PFK/ MHM/ SBT/ 13:00

( **सभापतीस्थानी माननीय सभापती** )

**<u>प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत.</u>**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपणाकडे नियम 289 अन्वये एक नोटीस दिलेली आहे. अधिवेशन सुरु झाल्यानंतर आता जवळजवळ दुसरा आठवडा संपत आला आहे. मागील आठवडयात दोन दिवस सुट्टीचे गेल्यामुळे तेवढया प्रमाणात कामकाज होऊ शकले नाही. या राज्यातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या आत्महत्त्यांच्या संदर्भात शासनाने ठोस अशी उपाययोजना करावी म्हणून सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन सभागृहात चर्चा करण्यासाठी ही नोटीस दिलेली आहे. शेतकरी हा राज्याचा कणा आहे आणि राज्यशासनाने पॅकेज घोषित केल्यानंतर सुध्दा 250 च्या वर आत्महत्त्या झालेल्या आहेत. ही समस्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे आणि यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे तसेच सविस्तर चर्चा झाली पाहिजे आणि या आत्महत्त्यांच्या मुळाशी गेले पाहिजे म्हणून या नोटीशीद्वारे विनंती करतो की, सभागृहाचे कामकाज बाजूला सारुन ही चर्चा करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अधिवेशन सुरु झाल्यापासून राज्यातील शेतकरी या अधिवेशनाच्या माध्यमातून शासनाकडून काही तरी मिळेल काय या अपेक्षेने अधिवेशनाकडे पाहतो. राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्त्येला सामोरे जात असतांना कांदा उत्पादक शेतकरी देखील उध्वस्त झालेला आहे. अशा प्रकारे चारही बाजूने अस्मानी संकट आलेले आहेच परंतु आता सुलतानी संकट सुध्दा येऊ घातलेले आहे अशी परिस्थिती सध्या या राज्यात निर्माण झाली आहे. अधिवेशनाच्या दुसरा आठवडा संपण्याच्या मार्गावर असतांना यासंबंधी कुठलीही ठोस उपाययोजना अथवा चर्चा देखील झालेली नाही. शासनाने शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केल्यानंतर तसेच इकडे माननीय अर्थमंत्री काल बजेट मांडत असतांना तिकडे शेतकरी आत्महत्त्या करीत होते. एवढी गंभीर समस्या असतांना शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न जर शासनाकडून होत नसेल, राज्यातील शेती धोरणाच्या संदर्भात भविष्यात काय उपाययोजना करणार हे समजणार नसेल तर या अधिवेशनाला काहीच अर्थ नाही. म्हणून आज सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या संदर्भात चर्चा घेण्यात यावी.

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अधिवेशन सुरु असतांना मागील आठवडयात 5 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आणि हे प्रमाण पॅकेज जाहीर केल्यानंतर सुध्दा वाढतच आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आज सभागृहासमोर पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे पण तरी देखील आपल्याला योग्य वाटत असल्यास आजच शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करावी हे फारच चांगले आणि काही अडचण वाटत असेल तर उद्या थोडा जास्त वेळ बसून यावर चर्चा करावी. कारण मंत्री महोदयांना थोडा तरी विचार करता येईल. म्हणून तातडीने ही चर्चा घेण्यात यावी अशी आमची भावना आहे.

श्री. विलासराव देशमुख : एका अतिशय गंभीर प्रश्नाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत त्यापेक्षा वेगळे मत शासनाचेही नाही. कारण या विषयावर अधिक सखोल चर्चा व्हावी, त्यातून काही उपाय सुचवावेत व काही मार्गदर्शनही मिळेल. तसेच शासनाने आतापर्यंत जे निर्णय घेतलेले आहेत त्यामध्ये आणखी दुरुस्ती करण्याची गरज असेल अथवा चर्चेनंतर जे प्रश्न उपस्थित होतील त्यासंदर्भात शासनाची भूमिका सकारात्मकच आहे. म्हणून यासंबंधीची योग्य वेळ ठरवून चर्चा घेण्यास शासन तयार आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन एका अत्यंत महत्वाच्या चर्चेला वेळ द्यावा यासाठी त्यांनी माझ्याकडे नोटीस पाठविली. त्यासंदर्भात माननीय विरोधी पक्षनेते, माननीय श्री. दिवाकर रावते तसेच माननीय श्री. गडकरी यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनीही याबाबतीत शासनाचेही हेच मत असल्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

यानंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

माननीय सभापती....

मला वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या वैयक्तिक भावना देखील अशाच असतील.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, त्याला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी ताबडतोब अनुमोदन दिलेले आहे. त्यांच्या पेक्षा मला काही निराळे सांगायचे नव्हते म्हणून मी त्यास मूक संमती दर्शविली आहे.

**सभापती** : या प्रश्नावरन चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास तहकूब करता कामा नये. प्रश्नोत्तराचा तासही महत्त्वाचा आहे. त्यामुळे तो पूर्ण झाला पाहिजे. आज आणि उद्या पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे. आपल्या सभागृहाचे कामकाज रोज दुपारी 1.00 वाजता सुरू होते. त्यामुळे उद्याच्या नियमित कामकाजाला दुपारी 1.00 वाजता सुरूवात न करता सकाळी 11.00 वाजता सुरूवात केली पाहिजे. उद्या साडेचार वाजेपर्यंत मंत्रिमहोदयांच्या उत्तरासह आपल्याला चर्चा संपवावी लागेल. त्यानंतर नियम 97 खाली अडीच तासाची चर्चा घेण्यात येईल. सर्वांनीच या विषयावर आपल्या भावना व्यक्त केलेल्या असल्यामुळे उद्या सायंकाळी 4.30 नंतर नियम 97 अन्वये चर्चेला सुरूवात होईल. तत्पूर्वी मंत्रिमहोदयांच्या उत्तरासह पुरवणी मागण्यांवरील चर्चा आपल्याला संपवावी लागेल.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे..

**संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळातील कोट्यावधीचा घोटाळा**

**(१) * १२७५२ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , डॉ. अशोक मोडक , श्री. विलास अवचट , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दिपक सावंत , श्री. अरविंद सावंत , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. विनायकराव मेटे , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. कन्हैयालाल गिडवानी :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर पालिकेतील प्राथमिक शाळामधील शिक्षकांची गोपनिय कागदपत्रे असलेल्या फायली चोरुन त्यातील कागदपत्राच्या आधारे कर्जपुरवठ्यात बनावट जामीनदार तयार करुन संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळाची कोट्यावधी रुपयांची फसवणूक करण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बनावट कागदपत्रे व बनावट जामीनदार दाखवून किती रकमेची कर्जे घेण्यात आली,
(३) या गंभीर प्रकरणात अडकलेल्या व्यक्तिविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे अथवा करण्याचे योजिले आहे ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री. चंद्रकांत हंडोरेयांच्याकरिता:** (१) अंशत: खरे आहे.
(२) रु. २७.७२ लाख रकमेची कर्जे घेण्यात आली.
(३) चौकशी सुरु आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, चर्मोद्योग महामंडळाचे माजी अध्यक्ष श्री.डोळस यांनी कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. परंतु, ज्यांचा या प्रकरणात दोष नाही त्यांच्यावर जप्ती आणून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यात आले आहे. संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळामध्ये कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे हे शासनाने अंशत: मान्य केलेले आहे. असे असताना देखील या प्रकरणात जे गुंतले आहेत, त्यांच्याविरूध्द फौजदारी कारवाई का करण्यात आलेली नाही ? या मंडळाचे माजी अध्यक्ष श्री.डोळस व व्यवस्थापकीय संचालकांविरूध्द बोगस कागदपत्र केल्याबद्दल त्यांच्या विरूध्द कारवाई का करण्यात आलेली नाही ? त्यांच्या विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना अटक का करण्यात आलेले नाही ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, हा कोकण विभागाचा प्रश्न आहे. कोकण विभागाचे विभागीय अधिकारी श्री.उदय शंकर शेठ आहेत. मुंबई शहर हे कोकण विभागामध्ये येते.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय ता.प्र.क्र.12752 हा "संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळातील कोटयवधीचा घोटाळा" यासंबंधीचा आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12752....

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, याप्रकरणी श्री.डोळस आणि श्री.शिवाजी बहिरव यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदर चर्मोद्योग घोटाळा हा महाराष्ट्रव्यापी आहे हे मंत्रिमहोदयांना मान्य आहे काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : होय.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळाची कोटयवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे काय ? असा प्रश्न विचारला असता, 'शासनाने अंशत: खरे आहे.' असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा 'अंशत: खरे आहे' या शब्दाचा अर्थ काय आहे ? तसेच, 'चौकशी सुरू आहे' असे देखील उत्तर दिले आहे. तेव्हा चौकशी कोणाच्या तक्रारीवरून कधी सुरू करण्यात आली आहे व कोणाला दोषी ठरविण्यासाठी चौकशी करण्यात येत आहे ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 13:10

ता.प्र.क्र.12752....

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, महानगरपालिकेने जी कागदपत्रे दिली आहेत त्यानुसार शासन चौकशी करीत आहे. गॅरेंटीसाठी ओव्हररायटींग करुन कागदपत्रे सबमिट केल्यामुळे 27.72 लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे. गॅरेंटीसंदर्भातील पत्र विभागाकडून आल्यानंतर कर्ज दिले आहे. वास्तविक पाहता गॅरेंटरसमोर कागदपत्रांवर स्वाक्षरी घ्यावयास हवी होती. परंतु तसे या ठिकाणी घडलेले नाही. त्यामुळे विभागीय अधिकाऱ्यांना सस्पेंड करुन, कारवाई करण्यात आली आहे. श्री.हनुमंत डोळस व शिवाजी बहिरव यांच्यावर पोलीस गुन्हे दाखल करावेत म्हणून राज्य सरकारने पत्र दिले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर असे प्रकरण आहे. सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.सदाशिवराव लोखंडे यांनी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय समाजकल्याण मंत्री यांचेकडे या चर्मोद्योग महामंडळातील घोटाळयासंदर्भात पत्र दिले होते. या महामंडळाने जो कर्ज पुरवठा केला आहे त्यामध्ये खोटी कागदपत्रे, शासकीय व निमशासकीय जमिनदारांच्या बोगस सहया व शिक्क्यांचा वापर करणे अशा प्रकारचे गंभीर आरोप करण्यात आले होते. माननीय संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरच्या प्रकरणासंदर्भात चौकशी करण्यास सांगितले होते. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी सुरु झाली. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.सदाशिवराव लोखंडे यांनी जी तक्रार केली होती त्याचा चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय ? आणि त्यामध्ये काय निष्पन्न झाले ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : महोदय, खोटया शिक्क्यांचा वापर आणि बनावट कागदपत्रे जोडण्यात आल्याचे चौकशीमध्ये आढळून आले. त्यामुळे महानगरपालिकेचे लिपिक श्री.नानाशंकर लोके यांना दिनांक 3 मार्च, 2006 रोजी निलंबित केलेले आहे. तसेच इतर तीन कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. यापूर्वी यामध्ये ज्या दोन अधिकाऱ्यांचा समावेश होता, त्यांची ट्रान्सफर केली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रकरणात गुंतलेली हनुमंत डोळस ही व्यक्ती ट्रान्सपरंट व्यक्ती आहे. या व्यक्तीने श्री.संतोष दगडू नारायणकर याला रक्कम मिळावी म्हणून पत्रच लिहीलेले आहे. त्यांनी पत्रामध्ये असे म्हटले आहे की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 13:10

ता.प्र.क्र.12752....

श्री.नितीन गडकरी.....

"पत्रास कारण की, आपल्या ठरल्याप्रमाणे व चर्चे प्रमाणे तुझे 407 टेम्पो (वाहन) प्रकरण मंजूर केले आहे. ठरल्याप्रमाणे सदर प्रकरणासाठी आवश्यक कागदपत्रे आमच्या मार्फत जोडलेली आहेत. कर्ज प्रकरण रुप.4,40,000/- मंजूर केलेले आहे. तसेच जामखेड तालुक्यातील मी सांगितल्याप्रमाणे तुझ्या नातेवाईकांचे सात प्रकरणांची कागदपत्र पूर्तता आमच्या मार्फत पूर्ण केलेली आहे.

वरील तुझ्या व तुझ्या नातेवाईकांच्या मंजूर प्रकरणाची आपले ठरल्याप्रमाणे रक्कम व पुढील प्रकरणासाठी आगाऊ रक्कम माझे प्रतिनिधी श्री.जयेश जोशी यांच्याकडे आज रोजी रुपये 5,10,000/- देणे, वाट पाहत आहे "

महोदय, मला वाटते ही व्यक्ती तर "पद्मश्री" आणि "पद्मविभूषण" देण्याच्या लायकीची आहे. यांनी रेकॉर्डच मेंटेन केले आहे. महोदय, या अधिकाऱ्यांनी तर या महामंडळामध्ये थैमान घातलेले आहे. या अधिकाऱ्यांचे दलाल राजरोसपणे वावरत आहेत. या महामंडळासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त असताना, त्यापैकी किती तक्रारींची चौकशी समाजकल्याण विभागाने केली आहे ? त्यात किती बोगस केसेस सापडल्या आहेत ? महोदय, तीन वर्षे या महामंडळाचे ऑडिट होऊ दिले गेले नाही. महोदय, जर या अधिकाऱ्यांना वाटले तर केवळ 50 रुपयांच्या स्टँप पेपरवर लिहूनच नव्हे तर, ते क्रॉस चेक सुध्दा घेतील. मला वाटते या डोळसने तर, डोळसपणाने हा प्रकार केलेला आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 12752 ....**

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, हा सर्व प्रकार आपल्या लक्षात आला का ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी, त्या व्यक्तीने नारायणकरांना लिहिलेले जे पत्र वाचून दाखविले, ते पत्र खरे आहे का, त्यावरील त्याची सही खरी आहे का, याबाबतची चौकशी करण्यासाठी पोलीस विभागाकडे पाठविले आहे. पोलीस विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर आम्ही कारवाई करणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण संबंधिताला निलंबित का करत नाही ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, त्या संबंधित दोघांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, असे पत्र लिहिण्यात आले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण त्या व्यक्तीच्या विरुध्द पोलिसांकडे गुन्हा दाखल करता, त्याची सही खरी आहे हे आपण मान्य करता, मग त्या संबंधित व्यक्तीला आपण अद्यापपर्यंत नोकरीवरुन का काढले नाही ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, चेअरमनला पदावरुन काढले आहे आणि भैरव व डोळस या दोघांवर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पत्र दिलेले आहे.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, "त्याला पद्मश्री व पद्मविभुषण देण्यात यावे " सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी केलेले वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

**सभापती** : ते वक्तव्य रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सरकार त्यांना पाठीशी घालत आहात हे बरोबर नाही. येथे अधिकाऱ्यांच्या संदर्भात काही उत्तर दिले नाही.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आम्ही कोणालाही पाठीशी घालत नाही. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात दिनांक 16 मार्चला प्रभारी व्यवस्थापक यांच्याकडे पत्र दिलेले आहे. त्याचप्रमाणे गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पोलीस आयुक्तांना देखील पत्र दिलेले आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 12752 ....**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पोलिसांना पत्र दिल्यानंतर, सही खोटी आहे हे पाहिल्यानंतर, तो पैसे घेतो हे सिध्द झाल्यानंतर, 50 रुपये किंमतीच्या प्रतिज्ञापत्रावर लिहून मिळाल्यानंतर, समाजकल्याण विभागाने चौकशी केल्यानंतर, या प्रकरणात कोण माणसे आहेत हे मान्य केल्यानंतर, माननीय समाजकल्याण मंत्रीमहोदयांनी संबंधितांना अटक करण्यासंदर्भात पोलिसांना पत्र दिल्यानंतर देखील त्यांच्यावर गुन्हा का दाखल होत नाही ? त्यांना अटक का होत नाही ? त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी आपण मुहूर्त पाहत आहात काय ? सभापती महोदय, भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीला सरकार पाठीशी घालत आहे, हे योग्य नाही. तरी, हे जर खरे असेल तर या संदर्भात पोलिसांना ताबडतोब आदेश देऊन संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करावा व या संबंधीचा खुलासा करावा.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात शासनाने 16 तारखेला पत्र दिलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा प्रश्न लागला नसता तर हे सर्व झाले नसते. हा किती अतिरेक आहे ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा गुन्हा आपल्या केव्हा लक्षात आला व या संदर्भातील माहिती केव्हा पाठविली ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, गुन्हा दाखल करण्यासंदर्भात आम्ही 16 तारखेला पत्र लिहिलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सुरुवातीला त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन्माननीय आमदार श्री. सदाशिवराव लोखंडे हे या संदर्भात 2-3 वेळा माझ्याकडे येऊन गेले. हे प्रकरण खरे आहे की नाही, या संदर्भातील माहिती सर्व महामंडळाकडून मागवून चर्चा केली. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी जे पत्र वाचून दाखविले, त्याची कॉपी त्यांनी मला दाखविली. पोलिसांकडून या संदर्भात अहवाल आल्यानंतर आम्ही जरुर कारवाई करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, तुम्ही या संदर्भात कन्व्हिन्स्ड आहात तर मग त्याला अटक का करत नाही ?

( उत्तर आले नाही. ) ( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12752...

श्री. पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदयांनी 16 मार्च रोजी पत्र दिलेले आहे. परंतु हे प्रकरण सन 2004 पासून उजेडात आलेले आहे. या विषयाच्या संदर्भात श्री. संतोष नारायणकर यांनी दिनांक 3.12.2004 रोजी माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री व संचालक, चर्मोद्योग महामंडळ यांना पत्रे दिलेली आहेत. ही तक्रार 2004 साली प्राप्त झालेली असतांना या कर्ज पुरवठयामध्ये जी बोगस 18 प्रकरणे आहेत ती 18 प्रकरणे मंजूर करतांना श्री. डोळस व श्री. भैरव यांनी रक्कम घेतल्याचे निष्पन्न झालेले आहे. हे प्रकरण सन 2004 मधील असतांना आपण 16 मार्च रोजी आयुक्तांना कारवाई करण्याठी पत्र पाठवित आहेत हे बरोबर आहे काय ? श्री. डोळस यांची सही आहे हे सिध्द झाल्यानंतर सुध्दा संबंधितांवर क्रिमिनल कारवाई का करण्यात आलेली नाही ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, यामध्ये 26 लाभार्थ्यांनी अर्ज केलेले होते त्यामध्ये 7 प्रकरणे ही बोगस आढळून आलेली होती. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ज्या लोकांनी ही प्रकरणे बोगस केलेली आहेत त्यांच्यावर शासनाकडून निश्चितपणे कडक कारवाई करण्यात येईल. येथे कोणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, आतापर्यंत ज्या सदस्यांनी मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यांच्या मुद्दयांना सविस्तर असे उत्तर मिळालेले नाही. श्री. डोळस आणि श्री. भैरव हे दोषी असतांना येथे उत्तर देण्यात येते की, "हे अंशत: खरे आहे." आम्ही येथे सातत्याने प्रश्न विचारीत असतांना, "अंशत: हे खरे आहे" असे उत्तर देण्यात येते, म्हणजे येथे सभागृहाची दिशाभूल करण्यात येत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. या उत्तराबाबत त्यांनी जातीने लक्ष घालावे अशी आमची विनंती आहे. या ठिकाणी जे जे आरोप करण्यात आलेले आहेत त्याबाबतीत ते "अंशत: खरे आहे" असे म्हटलेले आहे हे योग्य नाही. मुंबई महानगरपालिकेतील प्राथमिक शाळामधील शिक्षकांची गोपनीय कागदपत्रे असलेल्या फायली चोरुन त्यातील कागदपत्रांच्या आधारे कर्जपुरवठयात बनावट जामीनदार तयार करुन कोटयांवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे असा प्रश्न असतांना त्याला उत्तर आहे "अंशत: खरे आहे." या प्रश्नांचे गांभीर्य आपणास कळले नाही काय ? अंशत: म्हणजे काय ? याचा आपण खुलासा करावा असा माझा पहिला प्रश्न आहे.

....2....

ता.प्र.क्र.12752...

डॉ. अशोक मोडक...

त्यानंतर माननीय मंत्री श्री. हंडोरे यांना सन्माननीय आमदार श्री. सदाशिव लोखंडे हे भेटले होते असे त्यांनी सांगितले आहे. त्यावेळेस आपण हे उत्तर तपासून का पाहिले नाही ? असे उत्तर या ठिकाणी देणे बरोबर आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या बाबतीत श्री. डोळस व श्री. भैरव यांचा उल्लेख सुध्दा मंत्री महोदयांनी सुरुवातीला केलेला नाही. सुरुवातीला अधिकारी दोषी आहेत असेच ते म्हणाले आहेत. येथे अधिकाऱ्यांना धाऱ्यावर धरण्यात आलेले होते. म्हणून श्री. डोळस व श्री. भैरव यांच्यावर आपण काय करवाई करणार आहात ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या प्रकरणांचा उल्लेख केलेला आहे ती वेगवेगळी दोन प्रकरणे आहेत. एक प्रकरण मुंबई महानगरपालिकेशी संबंधित आहे त्यामध्ये 33 लाभार्थ्यांनी संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळाकडून कर्ज मिळावे यासाठी अर्ज केलेला होता. त्या अर्जासाठी जे जामीनदार दिलेले होते ते महानगरपालिकेतील शिक्षक होते. त्यांची कागदपत्रे त्या अर्जांना जोडलेली होती. ज्यावेळी लाभार्थ्यांकडून कर्ज फेडण्यास उशीर झाला त्यावेळी महामंडळाने कर्ज वसूलीसाठी लाभार्थी व जामीनदार यांना नोटिसा पाठविल्या.. त्या नोटिसा शिक्षकांना आल्यानंतर त्यातील काही शिक्षकांनी आम्ही कोणत्याही कर्जास जामीन राहिलेलो नाही असे त्यांनी महामंडळास सांगितले. या 33 लाभार्थ्यांपैकी फक्त 6 ते 7 प्रकरणे बोगस आढळून आलेली आहेत. इतर प्रकरणातील जामीनदार हे योग्य होते. तसेच दुसरा मुद्दा श्री. डोळस व श्री. भैरव यांच्या प्रकरणातील आहे. हे प्रकरण अहमदनगर येथील आहे. त्यामध्ये 26 लाभार्थ्यांनी कर्ज घेतले होते. त्यासंदर्भातील चौकशी महामंडळाकडून सुरु करण्यात आलेली आहे. या प्रकरणामध्ये जे जे दोषी आढळतील त्यांच्यावर नियमाप्रमाणे कडक कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.12752</u>**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. या प्रकरणी चर्मकार समाजाच्या गरीब मुलाची फसवणूक झाली आहे. 50 टक्के कर्जाची रक्कम घेऊन टाकण्यात आली आहे. तसेच एजंन्ट पाठवून फाईल्स काढून घेतलेल्या आहेत. हे काम लिपिकांनी केलेले नाही, त्यामुळे आपण खालच्या लोकांना का सस्पेंड करीत आहात ? हे सर्व काम मॅनेजिंग डायरेक्टर यांनी केलेले आहे. यामुळे मागासवर्गीय चर्मकार लोकांची फसवणूक झालेली आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सदनाच्या तीव्र भावना लक्षात घेऊन या प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्या विरुध्द तातडीने कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. सन 2004 मध्ये याबाबतीत मूळ तक्रार करण्यात आली आहे. आपल्याकडे पुरावे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अनेक कागदपत्रे आलेली आहेत. या प्रकरणी आर्थिक गुन्हयाच्या अनुषंगाने आपल्या विभागाने चौकशी करावी व त्या पध्दतीने पोलीस विभागाला चौकशी करण्यास सांगावे असे मी निदेश देतो.

श्री.चंद्रकांत हंडोरे : ठीक आहे.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नागलवाडी (जि. नागपूर) वनपरिक्षेत्रातील वन कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या दुरुस्तीबाबत

**(२) * १४८३९ श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील मौजे नागलवाडी येथील वनविकास महामंडळाच्या अधिपत्याखाली असलेले वनपरिक्षेत्रातील वन कर्मचाऱ्यांची निवासस्थाने कित्येक वर्षापासून दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवासस्थानाची दुरुस्ती करुन आवश्यक त्या सोई कर्मचाऱ्यांना पुरविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केलेली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (१) हे खरे नाही.

(२) मौजे नागलवाडी येथील वनविकास महामंडळाच्या अधिपत्याखालील असलेले वनपरिक्षेत्रातील वन कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सोई पुरविण्यात आलेल्या आहेत व विभागीय कार्यालयाला वा वरिष्ठ कार्यालयाला कोणत्याही निवासस्थानाचे विशिष्ठ दुरुस्तीचे प्रस्ताव/अंदाजपत्रक प्रलंबित नाहीत.

श्री.रमेश निकोसे : या ठिकाणी जी उत्तर देण्यात आली आहेत ती बरोबर नाहीत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, कर्मचा-यांनी त्यांच्या निवासाबाबत तक्रार केलेली नाही हे खरे आहे काय ? त्या कर्मचा-यांना कोणकोणत्या सोयी पुरवण्यात आल्या ? हा प्रश्न लागल्यानंतर याबाबत काळजी घेण्यात आली की त्या अगोदर घेण्यात आली ?

श्री.बबनराव पाचपुते : या संदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांना सांगू इच्छितो की, मौजे नागलवाडी या भागामध्ये पूर्वीच्या वस्तीमध्ये कर्मचा-यांची निवासस्थाने आहेत. प्रत्येकाला चटईक्षेत्राप्रमाणे निवासस्थान दिलेले आहेत. तक्रार येण्यापूर्वी सर्व व्यवस्था करुन देण्यात आली आहे. तसेच किरकोळ दुरुस्तीबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. किरकोळ दुरुस्तीबाबत कोणाचीही तक्रार आलेली नाही.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील वन विभाग, सामाजिक वनीकरण तसेच वन विकास महामंडळात रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(३) * १२७७२ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे , श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. प्रतापराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्र.६१३७ ला दि.२० जुलै,२००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन विभाग, सामाजिक वनीकरण व वन विकास महामंडळात गेल्या १५ ते २० वर्षापासून रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे,

(२) अशाप्रकारे रोजंदारीवर काम करणाऱ्या किती कर्मचाऱ्यांना १९९४ मध्ये निर्णय घेऊन कायम सेवेत सामावून घेतले होते,

(३) रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्यासाठी राज्य सरकारी वन कामगार सुविधा मंच संघटनेने दिनांक २ फेब्रुवारी, २००६ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(४) या कामगारांना कायम सेवेत सामावून घेणेबाबत काही निर्णय घेतला आहे काय ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (१) वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग व वनविकास महामंडळाकडे काम करणाऱ्या मजूरांची संख्या अनुक्रमे ९०६६, ३६०६ व १३५९ इतकी आहे.

(२) वनविभागामध्ये दि. १/११/१९८९ ते ३१/१०/१९९४ पर्यंत सलग ५ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या ८०३८ वनमजूरांना दि. ३१/१/१९९६ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदे निर्माण करुन कायम करण्यात आले.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दि. १९/१०/१९९६ च्या निर्णयानुसार ११६४ अधिसंख्य पदे निर्माण करुन १०६४ मजूरांना कायम करण्यात आले आहे.

वनविकास महामंडळामध्ये रोजंदारी मजूरांना नियमित करण्यात आलेले नाही.

(३) होय. हे खरे आहे.

(४) अद्याप निर्णय घेतलेला नाही. प्रस्ताव विचाराधीन आहे.

श्री.गोविंदराव आदिक : या प्रश्नाला शासनाने नेहमीच्या पध्दतीने उत्तर दिलेले आहे. हा प्रश्न गेल्या १२ वर्षांपासून प्रलंबित आहे. १४००० कामगारांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. आतापर्यंत अकरा ते साडेअकरा हजार कर्मचा-यांचे प्रश्न सोडविल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु नियमाप्रमाणे अजूनही १४००० कामगारांचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. याबाबत शासनाचे दुमत असेल असे मला तरी वाटत नाही. गेल्या १२ वर्षांपासून याबाबत दिरंगाई केली जात आहे.

( यानंतर श्री.सुंबरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आदिक (पुढे चालू...)  ता.प्र.क्र.12772...

बारा वर्षाची दिरंगाई ही फार मोठी आहे. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी अलिकडच्या काळामध्ये पाच मंत्री आणि 5 सचिव यांची एक समिती या संदर्भात नेमली आहे. मला हे कळत नाही की ही समिती आता कशासाठी ? एकदा आपण निर्णय घेतला आहे की, अशा कामगारांच्या बाबतीत, ज्यांची परिस्थिती सारखी आहे त्यांना अमुक अमुक न्याय दिला जाईल. त्या तत्त्वाप्रमाणे निर्णय झाला असेल तर मग राहिलेल्यांच्या बाबतीतही तसाच निर्णय घेण्याऐवजी पाच मंत्री आणि 5 सचिव यांची समिती नेमली आहे आणि त्या समितीची अजून एकही बैठक झलेली नाही. तेव्हा हे प्रकरण आपण आणखी किती वर्षे लोंबकळत ठेवणार आहात ? या बाबतीत निर्णयासाठी आणखी किती वर्षे घेणार आहात ? निश्चित कालावधीमध्ये याचा निर्णय आपण करणार आहात का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले ते खरे आहे. या संदर्भात 2-3 टप्प्यांवर चर्चा झाली आहे. 1994 सालापर्यंत ज्यांची सेवा पाच वर्षे पूर्ण झाली त्यांना कायम करण्याचा निर्णय झाला. त्यात हा एका खात्याचा केवळ संबंध नाही तर यामध्ये वन, सामाजिक वनीकरण आणि वन विकास महामंडळ अशा तीन विभागांचा संबंध आहे आणि या तिन्ही विभागांमध्ये रोजंदारीवर असलेले, रो.ह.यो.साठी काम करणारे असे जे कामगार आहेत त्यांचे वेगवेगळे प्रश्न असल्याने ही समिती नेमली आहे व तिच्या बैठकाही झाल्या आहेत. ते सुरू असतानाच सर्वोच्च न्यायालयाकडून पिटीशन क्र.323-325/98 च्या संदर्भात निर्णय मध्यंतरी बाहेर आला. त्याप्रमाणे बॅक एन्ट्रीने कोणालाही नोकरीमध्ये घेऊ नये असे सुप्रीम कोर्टाने सांगितले. त्यामुळे शासनाकडून देखील त्याबाबत जी.आर.काढला गेला. या शिवाय परत एकदा बैठक झाली आणि विधी व न्याय विभागाकडून या संबंधात त्यांचे अभिप्राय काय आहेत ते मागविण्यासाठी प्रकरण विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आले आहे. त्यांचा जो काही सल्ला याबाबत येईल त्याप्रमाणे मग निर्णय घेण्यात येईल.

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, आता नामदार मंत्र्यांनी जी माहिती दिली ती वस्तुस्थिती आहे यात शंका नाही. पण माझा प्रश्न एवढाच आहे की, किती कालावधीमध्ये यासंबंधात आपण निर्णय करणार आहात ? माझ्या या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. तसेच त्यांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टाचा निर्णय अलिकडच्या काळामध्ये आलेला आहे. पण तो रोजंदारीवर असलेल्या कामगारांना लागू होत नाही ही गोष्ट तपासून घेण्याचीही गरज नाही इतकी

...... जी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आदिक (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 12772 ....

स्पष्ट आहे. ज्या ठिकाणी व्हेकन्सीज असतील, डिक्लेअर्ड पोस्टस् असतील तेथे रोजंदारीच्या माध्यमातून सेवेत आलेल्या कामगारांच्या बाबतीत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार हा प्रश्न उपस्थित होत नाही. कारण आता प्रत्येक विभागामध्ये रोजंदारीवरील कामगार असतात आणि त्यांना रेग्युलर सेवेत आपण घेत असतो. त्यामुळे सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे म्हणून या प्रकरणी निर्णय लांबणीवर टाकणे काही योग्य होणार नाही. तेव्हा या 14 हजार लोकांच्या बाबतीतही आपण पूर्वी निर्णय घेतला आहे त्यानुसार न्याय द्यावा, तो आपण देणार का आणि किती कालावधीत देणार ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितली ती वस्तुस्थिती खरी आहे. त्याबाबतीत शासनाची भूमिका तशीच होती व आहे. ज्यावेळेस संपूर्ण 3-4 खात्यांच्या कर्मचाऱ्यांची लिस्ट करणे, त्यावेळी त्यांचा एकूण कार्यकाल किती आहे, त्यांची तुटक तुटक अशी जी सेवा आहे ती लक्षात घेऊन लिस्ट करण्यात वेळ गेला. त्या दरम्यान सुप्रीम कोर्टाचा निर्णय आला आणि त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भात 28.8.2005 ला एक परिपत्रक काढले. त्याप्रमाणे बॅक डेटेड कोणाचाही विचार आपल्याला करता येणार नाही असे ठरविले गेले. तरी देखील या कर्मचाऱ्यांच्या संघटनेने आम्हाला परत एक पत्र दिलेले आहे. त्यामुळे आता याबाबतीत विधी व न्याय विभागाकडून आपण सल्ला घेत आहोत त्यासाठी त्यांच्याकडे ही बाब पाठविली आहे. त्यांच्याकडून याबाबत सल्ला येईपर्यंत यावर आपण काही करू शकत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.आदिक यांनी वारंवार सांगितले की, याबाबतीत सुप्रीम कोर्टाचा निर्णय आडवा येत नाही. तरीही विधी व न्याय विभागाकडे अभिप्रायासाठी हे प्रकरण पाठवावे लागेल असे मंत्री महोदय सांगत आहेत. तर मग या प्रक्रियेला साधारणत: किती वेळ लागेल आणि या बाबतीत आपण निर्णय किती दिवसात घेणार आहात ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, वेळेचा प्रश्न नाही. एकदा निर्णय कायद्याप्रमाणे झालेला आहे आणि या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक काढलेले आहे. म्हणूनच आता याबाबतीत विधी व न्याय विभागाचा सल्ला आपण घेत आहात आणि त्यासाठी या युनियनने दिलेली सर्व कागदपत्रे आपण विधी व न्याय विभागाकडे दिलेली आहेत. ..

( यानंतर श्री. सरफरे .... एच 1 ..

ता.प्र.क्र. 12772...

श्री. बबनराव पाचपुते...

त्या कागदपत्रांची छाननी विधी व न्याय विभागामार्फत सुरु असून ती छाननी पूर्ण झाल्यानंतर व त्यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. याकरीता किती अवधी लागेल हे सांगता येत नाही.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, हा सरकारचा नाकर्तेपणा आहे. सुप्रिम कोर्टाने बॅक इफेक्टने करा असे सांगितले नाही. बॅक डोअर इंट्री करु नका असे सांगितले आहे. नवीन भरती करीत असतांना क्वॉलिफाईंग क्रायटेरीया तपासण्याचा अधिकार सरकारला आहे. आणि सरकार जिल्हा निवड समितीला सांगू शकते की, ज्या कर्मचाऱ्यांनी सतत पाच वर्षे काम केले आहे त्यांना प्राधान्य देण्यात येईल. Where there is a will there is a way. But where there is no will. हा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे की, या रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना विशिष्ट कालावधीमध्ये नोकरीमध्ये सामावून घेण्यासाठी त्यांना प्राधान्य देण्यात येईल अशाप्रकारचे नियम व अटी टाकून जिल्हा निवड समितीमार्फत भरती केली जाईल काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. या संदर्भात परिपत्रक काढल्यानंतर विधी व न्याय विभागाकडे जी माहिती तपासण्यासाठी दिलेली आहे त्या संदर्भात विधी व न्याय विभागाकडून निश्चित मार्गदर्शन करण्यात येत नाही तोपर्यंत आम्ही काही करु शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. माननीय सदस्यांनी दिलेली माहिती व शासनाचे अभिप्राय विधी व न्याय विभागाला कळविले आहेत. आणि या संदर्भात लवकरात लवकर मागदर्शन करण्यात यावे असे त्यांना सांगण्यात आले आहे. विधी व न्याय विभागाचे मार्गदर्शन न घेता कारवाई करणे चुकीचे होईल.

श्री. नितीन गडकरी : विधी व न्याय विभागाचे मार्गदर्शन आपणास किती कालावधीमध्ये मिळणार आहे? एक महिन्याच्या आत मार्गदर्शन मिळणार आहे काय? त्यावर अंतिम निर्णय काय होणार आहे? नाही तर पुढील अधिवेशनामध्ये विधी व न्याय विभागाचे मार्गदर्शन प्रतिक्षा यादीवर आहे असे आपण आम्हाला सांगाल.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, लवकरात लवकर म्हणजे एक महिन्याच्या आत आम्ही मार्गदर्शन घेऊ.

........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12772...

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, मंत्रिमहोदय सभागृहाला उत्तराच्या माध्यमातून देत असलेली माहिती बरोबर नाही  ती दुरुस्त केली पाहिजे असे मला वाटते. पहिली गोष्ट अशी की, मंत्रिमहोदय ज्या परिपत्रकाचा उल्लेख करीत आहेत ते सुप्रिम कोर्टाने काढले नसून शासनाचे आहे. सुप्रिम कोर्टाने या प्रकरणामध्ये निर्णय दिलेला नाही. रोजंदारीवरील कामगारांच्या प्रश्नाशी त्याचा काही संबंध नाही. दुसऱ्या एका प्रकरणामध्ये सुप्रिम कोर्टाने निर्णय दिलेला असेल तर तो निर्णय या प्रकरणाला लागू केला आहे. त्या ठिकाणी ज्या जागा भरावयाच्या आहेत त्या बॅक डोअर इंट्री पध्दतीने भरण्यात येऊ नयेत अशाप्रकारची तक्रार होती म्हणून त्यासंबंधी निर्णय दिला आहे. मूळ सुप्रिम कोर्टातील प्रकरण वेगळे आहे. या ठिकाणी 14 हजार कर्मचारी वर्षानुवर्षे काम करीत आहेत. त्यांच्या सेवेला 25 वर्षे पूर्ण होतील. तेव्हा केवळ 5 वर्षाचा सेवाकाळ धरला तर त्या निर्णयाचा या कर्मचाऱ्यांना फायदा मिळणार नाही. म्हणून या संदर्भात विधी व न्याय विभागाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता नाही. शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेतला पहिजे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंबंधी तातडीने निर्णय घेण्याच्या दृष्टीने एक महिन्याच्या आत विधी व न्याय विभागाकडून मार्गदर्शन प्राप्त होईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**घोडबंदर (जि.ठाणे) येथील मानपाडा भागात एका**

**इसमावर बिबट्याने केलेला हल्ला**

**(४) * १४१४२ श्री. नतिकोद्दीन खतिब , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. यशवंतराव गडाख : ** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) येथील मानपाडा या ठिकाणी दिनांक २० डिसेंबर, २००५ रोजी वा त्यासुमारास एका इसमावर बिबट्याने केलेल्या हल्ल्यात सदरहू इसम गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या घटनेत जखमी झालेल्या व्यक्तीला आर्थिक मदत देण्याबाबत तसेच वांरवार होत असलेल्या बिबट्यांच्या हल्ल्यांना रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (१) घोडबंदर (जि. ठाणे) येथील टकारडा (ओवळा) या ठिकाणी दिनांक २०.१२.२००५ रोजी बिबट्याच्या हल्ल्याने एक इसम जखमी झाल्याची घटना घडली आहे.

(२) होय.

(३) या घटनेत जखमी झालेल्या व्यक्तीस नियमानुसार मदत देण्यात आली आहे. वारंवार होणाऱ्या बिबट्याच्या हल्ल्यांना रोखण्यासाठी वन कर्मचाऱ्यांची गस्तीपथके तयार करुन रात्रंदिवस गस्त घालण्यात येत आहे तसेच वन कर्मचारी व पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन घेऊन बिबट्यास दाट जंगलात सीमितकरण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. संबंधित परिसरातील रहिवाशांना बिबट्या वाघापासून घ्यावयाच्या खबरदारीच्या सूचना पाड्यापाड्यावर फिरुन व भिंतीपत्रकांद्वारे देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री नतिकोद्दीन खतिब : सभापति महोदय, 20 दिसम्बर, 2005 को मानपाड़ा में बिबटया ने एक व्यक्ति पर हमला करके उसे गंभीर रुप से जख्मी कर दिया था. मैं यह जानना चाहता हूं कि सरकार की तरफ से जख्मी व्यक्ति को कितनी सहायता दी गई है ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि उत्तर क्रमांक तीन में यह उल्लेख किया गया है कि, " वन कर्मचारी व पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन घेऊन बिबटयास दाट जंगलात सीमित करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे " तो मैं यह

...4

जानना चाहता हूं कि किस प्रकार के प्रयत्न किए जा रहे हैं, क्या मंत्री महोदय इसकी जानकारी देंगे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, बिबटयाने किंवा वन्य प्राण्यांनी वन क्षेत्राच्या आतमध्ये हल्ला केल्यानंतर नुकसान भरपाई दिली जात नाही. आणि वन क्षेत्राच्या बाहेर जर त्या वन्य प्राण्यांनी हल्ला केला तर त्या प्रकरणी नुकसान भरपाई दिली जाते. या प्रकरणामध्ये वन क्षेत्राच्या बाहेर बिबटयाने हल्ला केला असल्यामुळे त्यांना १० हजार रुपयांची नुकसान भरपाई तातडीने देण्यात आली आहे. त्याबाबत त्यांची काहीही तक्रार नाही. दुसरे असे की, त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना पाठवून त्यांनी गस्त घालून त्या बिबटयाला परत पाठविण्याचे काम केले आहे. सध्या त्या भागामध्ये जनजागृतीचे काम सुरु आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14142 (पुढे सुरु...

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे ठाणे, घोडबंदर आणि बोरिवली याच्या मधे आहे. या उद्यानातील बिबटे हे सातत्याने हद्द सोडून बाहेर येत असतात. या उद्यानामध्ये किती बिबटे आहेत, याबाबतचा सेन्सेस खात्यामार्फत करण्यात आलेला आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सेन्सस करण्यात आलेला आहे

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, नरभक्षक बिबट्यांकडून माणसांवर वारंवार हल्ले होत आहेत. मध्यंतरी एका बांधकाम मजुराच्या चार वर्षाच्या मुलाला डोळ्या देखत पळवून नेल्याची धटना घडलेली आहे, त्याचे प्रेत थेऊरच्या डोंगरावर सापडले. याच घोडबंदर परिसरामध्ये आता श्री.भोयर नावाच्या इसमावर हल्ला करुन त्यास जखमी केलेले आहे. नर भक्षक बिबटे मनुष्य वस्तीमध्ये येत आहेत. या जनावरांना पुरेसे जंगल उपलब्ध नाही काय ? त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कायम स्वरुपी कोणती योजना डोळयासमोर आहे ? संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये एकूण किती बिबटे आहेत, याची मोजदाद करण्यात आलेली आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : त्या ठिकाणच्या बिबट्यांचा सेन्सस झालेला आहे. या नॅशनल पार्कमध्ये एकूण 25 बिबटे आहेत. लोकसंख्या वाढलेली आहे, त्यामुळे अतिक्रमणे होत आहेत. आता त्या ठिकाणी भिंत घालण्याचे काम चालू आहे.

श्रीमती सुधा जोशी : कायमस्वरुपी काय उपाययोजना करणार आहात ?

श्री.बबनराव पाचपुते : कायमस्वरुपी योजना तयार केलेली आहे. 32 कि.मी. भिंत घालण्याचे काम सुरु आहे. त्या भागातील लोकांचे दुसरीकड स्थलांतर करुन त्यांचे पुनवर्सन केले जात आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुंबईच्या जवळ नैसर्गिक जंगल आहे हे आमचे भाग्य आहे. 3 वर्षापूर्वी बिबट्यांचा सेन्सस झाला तेव्हा बिबट्यांची संख्या 42 होती, आता 25 वर आल्याचे सांगण्यात येते. म्हणजे बिबट्यांची संख्या कमी झालेली आहे. एका बिबट्याला किती चौरस मिटरचे जंगल राखीव ठेवलेले असते, त्यांचा टेरेटरी मार्क किती असतो ? तेवढे त्यांना पुरेसे जंगल आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, मध्यंतरी त्यांना भक्ष मिळावे, म्हणून भटकी कुत्री, डुकरे जंगलात सोडलेली होती, त्याचा काही परिणाम झालेला आहे आहे. आता बिबट्यांना भक्ष मिळावे, म्हणून कोणती उपाययोजना केलेली आहे ?



ता.प्र.क्र.14142 (पुढे सुरु...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, बिबट्यांना लागेल तेवढी जमीन त्या ठिकाणी शिल्लक आहे. बिबट्यांचा सेन्सेस झालेला आहे. बिबट्यांच्या संख्येपेक्षा जास्त भक्ष प्राणी त्यांना खाद्य म्हणून उपलब्ध आहेत. सहजा सहजी भक्ष मिळावे, म्हणून ते जंगलाच्या बाहेर येतात. माणसांनी आात जाऊ नये, अशाप्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत.

--

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**म्हसळा (जि. रायगड) तालुक्यातील हिंगुळहोड या नैसर्गिक**

**डोहावर बांधलेल्या बंधाऱ्याबाबत**

**(5) * 12781 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) म्हसळा (जिल्हा रायगड) तालुक्यातील हिंगुळहोड या नैसर्गिक डोहावर एकाच ठिकाणी दोन बंधारे, एकाच नदीला दोन वेगवेगळे प्रवाह दाखवून बांधण्यात आले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या बंधाऱ्यांच्या कामाला प्रशासकीय मंजूरी कोणी व केंव्हा दिली,

(3) या बंधाऱ्यांच्या कामाला प्रत्यक्षात सुरवात केंव्हा करण्यात आली,

(4) या बंधाऱ्यांच्या बांधकामांवर आतापर्यंत किती खर्च झाला ?

**श्री.राजेश टोपे, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) नाही. तथापि एकाच प्रवाहावर सलग दोन बंधारे बांधलेले आहेत.

(2) सदर दोन्ही बंधाऱ्यांना प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा, रायगड यांनी दि. 11.12.1998 रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(3) सदर बंधाऱ्याचे बांधकाम जानेवारी, 1999 मध्ये सुरु करण्यात आले.

(4) या दोन्ही बंधाऱ्याच्या बांधकामावर आतापर्यंत रु. 4,91,241/- इतका खर्च झाला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये दोन बंधारे असल्याचे म्हटलेले आहे. मी त्या बंधाऱ्याची पहाणी केलेली आहे. म्हसळा शहरापासून जवळ असलेल्या गावामध्ये एक बंधारा असतांना दोन बंधारे दाखवून त्या कामाची वेगवेगळी एस्टीमेट करुन दोन बंधारे बांधल्याचे दाखवून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेले आहे असे माझे म्हणणे आहे.

श्री.नितीन गडकरी (बसून) : दोन पक्षांनी दोन बंधारे बांधले असतील.

श्री.जयंत प्र.पाटील : यामध्ये राष्ट्रवादी पक्षाचा काही संबंध नाही.

**सभापती** : सनमाननीय सदस्यांनी माझ्याकडे पाहून बोलावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी आपल्याकडे पाहून बोलतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12781 .... श्री. जयंत पाटील ....

या बंधाऱ्याच्या ठिकाणी झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल म्हसळा पंचायत समितीने एकमताने ठराव करुन या कामाची ताबडतोब चौकशी करुन हे काम थांबवावे अशी मागणी केली होती, ही गोष्ट खरी आहे काय ? हे काम आश्वासित रोजगार योजनेतून घेतले होते काय ? जर त्या योजनेतून हे काम घेतले असेल तर आश्वासित रोजगार योजना बंद झालेली असल्यामुळे आता हे काम कोणत्या तरतुदीतून होणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हे काम 1998 चे सालचे आहे. यामध्ये ही वस्तुस्थिती आहे की, एकाच प्रवाहावर एकच काम होते. त्याचे दोन एस्टीमेट्स करुन, दोन प्रशासकीय मान्यता घेऊन हे काम 11.12.1998 ला मंजूर करण्यात आले. एक एस्टीमेट 4 लाख 30 हजार रुपयांचे होते आणि दुसरे एस्टीमेट 4 लाख 25 हजार रुपयांचे होते. आताही ते काम अर्धवट अवस्थेमध्ये आहे. मधल्या काळात निश्चितपणे त्याबाबत बऱ्याच तक्रारी उद्‌भवल्या तसेच आश्वासित रोजगार योजना बंद झाली. नवीन एस.जी.आर.वाय. योजना सुरु झाली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने 2005 मध्ये लघु पाटबंधारे विभागाचे अधिक्षक अभियंता यांची त्या ठिकाणी भेट झाली. नवीन सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन हे काम पूर्ण करावे अशा सूचना त्यांनी जिल्हा परिषदेला दिलेल्या आहेत. त्यांना नवीन सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये नवीन योजनेच्या माध्यमातून मंजुरी दिली जाईल. येत्या पावसाळयाच्या अगोदर हे काम पूर्ण केले जाईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, हे गंभीर प्रकरण आहे. त्या ठिकाणी एकच काम दोन बाजूने दाखविलेले आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब म्हणाले त्याप्रमाणे या कामाला 1998 साली मान्यता मिळालेली आहे. युती शासनाच्या काळातील हे काम आहे. एका बाजूने शिवसेना आणि दुसऱ्या बाजूने भारतीय जनता पक्ष या दोघांच्या भांडणामुळे हे काम अर्धवट पडलेले आहे काय ? आता शासन हे काम पूर्ण करणार आहे काय ?

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्यातील अनावश्यक भाग कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

ता.प्र.क्र. 12781 ......

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यावेळी सन्माननीय सदस्य हे आमच्याबरोबर होते. त्यांच्या पत्रावर ते काम मंजूर केले...

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, एकाच कामाचे दोन एस्टीमेट केले. दोन्ही बाजूने काम दाखविले. दोन्ही ठिकाणी भ्रष्टाचार केला. त्याची बिले उचलली आणि काम अर्धवट सोडलेले आहे. त्याची चौकशी करण्याचे सुध्दा निश्चित केले होते. कोणाच्या दबावामुळे ही चौकशी अपूर्ण राहिली का ? सभापती महोदय, ....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारत आहे.

**सभापती** : मी आपल्याला परवानगी देत नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्यामार्फत माझा सन्माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न आहे की..

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय,.....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभापती महोदय, आपण या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना वारंवार सांगत आहात तरीही सन्माननीय सदस्य पुन्हा बोलत आहेत हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. त्यांचे हे वागणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य हे सन्माननीय सभापतींचा अपमान करीत आहेत. सन्माननीय सदस्य वारंवार बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. नाही तर आपण त्यांना ताकीद दिली पाहिजे. आपण सांगितल्यानंतरही ते वारंवार बोलण्याचा प्रयत्न करीत आहे ही गोष्ट बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी दिलगिरी व्यक्त करावी.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.12781 पुढे सुरु...)

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. नितीन गडकरी : माननीय सदस्यांनी अशा प्रकारे वागणे इष्ट नाही. त्यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.

**सभापती** : सर्व माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे. सदनाच्या दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांना योग्य न्याय देण्याची माझी पीठासीन अधिकारी म्हणून सातत्याने भूमिका राहिलेली आहे. परंतु त्याच बरोबर मला सहकार्य देण्याच्या दृष्टीने मी सांगितल्यानंतर त्याच क्षणी माननीय सदस्यांनी बसणे आणि मी सांगितल्यानंतर त्यांनी उठणे अशा प्रकारची शिस्त पाळणे आवश्यक आहे. प्रश्न विचारण्याच्या निमित्ताने 4 मिनिटे बोलत राहाण्याची पध्दत माननीय सदस्यांना सोडावी लागेल. सदनाच्या प्रथा, पंरपरा, शिस्त आणि काम करण्याची पध्दत या संदर्भात माननीय सदस्यांचे वर्तन शिस्तीच्या कक्षेत बसणारे नाही. माननीय सदस्यांनी दिलगिरी व्यक्त करावी असे मी त्यांना सांगणार नाही. परंतु माननीय सदस्यांचे निश्चितच चुकलेले होते. माननीय सदस्यांनी ही पध्दत सोडावी अशी माझी त्यांना विनंती आहे. माननीय सदस्यांना मी एकदा खाली बसण्यास सांगितल्यानंतर त्यांना पुनश्च प्रश्न विचारण्याची संधी दिलेली आहे, हे माननीय सदस्यांनी विसरु नये.

श्री. विनोद तावडे : एकाच कामाची दोन एस्टिमेटस् केलेली आहेत. टेंडर मागविता येऊ नयेत या उद्देशाने या दोन कामाची एस्टिमेटस् 5 लाखाच्या खाली केलेली असतील तर त्या अधिका-यावर आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री. राजेश टोपे : आश्वासित रोजगार योजनेतील कामाचे टेंडर काढले जात नाही. ते काम ग्रामपंचायतीने करावयाचे असते. मजुरांना पेमेंट करण्यासाठी ग्रामपंचायतीला पैसे दिले जातात. त्यामुळे त्यामध्ये भ्रष्टाचाराचा प्रश्न निर्माण होत नाही.

श्री.जयंत प्र. पाटील : ज्या अधिका-याने हे काम कोणाच्या तरी दबावामुळे केलेले आहे त्या अधिका-याची विभागीय अधिका-यांमार्फत चौकशी करुन त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.12781 पुढे सुरु...)

श्री. राजेश टोपे : या कामाच्या बाबतीत एवढे गांभीर्य निश्चितपणे आहे की, 5 लाख रुपये खर्च होऊन ब-याच वर्षापासून काम अर्धवट अवस्थेत राहिलेले आहे. या कामामध्ये दिरंगाई झालेली आहे. त्याबाबतीत जिल्हा परिषदेच्या सीईओ मार्फत चौकशी करण्यात येईल.

----

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 13:50

## किनारपट्टीवरील खारफुटीच्या जंगलाचा ऱ्हास रोखण्यासाठी करण्यात येणारी उपाययोजना

**(६) * १५६१४ श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनारपट्टीवरील खारफुटीच्या जंगलाचा ऱ्हास रोखण्यासाठी सदरचे जंगले ताब्यात घेऊन त्यांना संरक्षण देणे व त्यांची पुनर्लागवड करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (१) होय.

(२) शासनाच्या मालकीच्या जमिनींवरील कांदळवनांना संरक्षित वने म्हणून घोषित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने कांदळवनांचे महाराष्ट्र रिमोट सेंसींग ॲप्लीकेशन सेंटर, नागपूर यांचे मार्फत दूरसंवेदी उपग्रहांद्वारे विस्तृत नकाशे तयार करण्यात येत आहेत. त्यानंतर क्षेत्रांवर सर्वेक्षण करुन व संरक्षित वने म्हणून घोषित करुन ती वन विभागाकडे हस्तांतरीत केली जातील व जेथे शक्य आहे तेथे पुनर्लागवड केली जाईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : छापील उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "शासनाच्या मालकीच्या जमिनींवरील कांदळवनांना संरक्षित वने म्हणून घोषित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे." खाजगी जमिनीवर देखील कांदळवने आहेत. खारफुटीची झाडे आणि कांदळवने यामध्ये फरक आहे. त्यामुळे हा फरक लक्षात घेऊन शासन कारवाई करणार आहे काय ? कांदळवने अशाप्रकारे तयार झालेली आहेत की, त्या झाडाच्या बिया जमिनीवर पडून झाडे वाढत जातात. वन विकासाच्या दृष्टीने हे धोकादायक आहे. तेव्हा शासनाची याबाबतीत निश्चित भूमिका काय आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : मॅनग्रोव्हज् जगली पाहिजेत, त्यांचे संरक्षण झाले पाहिजे याबाबतीत काही संस्था उच्च न्यायालयामध्ये गेल्या आणि उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मॅनग्रोव्हज्चे संरक्षण आणि पाहणी करण्याचे काम वन खात्या मार्फत सुरु आहे. खाजगी जमिनीवरील 252 हेक्टरमध्ये ही कांदळवने, मॅनग्रोव्हज् आहेत. त्यांचे संरक्षण आणि पाहणी करण्याचे काम वन खात्याकडे आहे. त्या खाजगी जमिनीवर वनेतर कामे करण्यास हरकत राहाणार नाही. बाकीची

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 15614...) (श्री. बबनराव पाचपुते...

कामे करता येतील. कांदळवनाचे, मॅनग्रोव्हज्‌चे संरक्षण करण्याची जबाबदारी उच्च न्यायालयाने वन खात्याकडे दिलेली आहे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 15614 पुढे सुरु....

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वेगवेगळया प्रकारची आपण वनीकरणाची चर्चा करीत आहोत. पर्यावरणाचा हा जो ऱ्हास होत आहे त्याचाही यामध्ये समावेश करण्याचा शासनाचा विचार आहे काय ? कारण हा विषय सुध्दा पर्यावरणाशी निगडीत आहे. खारफुटीच्या जंगलाचा ऱ्हास रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनेमध्ये याचा समावेश केला तर स्वाभिविकपणे कोकणाच्या किनाऱ्यावर खारफुटीच्या जंगलाचा ऱ्हास होत आहे आणि वृक्षतोड होत आहे त्यापासून संरक्षण मिळणार आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंदर्भात कारवाई झालेली आहे. पूर्ण जंगल वाचले पाहिजे म्हणून वन खाते सतर्क आहे. सरकारी जमिनी आहेत त्याठिकाणी संरक्षण केले जातेच. परंतु खाजगी जमीन आहे त्याठिकाणी सुध्दा वनसंहिता लावून वनाच्या व्यतिरिक्त त्या जमिनीवर दुसरे काही काम करता येत नाही. शासनाने आता वनसंज्ञा लागू केली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पर्यावरणाच्या दृष्टीने आणि समुद्र किनारपट्टीवरील जंगलाचा ऱ्हास रोखण्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई शहराच्या बाजूबाजूला असलेल्या वनसंपदेवर जर अतिक्रमणे काढून टाकली असती तर कदाचित गेल्या वर्षी आलेल्या महापुरामध्ये मुंबईचे संरक्षण झाले असते. मुंबईच्या बाजूबाजूला आणि मुंबईमध्ये जी वनसंपदा आहे त्यावर जी अतिक्रमणे होत आहे ती त्वरीत काढली जातील काय ? मुंबईतील खाडीभाग या अतिक्रमणातून मोकळा केला जाईल काय ? वनस्पतींची वाढ होणे हे पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून ही अतिक्रमणे तात्काळ काढली जातील काय ? वनस्पतींची वाढ होण्यासाठी जमीन मोकळी केली जाईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न गंभीर आणि महत्वाचा आहे. सरकारने वन खात्याचे मुख्य संरक्षक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्तील केली होती. या समितीने अभ्यास करुन अहवाल तयार केलेला आहे आणि तो अहवाल शासनाने स्वीकारलेला आहे. 1463 हेक्टर जमीन कांदळवन म्हणून राखण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. सरकारी आणि खाजगी अशी मिळून ही जमीन आहे. खाजगी जमिनीमध्ये अतिक्रमण झाले तर वनसंज्ञा लावली जाईल आणि त्यामुळे तेथे बांधकाम करता येणार नाही. या जमिनीमध्ये काही अनावश्यक मटेरियल टाकलेले असते ते सुध्दा काढून टाकण्याचा आमचा प्रयत्न आहे. हे सर्व

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 13:55

ता.प्र.क्र. 15614 पुढे सुरु..

श्री.बबनराव पाचपुते ...

जंगल राखण्याची जबाबदारी वन खात्याने घेतलेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप केला जाणार नाही आणि होऊ दिला जाणार नाही. अतिक्रमणे करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, कांदळवनाची डेफिनेशन कोणती ? एक झाड जरी असेल तर कांदळवन म्हणून संरक्षक भिंत घातली जाते.

श्री. बबनराव पाचपुते : एक झाड असेल तर कांदळवन मानत नाही. त्याचा सर्व्हे झालेला आहे. कांदळवनाचा सलग पट्टा गृहीत धरलेला आहे. यामध्ये मुंबई आणि ठाणे परिसरातील 1463 हेक्टर जमीन कांदळवन म्हणून निश्चित करण्यात आली आहे.

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी अतिशय पॉझीटीव्ह उत्तर दिलेले आहे. शासनाने याबाबतीत एक समिती देखील नियुक्त केली आहे. माझी सूचना अशी आहे की, मंत्रीमहोदय हे चांगले प्रवचनकार आहेत त्यामुळे या महत्वाच्या विषयावर त्यांनी प्रवचनाचे कार्यक्रम ठेवले तर चांगले होईल.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, "सजेशन् फॉर ॲक्शन्".

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. कानडे..... 14:00

ता. प्र. क्र. 15614.........

श्री. अरविंद सावंत : महोदय, यामध्ये मुख्य म्हणजे खाजगी आणि शासनाच्या जमिनीवरील खारफुटी तोडून अतिक्रमण केले असेल, तसेच खाजगी जमिनीवर एखादे झाड असेल तर त्याला तेथे काम करु देत नाहीत अशा परिस्थितीत शासन या खारफुटीला संरक्षण देणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर नागपूर येथील रिमोट सेंसींग ॲप्लीकेशन सेंटर जे आहे त्यांचा सर्व्हे प्राप्त झाल्यानंतर त्याच्या पलिकडे आपण जाणार नाही आणि त्याच्या अलिकडे कोणाला येऊ देणार नाही म्हणून कुठेही हे वन असले तरी ते राखण्याची जबाबदारी आपण घेतलेली आहे. मग ते एक झाड असेल तर ते नकाशामध्ये येणार नाही म्हणून त्यासंबंधीचा विचार करण्याची आवश्यकता नाही. परंतु कोणी जर एक्स्ट्रा मटेरियल ठेवावयाचे असेल व त्यासाठी अतिक्रमण केले असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : महोदय, या निमित्ताने एका ज्वलंत समस्येला सभागृहात वाचा फुटलेली आहे. मुंबई शहरात प्रामुख्याने अंधेरी आणि वर्सोवा या भागात बिल्डरांनी धुमाकूळ घातला आहे. जी खारफुटी किनाऱ्याचे संरक्षण करते तेथे ती तोडून भराव टाकण्याचे प्रमाण वाढते आहे, असे भराव टाकून बिल्डर तेथे इमारती उभ्या करीत आहेत. यासंबंधीची संपूर्ण पाहणी करुन जास्तीत जास्त संबंधित लोकांना नोटीस देऊन आणि खारफुटीची पुन: लागवड करुन तो किनारा संरक्षित करण्याचा प्रयत्न वन विभागामार्फत करण्यात येणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती अत्यंत गंभीर आहे. परंतु त्यासंदर्भातील माहिती समजून घेणे आवश्यक आहे. कांदळवनाचे जे क्षेत्र आहे ते 9857 हेक्टर असून त्यापैकी 9230 हेक्टर वन विभागाच्या ताब्यात आहे. त्यातून 1841 हेक्टर एवढेच क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात आहे. आमच्या क्षेत्रात हस्तक्षेप करुन सरकारी आणि खाजगी क्षेत्रात जी तोड झालेली आहे ती वस्तुस्थिती कोर्टाच्या लक्षात आल्यानंतर कोर्टाने जो निर्णय दिला त्यानुसार ही संपूर्ण जमीन वन विभागाकडे ट्रान्स्फर करण्यात येणार आहे. आणि जी जमीन वन विभागाकडे येणार नाही त्या ठिकाणी वन संज्ञा लावला जाणार आहे. तसेच ज्या ठिकाणी बिल्डरांनी झाडे तोडून भराव टाकला त्या ठिकाणी मी स्वत: जाऊन पंचनामे केले. ती जमीन वन खात्याच्या अखत्यारित येत नसल्यामुळे आतापर्यंत आम्हाला अडचण येत होती. पण आता कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे ही अडचण येणार नाही कारण सर्व जमीन वन विभागाच्या अंडर आलेली आहे.

........2

**कोळंबी संवर्धनासाठी शासनाने दिलेल्या जमिनीच्या गैरवापर होत असल्याबाबत**

**(7) * 12838 श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. विनायकराव मेटे , प्रा. फौजीया खान , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्रीमती मंदा म्हात्रे** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोळंबी संवर्धनास चालना देण्यासाठी शासनाने मंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील हजारो हेक्टर खाजण जमीन विविध सहकारी संस्था व खाजगी लोकांना दिली आहे हे खरे आहे काय,

(2) ज्या कारणासाठी ही जमीन देण्यात आली त्या कारणासाठी सदर जमिनीचा उपयोग न करता तिचा वापर अन्य कारणासाठी करण्यांत येत असून ज्यांना ह्या जमिनी दिल्या त्यांनी त्या पोटभाडेकरुंना अन्य कारणासाठी दिल्या आहेत हे खरे आहे काय,

(3) असल्यास, किती सहकारी संस्थांनी ह्या जमिनी पोटभाडेकरुंना दिल्या आहेत व केव्हापासून,

(4) या सहकारी संस्थाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री. अनिस अहमद यांच्याकरिता** : (1) मुंबई जिल्हा सोडून ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये खाजण जमिन भाडेपट्टीने खाजगी व्यक्ती, सहकारी संस्था यांना वितरीत करण्यात आल्या आहेत.

(2) हे खरे नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, शासनाने अशी खाजण जमीन विविध खाजगी संस्थांना कोळंबी संवर्धनासाठी दिलेली आहे. त्यांच्यामार्फत कोळंबी संवर्धनाचे काम केले जाते काय ? त्याची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 9306 हेक्टर जमीन जी कोळंबी संवर्धनासाठी उपयुक्त आहे त्यापैकी 2600.66 हेक्टर खाजण जमीन वितरित करण्यात आली आहे आणि त्यामध्ये 6 संस्था आणि 181 खाजगी व्यक्ती आहेत.

श्री. जितेंद्र आव्हाड : महोदय, घोडबंदर रस्त्यावर देखील 300 एकर जमीन काही वर्षापूर्वी मच्छिमारांना मच्छिमारीचा व्यवसाय करण्यासाठी दिलेली होती. आजमितीला त्या ठिकाणी मच्छिमारीचा व्यवसाय होत नाही तसेच कुठेही कोळंबीचे संवर्धन होत नाही परंतु तरी देखील ती जमीन आजही त्या शेतकऱ्यांच्याच ताब्यात आहे.

यानंतर श्री. भारवि .......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12838

श्री.जितेंद्र आव्हाड...

माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ज्यांना कोळंबी संवर्धनासाठी जमीन दिली आहे आणि ते त्या अनुषंगाने काम करीत नसतील तर त्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्या खाजगी संस्थांना देण्याची प्रक्रिया शासन करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कोळंबी संवर्धनाच्या अनुषागाने काम होत नसेल तर संबंधितांकडून जमिनी काढून त्या खाजगी संस्थांना देण्यात येतील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास अनुमती दिल्याबद्दल मी आपला आभार आहे. सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. केंद्र सरकारकडून NSDP अंतर्गत आपल्याकडे निधी येतो. त्यानुसार आपण वॅम्बी योजना मुंबई, पुणे, नागपूर शहरांमध्ये राबवितो. सदर योजनेची कामे विधान परिषद सदस्यांच्या मतदार संघात घेण्यासंबंधीचे पत्र पाठविले असता, संबंधित अधिकारी हे विधान सभा सदस्याच्या शिफारशीप्रमाणे काम घेतात. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, विधान परिषद सदस्याच्या मतदार संघामध्ये झोपडपट्टया नसतात काय ? हा निधी विधान परिषद सदस्यांना का उपलब्ध करून देण्यात येत नाही ? विधान सभा सदस्यांचे निर्वाचन क्षेत्र महत्त्वाचे असते हे मला मान्य आहे. पण विधान परिषद सदस्यांकडे देखील सामान्य माणसे येत असतात. तेव्हा विधान परिषद सदस्यांच्या मतदार संघात सुध्दा ठराविक रक्कम खर्च करण्याच्या सूचना शासनाने अधिकाऱ्यांना दिल्या पाहिजेत. आम्ही पत्र लिहिले की, शासनाचे अधिकारी आमच्या पत्राला केराची टोपली दाखवतात. त्यामुळे आमच्याकडून जनतेची अपेक्षा पूर्ण होत नाही. येत्या 2-3 दिवसामध्ये या निधीचे वाटप होणार आहे. तेव्हा सदर निधी विधान परिषद सदस्याच्या मतदार संघामध्ये खर्च करण्यासाठी राखून ठेवण्याची सूचना शासन संबधित अधिकाऱ्यांना देणार आहे काय ?

**सभापती** : शासनाने याची नोंद घ्यावी. यानंतर मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील व श्रीमती संजिवनी रायकर यांनाच औचित्याचा मुद्दा मांडण्यासंबंधी अनुमती देणार आहे. अन्य सन्माननीय सदस्यांना संधी मिळणार नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात असल्याने मी एका गोष्टीकडे त्यांचे लक्ष वेधू इच्छितो. तेजस्विनी जाधव या महिला खेळाडूला राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेमध्ये दोन सुवर्णपदके मिळाली आहेत.....

**सभापती** : मी आपल्या बोलण्यास अनुमती दिलेली नाही. त्यामुळे आपले म्हणणे मी रेकॉर्डवरून काढत आहे.

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज महाराष्ट्रातील पोल्ट्री व्यवसाय अडचणीमध्ये आलेला आहे. याच अधिवेशनामध्ये शासनातर्फे यासंबंधी निवेदन करण्यात आले आहे. अडचणीत सापडलेल्या पोल्ट्री व्यवसायाला मदत करण्याचा निर्णय शासन घेणार आहे. काल अलिबाग येथील पोल्ट्री व्यावसायिकांनी सुमारे 50 हजार कोंबडया जमिनीमध्ये जीवंत गाडण्याचे काम केले आहे. तेव्हा त्याचा पंचनामा झाला पाहिजे, अशी मी या औचित्याच्या मुद्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे. महापूरामध्ये ज्यांचे नुकसान होते, त्यांना प्रत्यक्षात मदत मिळत नाही हा आजवरचा अनुभव आहे. आज पोल्ट्री व्यावसायिक स्वत:हून पुढे येत आहे. तेव्हा ज्या पोल्ट्रीमध्ये जीवंत पक्षी आहेत, त्यांचा पंचनामा तातडीने महसूल विभागामार्फत करण्यात यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

**सभापती** : याची शासनाने नोंद घेऊन महसूल विभागाला कळवावे.

श्री.अजित पवार : होय.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या नेमणुकी संदर्भातील खटले निकाली काढण्यासाठी एक सदस्यीय तक्रार निवारण समिती निवृत्त न्यायाधीश श्री.भागवत यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली आहे. यासाठी स्टेनो, वरिष्ठ लिपिक, शिपाई इतका स्टाफ देण्यात आला आहे. सहा महिने स्टेनोला पगार न दिल्यामुळे स्टेनो नोकरी सोडून गेला आहे. तेव्हा पासून स्टेनोची जागा रिक्त आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर.....

स्वत: श्री.भागवत यांनी माननीय शिक्षण मंत्री महोदयांना सांगितले की, तेथे स्टेनो नसल्यामुळे 250 खटले प्रलंबित आहेत. परंतु त्यासंदर्भात शासनाकडून कसलीही दखल घेतली गेली नाही. महोदय, अगोदरच या शिक्षण सेवकांवर अन्याय होत आहे. जून पासून तर त्यांना नोकरीपासून वंचित व्हावे लागणार आहे. त्यामुळे दोन दिवसांत त्या ठिकाणी स्टेनोची नियुक्ती करण्यासंदर्भात माननीय शिक्षण मंत्री महोदयांना सांगण्यात यावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

**सभापती** : या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी निदर्शनास आणून दिलेला विषय माननीय शिक्षण मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावा.

श्री.अजित पवार : होय.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबई शहरातील मिठी नदी किनाऱ्यावरील अनधिकृत बांधकामांमुळे पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास व मुंबईवर ओढवलेले संकट" या विषयावरील सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, कन्हैयालाल गिडवानी, धोंडिराम राठोड, अब्दुल सत्तार नबी, सुधाकर गणगणे, मुझफ्फर हुसैन सय्यद, सुधीर सावंत, यशवंतराव गडाख, धनाजी साठे, रमेश निकोसे, डॉ.अशोक मोडक, सर्वश्री रामनाथ मोते, प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, जगदीश गुप्ता, श्रीमती कांता नलावडे, श्री.गुरुमुख जगवानी, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री विलास अवचट, अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.मधुकर सरपोतदार, वि.प.स. यांच्या दिनांक 7 डिसेंबर, 2005 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी तारांकित प्रश्न क्र.9280 ला दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

:: अधिक माहिती :

( प्रेस : येथे अधिकची माहिती छापावी.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव.

**मु.शी.**: श्री.रामचंद्र सोवार तथा भाई बंदरकर, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.रामचंद्र सोवार तथा भाई बंदरकर, माजी विधान परिषद सदस्य, यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो :-

"श्री.रामचंद्र सोवार तथा भाई बंदरकर यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै.रामचंद्र सोवार तथा भाई बंदरकर यांचा जन्म 1924 मध्ये मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिक पर्यंत झाले होते.

कै.बंदरकर यांनी शेतकरी कामगार पक्षाचे सहचिटणीस म्हणून कार्य केले. महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे संस्थापक-अध्यक्ष तसेच, अखिल भारतीय कोळी समाज परिषदेचे सचिव व अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले. समस्त कोळी बांधवांना संघटित करुन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांच्या न्याय्य मागण्यांना वाचा फोडण्यासाठी आयुष्यभर त्यांनी अनेक आंदोलने केली. 'भाई बंदरकर मच्छिमार विश्वस्त निधी' च्या माध्यमातून मदत करुन अनेक बांधवांचे जीवन त्यांनी सुसह्य केले. मच्छिमार बांधवांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले.

कै.बंदरकर 1980 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या समाजसेवकाचे व मच्छिमार बांधवांच्या नेत्याचे रविवार दिनांक 19 मार्च 2006 रोजी दु:खद निधन झाले.

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी कै.रामचंद्र सोवार तथा भाई बंदरकर, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला समर्थन देऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, कै.रामचंद्र बंदरकर यांचे निधन दिनांक 19 मार्च, 2006 रोजी मुंबईमध्ये झाले. गेल्या 10 वर्षांपासून कै.बंदरकर पॅरॅलिसीसने आजारी होते. ते पॅरॅलिसीसशी 10 वर्षांपासून झुंजत होते. त्यांनी विधान परिषदेमध्ये 1980 ते 1986 या कालावधीत शेतकरी कामगार पक्षाचे आमदार या नात्याने प्रतिनिधीत्व केले होते. योगायोगाने मी त्यावेळी विधानसभेत होतो. शेतकरी कामगार पक्ष आणि त्या वेळेला असलेला भारतीय जनता पक्ष यांची तेव्हा आघाडी होती. त्यामुळे त्यावेळी आघाडीच्या बैठका होत होत्या. या बैठकांच्या माध्यमातून भाई बंदरकर यांची भेट होत होती. तेव्हा त्यांचे लढाऊ व्यक्तिमत्त्व दिसत होते. महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे ते संयोजक आणि संस्थापक होते. अखिल भारतीय कोळी समाज परिषदेचे अध्यक्ष या भूमिकेतून त्यांनी मच्छिमार समाजाचे अनेक प्रश्न सभागृहाच्या आणि बाहेर आंदोलनाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले होते. कोळी बांधवांच्या उपजीविकेसाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी सभागृहामध्ये सातत्याने आवाज उठविला होता.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, कोळी समाजावर होत असलेला अन्याय शासनाच्या माध्यमातून दूर करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. त्याचप्रमाणे ठाण्याच्या काठावर असलेले कोळ्यांचे खारफुटी जंगल वाचविण्यासाठी व वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. कोळी समाजाच्या संदर्भातील असे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. वादळामध्ये मृत्युमूखी पडलेल्या कोळी बांधवांसाठी त्यांनी भाई बंदरकर विकास विश्वस्त निधी स्थापन केला. त्यातून अनेक लोकांनी संसार उभे केले, सांभाळले. सभापती महोदय, मला या ठिकाणी एवढेच सांगावेसे वाटते की, मुंबईच्या लगतच जे मनोरी नावाचे गाव आहे, त्या गावामध्ये माजी सदस्य श्री. रामचंद्र सोवार तथा भाई बंदरकर यांचा जन्म झाला. या गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सन 1997 पर्यंत सुटलेला नव्हता. त्यावेळी केंद्रीय मंत्री रामभाऊ नाईक हे त्या विभागाचे प्रतिनिधीत्व करत होते, त्यांनी समुद्रामधून पाईप लाईन टाकून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. त्यावेळी श्री. भाई बंदरकर शे.का.प. मध्ये होते, ते कोळी समाजाचे नेते होते. त्यांनी हे सर्व मुक्तकंठाने मान्य केले. हा इतका दिलदार मनाचा नेता होता की, त्यांनी मान्य केले की, माझा जन्म जरी या गावात झाला तरी मी या गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवू शकलो नाही. तो प्रश्न रामभाऊ नाईक यांनी सोडविला. यावरुन ते किती मोठ्या मनाचे नेते होते हे आपल्याला दिसून येईल. सभापती महोदय, असा हा नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. तरी, मी श्री. भाई बंदरकर यांच्या प्रती आदरांजली व्यक्त करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी स्वर्गीय भाई बंदरकर यांच्या दु:खद निधनाबद्दल दुखवट्याचा प्रस्ताव मांडलेला आहे आणि त्याला माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अनुमोदन दिले आहे, त्या शोकप्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. श्री. भाई बंदरकर यांचा आणि माझा परिचय जुना होता. कोळी समाज हा मुंबई शहराचा भूमिपुत्र आहे. या भूमिपुत्राची ताकद वाढवून मुंबई शहरावर होणारे अतिक्रमण, कोळी वाड्यांवर होणारे अतिक्रमण तसेच त्यांच्यावर होणारे अन्याय दूर व्हावेत या प्रश्नांसाठी त्यांनी प्रयत्न केले. त्याचप्रमाणे त्यांना डिझेल प्रामुख्याने सवलतीच्या दराने मिळावे यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सर्व कोळी समाजाला संघटीत ठेवून त्यांच्या समस्या सोडविण्यासठी ते सतत प्रयत्नशील होते. विधानसभेमध्ये वा विधानपरिषदेमध्ये येण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले आणि शेवटी सन 1980 मध्ये यश प्राप्त झाले. ते शेतकरी पक्षातर्फे या सदनात आले आणि येथे त्यांनी एक पूर्णक्रम काम केले. या अनुभवानेच त्यांचे कार्यक्षेत्र व्यापक झाले. पण तोपर्यंत ते वृध्द होत चालले होते. परंतु तरीही त्यांनी कधीही न्यायाची भूमिका सोडली नाही. गेली 4-5 वर्षे ते अर्धांगवायूने व्यथित होते, आजारी होते. त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या सार्वजनिक क्षेत्रामध्ये, सामाजिक कार्यामध्ये खंड पडत चालला. शेवटी त्यांना मृत्यूने गाठले आणि त्यांचे परवा 19 तारखेला दु:खद निधन झाले आणि त्यानंतर 20 तारखेला त्यांच्यावर अत्यंसंस्कार करण्यात आले. खरे म्हणजे आजचा शोकप्रस्ताव अगोदर घेण्यात येणार होता, परंतु इतर कार्यबाहुल्यामुळे तो मागे राहिला आणि आज हा शोकप्रस्ताव सदनात मांडला गेला आहे. समाजासाठी, महाराष्ट्रासाठी सातत्याने लढा देणारी माणसे अंतर्धान पावत चालली आहेत. मुंबईवरील अतिक्रमणे वाढत चालली आहेत. कोळी समाजामध्ये कोळी वाढत आहेत तसे त्यांचे प्रश्नही वाढत चालले आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

त्यांची कुटुंबे वाढत चालली आहेत, कुटुंबांची संख्या वाढत चाललेली आहे. त्यांची गावठाणे फक्त शिल्लक आहेत. कोळी समाजाच्या पूर्वीच्या समस्या तशाच शिल्लक आहेत. त्यांच्या समस्यांवर मार्ग काढण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. कै. भाई बंदरकर यांनी कोळी बांधवांचे जे प्रश्न मांडलेले आहेत ते जर आपण मार्गी लावले तर तीच खरी श्रध्दांजली त्यांना अर्पण होईल असे मला वाटते. आता सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री बसलेले आहेत. त्यांच्या समोर ज्यावेळी कोळी बांधवांच्या समस्या येतील त्यादृष्टीकोनातून त्यांनी विचार करावा, त्यांच्या प्रश्नांकडे बघावे, अशी मला नम्र विनंती करावीसी वाटते. शेवटी कोळी बांधव हा या मुंबई शहराचा भूमिपूत्र आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेबांनी सांगितले की, त्यांच्या मनोरा गावाचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागलेला आहे. त्यावेळी मी खासदार होतो. मनोरा गावांतील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जो कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्याा कार्यक्रमाच्या भूमिपूजनाची संधी मला मिळाली होती. त्यानंतर मनोरा गावांमध्ये पाणी गेलेले आहे त्यावेळी आम्हाला खूप आनंद झाला होता. आजपर्यंत कोळी वाडयातील अनेक समस्या तशाच आहेत, त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न व्हावयास पाहिजे, कै. भाई बंदरकर कोळी बांधवांच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर लढलेले आहेत त्यांच्या प्रश्नाकडे शासनाने लक्ष दिले तरच त्यांना खरी श्रध्दांजली अर्पण होईल. मी स्वत: व माझ्या पक्षाच्या वतीने नम्र श्रध्दांजली वाहतो, व शोक प्रस्तावाला पाठिंबा देऊन माझे दोन शब्द संपवितो.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख यांनी कै. भाई बंदरकर यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै. भाई बंदरकर हे लाल बावटयाचे राजकारण करीत होते, शेतकरी कामगार पक्षांचे ते कार्यकर्ते होते. तीव्र राजकीय भूमिका ते घेत असत. महाराष्ट्रामध्ये व मुंबई शहरामध्ये त्यांच्या समाजासाठी ते लढत असत, माझा व त्यांचा व्यक्तिश: परिचय होता. 1972 नंतर मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे तत्कालीन अध्यक्ष माननीय बॅरिस्टर श्रीमती रजनी पटेल यांच्याकडे ते नेहमी येत असत. त्या निमित्ताने आम्ही चळवळीतील कार्येकर्ते आणि कै. भाई बंदरकर यांची निरनिराळया कामानिमित्त भेट होत असे. निरनिराळया प्रश्नांच्या संदर्भात त्यांचे मुंबई शहरामध्ये लढे होत. ज्या ज्या वेळी अधिवेशन असेल त्यावेळी कै. भाई बंदरकर यांचे मोर्चे मुंबईमध्ये येत असत. 1980 साली या सभागृहामध्ये येण्याची त्यांना संधी प्राप्त झाली. 6 वर्षे म्हणजे सन 1986 पर्यंत या सभागृहामध्ये त्यांनी चांगले काम केलेले आहे. यापूर्वीच्या सर्व वक्त्यांनी सांगितले की आज मुंबई शहरामध्ये कोळी समाज असेल, मच्छिमार समाज असेल ते मुंबईचे भूमिपुत्र आहेत. त्यांचे सुरुवातीलपासून जे प्रश्न आहेत ते अजूनही तसेच आहेत त्या ठिकाणी ते पहायला मिळत आहेत. आज मुंबई शहरामध्ये त्या भागात 30-35 इमारती झालेल्या आहेत, त्या ठिकाणी कोळी वाडयामध्ये मच्छिमार लोकांचे गावठाण आहे, त्या गावठाणामध्ये एखादी इमारत नादुरुस्त असेल तर ती दुरुस्त करुन मिळत नाही अशी परिस्थिती आहे. मी माझ्या वतीने व माझ्या पक्षाच्या वतीने दिवंगत भाई बंदरकर यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि त्यांच्या आत्म्याला शांती लाभो अशी मी प्रतिज्ञा करतो व माझे दोन शब्द संपवितो.

------

यानंतर श्री.सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी कै.भाई बंदकर यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. कै.भाई बंदरकर यांनी मी लहानपणापासून ओळखतो. आमच्या वडिलांचे सहकारी आणि डाव्या विचारसरणीचा त्यावेळी जो प्रभाव होता, त्याचे प्रसार करण्याचे काम त्यांनी केले होते. कै.भाई बंदरकर यांनी महाराष्ट्रातील मच्छिमारांचे प्रश्न राज्य शासनापर्यंत व केंद्र शासनापर्यंत नेण्याचे काम केले होते. अशाप्रकारे महाराष्ट्रातील मच्छिमारांचा जर कोणी खरा नेता असेल तर तो म्हणजे भाई बंदरकर होय. मच्छिमारांना डिझेलवर सबसिडी देण्याचा प्रश्न असो, एक्साईज डयुटी माफ करण्याचा प्रश्न असो, मच्छिमारांसाठी आदर्श गाव योजना असो, बंदरांचा विकास करण्याचा प्रश्न असो या सर्व गोष्टींमध्ये कै.भाई बंदरकर अग्रेसर होते. विशेषत: मला एक गोष्ट आठवते की, ज्यावेळी भारताच्या समुद्रामध्ये परकीय नौकांना मच्छिमारी करण्यासाठी परवानगी देण्यात आली त्यावेळी सन 1992-93 साली मोठा लढा झाला होता. त्यावेळी केंद्र शासनाने व आम्ही प्रयत्न करुन मच्छिमार कमिटी स्थापन करण्यात आली होती. त्या कमिटीसमोर कै.भाई बंदरकर यांनी मच्छिमारांच्या संदर्भात जे प्रश्न मांडले होते, ते मूर्त स्वरुपात त्या कमिटीच्या अहवालामध्ये आले होते. हा अहवाल शासनाने स्वीकारलेला आहे. अशाप्रकारे कै.भाई बंदरकर यांनी मच्छिमारांचे भविष्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. अशाप्रकारे या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी कै.भाई बंदकर यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोकप्रस्तावाचे समर्थन करतो व कै.भाई बंदरकर यांना श्रंध्दाजली अर्पण करतो व माझे दोन शब्द संपवतो.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ( नामनियुक्त ) : माननीय सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी कै.भाई बंदरकर यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावाशी सहसंवेदना व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. आपल्या सदनाचे माजी सदस्य कै.भाई बंदरकर यांचे दु:खद निधन झालेले आहे. कै.भाई बंदरकर व आमचा कौटुंबिक संबंध होता. पूर्वी कै.भाई बंदरकर व त्यांचे पुत्र श्रीयुत विजय बंदरकर आमच्या घरी नेहमी येत असत. गेल्या 10 वर्षांपासून कै.भाई बंदरकर अर्धांगवायूने आजारी होते. कै.भाई बंदरकर यांचे व्यक्तिमत्व अतिशय साधे व सरळ होते, तेवढेच ते कणखर व्यक्तिमत्वाचे होते. कै.भाई बंदरकरांनी मच्छिमार कृति समितीची स्थापना केली. कोळी परिषद मच्छिमार कृति समितीच्या माध्यमातून त्यांनी मच्छिमार समाजासाठी अविरत काम केले. ससूण डॉकस, रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्हयांतील छोटया-मोठया बंदरांतील मच्छिमारांसाठी मच्छिमारीच्या संदर्भात अनेक सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सन 1980 ते 1986 या काळामध्ये कै.भाई बंदरकर विधान परिषदेचे सदस्य होते. कै.भाई बंदरकर यांनी मच्छिमारांच्या संदर्भात सभागृहामध्ये अनेक वेळेस आवाज उठवला होता. त्यांनी सभागृहामध्ये किंवा सभागृहाच्या बाहेर ज्या ज्या फोरमवर मच्छिमारांच्या कल्याणासंबंधी आवाज उठवता येईल तेथे त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे मच्छिमारांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला होता व यामध्ये त्यांना यशही आले. कै.भाई बंदरकर यांच्या दु:खद निधनामुळे समाजाची आणि विशेषत: कोळी समाजाची अपरिमित हानी झाली आहे. ईश्वर कै.भाई बंदरकर यांच्या कुटुंबियांना दु:ख सहन करण्याची ताकद देवो, आम्ही सुध्दा त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात सहभागी आहोत. कै.भाई बंदरकर यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी मी ईश्वर चरणी प्रार्थना करते व माझे दोन शब्द संपवते.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी कै.भाई बंदकर यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यास पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. कै.भाई बंदरकर माझ्या पक्षाचे नेते होते. त्यांच्या समवेत काम करण्याची मला सुध्दा सुधी मिळाली. कै.भाई बंदरकर यांनी आमच्या पक्षाचे संस्थापक भाऊसाहेब राऊत यांच्या नेतृत्वाखाली कोळी समाजाच्या समस्या सोडविण्यास सुरुवात केली. कै.भाई बंदरकरांनी मच्छिमारांच्या समस्या सोडविण्यासाठी अतिशय यशस्वीपणे लढे दिले यामध्ये प्रामुख्याने डिझेलची समस्या होती. 30 वर्षांपूर्वी डिझेलवर केवळ 2 पैशाची सवलत होती. त्याचा खरा फायदा आता मच्छिमारांना होतो आहे. गुजराथ मच्छिमारांचे महाराष्ट्रातील मच्छिमारांवर अतिक्रमण होत होते त्याबाबत कै.भाई बंदरकर यांनी यशस्वी लढा दिला होता.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ...

सभापती महोदय, ही मुंबई कोळी-आगरी लोकांची होती पण आज येथील कोळी समाज नष्ट होत आहे असे असताना कफ परेड वर जी कोळी लोकांची वसाहत आहे, तेथील जो कोळीवाडा होता तोही आता नष्ट होत आहे आणि तेथील त्या वसाहतीला त्या लोकांनी प्रेमाने भाई बंदरकरांचे नाव दिलेले आहे. सभापती महोदय, भाई बंदरकर यांचेबद्दल बोलावे तेवढे थोडे आहे, त्यांनी दिलेल्या यशस्वी लढ्यांबद्दल देखील बोलावे तेवढे थोडे आहे. मला येथे हे नमूद करावयाचे आहे की, महाराष्ट्राला जो 720 कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे त्या किनाऱ्यावरील जवळपास प्रत्येक कोळीवाड्याला भाई बंदरकर यांनी भेट दिली हाती आणि तेथील कोळी समाजाच्या समस्या समजावून घेतल्या आणि त्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला होता. मी माझ्या पक्षाच्या वतीने तसेच माझ्या आणि माझ्या कुटुंबियांच्या वतीने स्व. भाई बंदरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या या शोक प्रस्तावाला पाठिंबा देतो.

****

...... एस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड,रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री.रामचंद्र सोवार ऊर्फ भाई बंदरकर यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव येथे मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, भाई बंदरकर हे मच्छिमारांचे एकमेव असे नेते होऊन गेले की, ज्यांच्याबद्दल संपूर्ण समाजामध्ये आदर होताच पण आपल्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत हेच नेते आपल्याला न्याय देऊ शकतात अशी विश्वासाची भावना देखील होती. 1980 साली या सदनाचे सदस्य म्हणून ते या सदनामध्ये आले. कोळी समाजाचा पहिला माणूस या सदनामध्ये आमदार म्हणून आला. त्यांनी त्यांच्या कार्यकालामध्ये मच्छिमार समाजाचे अनेक प्रश्न येथे मांडले. विशेष करून जातीच्या दाखल्याचा प्रश्न अत्यंत चांगल्या प्रकारे उपस्थित केला. सभागृहाच्या विनंती अर्ज समितीचेही सदस्य म्हणून देखील त्यांनी चांगल्या प्रकारे काम केले आणि त्या समितीचा दाजिबा पाटील यांचा अहवाल देखील येथे मांडला. सदरच्या अहवालावर सरकारने अद्यापपर्यंत काहीही कारवाई केलेली नाही वा स्वीकारलेला नाही. तेव्हा स्व. भाई बंदरकर यांना खऱ्या अर्थाने आपल्याला श्रद्धांजली अर्पण करावयाची असेल तर मी आपल्याला विनंती करीन की, भाई बंदरकर यांनी श्री.दाजिबा पाटील यांच्या अध्यक्षतेखालील विनंती अर्ज समितीचा जो अहवाल येथे मांडलेला आहे तो स्वीकारण्याची, त्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, भाई बंदरकर यांच्या वयाला 75 वर्षे तीन वर्षापूर्वी झाली तेव्हा त्यांना नागरी सत्कार करण्यात आला त्यावेळी मी उपस्थित होतो. माननीय श्री.राम नाईक यांच्या हस्ते हा नागरी सत्कार त्यावेळी करण्यात आला. गेली कित्येक वर्षे ते आजारी असल्यामुळे त्यांचा आवाज येत नव्हता, त्यांना दिसतही नव्हते. परंतु त्या सत्काराच्या प्रसंगी त्यांनी जे भाषण केले ते अत्यंत भावपूर्ण असेच होते. समाजावर होणाऱ्या अन्यायाबद्दल कशा प्रकारे लढले पाहिजे याचे चांगले मार्गदर्शन त्यांनी केले. मध्यंतरी मे महिन्यामध्ये मी त्यांच्याकडे गेलो होतो. मी त्यांना सांगितले की, माझ्या कार्याचा अहवाल मला प्रकाशित करावयाचा आहे, तेव्हा आपण त्यासाठी मला शुभसंदेश द्यावा. त्यांना दिसत नव्हते, पण ते आवाज ओळखायचे, आणि कितीही लहान माणूस असला तरी त्याच्याशी ते आदराने बोलायचे. त्याप्रमाणे ते मला म्हणाले की, तुम्ही चांगले काम केलेले आहे, तुम्हाला मी निश्चितपणे शुभसंदेश देतो. सभापती महोदय, त्यांचा शुभसंदेश घेऊन मी माझ्या कार्याचा अहवाल प्रकाशित केला पण तो करण्यापूर्वीच ते आपल्यातून निघून गेले, तो

..... एस 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे .....

अहवाल पाहण्यास ते राहिले नाहीत. मी तमाम महाराष्ट्रातील कोळी, मच्छिमार समाजाच्या वतीने, ते एकवीरेचे भक्त होते त्यामुळे एकवीरा मातेच्या या भक्तास, मी, या सदनातील शिवसेनेचा एक उपनेता या नात्याने देखील भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो तसेच या कोळी समाजाला, मच्छिमार समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत असलेल्या माननीय मुख्यमंत्र्यांना मी या निमित्ताने विनंती करतो की, 1980 साली श्री.दाजिबा पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा जो अहवाल स्व. भाई बंदरकर यांनी येथे दिलेला आहे त्यावर अद्यापपर्यंत सरकारने कोणतीही कारवाई केलेली नाही वा तो स्वीकारलेला नाही. तरी त्या अहवालावर आपण कारवाई केल्यास स्व. भाई बंदरकर यांना श्रद्धांजली अर्पण केल्यासारखे होईल एवढे बोलून या शोक प्रस्तावाला मी पाठिंबा देतो.

****

( यानंतर श्री. सरफरे .... टी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी कै. भाई बंदरकर यांच्या निधनानिमित्त जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. कै. भाई बंदरकर हे 1980 ते 1985 या कालावधीत या सभागृहाचे सन्माननीय सदस्य होते. त्या काळात मी विधानसभेमध्ये प्रतिनिधित्व करीत होतो. त्या दरम्यानच्या काळात भाईंना जवळून पहाण्याचा प्रसंग आला. जबरदस्त ध्येयवादी असा हाडाचा कार्यकर्ता, कोणत्याही कामाचा सतत पाठपुरावा करणारा, असंघटीत कोळी बांधवांना संघटीत करुन त्यांच्या अनेक प्रश्नांसाठी लढणारा कार्यकर्ता म्हणून सलग दहा वर्षे मी त्यांना पाहिले आहे. दरम्यानच्या काळात कोळी बांधवांच्या अनेक समस्या सोडविण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस प्रयत्नांची पराकाष्ठा केली. एखाद्या व्यक्तीच्या पायामध्ये चाक असते त्याप्रमाणे सहा तासाचा झोपेचा खंड सोडला तर सतत त्या प्रश्नांच्या अवती भवती भाई सातत्याने फिरत. अजूनपर्यंत त्यांचे काम चालू होते. भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सहसचिव म्हणून त्यांनी काम केले आहे. मच्छिमार कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांना काम करण्याची संधी मिळाली. दरम्यानच्या काळात त्यांनी महाराष्ट्रातील कोळी बांधवांची संघटना अत्यंत उत्कृष्ट पध्दतीने निर्माण केली. या असंघटीत सामान्य समाजाला संघटीत करुन त्यांचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. हे करीत असतांना आयुष्याच्या अखेरपर्यंत या समाजातील दुर्बल घटकांचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अत्यंत ध्येयवादी, कणखर व जबरदस्त व्यक्तिमत्त्व असणारे या सदनातील सन्माननीय सदस्य व माझे सहकारी भाई बंदरकर यांचे दुर्देवी निधन झाले. त्यांच्या मृतात्म्यास शांती लाभो. त्यांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करील आणि या असंघटीत सामान्य समाजाच्या पाठीशी ताकद उभी करील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती**...

प्रथेप्रमाणे शोकप्रस्ताव संमत झाल्यानंतर सभागृहाची बैठक दहा मिनिटे स्थगित केली जाते. त्याप्रमाणे मी आता सभागृहाची बैठक दहा मिनिटे स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी ठीक 2.38 ते 2.48 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**<u>स्थगितीनंतर</u>**)

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी. व मु.शी** : कागदपत्रे सभागृहासमोर ठवणे.

डॉ.सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2000-2001 चा महालेखापाल यांचा लेखापरीक्षा अहवाल सभगृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : महालेखापाल यांचा लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2003-2004 चा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. विलासराव शिंदे ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी " दिनांक 18 मार्च,2006 रोजी वा त्यासुमारास गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुक्यातील लष्कर येथे नक्षलवाद्यांनी दोन आदिवासी तरुणांची केलेली हत्या " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने , मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर सन्माननीय सदस्य यांनी "नवी मुंबईत राज्याच्या विक्रीकर विभागातील कोट्यवधी रुपयांचा विक्रीकर बुडविल्याचे प्रकरण गेल्या आठवड्यात उघडकीस येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने , मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर सन्माननीय सदस्य यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव, बुलढाणा, चिखली व मलकापूर या तालुक्यात सर्वशिक्षा अभियानांतर्गत गट शिक्षणाधिकारी, सरपंच आणि शाळेचे मुख्याध्यापक यांनी संगनमताने मोठ्या प्रमाणावर संगणकांची केलेली खरेदी" या विषयवर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याबाबत शासनाला निवेदन करण्यास सांगावे. यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. सर्वशिक्षा अभियानांतर्गत 30-30 हजार रुपयांचे संगणक खरेदी केले. ज्या ठिकाणी वीजपुरवठा नाही त्या ठिकाणी जबरदस्तीने संगणक दिलेले आहेत.

**उपसभापती** : शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, नितीन गडकरी व इतर सन्माननीय सदस्य यांनी "औरंगाबाद तसेच वाळूंज महानगर सिडको कार्यालयात गेल्या 12 ते 15 वर्षापासून लिपिक टंकलेखक व इतर पदांवरील कर्मचाऱ्यांची कंत्राटदारांमार्फत नियुक्ती करणे" या विषयावर

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

**उपसभापती** ....

नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी " माहे फेब्रुवारी, 2006 मध्ये श्री. विक्रम पोतदार, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात इंजिनियर असलेल्या विद्यार्थ्याला अंमली पदार्थ देऊन त्याचे पुणे-मुंबई महामार्गावर करण्यात आलेले अपहरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे व इतर सन्माननीय सदस्य यांनी "राज्यातील नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व रजा प्रवास सवलत योजना लागू करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्य यांनी "राज्यातील मोठ्या शहरात, विशेषत: मुंबई, ठाणे, पुणे येथील रस्त्यारस्त्यांवर असलेल्या पोस्टर्समुळे व वाहिन्यांवर दाखविल्या जाणाऱ्या अश्लील चित्रपट व व्हिडिओ अल्बममुळे शालेय व महाविद्यालयीन मुलांचे जीवन उद्‌ध्वस्त होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते व इतर सन्माननीय सदस्य यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत पाणी उपसा करणारे दोन्ही पंप नादुरुस्त असल्याने पाणीपुरवठा बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने लक्ष घालावे.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते व इतर सन्माननीय सदस्य यांनी " लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील मानस मानसी वसतिगृहातील विद्यार्थी हंसराज जगन्नाथ पाटील या विद्यार्थ्याचा दिनांक 22 जानेवारी, 2006 रोजी वा त्या दरम्यान झालेला खून" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने लक्ष घालावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी "दिनांक 19 मार्च, 2006 रोजी वा त्यासुमारास बुलढाणा शहरातील जुन्या आर.टी.ओ. कार्यालयानजीक एका नऊ वर्षीय मुजलीवर झालेला बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, श्रीमती संजीवनी रायकर व इतर सन्माननीय सदस्य यांनी "दिनांक 21 मार्च,2006 रोजी विखे पाटील प्रशाला, पुणे येथे दहावीच्या परीक्षेत कॉपी करु न दिल्यामुळे चिडलेल्या विद्यार्थी व काही युवकांनी शिक्षकांना केलेली मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री श्रीकांत जोशी, नितीन गडकरी, विनोद तावडे, विलास अवचट, अरविंद सावंत व इतर सन्माननीय सदस्य यांनी "दिनांक 20 मार्च, 2006 रोजी बीड जिल्ह्यातील चौसाळा येथे जुन्या भांडणातून उपसरपंचाच्या साथीने चार महिलांनी एका महिलेला विवस्त्र करुन तिची काढलेली धिंड" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री नितीन गडकरी, दिवाकर रावते व इतर सन्माननीय सदस्य यांनी " दिनांक 1 मे 1994 रोजी महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांनी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश,

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

**माननीय उपसभापती** .....

1994 निर्गमित केला, परंतु त्यानुसार जिल्हानिहाय पाटबंधारे प्रकल्पांवरील तरतुदींचे स्पष्टीकरणात्मक विवरणपत्र, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार मुद्यांबाबत अनुपालन अहवाल सभागृहाला सादर न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, दरवेळी सभागृहामध्ये बजेटच्या वेळी आम्ही वारंवार मागणी करतो की, मागासलेल्या भागातील ही कागदपत्रे दिली पाहिजे, अनुपालन अहवाल दिला पाहिजे. याकरिता मागच्या अधिवेशनामध्ये दोन दिवस सभागृहाचे कामकाज थांबवावे लागले होते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी ....)

असे हे प्रत्येक वेळी का केले जाते ? ही अतिशय गंभीर बाब आहे. आपण यासंदर्भात निदेश दिलेले आहेत. जेव्हा श्री. राजेंद्र दर्डा हे अर्थ खात्याचे राज्यमंत्री होते त्यावेळी मी आणि माननीय सदस्य प्रा.बी.टी देशमुख, आम्ही दोघांनी सभागृहातील सदस्यांना यासंदर्भातील कागदपत्रे मिळण्याच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केलेला होता. "जोपर्यन्त ही कागदपत्रे दिली जाणार नाहीत तोपर्यन्त आम्ही चर्चा करणार नाही." अशी त्यावेळी आम्ही मागणी केलेली होती. त्यासंदर्भात सभापती महोदय, आपण निदेश दिलेले आहेत. असे असताना, ही कागदपत्रे का दिली जात नाहीत ? दोन-तीन वर्षापासून हे असेच सुरु आहे..

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी जी 93ची सूचना दिलेली आहे त्याबाबतीत महाधिवक्ता यांचे मत मागविण्यात येत आहे, असा निर्णय मी देत आहे.

श्री. नितीन गडकरी : 93च्या सूचनेतील विषय वेगळा आहे आणि मी आता उपस्थित करीत असलेला मुद्दा वेगळा आहे. सभागृहामध्ये जो निर्णय झालेला आहे तो मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. अर्थ विभागाने ही कागदपत्रे आम्हाला ताबडतोबीने द्यावीत अशी आम्ही मागणी केलेली होती. "सरकार जवळ झेरॉक्स मशिन देखील नाही काय ?" अशी विचारणा मी त्यावेळी केली होती. सभापती महोदय, हे रुटीन झालेले आहे. यावर्षी देखील आम्हाला कागदपत्रे दिलेली नाहीत. आम्हाला या शासनाने पैसे देऊ नयेत. परंतु घटनेमध्ये जे लिहिलेले आहे त्याप्रमाणे कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवली गेली पाहिजे. तेव्हा शासनाला अनुपालन अहवाल आणि अन्य कागदपत्रे देण्याचे निदेश आपण द्यावेत. असे निदेश आपण यापूर्वीही दिलेले आहेत.

**उपसभापती** : मी माननीय अर्थमंत्र्यांना याबाबतीत सूचना देतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, ही कागदपत्रे ताबडतोब दिली पाहिजेत अशा प्रकारचे आदेश आपण दिलेले आहेत. आपण मागील कार्यवृत्त कृपया पहावे. तसे आदेश आपण दिलेले असतील तर ती कागदपत्रे आम्हाला दिली जावीत.

**उपसभापती** : यासंदर्भात पूर्वी दिलेले आदेश तपासून कागदपत्रे देण्यात येतील.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री. श्रीकांत जोशी, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 15 मार्च 2006 रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील माळीवाडा गावाजवळ हरीगिरी महाराजांच्या मठातील पुजा-याच्या 50 वर्षीय पत्नीवर झालेला बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ..

दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, श्रीकांत जोशी व पांडुरंग फुंडकर यांनी "दिनांक 20 मार्च 2006 रोजी बीड येथील पोलीस मुख्यालयात काम करणा-या पोलीस कर्मचा-याच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार करण्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी "दिनांक 21 मार्च 2006 रोजी ठाणे येथील कलरकेम कंपनीने दूषित पाणी नदीत सोडल्याने व ते पाणी प्याल्याने चार व्यक्तींचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयामध्ये शासनाने लक्ष घालावे असे निदेश मी देत आहे. बाकीच्या आलेल्या 93च्या सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात विषाणूजन्य तापाच्या साथीची झालेली लागण

**मु.शी** : नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात विषाणूजन्य तापाच्या साथीची झालेली लागण याबाबत डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ. नीलम गो-हे, श्री. विलास अवचट व ॲड. अनिल परब,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ. विमल मुंदडा ( सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ. नीलम गो-हे, श्री. विलास अवचट व ॲड. अनिल परब,वि.प.स. यांनी "नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात विषाणूजन्य तापाच्या साथीची झालेली लागण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. निवेदनामध्ये आपल्या अनुमतीने मला थोडीशी सुधारणा करावयाची आहे. निवेदनाच्या दुस-या ओळीतील "3424 तापाचे रुग्ण" या ऐवजी "3856 तापाचे रुग्ण" असे वाचावे. सुधारल्याप्रमाणे मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**उपसभापती** : सुधारल्याप्रमाणे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : 93च्या निवेदनावर माननीय सदस्यांनी एकच प्रश्न विचारावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, त्या ठिकाणी साथ सुरु झालेली आहे. रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली आहे.

**उपसभापती** : 93च्या निवेदनावर अधिक प्रश्न विचारता येत नाहीत.

...नंतर श्री.कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 15:00

**निवेदनानंतर**

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, मालेगांव येथील रुग्णांमध्ये जो ताप आढळून आला तो चिकन गुनिया नावाच्या आजारामुळे आढळून आला आहे. त्याला चीक फीवर असे म्हणतात. या आजाराचे मोड ऑफ ट्रान्समीशन म्हणजे प्रसार कसा होतो हे राज्य शासनाला माहीत आहे आणि हा आजार बर्ड फ्लूच्या आजाराच्या जवळचा आहे काय ? उत्तरामध्ये म्हटले आहे की 25597घरातील भांडयांची तपासणी केली आहे. 29808 पाण्यांच्या नमुन्यांची तपासणी केली आहे. पाण्याचे साठे तपासले आहेत. 2722 पाण्याच्या नमुन्यांमध्ये एडीस हा व्हायरस आढळून आला. हे सर्वेक्षण करताना आपल्याला फक्त एडीसच मिळाला काय किंवा दुसऱ्या कोणत्या रोगाचे विषाणू किंवा डासांच्या अळया सापडल्या काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, चिकन गुनिया मध्ये एडीसी नावाचा डास असतो. दोन्ही व्हायरस तो कॅरी करतो. डेंग्यूचा व्हायरस कॅरी करतो. चिकन गुनियाचा विषाणू सुध्दा कॅरी करतो. मी वेबसाईटवरुन यासंबंधातील सर्व लिटरेचर मिळविलेले आहे. बर्ड फ्लूचा काहीही संबंध नाही. डासांपासूनच या रोगाची लागण होते......

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, चुकीची माहिती रेकॉर्डवर राहू नये. या रोगाचा प्रसार प्रथम चिकनमध्ये आणि स्पॅरोजमध्ये होतो आणि त्यांना डास चावल्यानंतर ते डास माणसाला चावतात आणि त्यातून हा आजार होतो अशी माझी माहिती आहे. शासनाकडे वेगळी माहिती असेल ती सभागृहाला द्यावी. बर्ड फ्लूशी या आजाराचे साधर्म्य आहे काय ? दुसरा प्रश्न असा निर्माण होतो की त्या भागातील कोंबडया आणि स्पॅरोजवर शासनाने नियंत्रण मिळविले काय?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, जळगांव किंवा नवापूरमध्ये कोंबडयांना एच-1 विषाणूंची बाधा झाली. माझ्याकडे माहिती आहे त्यानुसार अेडीसी डासांपासून हे इन्फेक्शन होते. सांधे दुखणे किंवा डोके दुखणे किंवा ताप येणे ही डेंग्यूची लक्षणे आहेत तेवढी या रोगामध्ये दिसत नाहीत. मॉटेलिटी एकदम कमी आहे. सांधेदुखी आहे. पेशंटला फार काळ ॲडमिट करावे लागत नाही. संपूर्ण वातावरण बदलले आहे. 1965 साली कलकत्ता आणि दक्षिण आफ्रिका येथे हा रोग आला होता. 30 वर्षानंतर हा प्रकार उद्‌भवला आहे. पेशंट वाढलेले दिसले तरी जनतेने घाबरुन जाण्याचे कारण नाही. पेशंट ॲडमिट झाल्यापासून दोन दिवसात त्याला डिस्चार्ज देतो. पेशंटबद्दल तक्रार नाही. निश्चितपणे 100 टक्के या रोगामध्ये रिकव्हरी आहे. ट्रीटमेंट व्यवस्थित सुरु आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 15:00

डॉ. विमल मुंदडा ...

डासाचे प्रकार घेतलेले आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून लॅबोरेटरीकडून रिपोर्ट घेतलेला आहे. अेडीसीचे डासच या रोगाला कारणीभूत आहेत हे मी माहितीसाठी सांगू इच्छिते.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोराळा बाजार (ता. मोताळा, जि.बुलडाणा) या गावाला बसलेला चक्रीवादळाचा तडाखा.

**मु.शी.**: कोराळा बाजार (ता. मोताळा, जि.बुलडाणा) या गावाला बसलेला चक्रीवादळाचा तडाखा याबाबत सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी कोराळा बाजार (ता. मोताळा, जि.बुलडाणा) या गावाला बसलेला चक्रीवादळाचा तडाखा या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, 9 मार्च रोजी मोताळा तालुक्यातील कोराळा बाजार या गावाला सायंकाळी 5 वाजण्याच्या सुमारास चक्रीवादळाचा मोठया प्रमाणात फटका बसला. हे चक्रीवादळ केवळ पाच मिनिट होते परंतु त्याची तीव्रता एवढी भयानक होती की, या पाच मिनिटांच्या कालावधीत एक बदामाचे झाड 50 फूट वर आकाशात उडाले, लोखंडी बैलगाडी 20 फूट उडाली आणि टीन पत्रे चार ते पाच किलोमीटर दूरवर उडत गेले. हे टीन पत्रे ज्यावेळी आकाशातून उडत चालले होते त्यावेळी त्या पत्र्यांचा आकार माचीसएवढा, अंगारपेटीच्या डबीप्रमाणे दिसत होता. अशा प्रकारे या चक्रीवादळामुळे जवळपास 500 घरे उध्वस्त झाली. माननीय पालकमंत्री देखील या ठिकाणी जाऊन आले, मी स्वत: या गावाला भेट दिली. या गावातील नुकसान पाहिले तर असे लक्षात येते की शासनाचे मदत व पुनर्वसन विभागाचे जे निकष आहेत त्या निकषांप्रमाणे जर या गावात मदत दिली तर ती मदत 5 टक्के सुध्दा होऊ शकणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये सांगितले आहे की, पूर्णत: नुकसान झाल्या घरांसाठी 4800 रुपये आणि अंशत: नुकसान झालेल्या घरांसाठी 2400 रुपये मदत देण्यात येईल. परंतु एक भिंत जरी बांधावयाची म्हटले तर या 4800 रुपयांमध्ये होऊ शकत नाही. म्हणून माननीय महसूल मंत्री आणि पालकमंत्र्यांनी ज्यावेळी या गावाला भेट दिली होती त्यावेळी त्यांनी जाहीर केले होते की, या गावासाठी विशेष पॅकेज शासनाकडून दिले जाईल. या विशेष पॅकेजच्या माध्यमातून 12 हजार रुपये घरासाठी कर्ज म्हणून देऊ असेही ते म्हणाले होते. आपद्ग्रस्त आणि संकटात सापडलेल्या माणसाला ज्याचे अगोदरच नुकसान झालेले आहे त्याला पुन: कर्जामध्ये कशाला टाकतात. म्हणून माझी मागणी अशी आहे की, ज्यांच्या घराचे पूर्णत: नुकसान झालेले आहे त्यांना 50 हजार रुपये आणि अंशत: नुकसान झालेल्या घर मालकाला 25 हजाराची मदत शासन देणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, बुलडाणा जिल्हयातील कोराळा बाजार या गावाला 10 मार्च रोजी संध्याकाळी चक्रीवादळाचा तडाखा बसला आणि त्यामुळे त्या संपूर्ण गावातील घरांचे तसेच गोठयांचे व सार्वजनिक मालमत्ता म्हणजेच शाळा, आंगणवाडया तसेच पी.एच.सी. चे देखील मोठया प्रमाणात नुकसान झाले ही वस्तुस्थिती आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे अतिशय भीषण अशी परिस्थिती त्या गावात आहे. बुलडाणा जिल्हयाच्या इतिहासातही अशा प्रकारे

..........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ......

चक्रीवादळामुळे गांव उध्वस्त होण्याची घटना माझ्या वाचण्यात आणि पाहण्यात पहिल्यांदाच आली. या चक्रीवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला सामोरे जात असतांना 597 घरांची पडझड झाली आणि त्याचा उल्लेख या निवेदनात देण्याचा प्रयत्न केला आहे. 112 गोठयांचेही नुकसान झालेले आहे. अनेक व्यक्ती जखमी झाल्या आहेत. या सर्व घरांना मदत करीत असतांना शासनाचे जे स्थायी आदेश आहेत त्याप्रमाणे मदत दिली गेली तर निश्चितपणे ती कमीच होईल, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितली ही गोष्ट खरी आहे की, इतक्या कमी मदतीमध्ये या गावातील पडलेल्या घरांची एक भिंत सुध्दा उभी राहू शकत नाही. म्हणून मागील वर्षी पावसाळयामुळे महापूर व अतिवृष्टी झाली होती त्यावेळी जे निकष लावले होते त्यानुसार या नुकसानीसाठी 40 हजाराची मदत दिली होती. तशाच प्रकारची मदत या ठिकाणी करण्यात येईल. त्याप्रमाणे ज्या घरांचे पूर्णत: नुकसान झालेले आहे त्या घरासाठी 40 हजार आणि अंशत: नुकसान झालेल्या घरासाठी देखील त्याच निकषांप्रमाणे मदत देण्यात येईल.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गावतलाव निंभा, ता.बाळापूर, जि.अकोला या कामावर झालेला भ्रष्टाचार.

**मु.शी.**: गावतलाव निंभा, ता.बाळापूर, जि.अकोला या कामावर झालेला भ्रष्टाचार.याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात (जलसंधारण मंत्री) : सभापती महोदय, सन्मानीय विरोधी पक्ष नेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "गावतलाव निंभा, ता.बाळापूर, जि.अकोला या कामावर झालेला भ्रष्टाचार." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभगृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे प्रकरण गंभीर आहे. संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत अकोला जिल्हयातील बाळापूर तालुक्यातील निंभा गावासासाठी रुपये 19 लाख 30 हजार इतक्या किंमतचा गाव तलाव मंजूर झाला. या तलावाची अंदाजित किंमत 20 लाख 22 हजार इतकी होती. यास तांत्रिक मान्यता दिनांक 26/3 रोजी आणि प्रशासकीय मान्यता दिनांक 31.3.2003 रोजी मिळाली. या तालावाच्या बांधकामासाठी रोख रक्कम रुपये 13 लाख 72 हजार व धान्यासाठी रुपये 5 लाख 98 हजार अंदाजपत्रकात दिली गेली. तसेच 92 हजार किलो गहू, 23 लाख किलो तांदूळ देण्यात आला. "निंभा गाव तलावाची चोरी" या मथळयाखाली वृत्तपत्रामध्ये बातमी आली होती. हे प्रकरण केव्हा उघडकीस आले ? एका वकिलाने महितीच्या आधारे माहिती मागितली असता, ती त्याला देण्यात आली नाही. त्यामुळे दुसऱ्या एका नागरिकाने माहिती मागितली. त्यास माहिती देताना डेप्युटी इंजिनिअरने असे नमूद केले आहे की, सदर काम सुरू केल्याचा दिनांक 1.4.2003 असून काम पूर्ण झाल्याचा दिनांक 31.3.2005 असा आहे. निधी कसा खर्च झाला, धान्यावर किती निधी खर्च झाला ही माहिती संबंधित अधिकारी माहितीच्या अधिकारान्वये देण्यास नव्हते. तरी देखील हे प्रकरण बाहेर आले. या प्रकरणाची चौकशी होईल म्हणून अधिकारी खडबडून जागे झाले. मी त्या कामाला भेट दिली. तेव्हा तेथे काय दृश्य पाहिले ? रोजगार हमी योजनेचे काम असताना तेथे 15 ट्रॅक्टर लावून आजूबाजूची माती गोळा करीत होते. तेथे भिंत बनविली होती. तिला पाया नव्हता. तेथील गॉर्जचे काम पूर्ण झाले नव्हते. सांडवा दिलेला नव्हता. सर्व्हे क्रमांक 5/1 व सर्व्हे क्र.5/3 मधील जमिनीवर हा तलाव आहे. पण आज त्या तेथे जाऊन पाहिले तर त्या जमिनीवर पीक उगवल्याचे दिसेल. सर्व्हे क्र.5/1 वर भिंत उभारण्या ऐवजी दुसऱ्या ठिकाणी भिंत उभारण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर एकाही मजुराला मजुरी दिली गेलेली नाही. इतकेच नव्हे तर रुपये 5 लाखाचे धान्य हे परस्पर विकण्यात आले आहे, मजुरांची खोटी यादी तयार करण्यात आली आहे. तेव्हा माझी मागणी आहे की, हे संपूर्ण प्रकरण शासनाने तपासून पहावे. धान्य किती घेतले, त्याचे वाटप कधी झाले, कोणत्या गावाच्या मजुरांना धान्य वाटप केले इत्यादी सर्व प्रकारची माहिती शासनाने तपासून पहावी. हे प्रकरण भ्रष्टाचाराचे आहे. ते फार गंभीर आहे. या प्रकरणानंतर मी जवळ जवळ 10 पत्र लिहिली. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

कलेक्टरपासून कमिशनरना पत्र पाठविली. परंतु, संबंधितांविरुध्द काहीही कारवाई झालेली नाही. एवढेच नव्हे तर पत्राचे उत्तर देखील आलेले नाही. परंतु, आता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून पत्र आले आहे की, सदर काम अर्धवट अवस्थेत आहे. डेप्युटी इंजिनिअरने काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती, माहितीच्या अधिकारान्वये दिलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पत्रानुसार आतापर्यंत रुपये 10.00 लाख इतका खर्च सदर कामावर करण्यात आलेला आहे. एकंदरीत हे प्रकरण गंभीर आहे. त्यामुळे यास प्रकल्प अधिकारी, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता हे सर्व जबाबदार आहेत. या कामात जवळ रुपये 20.00 लाखाचा भ्रष्टाचार झालेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 15:15

श्री.पांडुरंग फुंडकर....

या भ्रष्टाचाराची खऱ्या अर्थाने माननीय मंत्री महोदय चौकशी करणार आहेत काय ? ज्यांनी सहया करुन पैसै विथ्ड्रॉल केले आहेत त्यांच्यावर आणि तलावाचे काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ? चौकशी जरी सुरु असली तरी त्या कामासंदर्भातील रेकॉर्ड जप्त केले जात नाही. त्यामुळे माझा दुसरा प्रश्न असा आहे की, तेथील रेकॉर्ड जप्त केले जाईल काय ? श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमध्ये हे काम दिनांक 31 मार्च, 2003 रोजी मंजूर झालेले आहे. दिनांक 1 एप्रिल. 2003 पासून या कामास प्रत्यक्ष सुरुवात झाली. या कामावर साधारणत: 10 लाख 62 हजार रुपये इतका खर्च झालेला आहे. उर्वरित काम पूर्ण करुन, पैसा देण्याचे काम बाकी आहे अशी माझ्याकडे माहिती आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या प्रकरणासंदर्भात वक्तव्य केल्यामुळे, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेण्यात येईल. वास्तविक पाहता यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांचे दक्षता पथक या कामाची चौकशी करीत आहे. ती चौकशी साधारणत: 15 दिवसांत करणार आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, या कामासंदर्भात जरी चौकशी होत असली तरी त्या कामासंदर्भातील संपूर्ण कागदपत्रे त्या अधिकाऱ्यांकडे आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून कागदपत्रांमध्ये खाडाखोड करणे, महत्वाची कागदपत्रे गहाळ करणे आणि खोटे मस्टर तयार करणे असे प्रकार सुरु आहेत. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी या कामामध्ये भ्रष्टाचार करुन, रकमेचा अपहार केला असेल त्यांची आयुक्त स्तरावरुन चौकशी करुन, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ? तसेच हे अधिवेशन संपण्यापूर्वी या प्रकरणामध्ये जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केल्याबाबतचा अहवाल माननीय मंत्री महोदय सभागृहाच्या पटलावर ठेवतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुचविल्यानुसार या प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्तांच्या पातळीवरुन केली जाईल. या कामाचे जे रेकॉर्डस् आहे ते ताब्यात घेण्याबाबत सूचना देण्यात येतील. आयुक्त स्तरावरुन या प्रकरणाची चौकशी 15 दिवसांत करण्यात येईल. आयुक्तांच्या निर्णयानुसार करण्यात आलेल्या कारवाईबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्र.4 बाबत.**</u>

**उपसभापती** : यानंतर निवेदन क्रमांक-4 हे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या सूचनेसंदर्भात आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण सदनामध्ये उपस्थित नसल्यामुळे आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्त्याच्या मुद्याबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री महोदयांनी लॉटरी बंदी संदर्भात जे निवेदन केले त्याबाबत आम्हाला वर्तमानपत्रातून वाचावयास मिळाले. ऑनलाईन लॉटरी बंद करण्यात येईल असे त्यांनी निवेदन केले आहे. महाराष्ट्रातील सर्वच लॉटरी बंद करण्यात येणार असून, त्यामुळे मोठया प्रमाणावर बेकारी निर्माण होऊन, महाराष्ट्रातील 20 हजार मराठी तरुण जो या व्यवसायामध्ये आहे त्याच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार, अशा प्रकारची सत्य-असत्य माहिती आज राज्यामध्ये पसरलेली आहे. म्हणून आज लॉटरी विक्रेत्यांचा मोर्चा विधान भवनावर आला आहे. त्यामुळे लॉटरी बंदीबाबतचा निर्णय खरा की, खोटा, याबाबत सत्य जाहीर होणे आवश्यक आहे. लॉटरी व्यवसायामध्ये हजारो अंध, अपंग, तरुण असल्यामुळे त्यांचे कुटुंब या रोजगारावर अवलंबून आहे. लॉटरी व्यवसायावर बंदी आणल्यानंतर त्यांच्यावर उपासमारीची पाळी येईल की काय, अशा प्रकारची परिस्थिती आज सर्वत्र निर्माण झालेली आहे. महोदय, आमचा लॉटरीला पाठिंबा नाही. परंतु या लॉटरी बंदीमुळे बेरोजगार होणाऱ्या कुटुंबांचा यक्ष प्रश्न महाराष्ट्रासमोर उभा राहिल अशी आज परिस्थिती निर्माण झाली आहे. ऑनलाईन लॉटरी हा खरोखरच गंभीर विषय आहे. ऑनलाईन लॉटरी जुगारापेक्षा भीषण आहे असे माझे मत आहे. त्यामुळे या लॉटरी बंदीविषयी शासनाकडून भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, या संदर्भात मोठ्या प्रमाणात मोर्चा आलेला आहे. तरी, समज व गैरसमज यामधील फरक समजला पाहिजे. महाराष्ट्रातील हजारो कुटुंबांचा प्रश्न निर्माण झालेला असल्यामुळे शासनाने या संदर्भातील भूमिका स्पष्ट करावी अशी अपेक्षा आहे. सभापती महोदय, ऑन लाईन लॉटरीचे आम्ही समर्थक नाही आणि कधी असणारही नाही. महाराष्ट्र राज्याची आणि इतर राज्यांची लॉटरीची तिकीटे विकण्याचा अनेक तरुणांचा रोजगार आहे. तरी, सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्यामुळे या सदनाच्या माध्यमातून आपण शासनाला या संदर्भातील भूमिका मांडण्यास भाग पाडावे अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या संदर्भात माननीय वित्त मंत्र्यांना भूमिका मांडण्यास सांगण्यात येईल.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानात हरणांचा झालेला मृत्यू.

**मु.शी.** : वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानात हरणांचा झालेला मृत्यू यासंबंधी सर्वश्री मुझफ्फर हुसेन सय्यद, संजय दत्त, रमेश निकोसे, धनाजी साठे, नतिकोद्दीन खतिब, सुधाकर गणगणे, सुधीर सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मुझफ्फर हुसेन ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानात दिनांक १३ फेब्रुवारी, २००६ रोजी वा त्यासुमारास सुमारे ११ हरणांचा मृत्यू होऊन सुमारे ७ हरणे गंभीर जखमी झाल्याची भितीदायक घटना घडणे, हरणांच्या पिंजऱ्यात काही कुत्र्यांची पिल्ले घुसून केलेल्या हल्ल्यात हरणांचा मृत्यू झाला असल्याचे अथवा हृदयविकाराच्या झटक्याने किंवा अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे मृत्यू झाला असावा असा संशय व्यक्त केला जात असून त्याचे गूढ अद्यापी उकललेले नसणे, या उद्यानातील प्राण्यांच्या सुरक्षितपणाबाबत निर्माण झालेला धोका, दिवसेंदिवस उद्यानांतील प्राण्यांची मोठ्या प्रमाणात घटत असलेली संख्या, तसेच येथील प्राण्यांच्या खाद्यांसाठी मंजूर निधीचा गैरवापर होत असून त्यात कोट्यावधी रुपयांचा होत असलेला भ्रष्टाचार, उद्यानातील प्राण्यांकडे पालिका प्रशासनाचे नेहमीच होत असलेले दुर्लक्ष, भविष्यात पुढे अशाच वारंवार घटना घडत राहिल्यास सदर उद्यानातील प्राण्यांची संख्या नष्ट होण्याची निर्माण झालेली भीती, यामुळे प्राणी प्रेमी जनतेत पसरलेले चिंतेचे वातावरण, प्राण्यांच्या खाद्य निधीत होत असलेल्या भ्रष्टाचारास व प्राण्यांच्या असुरक्षिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, दिनांक 13 फेब्रुवारीला भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान या ठिकाणी हरणांच्या कुंपनांमध्ये काही कुत्रे शिरले होते आणि त्याप्रकारच्या विविध कारणांमुळे तेथील हरणांचा मृत्यू झाला. सभापती महोदय, निवेदनातील पॉईंट क्रमांक 3 मध्ये असे म्हटले आहे की, महापालिकेने केलेल्या प्राथमिक चौकशीत प्राणी संग्रहालयातील उपअधीक्षक यांना निष्काळजीपणाबद्दल जबाबदार धरुन निलंबित केले असून त्यांच्यासह अन्य 4 कर्मचाऱ्यांविरुध्द खातेनिहाय चौकशी करण्यात येत आहे. " तरी, सदर बाबतीमध्ये मी माननीय मंत्रीमहोदयांना असे विचारु इच्छितो की, आपण या संदर्भातील चौकशी केव्हा पूर्ण करणार आहात ? आणि जर चौकशी पूर्ण झाली असेल तर त्यातून कोणता निष्कर्ष निघाला आहे ? त्याचप्रमाणे सभापती महोदय, प्राथमिक चौकशीमध्ये हेही सिध्द झाले आहे की, त्या ठिकाणी तयार करण्यात आलेली कुंपने मागील एका महिन्याअगोदरच तयार करण्यात आली होती आणि ती कुंपने तयार करताना महापालिकेचा कोणत्याही इंजिनिअरचे त्या कुंपनांच्या डिझायन संदर्भात ॲप्रुव्हल नव्हते. सभापती महोदय, अशाप्रकारची बातमी देखील प्रसिध्द झालेली आहे. सभापती महोदय, ही माहिती जर खरी असेल तर आपण संबंधित इंजिनिअरवर काय कारवाई करणार आहात ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानात अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणा संदर्भात हायकोर्टाने मुख्य वन संरक्षण श्री. यदू व्यंगडू यांच्या अध्यक्षतेखाली तातडीने एक कमिटी नेमली होती. या कमिटीमध्ये साधारणपणे 4 व्यक्ती आहेत. हायकोर्टाला रिपोर्ट सादर करावयाचा आजचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे हा रिपोर्ट डायरेक्टली हायकोर्टाला सबमिट केला जाणार आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला तो म्हणजे यामध्ये टेक्निकल दोष असल्यामुळे संबंधित सब इंजिनिअरवर काही कारवाई केली आहे का ? तरी, त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, यामध्ये पाच लोकांवर कारवाई केली आहे. त्यामध्ये झू चे डेप्युटी सुप्रिटेन्डंट यांना सस्पेंड करण्यात आले आहे. तसेच सिक्युरिटी गार्ड श्री. ननवरे, सब इंजिनिअर श्री. पाबरेकर, हेड ॲनिमल किपर श्री. यशवंत तांबे आणि ॲनिमल किपर श्री. महेंद्र कदम अशा सर्वांची विभागीय चौकशी सुरु आहे. त्याचप्रमाणे ज्यांनी हे बांधकामाचे डिझाईन केले आणि बांधकाम केले, त्या श्री. पाबरेकरांची देखील विभागीय चौकशी सुरु आहे.

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदनात असे म्हटले आहे की, प्राणीपाल यांच्या सांगण्यानुसार सदर पिंजऱ्यामध्ये 3 भटकी कुत्रे होते आणि प्राणीपालाला पाहताच ते पळून गेले. सभापती महोदय, निवेदनात असे म्हटले आहे की, या ठिकाणी निष्काळजीपणामुळे हरणांचा मृत्यू झाला आहे आणि त्या संदर्भात उप निरिक्षक यांच्या निष्काळजीपणामुळे त्यांना निलंबित केले आहे. वास्तविक पाहता सकृतदर्शनी प्राणीपालावर कारवाई करणे आवश्यक होते. तरी, या संदर्भातील माहिती शासन देईल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, डेप्युटी सुप्रिटेंडन्ट, ॲनिमल कीपर, सब ॲनिमल कीपर या लोकांच्या निष्काळजीपणामुळेच त्यांच्याविरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. डेप्युटी सुप्रिटेंडन्ट यांना सस्पेंड करण्यात आलेले आहे.

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विडी कामगारांच्या सोई सवलतीकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष

**मु.शी.**: विडी कामगारांच्या सोई सवलतीकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष याबाबत

सर्वश्री जितेंद्र आव्हाड, राजेद्र जैन, सदाशिवराव पोळ, जोगेंद्र कवाडे, लक्ष्मण जगताप, जगन्नाथ शेवाळे, प्रा. फौजीया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. वसंतराव चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

......2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दिनानाथ नाटयगृह व जयप्रभा स्टुडिओच्या व्यापारीकरणास परिसरातील जनतेचा असलेला तीव्र विरोध

**मु.शी.**: दिनानाथ नाटयगृह व जयप्रभा स्टुडिओच्या व्यापारीकरणास परिसरातील जनतेचा असलेला तीव्र विरोध यासंबधी डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. मधुकर सरपोतदार, विलास अवचट, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मुख्यमंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"महाराष्ट्राच्या गळयातील ताईत बनलेल्या व आपल्या नाटयसंगीतांने व अभिनयाने एकेकाळी महाराष्ट्र गाजविला अशा नाटय तपस्वी असलेल्या मास्टर दिनानाथ मंगेशकरांच्या नावाने असलेले नाटयगृह तोडून त्या ठिकाणी व्यापारी तत्वावर संकुलन बांधण्याचा सांगली महानगरपालिकेने घेतलेला निर्णय, सदर व्यापारी संकुल बांधणे म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीवर घाला घातला असल्याची लोकांमध्ये निर्माण झालेली भावना, अशाच प्रकारे कोल्हापूरातील चित्रपट महर्षि भालजी पेढांरकर यांचा जयप्रभा स्टुडिओ मोडीत काढून त्या ठिकाणी असलेल्या भालजी पेंढारकरांच्या स्मारकाची जागा तेथील खाजगी बिल्डर्सला देण्यात येणे, यामुळे कोल्हापूर व आसपासच्या जनतेत असंतोष पसरल्याने जनतेच्या भावना लक्षात घेवून तसेच मंगेशकर कुटुंबियांनी याबाबत मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी दिनानाथ नाटयगृह पाडण्याच्या प्रस्तावास स्थगिती देणे, तशाच प्रकारची स्थगिती जयप्रभा स्टुडिओच्या मोडीत काढण्याच्या प्रकरणास देण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, दिनानाथ नाटयगृह व जयप्रभा स्टुडिओच्या व्यापारीकरणास परिसरातील जनतेचा असलेला तीव्र विरोध लक्षात घेता सदर परिसरात जनक्षोभ उसळून येण्याची निर्माण झालेली परिस्थिती, यावर शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची भूमिका."

.......३....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत करण्यात आल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : सोबतचे निवेदन येथे छापावे )

......४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण या प्रश्नांच्या संदर्भात थोडासा इतिहास पाहिला तर आणि केवळ प्रश्नांपर्यंत जाण्याच्या अगोदर शासनाकडून जे उत्तर आलेले आहे, त्यामध्ये सांगली येथील मास्टर दिनानाथ मंगेश नाटयगृह आणि त्या नाटयगृहाच्या ठिकाणी व्यापारी संकुल उभारण्यात येणार होते, त्याला शासनाने स्थगिती दिलेली आहे. त्याबद्दल योग्य तो निर्णय घेतला गेलेला आहे यामध्ये काही शंकाच नाही. प्रश्न असा आहे की, कोल्हापूर मध्ये भालजी पेंढारकरांचा जो स्टुडिओ होता. तो स्टुडिओ काही वर्षापूर्वी लिलावात निघण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी कोणीतरी परप्रांतीय येऊन मराठी लोकांच्या अस्मितेचे आणि रसिकांचे अतिशय जिव्हाळयाचे स्थान असलेला जयप्रभा स्टुडिओ दुसऱ्या कोणाच्या तरी घशामध्ये जाईल म्हणून महाराष्ट्राची आणि भारताची ज्यांना आपण गान कोकिळा मानतो त्या लताजी मंगेशकर आणि त्यांच्या कुटुंबियांनी हा जयप्रभा स्टुडिओ विकत घेतला. त्यानंतर या जयप्रभा स्टुडिओला शक्य त्या पध्दतीने सांभाळण्याचे आणि त्यावर लागेल तो खर्च करण्याचे काम मंगेशकर कुटुंबियांनी केले आहे. मध्यतरीच्या काळामध्ये भालजी पेंढारकरांची कर्मभूमी असलेले कोल्हापूर या ठिकाणी त्यांच्या नावाने एखादी स्मृती आणि चित्रपट विषयक स्मारक उभे राहावे, अशी इच्छा चित्रपट अभिनेत्री सुलोचनाजी यांनी केल्यानंतर जवळ जवळ 10 ते 12 वर्षापूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै. सुधाकरराव नाईक यांनी या कामासाठी 25 लाख रुपये दिले होते. आता जवळ-जवळ या घटनेला सुध्दा 12 ते 13 वर्षे झ ाालेली आहेत. मध्यतरीच्या काळात आमच्या माहिती प्रमाणे या जागेवरती भालजी पेंढारकारांचे योग्य असे स्मारक व्हावे, चित्रपट सृष्टीला त्याचा फायदा व्हावा, त्यासाठी लागणारा खर्च व देखभाल यासाठी लता मंगेशकर आणि त्यांच्या कुटुंबियांनी तयारी दर्शविली होती. आता यामध्ये प्रश्न असा आहे की, कोल्हापूर मध्ये भालजी पेंढारकर यांचे स्मारक होण्याच्या दृष्टीकोनातून ते स्मारक कोठे व्हावे, कशा प्रकारे व्हावे, याबद्दल कोल्हापूर महानगरपालिका स्वत:हून काहीच पुढाकार घेत नाही. हे आतापर्यंत घडलेल्या घटनाक्रमावरुन दिसून येते. या विषयावर लक्षवेधी लावण्याचे कारण देखील हेच आहे. कोल्हूपर मधील जयप्रभा स्टुडिओ अतिशय दुर्लक्षित असा आहे, त्या स्टुडिओच्या परिसरामध्ये जे रसिक लोक आहेत, चित्रपट महामंडळाशी संबंधित लोक आहेत, त्यांचे आणि खास करुन मंगेशकर कुटुंबियांचे याबद्दलचे मनोगत काय आहे हे जाणून घेऊन महाराष्ट्र राज्याच्या नगर विकास विभागाने याबद्दल पुढाकार घेऊन मूळच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

कर्मभूमीमध्ये भालजी पेंढारकरांचे स्मारक उभे करण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलेले काय ? ती पावले उचलणार असेल तर त्याची कार्यपध्दती आणि कालमर्यादा कशी असावी याबाबत सभापती महोदय आपण संरक्षण देऊन करुन घ्यावी. आदरणीय कै. जयंतरावजी टिळक पूर्वी ज्यावेळी सांस्कृतिक मंत्री होते त्यावेळी त्यांनी स्वत: लक्ष घालून प्रयत्न केले होते पण मार्ग निघाला नाही. आता शहरांचे नागरिकीरण जसे वेगाने होत चालले तशी ही निवासी जमिन म्हणून कंन्सिडर झ ााल्यावर पुढील काळामध्ये या जमिनीचे आणि भालजी पेंढारकारांच्या नावांनी स्मृती उभारण्याचे स्वप्न कायमचेच बासनामध्ये बांधले जाईल की काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे. याबद्दल महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन, सभापती महोदयांनी या प्रश्नांमध्ये लक्ष घालून एक ठोस असा कार्यक्रम आखून ठराविक काळामध्ये योग्य असे स्मारक त्या ठिकाणी कसे तयार होईल या दृष्टीकोनातून पावले उचलली जातील काय ? असा माझा महत्वाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री. सांगळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, चित्रपट महर्षि भालजी पेंढारकर यांचे चित्रपट सृष्टीतील काम निश्चितच उल्लेखनीय आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सदरची जागा मंगेशकर कुटुंबियांची असल्याचे सांगितले आहे. मंगेशकर कुटुंबियांची ती खाजगी प्रॉपर्टी आहे. त्या जागेवर चित्रपट महर्षि भालजी पेंढारकर यांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध करुन द्यायची काय, हा त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. सभापती महोदय, चित्रपट महर्षि भालजी पेंढारकर यांचे उल्लेखनीय काम व सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांच्या भावना लक्षात घेऊन या संदर्भात मंगेशकर कुटुंबियासमवेत चर्चा करुन, त्यांचे मत लक्षात घेऊन चित्रपट महर्षि भालजी पेंढारकर यांचे स्मारक उभारण्याच्या दृष्टीकोनातून शासनाकडून प्रयत्न करण्यात येईल. एवढे करुनही ही बाब होत नसेल तर, चित्रपट महर्षि भालजी पेंढारकर यांचे स्मारक व्हावे अशी आपली अपेक्षा असेल तर कोल्हापूर महानगरपालिका आणि शासन मिळून दुसरीकडे उचित जागा मिळू शकेल काय ? याबाबत तपासणी करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, या लक्षवेधीमध्ये दोन भाग आहेत. एक सांगलीच्या मास्टर दिनानाथ मंगेशकराच्या नाटयगृहाचा आणि दुसरा कोल्हापूरच्या जयप्रभा स्टुडिओबाबतचा आहे. महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून मनी मेकिंग संस्था नाही. असे असताना सुध्दा सांगली महानगरपालिकेने उत्पन्न वाढीचे विविध मार्ग अनुसरण्यासाठी हा ठराव केलेला आहे. या संदर्भात शासनाने दिलेल्या निवेदनामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दांबाबत सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेशी सविस्तर चर्चा करण्यात येईल व या मधून समाधानकार तोडगा काढण्याचा शासनाकडून प्रयत्न केला जाईल असे नमूद करण्यात आले आहे. म्हणून माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या समाधानकारक तोडग्याचे स्वरुप काय आहे ?

श्री.राजेश टोपे : सन 1958 पासून सांगली येथे मास्टर दिनानाथ मंगेशकर नाटयगृह अस्तित्वात आहे. त्यानंतर या नाटयगृहाचे 1998 मध्ये नूतनीकरण करण्यात आले. सांगली येथे महानगरपालिका झाल्यानंतर सुध्दा तेथील आर्थिक परिस्थिती अतिशय खराब आहे. म्हणून उत्पन्नाचे साधन म्हणून अत्याधुनिक नाटयगृहासह बीओटी तत्वावर व्यापारी संकुल विकसित करण्याबाबतचा ठराव करण्यात आला. त्यामुळे ही जागा हेरिटेज ग्रेड-3 मध्ये येऊ शकेल. या संदर्भात नाटयगृह ग्राऊंड फ्लोअरवर कशा पध्दतीने असावे, याबाबत लता मंगेशकर यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे पत्र दिलेले आहे. या सर्व भावना लक्षात घेऊन तेथे स्थगिती देण्यात आली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ SBT/ MHM/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 15:30

श्री.राजेश टोपे ...

या महिन्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात येईल. या दोघांचा मध्यमार्ग काढण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणा-या बैठकीमध्ये निश्चितपणे तोडगा काढण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : या लक्षवेधीमध्ये सांगलीच्या मास्टर दिनानाथ मंगेशकराच्या नाटयगृहाच्या संदर्भात आणि दुसरा कोल्हापूरच्या जयप्रभा स्टुडिओच्या प्रकरणाबाबतच्या दोन्ही चर्चा एकत्र करण्याचा प्रयत्न होत आहे. मंगेशकर कुटुंबियांनी माननीय मुख्यमंत्र्याकडे तक्रार केल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी मास्टर दिनानाथ नाटयगृह पाडण्याच्या प्रस्तावास स्थगिती दिली आहे, याबाबतचा निर्णय नंतर होईल. माझा प्रश्न आहे की, कोल्हापूरच्या संदर्भात चित्रपट महर्षि भालजी पेंढारकर यांच्या जयाप्रभा स्टुडिओ अस्तित्वात असलेला भूखंड विकसनाबाबत खाजगी बिल्डसमार्फत कोणताही प्रस्ताव कोल्हापूर महानगरपालिकेकडे अद्याप सादर झालेला नसल्यामुळे सदर भूखंडाच्या व्यापारी विकसनास स्थगिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे निवेदनात सांगण्यात आले आहे. कोल्हापूरला चित्रपट महर्षि भालजी पेंढारकर यांच्या जयाप्रभा स्टुडिओच्या जागेमध्ये चित्रपट महर्षि भालजी पेंढारकर यांचे स्मारक होईल व उर्वरित जागेमध्ये व्यापार कसा करावयाचा, याबाबत संबंधित लोकांशी चर्चा करुन शासन निर्णय घेईल काय ? तसेच कुठल्याही परिस्थितीत ही जागा खाजगी विकासकाला विकली जाणार नाही असा विश्वास शासन देईल काय ?

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी माझ्या सुरूवातीच्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओ हा मंगेशकर कुटुंबियांची खाजगी प्रॉपर्टी आहे. त्यामुळे त्याबाबत आपण या ठिकाणी बसून काही सांगणे योग्य होणार नाही. 1974 साली भालजी पेंढारकर यांचेकडून ही प्रॉपर्टी इतर कोणी लिलावामध्ये विकत घेऊ नये म्हणून मंगेशकर कुटुंबियांनी विकत घेतलेली आहे आणि आता मंगेशकर कुटुंबीय त्या प्रॉपर्टीचे मालक आहेत. मधल्या काळामध्ये त्या ठिकाणी तो कमर्शिअल झोन झाला तेव्हा त्यांनी त्याबाबत अर्ज केला होता. आणि मग जो डीपी प्लान झाला तेव्हा त्यातील काही भाग हा कमर्शिअल झोन आणि काही निवासी झोन झालेला आहे. यूएलसी मध्ये देखील अॅट्रॅक्ट करणारा हा मुद्दा आहे. जवळपास तेथे ही साडेतीन हेक्टर जमीन आहे त्यामुळे त्यातील 2 हेक्टर जमीन ही यूएलसीमध्ये सेक्शन 8 खाली येते. परंतु सेक्शन 20 खाली गृहनिर्माणाचा प्रस्ताव असतो तो दिलेला असल्यामुळे त्या सगळ्या दृष्टीकोनातून पाहिल्यास निवासाचा मुद्दा देखील महत्त्वाचा आहे. तेव्हा मला या प्रसंगी एवढेच सांगावयाचे आहे की, कोल्हापूर शहरामध्ये स्व. भालजी पेंढारकर यांचे स्मारक होणे हे महत्त्वाचे आहे म्हणून त्या दृष्टीने मंगेशकर कुटुंबियांशी चर्चा करून हे स्मारक करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता मंत्री महोदयांनी सांगितले की, तेथे सरप्लस जमीन 2 हेक्टर आहे. सेक्शन 8 च्या अंतर्गत तेथे इमारत बांधण्यासाठी जो प्रस्ताव आहे त्यामध्ये शासनाला 5 टक्के जागा नियमानुसार मिळणार आहे. तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, त्या 5 टक्के जागेचा हिशोब करून तेवढा भूखंड त्यांचेकडून काढून घेऊन त्यावर भालजींचे स्मारक उभारावे. ते जास्त चांगले होईल. यासाठी अधिक वाटाघाटी करण्याचीही गरज नाही. यूएलसीची जी सवलत तुम्ही देता त्याच्या समोर तुम्हाला ही 5 टक्के जागा मिळणार आहे आणि 2 हेक्टरच्या 5 टक्के म्हणजे जवळपास 4 एकर जागा आपल्याला तेथे उपलब्ध होऊ शकते आणि त्या जागेवर आपण चांगल्या प्रकारे भालजींचे स्मारक करू शकाल असे मला वाटते. म्हणून माझ्या या सुचनेचा आपण अवश्य विचार करावा. त्यातून आपल्याकडून फार मोठे काम आपण करू शकाल आणि हे सारे आपण कायद्यामध्ये बसूनच करू शकणार आहात. तेव्हा माझ्या या सुचनेचा आपण विचार करून त्याप्रमाणे कारवाई कराल का, आदेश द्याल का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आता सेक्शन 20 खाली ज्या गोष्टी आहेत त्यासाठी त्यांचेकडून तो प्रस्ताव यावा लागतो आणि मी इतकेच सांगेन की, मी येथे या संदर्भात अगदी सकारात्मकच बोलतो आहे आणि आपल्या सूचनेचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

***

22-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अहमदनगर शहरात उघडकीस आलेले वासनाकांड.

**मु.शी.** : अहमदनगर शहरात उघडकीस आलेले वासनाकांड याबाबत
सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीमती कांता नलावडे,
श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण,
श्रीकांत जोशी, संजय दत्त, सुधाकर गणगणे, रमेश निकोसे,वि.प.स.
यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो. -

" माहे फेब्रुवारी 2006 मध्ये अहमदनगर शहरात गरीब घरातील अल्पवयीन मुलींना पैशाचे अमिष दाखवून वेश्या व्यवसायास भाग पाडणारे वासनाकांड उघडकीस येणे, या लैंगिक शोषणाची माहिती श्री.दिलीप बारगळ याने नोव्हेंबर 2005 मध्ये तोफखाना पोलीस ठाण्यामध्ये देऊनही त्याकडे पोलिसांनी दुर्लक्ष करणे, पोलिसांऐवजी "चाईल्ड लाईन" या संस्थेने या वासनाकांडाचा छडा लावणे, त्यामुळे नागरिकांचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास उडणे, या वासनाकांडात बळी पडलेल्या मुलींचे व त्यांच्या कुटुंबियांचे जीवन उध्वस्त झाल्यामुळे पोलिसांबद्दल जनतेत निर्माण झालेला तीव्र संताप, वासनाकांड करणारे व त्यांच्याविरूद्ध टाळाटाळ करणारे पोलीस अधिकारी यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सुचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवज्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा.गृहराज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला शासनाकडून जे उत्तर देण्यात आलेले आहे त्या निवेदनामध्ये आम्ही या सूचनेमध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरच दिलेले नाही. म्हणून आमचा आक्षेप आहे की, जी माहिती आम्ही या सुचनेमध्ये विचारली आहे ती पूर्णपणे या निवेदनामध्ये दिलेली नाही. अहमदनगरमध्ये 15 व 16 वर्षे वयाच्या दोन अल्पवयीन मुलींना पैशाचे अमिष दाखविले जाते आणि त्या मुलींवर 17 जानेवारी ते 31 जानेवारी या 10-15 दिवसांच्या काळामध्ये बलात्कार केला जातो. त्या मुलींच्या गरीबीचा फायदा घेऊन अनेक धनाढ्य लोक या मुलींना नादी लावून, पैशाचे आमिष दाखवून बलात्कार करतात. हा प्रकार अहमदनगर शहरामध्ये झाला आहे आणि हे प्रकरण ज्यांच्या घरामध्ये होत होते त्यांची पत्नीदेखील त्यामध्ये सामील आहे. म्हणून तो घरमालक पोलीस ठाण्यामध्ये तक्रार करतो. 24 फेब्रुवारी 2006 रोजी चाईल्ड लाईन आणि स्नेहालय या संस्थेने पोलीस ठाण्यामध्ये या दोन मुलींना घेऊन जाऊन तक्रार केली. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एफएफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

ती तक्रार करण्यापूर्वी 1 डिसेंबर 2005 रोजी या कटाची मुख्य सूत्रधार श्रीमती शीला बारगळ हिचा पती श्री, दिलीप बारगळ यांनी माझी पत्नी अशाप्रकारचे अनैतिक कृत्य करीत असून त्याबाबत पोलीस स्टेशनने कारवाई करावी अशाप्रकारची तोफखाना पोलीस स्टेशनला तक्रार केली. परंतु पोलीसांनी त्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्यामुळे हे प्रकरण सीमित न राहता ते वाढत गेले. पहिल्या प्रकरणामध्ये 7 आरोपींना आणि दुसऱ्या प्रकरणामध्ये 5 आरोपींना अटक केल्यानंतर हे प्रकरण गुन्हा अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात आले. दुसऱ्या गुन्हयामध्ये ज्या तीन आरोपींना अटक करण्यात आली त्यामध्ये एक मागासवर्गीय अल्पवयीन मुलगी आहे. अहमदनगर सारख्या शहरामध्ये ज्या ठिकाणी पोलीस अधिक्षक रहातात अशा एका मोठया शहरामध्ये वासनाकांड चालू आहे. त्यामध्ये अनेक गोष्टी सामील आहेत. यासंबंधीची तक्रार दाखल झाल्यानंतर पोलीस स्टेशन सतर्क झाले नाही. 1 डिसेंबरपासून 24 फेब्रुवारीपर्यंत पोलीसांनी त्याबाबत कोणतीही दखल घेतली नाही. खऱ्या अर्थाने या प्रकरणात 2 मुलींचा बळी गेला आहे. त्या मुलींच्या पालकांनी आणि 2 संस्थांनी पोलीस स्टेशनमध्ये त्यासंबंधी तक्रार दाखल केल्यानंतर गुन्हा रजिस्टर करण्यात आला. त्यानंतरही अनेक आरोपींना पोलिसांनी पकडले नाही. त्यामध्ये जे मुख्य सूत्रधार आहेत त्यांना पकडण्यात आले नाही. त्यांच्याकडे पोलिसांनी कानाडोळा केला. त्यांना कोर्टामध्ये जाऊन अटकपूर्व जामीन मिळविण्याची संधी दिली. त्यामुळे या प्रकरणामध्ये पोलीस स्टेशन सुध्दा तितकेच जबाबदार आहे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी आरोपींना कोर्टामध्ये जाण्याची संधी दिली व खऱ्या अर्थाने त्या आरोपींना नजरेआड केले त्या पोलीस अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात? तेथील पोलीस निरीक्षक जबाबदार आहेत त्यांना निलंबित करण्यात यावे अशाप्रकारची मागणी तेथील राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडीच्या अध्यक्षांनी केली आहे. तरीसुध्दा त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. या प्रकरणामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे काही पदाधिकारी सामील आहेत म्हणून त्यांच्यावर कारवाई केली जात नाही काय? निवेदनामध्ये उल्लेख केलेले व पकडण्यात आलेले 7,5,4 व 3 आरोपी कोण आहेत, त्यांची आपण माहिती देणार काय? तसेच, ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी डिसेंबरपासून या घटनेकडे दुर्लक्ष केले आहे त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्रीमती शीला बारगळ यांचे पती श्री. दिलीप बारगळ यांनी माझ्या घरी अनेक महिला येतात व माझी पत्नी अवैध धंदा करते अशाप्रकारची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये केली. त्या तक्रारीनंतर पोलीस त्या महिलेच्या घरी गेले व त्यांनी चौकशी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे...

केली. ती चौकशी केल्यानंतर श्री. दिलीप बारगळ पती-पत्नी दोघेही पोलीस स्टेशनमध्ये येऊन त्यांनी मी गैरसमजाने तक्रार लिहून दिली असून त्या महिला माझ्या पत्नीच्या मैत्रिणी आहेत. त्यामुळे माझा गैरसमज दूर झाला आहे व आता माझी काही तक्रार राहिलेली नाही असे लिहून दिले. कुमारी अर्चना जाधवच्या पहिल्या प्रकरणामध्ये 11 आरोपींना अटक करण्यात आली. त्यामध्ये सौ. शीला दिलीप बारगळ, हृदीक लखमीचंद जग्गड, सतीश बन्सी पाथरे,आकाश सुभाष राठी, तुकाराम गेना मिसाळ, बालकिसन प्रेमराज गोयल, रमेश उर्फ रमाकांत राजाराम बरकसे...

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (पुढे सुरु....

श्री.अजय सुधाकर काटे, श्री.हरकतसिंग जोधसिंग राजपाल, श्री. आबा उर्फ ज्ञानदेव भागचंद गोंदकर, श्री. रामराव मोहनीराज डेंगळे यांना कु. अर्चना जाधव हिच्या केसमध्ये अटक केलेले आहे..

कु.सोनवणे हिच्या केसमध्ये श्री.अमित कैलास मदान, श्री.नामदेव मारुती कळसकर, श्री.राधवेंद्र रागप्प पुजारी, श्री.कलम भ्र.दिलीप वराडें, सौ.शिला दिलीप बारगळ, श्रीमती सपना रामभाऊ शिंदे, श्री.भागचंद उर्फ भाग्योदय सुभाष पाटील, श्री. रमेश उर्फ उमाकांत राजाराम बरकसे अशी आरोपींची नावे आहेत.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, हे आरोपी सगळे कस्टमर्स आहेत. तिच्या मोबाईलवर त्यांचे मोबाईल नंबर मिळाले. म्हणून मी स्वत: 3 तारखेला नगर येथे जाऊन त्या मुलींना भेटले, त्यांच्याशी बोललेले आहे. श्री.दिलीप बारगळ याने दिनांक 30-11-2005 रोजी तक्रार केलेली आहे, त्याची कॉपी माझ्याकडे आहे. त्याला त्याच्या बायकोचा मित्र श्री.रमेश रासकर याच्यापासून धोका आहे,अशी त्याने तक्रार केलेली आहे. त्यानंतर श्रीमती शीला बारगळ आणि तिचा मित्र श्री.रासकर यांनी "तक्रार मागे घेतोस की नाही? ते सांग नाही तर तुझ्या दोन्ही मुलांना आणि तुला ठार मारीन," असे सांगून श्री.दिलीप बारगळला पोलीस स्टेशनमध्ये घेऊन गेले. असा मुळामध्ये प्रकार झालेला आहे. या दोन मुली या प्रकरणामध्ये अडकलेल्या आहेत. या रॅकेटमध्ये मुख्य आरोपी श्री.विलास कराळे आणि श्री. राम साळवे हे दोघे आहेत. नगर जिल्ह्यातील मळीवाडा भागातील 15 वर्षाची मुलगी हरविली म्हणून तिच्या वडलांनी म्हणजे रिक्षा चालकांनी पोलीसांकडे तक्रार केली. त्या मुलीला श्रीमती शीला बारगळच्या जाळ्यामध्ये फसविण्याचे काम श्री.राम साळवे यांनी केलेले आहे. तो श्री.राम साळवे हा तिच्या वडिलांचा मित्र आहे, म्हणून तो मुलीच्या घरी येत होता.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती कांता नलावडे : मी प्रश्नच विचारते, परंतु सन्माननीय सदनाला नक्की काय प्रकार आहे हे कळले पाहिजे म्हणून, मला या प्रकरणाची पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. श्री.राम साळवे याने सांगितले की, तुझ्या घरची गरिबी आहे, तुला सगळे काही मिळत नाही. तेव्हा तुला सांगतो त्या ठिकाणी तू जा, म्हणजे तुला पैसे मिळतील. अशा पध्दतीने त्याने श्रीमती शीला बारगळकडे त्या मुलीला नेले. या प्रकरणामध्ये श्री.राम साळवे याला पकडलेले नाही. खरे तर त्या मुलीच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वडलांना जाब विचारला पाहिजे की, श्री.राम साळवे हा तुमच्या घरी यायचा हे खरे आहे काय ? त्या मुलीच्या आईने जाळून घेऊन आत्महत्या केलेली आहे.

दुसरी जी मुलगी कु.सोनवणे म्हणून आहे, तिला वडील नाहीत, आई मोल-मजुरी करते. ती मुलगी गॅस कंपनीमध्ये कामाला होती. गॅस दुरुस्तीसाठी ती श्रीमती शीला बारगळ हिच्या घरी गेली होती. ती तेथे गेल्यानंतर श्रीमती शीला बारगळ हिने तिला विचारले की, यामधून तुला काय पैसे मिळतात ? यापेक्षा चांगले काम केले तर पैसे भरपूर मिळतील. त्यावर त्या मुलीने काय काम आहे ? असे विचारल्यानंतर तिला सांगितले की, माझ्याकडे जे ग्राहक येतील त्यांची सेवा करायची. त्यावर त्या मुलीने विचारले की, सेवा करायची, म्हणजे नेमके काय करायचे ? तिने सांगितले की, त्यांना खुष ठेवायचे. त्यांना खुष कशा पध्दतीने ठेवायचे, हे सांगितल्यानंतर त्या मुलीने सांगितले की, हे काम मला जमणार नाही. त्यावर त्या श्रीमती शीला बारगळ हिने गॅस कंपनीकडे तक्रार केली की, या मुलीने गॅस दुरुस्त केला नाही तर उलट बिघडऊन ती निघून गेली. त्या मुलीला ताबडतोब घरी पाठवा. ही मुलगी घरी गेल्यानंतर श्रीमती शीला बारगळ हिने सापळा रचून तिच्यावर बलात्कार घडवून आणला. त्याचे चित्रण करण्यात आले, सीडी तयार करण्यात आली. त्यावरुन तिला सतत ब्लॅकमेल करुन वेगवेगळया गिऱ्हाईकांना बोलावून त्या मुलीवर अशाप्रकारे बलात्कार केला गेलेला आहे. मुळामध्ये श्री.चेतन बारगळ, हा राष्ट्रवादी युवक संघटनेचा त्या जिल्ह्याचा संघटक आहे. खरे म्हणजे त्याला पकडलेले नाही. थोरात बंधू त्याच्यामध्ये आहेत. खरे तर ते सगळे बाहेर आहेत. ज्यांना पकडलेले आहे ते कॉलेजचे विद्यार्थी आहेत. त्या बाईचा नवरा श्री.दिलीप बारगळ हा आम्हाला भेटला, त्याच्याशी आम्ही बोललो. त्यांनी अशी धक्कादायक माहिती दिली की, माझी बायको तर गेली तीन वर्षे हा धंदा करते आहे. तिच्याबरोबर अजून दोन-तीन महिला आहेत. त्यांची नावे आणि पत्तेही त्यांनी दिलेले आहेत. या महिला अजूनही अशाप्रकारचा राजरोसपणे धंदा करत आहेत. 15 मार्चलाही एका मुलीला पोलिसांनी पकडलेले आहे. मला असे सांगायचे आहे की, या प्रकरणाचा तपास सी.आय.डी.कडे गेल्यामुळे स्थानिक पोलीस योग्य प्रकारे सहकार्य करत नाहीत, याकडे देखील आपण लक्ष दिले पाहिजे. श्रीमती शीला बारगळ हिला पोलिसांकडूनही सहाय्य होते. मुख्य आरोपी बाहेर आहेत, त्यांना शासन का पकडू शकत नाही ? हा खरा प्रश्न आहे. यामध्ये श्री.राम साळवे, श्री.विलास कराळे हे मुख्य आरोपी आहेत, ते बाहेर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु.....

आहेत. श्री.विलास कराळे यांनी गॅस कंपनीमध्ये काम करणाऱ्या मुलीला फसवलेले आहे. श्री.राम साळवे याने कु.जाधव हिला फसवलेले आहे. या आरोपींना अजूनपर्यन्त का पकडले जात नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, उरलेले जे आठ आरोपी आहेत, त्यांचा तपास चालू आहे. त्यांच्या ठावठिकाणांवर छापे घालण्यात आलेले आहेत. त्यांच्या संबंधाने गुप्त पध्दतीने माहिती घेण्यात येत आहे. या प्रकरणी चौकशीचे काम सी.आय.डी.कडे दिलेले आहे, त्यांना लवकरात लवकर अटक करण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी जी माहिती दिली त्यावरुन सरळसरळ असे लक्षात येते की, याबाबत पोलीस खात्याचा गलथानपणा जबाबदार आहे. आपण निवेदनामध्ये मान्य केले आहे. Credit goes to "Child Line". यामध्ये ज्या पोलिसांचा गलथानपणा लक्षात येतो त्या स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ज्यावेळी चाईल्ड लाईन मार्फत येऊन त्या मुलीने पोलिसांकडे तक्रार केली त्यानंतर ताबडतोब दुसऱ्या दिवशी कारवाई केलेली आहे. दुसऱ्या दिवशीच अटक केलेली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, त्या दोन मुलींना मी भेटले. यासंदर्भात मी सुध्दा लक्षवेधी सूचना दिली होती परंतु आमचे नाव लक्षवेधी सूचनेमध्ये का आले नाही याची कल्पना नाही. सभापती महोदय, त्या मुली जे काही बोलल्या आहेत त्याची सी.डी. माझ्याकडे आहे. चाईल्ड लाईनच्या लोकांनी सी.डी. दिलेली आहे. सभापती महोदय, ही सी.डी. आपल्यामार्फत मी शासनाला देते. त्या ठिकाणी पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये श्री. जावळे नावाचे अधिकारी आहेत. बऱ्याच वर्षापासून त्यांचे पोस्टींग त्या ठिकाणी आहे. एखाद्या अधिकाऱ्याला मी कधीच कॉर्नर करीत नाही परंतु नगर जिल्ह्यामध्ये काम करीत असताना अनेक संस्थांनी आणि संघटनांनी विनंती केली. त्या ठिकाणी श्री. जावळे नावाचे अधिकारी आहेत. तुझे नाव सुध्दा कस्टमरमध्ये आहे असे जो दिसेल त्याला सांगावयाचे आणि त्यांच्याकडून पैसे गोळा करावयाचे असा धंदा अहमदनगर जिल्ह्यात चालू आहे. त्या मुलींना येनकेनप्रकारे, जमले तर अक्षरश: त्यांना खलास करुन साक्षीपुरावे कसे मिटवता येतील यादृष्टीने प्रयत्न चालू आहेत. श्री. जावळे नावाचे जे अधिकारी आहेत त्यांच्याकडे तपासाच्या संदर्भात जबाबदारी होती. आता आपण हे प्रकरण सी.आय.डी.कडे दिलेले आहे. एका बाजूने जे सूत्रधार आहे ते बाहेरच फिरत आहेत. ते दबाव आणण्याचे काम करतात. सभापती महोदय, चाईल्ड लाईनच्या लोकांनी दिलेली सी.डी. मी आपल्याकडे पाठवते. यातील दलालांवर कारवाई केली पाहिजे. श्री. जावळे नावाच्या अधिकाऱ्याची बदली किंवा त्यांच्या बाबतीत कडक कारवाई शासन करणार काय ? मी ही सी.डी. आपल्याकडे देते.

...2...

RDB/ MHM/ SBT/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडे असलेली सी. डी. आपल्यामार्फत आमच्याकडे येईल. ती सी.डी आपण बघू या. त्या सी.डी.ची आम्ही पडताळणी करु आणि त्याप्रमाणे जे जे दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे गंभीर प्रकरण आहे. शासन पोलीस अधिकाऱ्याला पाठीशी घालत आहे.

**उपसभापती** : हे प्रकरण गंभीर आहे. माननीय मंत्रिमहोदयांनीही हे मान्य केले आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना माननीय मंत्रिमहोदयांनी ऐकलेल्या आहेत. पहिली गोष्ट अशी की, जे खरे आरोपी आहेत ते मिळण्याच्या दृष्टीने आणि लोकांकडून पैसे उकळण्याचा जो धंदा एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चालू आहे त्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितलेले आहे. मला असे वाटते की, ती सी. डी. माननीय मंत्रिमहोदयांनी बघावी आणि काय ॲक्शन घ्यावयाची ती घ्यावी. परंतु आज संध्याकाळच्या आत श्री. जावळे यांची अहमदनगर जिल्ह्याच्या बाहेर बदली करावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देते. आपण असाच न्याय परत परत द्यावा.

**उपसभापती** : परत अशा घटना घडावयास नकोत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपली सदिच्छा चांगली आहे परंतु अशा घटना बर्ड फ्लू सारख्या घडत आहेत. त्यामुळे वारंवार न्याय मागण्याची वेळ येत आहे.

----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

**पृ. शी.** : नवरगाव, ता. सेलू, जिल्हा वर्धा येथील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना योग्य सोयीसुविधा न मिळणे

**मु. शी.** : नवरगाव, ता. सेलू, जिल्हा वर्धा येथील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना योग्य सोयीसुविधा न मिळणे यासंबंधी श्री व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते व जी.एल.ऐनापूरे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत नवरगांव (तालुका सेलू) जिल्हा वर्धा येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट प्रकारचे कोंडा मिश्रित डाळीचे वरण, धान्य, जेवणात भाजी न देणे, सकस आहार महिन्यातून एखाद वेळीच देणे, आंघोळीची/कपडे धुण्यासाठी साबण, डोक्याला लावण्याचे तेल, अंथरुण, पांघरुन व कपडे इ. साहित्य न पुरविणे, याबाबत मुख्याध्यापक व अधिक्षक यांचे संगनमताने अनियमितता होणे, अप्पर आयुक्त कार्यालय, प्रकल्प अधिकारी यांचेकडे अनेक तक्रारी दाखल करुनही दुर्लक्ष करणे, धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील मेळघाट व इतर भागातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय वार्षिक शिष्यवृत्ती, उपस्थिती भत्ता, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती व इतर योजनांसाठी उपलब्ध झालेल्या निधीतील सुमारे 60 लक्ष रुपयाची अनियमितता होणे, आश्रम शाळेत प्राथमिक स्तरावरील व इतरही सोयी उपलब्ध नसल्याच्या अनेक तक्रारी गावकऱ्यांनी केलेल्या असणे, देवरी (जि.गोंदिया) तालुक्यातील राधाकिसन आहुजा अनुदानित आश्रम शाळेतील निलम भोगारे या मुलीचा प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे झालेला मृत्यू, सुमारे 834



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे.....

झालेला मृत्यू, सुमारे 834 शिक्षकांच्या नियुक्त्यांना शासन मान्यता अद्याप मिळालेली नसणे, शासकीय व खाजगी आश्रम शाळांची उच्चस्तरीय पहाणी व तपासणी करण्याची अनेक संघटनांनी केलेली मागणी, पालक व विद्यार्थी वर्गात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

डॉ. विजयकुमार गावित ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. खाजगी आश्रमशाळा असो किंवा शासकीय आश्रमशाळा असो त्या ठिकाणी शोषण केले जाणे ही नित्याची बाब आहे. विद्यार्थ्यांना नियमित जेवण मिळत नाही. जेवणामध्ये जे पदार्थ द्यावयास पाहिजेत ते मिळत नाहीत. भाजीचा पत्ता नाही. वरणाचा पत्ता नाही. झोपण्यासाठी आवश्यक अशी व्यवस्था नाही. शोषण हे नित्याचे झालेले आहे. अनेकवेळा हे प्रकरण सभागृहामध्ये आले आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. गावित साहेब यांच्याशी मी चर्चा केली. ते चांगले मंत्री आहेत परंतु उपाययोजना करीत नाहीत. त्यांनी यामध्ये लक्ष द्यावयास पाहिजे. यामध्ये अनेक प्रकरणे आहेत. मी दोन तीन बाबी सांगतो. या निवेदनामध्ये प्रकल्प कार्यालय धारणी अधिनस्त येत असलेल्या आश्रमशाळांच्या बाबतीत असे म्हटले आहे की, शिष्यवृत्तीबाबत अनियमितता आढळून येत नाही. आपण निवेदनामध्ये आधी मान्य केलेले आहे की, 30,750 रुपये शिष्यवृत्ती द्यावयाची होती ती 8 महिने विलंबाने दिली. ही अनियमितता नाही काय ? आपल्याला आणखी कोणती अनियमिता अपेक्षित आहे ?

यानंतर श्री. शिगम.....

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 15:55

(श्री. व्ही.यू.डायगव्हाणे...)

अधिवेशन संपल्यानंतर शिष्यवृत्तीचे वाटप झालेले आहे. 8-8 महिने शिष्यवृत्ती न देणे हा भ्रष्टाचाराचा प्रकार आहे. परीक्षा झाल्यावर विद्यार्थी घरी निघून जातात आणि शिष्यवृत्ती गायब करण्याचे, त्यामध्ये अनिमितता करण्याचे प्रकार होतात. या आश्रमशाळांची भरारी पथका मार्फत अचानक भेटी देऊन तपासणी केली पाहिजे. या आश्रमशाळातील मुलांना जेवण दिले जात नाही, त्यांच्या निवासाची नीट व्यवस्था केली जात नाही. माझा प्रश्न असा आहे की, एक महिन्याच्या आत वेगवेगळी भरारी पथके तयार करुन त्यांच्या मार्फत शासकीय आणि खाजगी आश्रमशाळांची तपासणी हे शासन करणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : आता विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु आहेत. हे शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर जरुर अशा त-हेची भरारी पथके निर्माण करुन निश्चितपणे विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर केल्या जातील. शिक्षण विभागाला देखील तपासणी करण्याचे आदेश दिलेले आहेत.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : 1494 शिक्षकांची 4 वर्षापूर्वी नियुक्ती झालेली आहे. त्यांना मान्यता मिळालेली नाही. त्याबाबतची कारणे निवेदनामध्ये दिलेली आहेत. त्यानंतर 2004-05मध्ये आढावा घेऊन 599 प्रकरणे क्लिअर करण्यात आली. उरलेल्या 391 आणि 167 शिक्षकांच्या अर्हतेच्या बाबतीत फारसा फरक नाही. केवळ आरक्षणाचा भाग आहे. आपण या शिक्षकांच्या 4 वर्षापूर्वी नियुक्त्या करुन घेतलेल्या आहेत. 267 शिक्षकांच्या संदर्भात मी बोलणार नाही. परंतु 391 आणि 167 शिक्षकांना शासन मान्यता देणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : या शिक्षकांना मान्यता मिळालेली नाही ही गोष्ट खरी आहे. त्याचे कारण असे आहे की, रोस्टर नियमाप्रमाणे भरले गेले नाही. ज्या गोष्टी कॅरी आऊट करायला पाहिजे होत्या त्या केलेल्या नाहीत. आता ते त्या गोष्टी व्यवस्थित करुन देत असल्यामुळे अप्रशिक्षितांना देखील समाविष्ट करण्यासंबंधी आदेश काढलेले आहेत. याबाबतीत आयुक्त कार्यालयाकडून व्हेरिफिकेशन करुन घेऊन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : दोन महिन्याच्या आत ही प्रक्रिया पूर्ण होईल काय ?

डॉ. विजयकुमार गावित : हे शैक्षणिक वर्ष संपण्याच्या आधी ही प्रक्रिया पूर्ण होईल.

---





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: न्यायालयाचे कामकाज मराठीत चालावे म्हणून सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे

**मु.शी.**: न्यायालयाचे कामकाज मराठीत चालावे म्हणून सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे याबाबत डॉ.नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"दिनांक 9 डिसेंबर 2005 रोजी न्यायिक अधिका-यांना कोर्टाचे पन्नास टक्के काम मराठीतून चालवावे असे आदेश काढले असूनही तसेच फौजदारी मार्गदर्शिका (क्रिमिनल मॅन्युअल) आणि दिवाणी मार्गदर्शिका (सिव्हिल मॅन्युअल) यामधील दुरुस्त्यांसाठी योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्यात येऊनही यावर पाहिजे तेवढी अंमलबजावणी होत नसणे, त्यासाठी न्यायालयाचे काम मराठीत चालावे म्हणून राज्य शासनाने सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे अगत्याचेच आहे. त्याकरिता विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे हा विषय मी माडू इच्छिते."

सभापती महोदय, 25 आणि 26 तारखेला संपूर्ण महाराष्ट्रातील न्यायालयामध्ये मराठीतून कामकाज चालावे या दृष्टीकोनातून मुंबईमध्ये एक परिषद होणार आहे. हा विषय या पूर्वी अनेक माननीय सदस्यांनी तारांकित प्रश्नाद्वारे, लक्षवेधी सूचनेद्वारे या सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायधीश माननीय श्री. सबरवाल यांनी असे मत व्यक्त केलेले आहे की, त्या त्या भागातील मायबोलीमध्ये न्यायालयाचे कामकाज झाले तर ते अधिक चांगले होईल. यासंदर्भात फौजदारी मार्गदर्शिका आणि दिवाणी मार्गदर्शिका यामध्ये दुरुस्त्या करुन मराठीमध्ये कामकाज चालविण्याच्या दृष्टीने योग्य ती कारवाई व्हावे असे आदेश वेळोवेळी देण्यात आलेले आहेत. माजी न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी 16 मार्च 2006 रोजीच्या दैनिक "महाराष्ट्र टाइम्स" या वृत्तपत्रामध्ये तपशीलवार लेख लिहिलेला आहे.

...नंतर श्री. कानडे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. शिगम 16:00

डॉ. नीलम गोऱ्हे....

त्यासंबंधातील जी माहिती आहे त्यानुसार अनेक न्यायालयांतून न्यायाधिशांना मराठीतून निकाल देण्यासाठी अडचण नाही. परंतु हा निकाल मराठीमध्ये टाईप करण्यासाठी आणि इंग्रजीला मराठी प्रतिशब्द शोधण्यासाठी तसेच इतर तांत्रिक बाबींची पूर्तता झालेली नसल्यामुळे निकाल मराठीमध्ये देता येत नाही. तसेच कोर्टामध्ये सध्या जे टंकलेखक आहेत ते पूर्वीपासून काम करीत आहे आणि त्यांना संगणकाचे ज्ञान नसल्यामुळे केवळ या तांत्रिक कारणांमुळे महाराष्ट्रातील हजारो नागरिकांना निकालपत्र संपूर्णपणे मराठी भाषेमध्ये मिळण्यापासून वंचित रहावे लागत आहे. या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनाला विनंती करते की, न्यायालयांमध्ये लवकरात लवकर मराठी भाषेतून निकालपत्र देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वाहतूक सेवेच्या खाजगीकरणामुळे वृत्तपत्र व्यवसायावर ओढवलेले संकट

**मु.शी.**: वाहतूक सेवेच्या खाजगीकरणामुळे वृत्तपत्र व्यवसायावर ओढवलेले संकट याबाबत डॉ.अशोक मोडक,वि.प.स यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"वाहतूक सेवेच्या खाजगीकरणामुळे वृत्तपत्र व्यवसायावर ओढवलेले संकट".

सभापती महोदय, आपणा सर्वांनाच कळले असेल की, एस.टी.महामुंडळाने वृत्तपत्रांच्या वाहतुकीचे काम खाजगी संस्थेकडे सोपविण्याचे ठरविलेले आहे. त्यामुळे प्रथमत: सर्व वृत्तपत्रांच्या संपादकांमध्ये आणि वार्ताहरांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण झालेला आहे. त्याचप्रमाणे पुण्याला यासंबंधात जी बैठक झाली त्यामध्ये देखील स्वाभविकपणे याबद्दल असंतोष व्यक्त करण्यात आला. माझ्या माहितीप्रमाणे पूर्वी 20 वर्तमानपत्राच्या पाकिटाला एस.टी.महामंडळ 18 रु. आकारीत होते. आता हे काम साई ट्रान्सपोर्ट ॲन्ड कुरिअर या कंपनीला देण्याचे ठरत आहे. हे काम करण्यासाठी कंपनीकडून या व्यतिरिक्त 90 रु.आकारले जाणार आहेत. म्हणजे प्रतिदिन 3 रु.प्रमाणे पैसे भरावे लागतील. मला स्वत:ला यामध्ये दोन धोके संभवतात. एक तर एखाद्या खेडेगावात 4-5 वर्तमानपत्रे दिली जात असतील तर स्वाभाविकपणे त्यांना सवलत दिली जाणार नाही. 20 वर्तमानपत्रांसाठी 90 रु. आणि 18 रु. द्यावे लागतील ते त्यांनाही द्यावे लागतील. परिणामत: वृत्तपत्र वाचनावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. माहितीच्या अधिकाराद्वारे आपण सर्व लोकांना माहिती पुरवीत असल्यामुळे माहितीचा अधिकार लोकांकडून काढून घेत आहोत असा संदेश जाईल. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे आतापर्यंत एसटी महामंडळ वर्तमानपत्रांची वाहतूक करीत होते त्याचे आता खाजगीकरण करण्याचा घाट घातलेला आहे त्याबाबत दूरगामी परिणाम काय होतील याचे चिंतन केले आहे काय ? मला शासनाला या निमित्ताने विनंती करावयाची आहे की, वर्तमानपत्रांच्या वाहतुकीचे खाजगीकरण करण्याबाबत एस.टी.महामंडळाने जे परिपत्रक काढले आहे ते मागे घेतले जावे आणि वर्तमानपत्रे आणि पत्रकार यांना दिलासा द्यावा. धन्यवाद.

....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: औरंगाबाद-पैठण रस्त्याची दुरुस्ती.

**मु.शी.**: औरंगाबाद-पैठण रस्त्याची दुरुस्ती याबाबत

श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी, यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" औरंगाबाद ते पैठण रस्त्यावरील स्पीड ब्रेकर व रस्त्याची दुरुस्ती "

सभापती महोदय, पैठण म्हटले की खूप काही महत्वाच्या गोष्टी नजरेसमोर येतात. पैठण ही शालिवाहन शतकाच्या सुरुवातीची नगरी आहे. पैठण नगरीत संत पीठाची उभारणी होणार आहे. ही संतपीठाची उभारणी केव्हा होईल हे संतमहात्मेच सांगू शकतील. पैठण येथील गार्डनचे खाजगीकरण केल्यामुळे दिवसेंदिवस या गार्डनची अवस्था खराब होत आहे. जायकवाडी सारखा आशियातील सर्वात मोठा डॅम जमिनीवर बांधलेला आहे. सभापती महोदय, औरंगाबाद-पैठण हा रस्ता सगळयांनी सगळे प्रयत्न करुन देखील दुरुस्त झालेला नाही. संभाजीनगर-पैठण या 50 कि.मी.च्या रस्त्यावर 52 स्पीड ब्रेकर्स ठाण मांडून आहेत. स्पीड ब्रेकर्स काढून टाकण्यासाठी सगळयांनी वेगवेगळया पध्दतीने प्रयत्न केले तसेच औरंगाबाद उच्च न्यायालयाने निर्देश सुध्दा दिले तरीसुध्दा स्पीड ब्रेकर्स काढण्याची हिंमत झालेली नाही. रस्त्याची दुरुस्ती झालेली नाही मात्र टोल हा द्यावाच लागतो. परिणाम असा झाला की, दोन टोल नाके जाळण्याच्या घटना धडल्या आहेत. तरीसुध्दा पैठण या ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या शहराकडे जाणारा रस्ता दुरुस्त झाला नाही. हा 50 कि.मी.रस्ता चांगला व्हावा विशेषत: मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेसारखा व्हावा जेणेकरुन तेथे पर्यटक येऊ शकतील यादृष्टीने माझी शासनाला विनंती आहे. दररोज 25 हजारपेक्षा जास्त पर्यटक याठिकाणी भेट देत असतात. म्हणून पैठणकडे जाणारा रस्ता हा कायम स्वरुपी चांगला व्हावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला पुन्हा एकदा विनंती करतो.

-----

यानंतर खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.**: जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत बांधलेले सामाजिक सभागृह खाजगी संस्थेच्या ताब्यात देणे.

**मु.शी.**: जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत बांधलेले सामाजिक सभागृह खाजगी संस्थेच्या ताब्यात देणे या विषयाबाबत सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाच्या माध्यमातून खालील घटनेकडे माननीय मंत्री महोदयांचे व सभागृहाचे लक्ष वेधून कारवाई व्हावी अशी अपेक्षा करतो.

"खामगांव शहरात डी.आर.डी.ए. (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) च्या माध्यमातून सामाजिक सभागृहाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात आले. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 22 ऑक्टोबर, 2005 रोजी या सभागृहाचे उद्‌घाटन केले. वास्तविक ज्या जागेवर हे सभागृह बांधण्यात आले आहे, ती जागा खामगांव नगरपालिकेची आहे. त्यामुळे हे सामाजिक सभागृह नगरपालिकेकडे तातडीने हस्तांतरित होणे आवश्यक होते, जेणेकरुन नगरपालिकेच्या आर्थिक हलाखीच्या परिस्थितीत ते एक उत्पन्नाचे साधन म्हणून नगरपालिकेला त्याचा उपयोग करता येईल. परंतु या सभागृहाचा उपयोग व फायदा राजकीय दबावामुळे खाजगी व्यक्तींकडून व खाजगी संस्थांकडून घेतला जात आहे. शासकीय निधीचा उपयोग हा सार्वजनिक कामाव्यतिरिक्त होण्याऐवजी खाजगी व्यक्तिंच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी होत आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. हे थांबले पाहिजे व उक्त सभागृह तातडीने नगरपालिकेकडे हस्तांतरित झाले पाहिजे यासाठी विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी या ठिकाणी उपस्थित करुन सभागृहाच्या निदर्शनास ही बाब आणून देत आहे."

-----------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दादर रेल्वे स्थानकाजवळ "वसंत निवास" या रहिवाशी इमारतीत महापालिकेचे नियम धाब्यावर बसवून करण्यात आलेली दुरुस्ती.

**मु.शी.**: दादर रेल्वे स्थानकाजवळ "वसंत निवास" या रहिवाशी इमारतीत महापालिकेचे नियम धाब्यावर बसवून करण्यात आलेली दुरुस्ती या विषयाबाबत श्री. मधुकर चव्हाण वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विशेष परवानगीने मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दादर पश्चिम येथील रेल्वे स्थानकासमोर असलेल्या वसंत निवासमध्ये लोकांच्या जिवीताशी खेळण्याचा प्रयत्न होत आहे. मागे माटुंगा या ठिकाणी नवरे बिल्डिंग पडली होती त्यापूर्वी त्या इमारतीबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या तरी दखल घेतली नाही व इमारत पडल्यावर फायर ब्रिगेडला 40 मृतदेह बाहेर काढावे लागले. त्याप्रमाणे दादर (पश्चिम) रेल्वेस्थानकासमोरच्या वसंत निवास या इमारतीमध्ये तळमजला व पहिल्या मजल्यावर सुविधा हे कपडयाचे 15 हजार चौरस फुटांचे दुकान (शॉपिंग सेंटर) आहे. या दुकानाच्या मालकाने सर्व नियम व कायदे धाब्यावर बसवून हे दुकान बांधतांना इमारतीमधील लोडबेअरींगच्या भिंती पाडून जागा मोकळी केलेली आहे, दुकानामधूनच तळमजल्यावरुन पहिल्या मजल्यावर जाण्याकरिता जिना बनविलेला आहे, मोठ-मोठे ग्लोसाईनचे जाहिरात फलक पहिल्या मजल्यावर लावल्याने पहिल्या मजल्यावरील खेळती हवा बंद झालेली आहे. या सर्वांमुळे इमारत धोकादायक बनली आहे. तसेच महापालिकेच्या मुख्य अभियंत्याने आपल्या गोपनीय अहवालात वरील सर्व गोष्टी नमूद करुन कारवाईची शिफारस केलेली असून, इमारतीच्या मालकाने या अनधिकृत बांधकामाची अनेक वेळा महानगरपालिका व पोलिसांच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केलेली असतांना सुध्दा त्याकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. परिणामत: या लोकांचे जीव जाण्याचा धोका निर्माण झालेला आहे. यामुळे या परिसरातील रहिवाशांच्या मनात भितीचे सावट निर्माण झालेले आहे."

सदर विषय सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे.

यानंतर श्री. भारवि ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

लोड बेअरिंगची भिंत काढल्यामुळे इमारत कमकुवत झाली आहे. पैसे कमविण्यासाठी गरीबांच्या जीवाची पर्वा करायची नाही असे धोरण स्वीकारणे चुकीचे आहे. एखाद्या गरीब व्यक्तीने त्याच्या खोलीमध्ये पोटमोळा बांधला आणि घरा समोर डेबरी टाकली तर त्याच्यावर लगेच 351 ची नोटीस बजावण्यात येते. ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. तेव्हा या अनधिकृत कारवाईच्या विरोधात शासनाने कारवाई करावी अशी माझी विनंती आहे. सदर इमारत ज्या रस्त्यावर उभी आहे तो फार वर्दळीचा रस्ता आहे. या इमारतीच्या आजूबाजूला देखील इमारती आहेत. सदर इमारत आजूबाजूच्या इमारतीवर पडली तर फार मोठी दुर्घटना घडेल. त्यामुळे या परिसरातील रहिवाशांच्या मनामध्ये भीतीचे सावट निर्माण झाले आहे. सदर विषय हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने तो मी सभागृहात 'विशेष उल्लेखाद्वारे' मांडत आहे. या प्रकरणी जो अधिकारी जबाबदार असेल त्याच्याविरूध्द फौजदारी कारवाई करावी अशी विनंती करीत आहे.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल व सायंकाळी 4.45 वाजता पुन: भरेल.

(4.12 ते 4.45 पर्यत मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 16:45

:: **मध्यंतरानंतर** ::

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पुरवणी मागण्यांच्या बाबतीत माननीय सभापती महोदयांचा निर्णय.**

**सभापती** : सर्वप्रथम मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, दिनांक 16 मार्च, 2006 रोजी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी पुरवणी मागण्यांच्या वेळी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी मी सांगितले होते की, एक-दोन दिवसात मी या मुद्याच्या संदर्भात माझा निर्णय देईन. हा निर्णय देण्यासाठी दोन-तीन दिवस जास्त लागले ही वस्तुस्थिती आहे. आता मी माझा निर्णय देत आहे.

"गुरुवार, दिनांक 16 मार्च, 2006 रोजी सन 2005-2006 या वर्षाच्या पुरवणी मागण्या मांडत असताना सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. या मुद्यावर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी त्यांचे विचार मांडले. त्यावेळी एक-दोन दिवसात याबाबत निर्णय देईन असे मी घोषित केले होते.

डॉ.सुनील देशमुख, वित्त राज्यमंत्री यांनी पुरवणी मागण्या सादर करताना, विदर्भ-कोकणातील अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आमचे शासन नेहमीच कटीबध्द राहीले आहे. विदर्भातील अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 150 कोटी रुपये व कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी 50 कोटी रुपये आकस्मिकता अग्रीम निधीद्वारे उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे असे जाहीर केले होते. शिवाय त्यांनी त्यापूर्वी सन 2006 चा अध्यादेश क्रमांक-2, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवला. पुरवणी मागण्या सादर करताना माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी असे मुद्दे उपस्थित केले होते की, आकस्मिकता निधी अध्यादेश काढून 950 कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यासाठी राज्यपालांची अनुमती घेतली आहे काय ? शिवाय राज्यपालांचे निर्देश शासनावर बंधनकारक आहेत. तसेच पुरवणी अर्थसंकल्पात या रकमांचा समावेश का केला गेला नाही ? शिवाय सभागृहाचे कामकाज सुरु असताना तसेच सभागृह सुरु होण्यास आठ-दहा दिवस असताना कोणताही प्रकारचा अध्यादेश काढता येत नाही. इत्यादी.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे निधी वाटप करण्याच्या बाबतीत जे मुद्दे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी उपस्थित केले त्या मुद्यांना पाठिंबा दर्शविला. तसेच त्यांनी असाही प्रश्न उपस्थित केला की, कोकण व विदर्भाला जो निधी द्यावयास पाहिजे होता तो दिला गेला नाही व 150 कोटी रुपये पुरवणी मागण्यांमध्ये समाविष्ट आहेत की, अतिरिक्त आहेत, याचा खुलासा करावा. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी असे म्हणणे मांडले की, वित्त राज्यमंत्र्यांनी जो प्रस्ताव सभागृहात ठेवलेला आहे त्याची चर्चा वेगळया माध्यमातून उपस्थित करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी असे म्हणणे मांडले की, भारतीय घटनेच्या अनुच्छेद-205 अन्वये ही प्रक्रिया झालेली असून, आकस्मिकता निधीची मर्यादा वाढविण्यासाठी अध्यादेश काढण्यात आलेला आहे. पुरवणी मागण्यांचा आणि अनुशेषाचा या अध्यादेशाशी काहीही संबंध नाही. कोकण व विदर्भाला अत्यल्प रक्कम मिळाल्यामुळे विदर्भासाठी 150 कोटी व कोकणसाठी 50 कोटी रुपये देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. परंतु, ती रक्कम पुरवणी मागण्यांचे पुस्तक छापून झाल्यानंतर त्यामध्ये समाविष्ट करणे शक्य होत नाही, परिणामी वरील 200 कोटी रुपये आकस्मिकता निधीतून देण्याची तरतूद करण्यात आली व ही अधिक माहिती माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी पुरवणी मागण्या मांडत असताना सभागृहात दिली. ही माहिती विधानसभा आणि विधानपरिषदेच्या कामकाजाच्या नियमाप्रमाणे तसेच, भारतीय घटनेला धरुन दिलेली आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

माननीय वित्त राज्यमंत्री श्री.सुनील देशमुख यांनी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला असावा, असे मत व्यक्त करुन आकस्मिकता निधीची 950 कोटी रुपयांची मर्यादा वाढविणारा अध्यादेश कापूस एकाधिकार योजनेतील चढ - उतार निधीचा 350 कोटी रुपयांचा हप्ता द्यावयाचा आहे म्हणून मर्यादा वाढविण्यात आली आहे, असे नमूद केले व 200 कोटी रुपये आकस्मिकता निधीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येतील, असे प्रतिपादन केले.

या संपूर्ण चर्चेचा सखोल आढावा घेतला असता, ही संपूर्ण चर्चा गैरसमजूतीवर आधारित असल्याचे माझे मत झाले आहे. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, दिनांक 16 मार्च, 2006 रोजी वित्त राज्यमंत्र्यांनी आकस्मिकता निधीसंबंधी अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवला. सदर अध्यादेश क्रमांक 02 दिनांक 15 फेब्रुवारी, 2006 रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेला आहे व सदर अध्यादेश भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 च्या खंड 01 द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्राच्या राज्यपालांनी काढलेला आहे.

संविधानातील तरतुदीप्रमाणे सदर अध्यादेश विधानमंडळासमोर ठेवणे आवश्यक आहे व अध्यादेश नि:सत्र काळातच काढता येतो व याला कायद्याचे अधिष्ठान असते. अशाप्रकारे संपूर्ण कायदेशीर व संविधानात्मक प्रक्रिया पूर्ण करुन अध्यादेश काढल्यानंतर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे.

अनुच्छेद 205 अन्वये पूरक मागण्यांचे विवरणपत्र सभागृहासमोर मांडता येते. विधानपरिषद नियम 230 अन्वये खर्चाचे पुरक विवरणपत्र राज्यपाल नेमून देतील अशा दिवशी विधानपरिषदेपुढे मांडण्यात येते व त्यानंतर त्यावर चर्चा केली जाते. संविधान व नियमाच्या अधीन राहून दिनांक 16 मार्च, 2006 रोजी माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी पुरक मागण्या सादर केल्या व हे सादर करताना त्यांनी सभागृहाला केवळ अधिक माहिती दिली. सभागृहाला अशी अधिक माहिती दिली की, कोकण व विदर्भातील अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अनुक्रमे 50 व 150 कोटी रुपये आकस्मिकता निधीद्वारे उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. संविधानाच्या अनुच्छेद 267 (2) मध्ये आकस्मिकता निधीतील तरतूद असून अनपेक्षित खर्च

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

भागविण्यासाठी अनुच्छेद 205 किंवा 206 खालील राज्य विधानमंडळाकडून कायद्याद्वारे असा खर्च प्राधिकृत होईल, तोवर अशा निधीतून अग्रीमे देणे राज्यपालांस शक्य व्हावे याकरिता आकस्मिकता निधीचा विनियोग उपलब्ध असतो.

उपरोक्त संविधानात्मक तरतूदी व नियमातील वस्तुस्थिती विचारात घेता पुरवणी मागण्या सादर करणे व आकस्मिकता निधीचा अध्यादेश क्रमांक 02 तसेच, माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी कोकण व विदर्भासाठी तरतुदींसाठी आकस्मिकता निधीचा उपयोग करण्याची घोषणा करणे, यांचा एकमेकांशी अर्था - अर्थी काहीही संबंध नाही, या तिनही बाबी त्यांच्या त्यांच्या ठिकाणी स्वतंत्र आहेत. वित्त राज्यमंत्र्यांनी केवळ पुरवण्या मागण्या सादर करण्याचे निमित्त साधून मंत्रीमंडळाने विदर्भ व मराठवाड्यासाठी घेतलेल्या निर्णयाची माहिती सभागृहाला दिली अशी माहिती सभागृहाला देणे व पुरवणी मागण्या सादर करणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. वित्त राज्यमंत्र्यांला सदर माहिती स्वतंत्र निवेदन करुनही घेता आली असती, आकस्मिकता निधीसंबंधी अध्यादेश हे स्वतंत्र वैधानिक व संविधानात्मक कृती होती. या बाबीचा सुध्दा पुरक मागण्यांशी कोणताही संबंध नाही अशाप्रकारे, ही संपूर्ण प्रक्रिया संविधानातील व नियमातील तरतूदींचे पालन करुनच पार पाडली आहे. त्यामुळे, सदर चर्चेमध्ये जे हरकतीचे मुद्दे किंवा इतर वस्तुस्थिती मांडण्यात आली आहे ते मुद्दे गैरलागू होते, असे मला वाटते. अनुशेषाचा मुद्दा हा स्वतंत्र मुद्दा असून त्यावर वेगळी चर्चा संसदीय आयुधांमार्फत उपस्थित करता येईल, असे मी रुलिंग दिलेले आहे.

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ प्रथम श्री. कांबळे... 16:55

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, आपण दिलेल्या रुलिंगवर माझा कोठल्याही प्रकारचा आक्षेप नाही. ही गोष्ट खरी आहे की, ही चर्चा ज्यावेळी उपस्थित केली त्यावेळी पुरवणी मागण्यांमध्ये ही तरतूद नव्हती. काही मंत्री महोदयांनी मंत्रीमंडळामध्ये विचारणा केल्यानंतर अध्यादेश काढला त्यावेळी वित्त राज्यमंत्री यांनी जो खुलासा केला तेव्हा सुध्दा माझे समाधान झाले होते. आता आपण दिलेल्या निर्णयाने सुध्दा माझे समाधान झालेले आहे. परंतु मी वेगळे दोन-तीन मुद्दे उपस्थित केले होते.

**सभापती** : त्या दिवशी जे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले होते, त्यावर मी रुलिंग राखून ठेवले होते. त्यावरील रुलिंग मी आज दिलेले आहे एकदा सभापतींनी रुलिंग दिल्यानंतर त्यावर या ठिकाणी चर्चा होऊ नये.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण दिलेले रुलिंग मला मान्य आहे. परंतु मी जे 3 मुद्दे मांडलेले होते त्यांचा उल्लेख आपल्या रुलिंगमध्ये आलेला नाही. मी जे मुद्दे मांडले होते त्या मुद्दांना सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार व माननीय विराधीपक्ष नेत्यांनी पाठिंबा दर्शविला होता.

**सभापती** : त्यासंदर्भात आपण दालनामध्ये चर्चा केली होती, या ठिकाणी आपण जो मुद्दा उपस्थित केला होता त्याबद्दल आम्ही ॲडव्होकेट जनरलचे मत विचारात घेण्याचे ठरविले आहे त्यानुसार आमची प्रक्रिया सुरु आहे. त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर सभागृहामध्ये त्यासंदर्भात रुलिंग देण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण माझ्या मुद्दयावर खुलासा केला त्याबद्दल मी आपला आभारी आहे, आपण दिलेला निर्णय मला मान्य आहे. इतर मुद्यांच्या बाबतीत आपण 8 दिवसांत निर्णय घ्याल याचा आम्हाला विश्वास आहे, तो आपण जरुर घ्यावा.

-----

......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

**सभापती** : माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चा आज व दिनांक 23 मार्च, 2006 घ्यावयाचे ठरविले आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून, मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच

कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व उद्याकरिता असलेल्या बाकीच्या सर्व मागण्या यावरील चर्चा उद्या पूर्ण करावी लागेल.

**शीर्षक : विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या.**

**सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1) मुख्यमंत्री विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक अे-1, अे-2, अे-4, अे-5, अे-6, एफ-2, एफ-3, एफ-5, जे-1, जे-2, क्यु-3

2) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक एच-1, एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, एच-11

3) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक आय-3, आय-4, आय-5, वाय-1, वाय-4, वाय-5

.....3.....


VVK/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ प्रथम श्री. कांबळे... 16:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

4) वित्त व नियोजन विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक जी-1, जी-3, जी-5, जी-6, जी-8, ओ-1, ओ-2, ओ-7, ओ-9

5) कृषि, जलसंधारण व खारजमीन विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक डी-2ए, डी-3, आय-3, आय-5, एल-3, एल-7

6) पशुसंवर्धन, दुग्धविकास मत्स्यव्यवसाय व औकाफ विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक डी-2, डी-4, डी-5

7) शालेय शिक्षण क्रिडा व युवक कल्याण विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक ई-1, ई-2, ई-3, ई-3ए

8) आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक टी-3, टी-4, टी-5, टी-6, टी-9

9) वने विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक सी-7,

10) अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक एम-3

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, बाब क्रमांक 109 पृष्ठ क्रमांक 92, मोठे आणि मध्यम प्रमुख पाटबंधारे प्रकल्पासाठी अतिरिक्त निधी- सभापती महोदय, या हेड मध्ये या पुरवणी मागण्यांद्वारे सन 2005-2006 मध्ये सुधारित अनुदान होते, जे काही अनुदान होते त्यांच्यामधून जो काही निधी राहिलेला होता ती रक्कम 2,63,21,03,000/- रुपये सरकारने रि-ॲप्रोप्रिएशन करीता वापरलेली आहे ही रक्कम वापरली असल्यामुळे वैधानिक प्रश्न निर्माण झ ालेला आहे. त्याकडे मी आपले लक्ष वेधले होते. अनुच्छेद 370 (2) अन्वये राज्यातील विविध क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी राज्यपाल महोदयांनी 30 एप्रिल, 1994 रोजी व 5 ऑगस्ट, 1994 रोजी निधी वाटपाचे आदेश काढलेले आहेत.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

इतर तरतुदीसोबत निधी वाटपासंबंधीच्या तरतूदी आहेत. ज्यावेळी 1994 मध्ये वैधानिक विकास मंडळे निर्माण झाली त्यावेळी महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांनी आदेश काढले व त्यानंतर दि.30 एप्रिल, व 5 ऑगस्ट, 1994 रोजी आदेश काढले होते, त्यामध्ये निधी वाटपासंदर्भातील तरतूदी आहेत. त्या अंतर्गत माननीय राज्यपालांनी प्रत्येक वर्षी दिलेले निदेश हे महाराष्ट्र शासनावर बंधनकारक आहेत. 1957 मध्ये भारताच्या लोकसभेने एक विधेयक पास केले होते त्या अन्वये महाराष्ट्रामध्ये आणि गुजराथ राज्यातील कच्छ येथे वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. घटनेने माननीय राष्ट्रपतींना अधिकार दिलेले आहेत. घटनेप्रमाणेच माननीय राष्ट्रपतींनी हे अधिकार फक्त महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांना अधिकार दिलेले आहेत. अशा प्रकारचे अधिकार जगामध्ये दुसरीकडे कुठेही देण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल अतिशय पॉवरफूल आहेत. 263,21,03,000 रुपयांचे रिॲप्रोप्रिएशन आहे. एका वैधानिक विकास मंडळाच्या भागातून दुस-या वैधानिक विकास मंडळामध्ये निधी ट्रान्सफर करता येतो किंवा नाही, याबाबत माननीय राज्यपालांनी नियम केलेले आहेत. माझ्याकडे या संदर्भात दि. 30 एप्रिल, 2005 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे राजपत्र आहे. या राजपत्रातील 8 नंबरच्या कलमामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, "The allocation of funds or outlays made by the Governor shall be reflected in the Annual Financial Statement to be placed before the State Legislature and the developmental activities with regard to the outlays as aforesaid, shall be carried out or caused to be carried out by the State Government and the funds so allocated shall be non divertible from the area of one Board to that of another Board" एका भागातील पैसे असल्यामुळे दुस-या भागाकडे डायव्हर्ट करता येत नाही. याबाबत महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांनी निदेश दिलेले आहेत. हे निदेश महाराष्ट्र शासनावर बंधनकारक आहेत. म्हणून माझा वित्तमंत्र्यांना प्रश्न आहे की, 263,21,03,000 रुपये एका भागातील असताना सुध्दा दुस-या भागाकडे कसे ट्रान्सफर केलेले आहेत. सभापती महोदय, उदाहरण म्हणून सांगावयाचे झाल्यास 263,21,03,000 रुपये विदर्भासाठी असतील तर ते विदर्भालाच देणे आवश्यक आहे, 263,21,03,000 रुपये पश्चिम महाराष्ट्रासाठी असतील तर ते पश्चिम महाराष्ट्रालाच देणे आवश्यक आहे, 263,21,03,000 रुपये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

मराठवाडयासाठी असतील तर ते मराठवाडयालाच देणे आवश्यक आहे. याबाबत स्पष्टपणे प्रोव्हीजन आहे की, " shall be non divertible from the area of one Board to that of another Board.." याबाबत माननीय वित्तमंत्र्यांनी खुलासा करावा. हा खुलासा करीत असताना 263,21,03,000 रुपयांचे असलेले रिॲप्रोप्रिएशन कोणत्या विभागातील आहे, हे पैसे कुठून आले, हे पैसे त्या त्या विभागांना दिलेले आहे काय ? तसेच 263,21,03,000 रुपयांचे डिस्ट्रीब्युशन करीत असताना माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाचे पालन केले आहे की नाही ? याबाबत माननीय वित्तमंत्र्यांनी खुलासा करणे आवश्यक आहे.

माझा दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, माननीय राज्यपालांनी सन 2005-06 साठी दि.25/2/2005 रोजी आदेश दिले होते. त्या आदेशानुसार 4685.86 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केलेला होता.

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

त्यानंतर आपल्या नियोजन विभागाच्या सचिवांनी 29.3.2005 रोजी माननीय राज्यपालांना रिव्हिजन मागितले आणि विनंती केली की, 20.3.2005 रोजी राज्याच्या साधनसंपत्तीच्या उपलब्धतेच्या आधीन राहून राज्यपालांनी ही तरतूद 1941.94 कोटी रूपये इतकी कमी करून द्यावी. मग माननीय राज्यपालांनी सांगितले की, मी तर याबाबतीतील आदेश दिले आहेत पण तुम्ही आता या पेक्षा जास्त देऊ शकत नाही. म्हणून या बाबतीत पुन्हा महत्त्वाचा मुद्दा निर्माण झाला की, निर्देश आले तर ते बदलू शकतात का ? त्यावर कायदेशीर मुद्दा निघाला की, अशा प्रकारच्या डायरेक्शन्स आल्या तर directions can be changed by the directions of the Governor. म्हणजे माननीय राज्यपालांनी दिलेले निर्देश दुरूस्त करण्याचा किंवा ते बदलण्याचा म्हणजे त्यातील रक्कम वगैरे बदलण्याचा अधिकार हा राज्यपालांनाच आहे. या संदर्भात चर्चा झाली आणि महा-अभिवक्ता श्री. आर.एस.कदम यांचे अभिमत घेण्यात आले. 4 एप्रिल 2005 रोजी त्यांनी आपला अभिप्राय दिला आणि राज्य सरकारला साधनसंपत्तीच्या उपलब्धतेच्या आधारावर माननीय राज्यपालांचे निर्देश बदलण्याचा, सुधारित करून देण्याचा अधिकार आहे आणि त्या अधिकारात शासनाने राज्यपालांच्या संमतीने केलेले रिव्हिजन हे न्यायसंमत व राज्यघटनेच्या तरतुदीप्रमाणे आहे असे ॲडव्होकेट जनरल श्री.कदम यांनी 5 ऑगस्ट 1994 चा नियम 7/6 चा उल्लेख केला आहे. सभापती महोदय हा नियम 7/6 असा आहे की, "Rule 7/6 is important in as much as it mandates that if and when there is occasion to revise the amounts of developmental expenditure as communicated to the Governor, such change shall be intimated to the Governor after the State Government decides on such revision."

**( सभापतीस्थानी - माननीय उपसभापती )**

सभापती महोदय, या कलमामध्ये असे म्हटले आहे की, जेव्हा जेव्हा असा निधीमध्ये बदल करून वाटप करावयाचा असेल, त्यामध्ये ॲडिशन करावयाची असेल तर ताबडतोब त्या विषयी माननीय राज्यपालांना कळविले पाहिजे. राज्यपालांना तुम्ही कळविल्यानंतर त्या निधीचे वाटप सूत्राप्रमाणे कसे करता येईल हे ते आपल्याला सांगतील आणि त्याप्रमाणे आपण वाटप केले पाहिजे. माननीय मंत्री महोदय, माननीय राज्यपालांना तुम्ही एकीकडे सांगता की, राज्याची आर्थिक स्थिती काही चांगली नाही. तुम्ही आम्हाला 4685.86 कोटीचा नियत व्यय 25.2.2005 च्या आदेशाप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

प्रस्तावित केला आहे. परंतु आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने आम्ही एवढा निधी देऊ शकत नाही. आम्ही केवळ 141.94 कोटी इतकाच निधी देऊ शकतो. परंतु चमत्कार घडला. फार हुशारीने यांनी हे काम केले आहे. पण आम्ही येथे डोळ्यात तेल घालून बसतो आहोत म्हणून अन्यथा यांनी काय केले असते हे समजूनही आले नसते. ॲडव्होकेट जनरल यांचा अभिप्राय घेतल्यानंतर,... सभापती महोदय, आपल्याला मी हा नियम वाचून दाखविला आहे. तरीही मी पुन्हा एकदा वाचून दाखवितो की "Rule 7/6 is important in as much as it mandates that if and when there is occasion to revise the amounts of developmental expenditure as communicated to the Governor, such change shall be intimated to the Governor after the State Government decides on such revision." म्हणजे पाटबंधारे खात्याचा कोठल्याही रकमेचा expenditure तुम्हाला बदलावयाचा असेल तर " there is occasion to revise the amounts of developmental expenditure as communicated to the Governor, such change shall be intimated to the Governor after the State Government decides on such revision." पहिल्यांदा तुम्ही याप्रमाणे राज्यपालांना कळविले. पण आता तुम्ही पुन्हा बदल केला. तुम्ही ही 263 कोटी आणि त्यामध्ये पुन्हा ॲड केलेले 778.68 लाख 97 हजार म्हणजे एकूण 1063 कोटी इतक्या रकमेचा जादूचा प्रयोग केला. पहिला मुद्दा असा आहे की, तुम्हाला हा जादूचा प्रयोग करण्याचा अधिकार आहे काय ? अगोदरच आपल्याला माननीय शंकरराव चव्हाण सांगत होते की, तुम्ही हे वैधानिक विकास मंडळ निर्माण करू नका, यामुळे तुमचे अधिकार कमी होतील. पण ते कोणी ऐकले आणि आणि त्यावेळी माननीय श्री.पवार साहेबांपासून अगदी आम्ही देखील वैधानिक विकास मंडळांची मागणी केली. त्याप्रमाणे वैधानिक विकास मंडळे निर्माण झाली आम्हीही त्यांचे समर्थन केले. आम्हाला न्याय देण्यात सिंहाचा वाटा कोणाचा असेल तर 1984 साली दांडेकर कमिटी नियुक्त करणारे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतरावदादा पाटील यांचा आणि त्यांचा उल्लेख मी या ठिकाणी अगदी गौरवाने करतो. त्यांनी 1984 साली वैधानिक विकास मंडळे निर्माण करण्याची भूमिका घेतली नसती आणि त्यासाठी दांडेकर समिती नेमली नसती आणि दांडेकर समितीने ..

( यानंतर श्री. सरफरे .... आरआर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

अनुशेष काढला नसता तर तुमच्या जादूच्या प्रयोगामध्ये आम्ही कुठे आहोत याचा पत्ता लागला नसता. ते दादांपासून शिकले नाहीत ही खरी अडचण आहे. आज काल दादा नावाचे लोक कुणाकडून काहीही शिकायला तयार नाहीत. ते दादागिरी करण्यावर विश्वास ठेवतात. दादागिरी करा परंतु ती दादागिरी कायद्यात बसून नियमात बसून करा, नियमाचा आधार घेवून करा. आम्ही सुनील दादा, बबन दादा म्हणत नाही. आमचे दोन दादा आहेत. ते कोणती दादागिरी करतात हे मी तुम्हाला सांगत नाही ते तुम्ही समजून घ्या. माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांच्या ही बाब लक्षात आली असून त्यांना अनुभव आहे. माननीय श्री. उल्हासदादा सारखा सुसंस्कृत माणूस नाही. त्यांना दादा म्हणणे हा त्यांचा अपमान आहे. मी मनापासून तुम्हाला सांगतो की, ते अतिशय सुसंस्कृत आहेत, सभ्य आहेत, विचारपूर्वक काम करणारे मित्र आहेत, लोकशाहीची मूल्ये मानणारे आहेत, तत्व आणि विचारपूर्वक बोलणारे आहेत. त्यामुळे हे दादा वेगळे व ते दादा वेगळे. हे दादा कायद्याप्रमाणे चालणारे आणि ते दादा कायद्याला खड्डयात टाकणारे. काहीही असले तरी "मै बोलूंगा वैसा राज चलेगा, मैं तो चला जिधर चले रस्ता" . त्यामुळे ते दादा वेगळे. सभापती महोदय, पहिला प्रश्न असा की, 263 कोटी 21 लाख 3 हजार एवढी रक्कम आहे. त्याचबरोबर 778 कोटी 68 लाख 97 हजार एवढी रक्कम आहे, या दोन्हींची बेरीज मिळून 1041 कोटी होते. याबाबत ॲडव्होकेट जनरल यांचा आपण सल्ला घेणार आहात. परंतु या सभागृहामध्ये मी मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारतो की, ज्यावेळी तुम्ही माननीय राज्यपालांना पत्र लिहिले की, आमच्याकडे एवढाच निधी आहे. तर मग हे 1041 कोठून आले? त्यावेळी तुम्ही चुकीची माहिती आम्हाला कां दिली? तुमची स्टाईल अशी होती की, माननीय राज्यपालांना सांगायला अडचण आहे की, हे 1900 कोटी रुपये घ्या आणि विदर्भ, मराठवाडा व कोकणामध्ये वाटून घ्या. बिच्चारे माननीय सदस्य श्री. जयंत प्रभाकर पाटील हे भोळे आहेत, त्यांना वाटले पैसे मिळाले. आणि एके दिवशी जादूचे प्रयोग करुन यांनी ते पैसे वाटून टाकले ते कुणालाही माहीत नाही. माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे वरुन नारळासारखे फार कडक आणि आतून फार मुलायम आहेत.

**उपसभापती** : ते आतून ताडगोळयासारखे आहेत काय?

श्री.नितीन गडकरी : वरुन फार कडक व आतून फार सुंदर, मुलायम आहेत. सभापती महोदय, 30.4.1994 च्या आदेशामध्ये नियम 8 अ नुसार एखाद्या तरतुदीचे पुर्नविनियोजन करावयाचे झाल्यास त्या क्षेत्रामध्ये केले पाहिजे अशी तरतूद आहे. आता आपण सांगा की, हे जे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

1041 कोटी रुपये तुम्ही ज्या प्रमाणे वाटले असतील ते वाटण्याचा अधिकार तुमचा आहे. ते वाटण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या 5 ऑगस्ट 1994 च्या राजपत्रामध्ये असे म्हटले आहे की, "If and when there is an occasion to revise the amount of development expenditure as communicated to the Governor, such change shall be intimated to the Governor immediately after the State Government decides son such a revision." त्याच्या दुसऱ्या कलमामध्ये तुम्ही दाखवून दिले की, 9 हजार कोटी रुपये उपलब्ध झाले. मग माननीय राज्यपाल काय करतील? सूत्र लावल्याप्रमाणे ते हिशेब करतील. संविधानाच्या कलम 371 (2.8) नुसार मिळालेल्या वैधानिक अधिकारानुसार वाटप करतील. त्यामध्ये तीन सूत्रे अशी ठरविली आहेत की, सिंचनाखाली किती शेती आहे, प्रकल्पाचे किती काम आहे, आणि लोकसंख्या किती आहे? या आधारावर सूत्र ठरविले आहे. ज्याप्रमाणे तुम्ही 1900 कोटीला सूत्र लावले त्याप्रमाणे ते हजार कोटीला सूत्र लावतील. The Governor may issue directives to the State Government allocating funds to various areas under the different Boards and, further such directives of the Governor may indicate allocation to each sector or sub-sector as deemed fit by the Governor.

(यानंतर श्री.किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे..... 17:15

श्री.नितीन गडकरी (पुढे चोलू...

हा तुमचा कायदा आहे. मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, 1041 कोटी रुपयाची माहिती गव्हर्नरांना दिली होती काय ? ...आता ते बोलत नाहीत. ठीक आहे. त्या बिचाऱ्यांची अवस्था वाईट आहे. "आई गं...सहन होत नाही आणि सांगताही येत नाही", अशी टी.व्ही.वर जाहिरात दाखविली जाते, त्याची त्यांच्याकडे पाहिले की, मला आठवण येते. 1041 कोटीचे वाटप केले त्याची माहिती माहिती गव्हर्नरना दिली नाही, त्यांना काही दाखविले नाही,त्यावर डायरेक्शन्स प्राप्त केलेल्या नाहीत, हे महाराष्ट्र सरकारचे वर्तन घटनाबाह्य आहे, इम्मॉरल, इल-लिगल, अन कॉन्स्टीटयुशनल आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वाला हरताळ फासणारे आहे. गव्हर्नरना न कळविता पैसे वाटप केले. यावरुन मला एक गाणे आठवते,

जब भी जी चाहता है तो नई दुनिया बसा लेते है लोग
एक चेहरे पर कई चेहरे लगा लेते है लोग.

सभापती महोदय, इरिगेशन मंत्र्यांनी नागपूर येथे स्टेटमेंट केले की, " 2008 सालापर्यन्त इरिगेशनचा बॅकलॉग पूर्ण करणार आहोत". सन्माननीय मंत्री श्री. श्री.शिंगणे साहेबांनी ते वाचले असेल. विदर्भातील इरिगेशनचा बॅकलॉग पूर्ण करणार, असे माननीय उप मुख्यमंत्री महोदय सतत सांगत असतात. ते चांगले बोलतात... मी त्यांना "बोलका बाहुला", असे म्हणणार नाही. कोणतीही टिका कोणी रागावू नये, अशी रितीने करावी. त्यांनी काल राज्यपालांच्या अभिनंदनपर प्रस्तावाला उत्तर देताना, या सभागृहामध्ये असे सांगितले की, युती सरकारने बॅकलॉग पूर्ण करण्यासाठी जेवढे पैसे दिले नाहीत तेवढे पैसे या आघाडी सरकारने दिले. मग त्यावेळचे अंदाजपत्रक आपण काढा आणि पहा. तुम्ही विदर्भ, कोकण आणि मराठवाड्याला किती पैसे दिले याचे आकडे आम्हाला द्या. मी पश्चिम महाराष्ट्राला पैसे देण्याच्या विरोधात नाही. तुम्ही कोणाला किती पैसे द्यावे याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. परंतु तुम्ही कोणाला फेवर करता ? हे आता मी सांगत नाही. मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, या राज्य सरकारने, या विधीमंडळाने जी घटना स्वीकारली त्या घटनेप्रमाणे, पार्लमेंटमध्ये बील पास झाले. त्यानंतर महामहिम राष्ट्रपती महोदयांनी त्याबाबतचे अधिकार राज्यपाल महोदयांना दिलेत. ते अधिकार नाहीत, तर ते निर्देश आहेत. डायरेक्टीव्हज आहेत, कॉन्स्टीटयुशनली, लिगली शासनावर मॅन्डेटरी आहेत. त्यावर अपील नाही.. There is no appeal against any directives of the Governor.

...SS-2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू...

ते तुमच्यावर बंधनकारक आहे. ते तुम्ही पाळले पाहिजे. म्हणूनच 1041 कोटी रुपयाचे वाटप मोठ्या हुशारीने केलेले आहे. "वरुन किर्तन आतून तमाशा" असा प्रकार केलेला आहे. एका दिवसामध्ये, रात्रीत बैठक घेऊन, या पैशाचे वाटप केलेले आहे. या 1041 कोटी रुपयाचा हिशोब माननीय राज्यपालांना माहीत नाही, प्रत्यक्षात सगळे व्यवहार केले. पण राज्यपालांना न सांगता हे सर्व व्यवहार झालेले आहेत, ते योग्य आहे काय ? सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे. यासंबंधाने मंत्री महोदयांकडून उत्तर पाहिजे. मी आणि प्रा.बी.टी.देशमुख मुंबई हायकोर्टामध्ये केस लावून घेण्यासाठी गेला होतो. तेथे श्री. श्रीहरी अणे, आणि श्री.मनोहर आणि इतर नामांकित वकिलांकडे गेलो होतो, पण काही उपयोग झाला नाही. कोर्टाच्या बोर्डवर ही केस आलीच नाही. सन्माननीय मुख्यमंत्री हे तर अनेक वर्षे मंत्री म्हणून राहिले आहेत, त्यांना कधी असे हतबल झ ाल्याचे मी पाहिलेले नव्हते. ते म्हणतात, हे कसे झाले, कसे सांगू ? दादाची दादागिरी मोठी आहे. त्यांच्यासमोर उभे रहाण्याचे कोणाचे धाडस नाही. त्या खात्याचे राज्यमंत्री आहेत, त्यांची बिचाऱ्यांची फार वाईट अवस्था आहे. माझा मुद्दा एवढाच आहे की, 1041 कोटी रुपयाच्या वाटपाबाबत घटनेप्रमाणे राज्यपालांची परवानगी घ्यायला पाहिजे, त्यांना इंटीमेट करायला पाहिजे होते,

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

त्यानंतर त्यांची परवानगी घेऊन त्या पैशाचे वाटप करावयास पाहिजे हाते. ते सरकारने केलेले नाही. ते जर सरकारने केले नसेल तर हे योग्य आहे काय ? हे वैधानिक आहे काय ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. सभापती महोदय, मी आपल्याकडे विनंती केली. उद्या आम्ही माननीय राज्यपाल महोदयांच्या भेटीसाठी जाणार आहोत. आम्ही माननीय राज्यपाल महोदयांना सांगणार आहोत की, हे सरकार केवळ महाराष्ट्रातील जनतेलाच मूर्ख बनवत नाही तर या सरकारने तुम्हाला देखील अंधारात ठेवलेले आहे, तुम्हाला न सांगता पैशाचे वाटप करुन टाकलेले आहे, तुमच्या निर्देशांना कचऱ्याची टोपली दाखवली आहे, हा तुमचा अपमान आहे, याबाबतीत तुम्ही काही कारवाई करणार की नाही ? आपण हे पुरवणी अंदाजपत्रक मंजूर केल्यानंतर ते सही करण्यासाठी परत माननीय राज्यपालांकडे जाणार आहे. म्हणून आम्ही माननीय राज्यपाल महोदयांना विनंती करणार आहोत की, ज्या सरकारने तुमचा विश्वासघात केला, तुमची फसवणूक केली, तुम्हाला अंधारात ठेऊन परस्पर पैशाचे वाटप केले, त्या पैशाच्या पुरवणी अर्थसंकल्पावर तुम्ही सही करण्याचे कारण नाही. असे घटनात्मक मत, कायदेशीर मत उद्या सकाळी माननीय राज्यपाल महोदयांना भेटून सांगणार आहोत. या ठिकाणी काँग्रेस पक्षाच्या किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एकाही सन्माननीय सदस्यांनी उभे राहून सांगावे की, नितीन गडकरी, तुमच्या बोलण्यातील हा मुद्दा चुकीचा आहे, हे बेकायदेशीर आहे, हे कायद्याला धरुन नाही असे त्यांनी सांगावे. सभापती महोदय, आपला निर्णय आम्ही शिरसावंद्य मानू. आमचे चुकले असे आम्ही मान्य करु. परवा माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी माझे म्हणणे दुरुस्त केले. अध्यादेशासंबंधीची ती बाब माझ्या लक्षात आली नव्हती. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी त्याची स्पष्टता केली. आपणही जो निर्णय दिला तो मी मान्य केला. यामध्ये घटनात्मक व्हायोलेशन झालेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, त्यांनी या बाबीचा खुलासा करावा. माननीय अर्थ राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. दुर्दैवाने म्हणा किंवा सुर्दैवाने म्हणा, ते अर्थ राज्यमंत्री आहेत तसेच जलसंपदा राज्यमंत्री आहेत. मी सुर्दैव म्हणू की, दुर्दैव म्हणू हे कळत नाही. माननीय राज्यमंत्री हे विदर्भातील आहेत. विदर्भाच्या मंत्र्यांनी विदर्भाची वाट लावली हा जुना इतिहास आहे. मघाशी मी सांगितले की, सहन होत नाही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

आणि सांगताही येत नाही, त्यामुळे त्यांची थोडी अडचण होत असेल. परंतु याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा अशी विनंती करतो. त्यांनी हा खुलासा केला तरी सुध्दा हा मुद्दा आपण ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेण्यासाठी पाठविला आहे. हे कायदेमंडळ आहे. या ठिकाणी कायदेशीर चर्चा झाली पाहिजे. या ठिकाणी नियमांची चर्चा झाली पाहिजे. वैधानिक अस्त्रांची आणि शस्त्रांची चर्चा झाली पाहिजे. आम्ही विधिमंडळामध्ये युक्तिवाद केला. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी युक्तिवाद करण्यास हरकत नाही. पण जे सत्य आहे ते सत्यच आहे. कोणी कितीही लपविण्याचा प्रयत्न केला, कोणी कितीही हेराफेरी केली, कोणी कितीही दादागिरी केली, कोणी अंधारामध्ये कितीही इकडचे पैसे तिकडे केले तरी जे सत्य आहे ते सत्यच आहे. सत्य लपू शकत नाही ही गोष्ट आपण लक्षात ठेवावी. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांना सांगू इच्छितो की, मी आपल्याला बोलणार नाही पण जे दादागिरी करतात त्या दादांनी जरुर लक्षात ठेवले पाहिजे. भविष्यात तरी हेराफरी करु नये अशी विनंती करतो. याबाबतचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेला असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे. प्रथम मी पृष्ठ क्रमांक 53 वरील नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 66 बाबत बोलणार आहे. रस्ते आणि एमएमआरडीएची कामे याबाबत मी सांगू इच्छिते. पश्चिम द्रुतगती मार्गाने जोगेश्वरी (पूर्व) येथे येण्याकरिता असलेला सर्व्हिस रोड एमएमआरडीएने खणून ठेवलेला आहे आणि गेल्या काही दिवसांपासून काम बंदच आहे. या मार्गावर असलेल्या खड्डयांमुळे रोज लहानमोठे अपघात होत असतात. वाहतुकीची कोंडी होते. सर्व्हिस रोडचे काम अर्धवट आहे. त्याचे डांबरीकरण झालेले नाही. त्यामुळे धुळीचा प्रचंड त्रास होतो. द्रुतगती मार्गावर गोरेगाव येथून येताना डाव्या बाजूने जोगेश्वरी स्टेशनवर येण्यासाठी असलेला जो सर्व्हीस रोड आहे त्या रोडवर सळ्या असलेले काम अर्धवट पडलेले आहे. त्याही सर्व्हिस रोडची अवस्था वाईट आहे. तेथून येण्यासाठी रिक्शावाला सुध्दा तयार होत नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 17:25

(श्रीमती सुधा जोशी पुढे सुरु...)

एमएमआरडीअेच्या या कारभारामुळे नागरिक हैराण झालेले आहेत. त्यांनी आंदोलन करण्याच्या अगोदर कृपया याकडे लक्ष द्यावे. सध्या संपूर्ण मुंबईभर रस्ते खोदून ठेवलेले आहेत, त्यामुळे वाहतुकीची अतिशय कोंडी होत आहे. मी जुहू येथून या विधान भवनामध्ये येते. पूर्वी मला जुहू येथून विधान भवनामध्ये येण्यासाठी एक ते सव्वा तास लागत असे, पण आता मात्र कमीत कमी पावणे दोन ते दोन तास लागतात. कृपा करुन पावसाळ्यापूर्वी खोदलेले रस्ते ठीक करावेत अशी मी शासनाला विनंती करते. विक्रोळी-जोगेश्वरी लिंक रोडचे काम जलद गतीने करावे. अंधेरी-घाटकोपर व्हाया आसल्फा व्हिलेज या 520 मीटर मार्गामध्ये आसल्फा ते श्रेयस सिग्नल या मार्गाचे काम अद्याप चालू झालेले नाही. पूर्वी ज्या अर्धवट स्थितीत हे काम ठेवलेले होते ते अद्यापही त्याच स्थितीत आहे. या कामाचा उल्लेख मी मागील अधिवेशनामध्येही केलेला होता.

पृ.क्रमांक 52 वरील बाब क्रमांक 65च्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, मुंबईसाठी वेगळा, स्वतंत्र आणि भरीव असा निधी राखून ठेवण्याची आवश्यकता आहे. हा निधी वीज, पाणी, ड्रेनेज, रस्ते यासाठी राखून ठेवण्याची आवश्यकता आहे. मुंबईकडून पैसा घेतला जात असला तरी मुंबईची दुरावस्था मात्र दूर होत नाही याचा खेद होतो. मुंबईची वाहतूक व्यवस्था ही अतिशय गहन अशी समस्या आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये पुरेशा प्रमाणात पार्किंगची व्यवस्था नाही. त्यामुळे लोक रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी करतात. तेव्हा प्रत्येक विभागात पार्किंग झोन निर्माण केले पाहिजेत. जेथे उद्याने, मैदाने आहेत त्या ठिकाणी अंडरग्राऊंड पार्किग करावेत. ते महानगरपालिकेचे उत्पन्नाचे साधनही होईल आणि मुंबईतील रस्ते जे दुतर्फा वाहनांनी भरुन गेलेले आहेत ते मोकळे होतील. सभापती महोदय, मुंबईचे सुशोभीकरण करण्याची आवश्यकता आहे. देशविदेशातील पर्यटक मुंबईमध्ये येत असतात. मुंबईमध्ये सध्या जी काही प्रेक्षणीय स्थळे आहेत त्यांच्या बरोबरीने इतरही स्थळांचा प्रेक्षणीय स्थळे म्हणून विकास करण्याची आवश्यकता आहे. उदा. माहीमचा किल्ला, सायनचा किल्ला यांचा विकास करुन ती ठिकाणे प्रेक्षणीय स्थळे केली गेली तर तेही फार चांगले होईल.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 84च्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, मुंबईतील जे.जे. हॉस्पिटल, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल यांच्या इमारतींची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. वार्डामध्ये फॅन नाही, खिडक्यांना तावदाने नाहीत, काचा फुटलेल्या

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती सुधा जोशी...)

आहेत, पाण्याच्या टाक्या गळक्या आहेत, पाईप गंजलेले आहेत, अशी सर्व ठिकाणी अवस्था आहे. या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. राज्यातील अनेक विश्रामगृहांसाठी असलेले मेण्टेनन्सचे बजेट अतिशय थोडे आहे. त्याकडे लक्ष पुरविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पृ.क्र. 44 वरील बाब क्रमांक 52च्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, मुंबईतीले अनेक शाळा ह्या झोपडपट्टयांमध्ये सुरु झालेल्या आहेत. त्या शाळांसाठी इमारती नसल्यामुळे विद्यार्थ्यांची बसण्याची अतिशय गैरसोय होत आहे. अशा शाळांचा सर्व्हे करुन त्या त्या विभागामध्ये त्यांना जागा उपलब्ध करुन देण्याकरिता नगरविकास खात्यामार्फत प्रयत्न करावेत, पण त्याचबरोबर नवीन शाळांना मान्यता देताना मात्र इमारती बाबतचा मुद्दा लक्षात ठेंवावा. विद्यार्थ्यांना बसायला जागा नसेल तर शाळांना मान्यता देणे योग्य नाही.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 17:30

श्रीमती सुधा जोशी ....

सभापती महोदय, बाब क्र.46 पृष्ठ क्रमांक 35 पशुसंवर्धनविभागाशी संबंधित ही पूरक मागणी आहे. राज्यामध्ये बर्ड फ्लूची लागण झाली असल्यामुळे पोल्ट्री व्यवसाय अत्यंत अडचणीत आला आहे. गेल्यावर्षी देखील या रोगाची लागण दिसून आल्यानंतर अनेक पोल्ट्री फार्म बंद झाले होते. या पोल्ट्री फार्म धारकांनी कर्ज घेतलेले असल्यामुळे त्यांच्या कर्जफेडीचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांनी घेतलेल्या कर्जाबाबत शासनाने विचार केला पाहिजे. केवळ बाधित कोंबडया नष्ट करुन हा प्रश्न सुटणार नाही. या रोगाच्या संदर्भात कायमची उपाययोजना करण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने पोल्ट्री फार्म चालविण्याकरिता पोल्ट्री व्यावसायिकांना शास्त्रोक्त प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तशी शासनाने व्यवस्था करावी. यासाठी एखादा अभ्यास गट नेमण्याची मी शासनाला विनंती करते. सभापती महोदय, कृषी विभागाच्या संदर्भात मागणी क्र.39 पृष्ठ क्र. 32 कडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. राज्यातील द्राक्ष बागायत शेती सुध्दा नवनवीन तंत्रज्ञानाने विकसित करणे आवश्यक आहे. यासाठी शेतकऱ्याला त्याचे ज्ञान देण्याकरिता द्राक्ष पीक संरक्षण आणि प्रशिक्षण या विषयी नाशिक,पुणे,सोलापूर आणि सांगली या जिल्हयांमध्ये द्राक्ष उत्पादकांसाठी मार्गदर्शक मेळावे आयोजित करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. उत्पादित केलेल्या मालाला देखील संरक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. उत्पादित झालेल्या मालाचे योग्य तऱ्हेने मार्केटींग झाले नाही तर व्यापाऱ्यांकडून अशा शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. म्हणून यावर उपाययोजना केली नाही तर सर्व शेतकरी असेच फसत राहतील. एवढे बोलून आणि या पूरक मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपविते.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, बाब क्र.38,पृष्ठ क्र.32 ही कृषी विभागाशी संबंधित पूरक मागणी आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. निकृष्ट दर्जाच्या बीटी कॉटन बियाण्यामुळे कापूस उत्पादनात घट झालेली आहे. बीटी कॉटनच्या संदर्भात मी मागील अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, सध्याचा जो बियाणे कायदा तो तो केंद्राचा कायदा असल्यामुळे बियाणे उत्पादकांकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाली तरी राज्य शासनाला कायदेशीर कारवाई करता येत नाही कारण केंद्राच्या कायद्यामध्ये तशी तरतूद नाही. केंद्राने या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या संदर्भात राज्य शासन केंद्राकडे शिफारस करील. कृषीमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मध्यंतरी चार महिन्यापूर्वी केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार साहेब यांच्या निवेदनामध्ये असे आले होते की सध्याच्या बियाणे कायद्यामध्ये केंद्र सरकार बदल करणार आहे. परंतु केंद्राच्या या कायद्यामध्ये आतापर्यंत बदल झालेला दिसत नाही. आज सदनामध्ये कृषीमंत्र्यांकडून अशी अपेक्षा आहे की केंद्राचा कायदा बदलण्यासंदर्भात काय प्रगती झाली त्याची माहिती त्यांनी येथे द्यावी. शेतकऱ्यांनी ज्या आत्महत्या केलेल्या आहेत त्यावर चर्चा करताना हे सर्व संदर्भ येतीलच. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला केंद्रीय कृषी मंत्री आणि राज्याचे कृषीमंत्री जबाबदार आहेत अशा प्रकारचे निवेदन सप्रमाण करण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. राज्यामध्ये गेल्या चार वर्षात शेतकऱ्यांनी ज्या आत्महत्या केल्या त्या आत्महत्यांच्या कारणांमध्ये बि-बियाणांमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक हेही एक महत्वाचे कारण आहे. 3/4 वर्षापूर्वी अकोल्यापासून सर्वच कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे निकृष्ट बियाण्यामुळे मोठे नुकसान झालेले आहे. परंतु कायदेशीर कारवाई करण्याची सध्याच्या कायद्यात तरतूद नसल्यामुळे बियाणे उत्पादकांवर कायदेशीर कारवाई शासन करु शकले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खर्चे पी.

श्री. दिवाकर रावते ........

बोगस बियाण्याच्या नांवाखाली मोठया प्रमाणात प्रचार करुन अमुक ठिकाणी धाडी टाकल्या असे सांगण्यात आले. परंतु बोगस कंपनीच्या विरुध्द कारवाई करण्याबाबत जर कायदयात तरतूदच नाही तर या कंपनीला एजन्सी देण्याची गरज काय होती ? हा महत्वाचा प्रश्न आहे. बी.टी. कॉटनच्या संदर्भात जी मागणी या ठिकाणी शासनाने सभागृहाच्या मान्यतेसाठी पुरवणी मागणीच्या माध्यमातून मान्यतेसाठी आणली आहे त्यासंदर्भात मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, बी.टी. कॉटनवर जो "लाल्या" नांवाचा रोग आला. त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, अगोदर शेतकऱ्यांना या कॉटनवर बोंड अळी येत नाही, बाकी सर्व रोग या पिकावर पडतात, अशा प्रकारचा प्रचार बी.टी. कॉटनच्या बाबतीत केला जात होता, परंतु बी.टी. कॉटनवर आज किती तरी रोग आले. ज्यावेळी बी.टी. कॉटनचा प्रचार केला जात होता त्यावेळी मात्र शेतकऱ्यांना सांगण्यात आले होते की, या पिकावर कोणताच रोग येत नाही. अर्थात प्रचारामागची कारणे अनेक असतील परंतु शेतकऱ्यांना या पिकावरील फवारणीसाठी मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो व त्यासाठी औषधांचा पुरवठा दुर्देवाने आपल्या राज्यातून झाला नाही तर बाजूच्या राज्यातून विदर्भ आणि मराठवाडा या भागांना होत असतो. सभागृहात मी यापूर्वी हा विषय मांडला होता की, ज्यावेळी अशी बनावट औषध खरेदी होते त्याबाबत शासन कोणती कारवाई करणार ? कारण या बनावट औषधीच्या संदर्भातील रिपोर्ट अत्यंत गंभीर आहे. ही बनावट औषधी निदर्शनास आणून देतांना मी संबंधित अहवालाची कागदपत्रे दाखविली होती. माननीय कृषी मंत्र्यांना याची कल्पना असेलच. आपल्याकडे या औषधीची तपासणी लेबोरेटरीमार्फत केली आणि समजा ती औषधी नाकारली तर ती औषधे दिल्लीला पाठविली जातात, दिल्लीला गेल्यानंतर यांचे तेथे काही तरी लागेबांधे असतात म्हणून तेथून त्यांना मुभा मिळते, अशा प्रकारे दिल्लीला जाऊन ती औषधी मान्य व प्रमाणित केली जाते. असे झाल्यानंतर आपण आपल्याकडे या बनावट औषधीबाबत खटला दाखल करुन घेऊ शकत नाही, अशा प्रकारची कायदेशीर तरतूद यात निर्माण झालेली आहे. परंतु शेतकऱ्यांची फसवणूक करणारे अशा बनावट औषधीचे व्यापारी कुठल्याही कायदयामध्ये न सापडता ते आपले काम चालू ठेवतात. आपल्या राज्यात मराठवाडयात 120 कोटी रुपयाची आणि विदर्भामध्ये जवळपास 80 कोटी रुपयाची औषधी खरेदी केली जाते. अशा प्रकारे बनावट औषधी खरेदी करुन शेतकऱ्यांची फसवणूक झाली तर शेतकरी कर्जबाजारी होणार नाही तर काय ? कदाचित मी 200

श्री. दिवाकर रावते .......

कोटीची औषध खरेदी होत असल्याचे सांगितले परंतु त्यापेक्षाही जास्त हा आकडा निघू शकेल. एवढया मोठया प्रमाणात औषधे खरेदी केल्यानंतर आणि शेतकऱ्यांच्या हातात पीक लागत नसेल आणि या बनावट औषध विक्री करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई होणार नसेल तर शेतकऱ्यांना कोणीच वाली राहणार नाही, असे म्हटले तर वावगे होणार नाही. शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी शासन उपाययोजना करते हे मान्य आहे परंतु दुसऱ्या बाजुने अशा प्रकारे त्या शेतकऱ्याला फसवून आणि त्याच्याच खिशातून पैसे काढून घेतले तर त्याचा फायदा राज्याला व शेतकऱ्यालाही होणार नाही. म्हणून याला जबाबदार असलेल्या सर्व औषध निर्माण करणाऱ्या कंपन्यांवर कायदेशीर दंडात्मक कारवाई करुन त्यांच्याकडूनच ही वसूली झाली पाहिजे व शेतकऱ्यांची फसवणूक थांबविली पाहिजे. सन 2000 मध्ये बनावट औषधे असल्याचे निष्पन्न झाले, त्यानंतर ते दिल्लीला गेले व तेथेही लक्षात आले की, हे औषध सदोष आहे. पण दिल्लीहून सर्टिफिकेट येईपर्यंत दोन वर्षांचा काळ निघून गेला. इकडे आल्यानंतर त्या कंपन्यांवर कारवाई करावयाची म्हटले तर ज्याप्रमाणे आय.ए.एस. अधिकारी कितीही भ्रष्टाचारी असला तरी आपल्या राज्यशासनाला त्याच्याविरुध्द कुठलीच कारवाई करता येत नाही व त्यासाठी केंद्रशासनाची परवानगी घ्यावी लागते. तशीच परिस्थिती या औषधांच्या बाबतीत, किटकनाशक कंपन्यांविरुध्द कारवाई करावयाची असेल तर डायरेक्टर ऑफ ॲग्रीकल्चर यांची परवानगी आणि त्यांची सही झाल्याशिवाय फौजदारी गुन्हा दाखल करता येत नाही. जर यावर्षी सन 2006 मध्ये एखादी कंपनी बनावट औषध निर्माण करणारी असल्याचे लक्षात आले तर त्या कंपनीविरुध्द कारवाई करण्यासाठी 2010 साल उजाडेल अशा प्रकारची ले-डाऊन प्रोसिजर आहे. म्हणून याबाबत कुठल्या कायदयाचा आपण आधार घेणार आहोत. कदाचित माझी माहिती अपुरी असेल व त्यात माननीय कृषी मंत्री भर घालतील.

यानंतर श्री. भारवि .......

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

कीटकनाशक कृषि औषध कायदा आहे. त्यात बदल केल्याशिवाय योग्य प्रकारे शास्ती करता येणार नाही. याबाबत मला संबंधित सचिवांनी सांगितले की, ड्राफ्ट तयार आहे. तो मी त्यांच्याकडे वाचण्यासाठी मागितला आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल शासनाला किती पुळका आहे, आत्महत्या थांबविण्यासाठी किती कळकळ आहे हे मग त्यावरून समजेल. केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार आहेत. इथे त्यांच्याच नेत्तृत्वाखाली सरकार आहे. असे असताना बियाणे कायद्यात व कीटकनाशक कृषि औषध कायद्यात आवश्यक तो बदल (सुधारणा) करण्यात श्री.शरद पवार असमर्थ ठरले आहेत, असे मला येथे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते. तेव्हा यासंबंधी कृषि मंत्र्यांनी सदनाला मार्गदर्शन करावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, याच सदनामध्ये मी गेल्या वर्षी "बोगस बियाणे, खते व कीटकनाशके यांची खुल्या बाजारात होणारी विक्री व त्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे शेतीचे झालेले प्रचंड नुकसान" या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी कृषि मंत्र्यांनी असे निवेदन केले होते की, अमरावती विभागात कृषि निविष्ठांच्या गुणवत्ता नियंत्रणासाठी 81 पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकाने जून 2005 ते सप्टेंबर 2005 अखेर 10738 उत्पादक/विक्रेते/वितरकांची तपासणी केली असून बियाण्यांचे 658, रासायनिक खतांचे 698 व कीटकनाशकांचे 300 असे एकूण 1656 नमुने घेतले आहेत. त्यापैकी बियाण्यांचे 25,रासायनिक खतांचे 130 व कीटकशनाकांचे 4 असे एकूण 159 नमुने अप्रमाणित असल्याचे आढळून आले आहेत. हे उत्तर गेल्या वर्षीचे आहे. जून 2005 ते सप्टेंबर 2005 या कालावधीतील सॅम्पल तपासणीसाठी घेण्यात आले होते. अप्रमाणित नमुन्यापैकी 92 प्रकरणी कायद्यांतर्गत कोर्ट केस दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित 67 नमुने ताकीद पात्र आढळून आले असल्याने संबंधितांना ताकीद बजावण्यात आली आहे. आज या 92 प्रकरणांची प्रगती काय आहे ? यासंबंधी एफ.आय.आर.दाखल करण्यासंबंधी डायरेक्टर ऑफ ॲग्रीकल्चर यांची मान्यता देखील मिळाली नसेल. तेव्हा या संदर्भात शासनाने खुलासा करावा. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून 2 हेक्टर इतक्या मर्यादेपर्यंत प्रति हेक्टर 1000 इतके वित्तीय सहाय्य मंजूर शासनाने करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी रुपये 200.00 कोटी इतका खर्च येणार आहे. तेव्हा उद्ध्वस्त होणाऱ्या शेतकऱ्यांसाठी शासनाने खुलासा करावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

.... यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 17:45

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मी विशेषत: शालेय शिक्षण विभागाच्याा व इतर महत्वाच्या पूरक मागण्यांवर माझे विचार व्यक्त करणार आहे. शालेय शिक्षण विभागाची बाब क्र.52, पृष्ठ क्र.44 यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना शालेय शिक्षण विभागाकडून जे अनुदान दिले जाते त्याचा अधिकचा खर्च भागविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. जिल्हा परिषदेमध्ये जी कनिष्ठ महाविद्यालय आहेत, त्या महाविद्यालयांच्या प्राध्यापकांना आठ-दहा महिन्यांपूर्वी जी.आर. काढून सुधारित वेतनश्रेणी देण्याचे जाहीर करण्यात आले. परंतु त्याच्या अनुदानासाठी मात्र तरतूद करण्यात आली नाही. म्हणून सुधारित वेतनश्रेणीच्या अनुदानासाठी तरतूद होणे गरजेचे होते. परंतु सुधारित वेतनश्रेणीच्या संदर्भात मात्र कसल्याही प्रकारची तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

महोदय, बाब क्र.53, पृष्ठ क्र.45 अंतर्गत अधिकचा खर्च भागविण्यासाठी 41 कोटी 36 लाख 35 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, दिनांक 27 नोव्हेंबर, 2005 रोजी 921 शाळा अनुदानास निकषपात्र ठरल्या होत्या. त्या शाळांची यादी जाहीर करण्यात आली होती. परंतु त्या शाळांमध्ये काम करणाऱ्यांच्या वेतनासंदर्भात मात्र कसलाही ऊहापोह करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्यांच्या वेतनासंदर्भात तरतूद होणे आवश्यक असताना सुध्दा ती झालेली नाही. माननीय मंत्री महोदयांनी एका प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर देताना सांगितले की, एप्रिल महिन्यामध्ये आम्ही तरतूद करु. त्यानुसार या शाळांमध्ये काम करणाऱ्यांना मदत दिली पाहिजे. निश्चितपणाने एप्रिल महिन्यामध्ये तरतूद करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी या चर्चेच्या उत्तराच्या वेळी ठोसपणाने सांगितले पाहिजे. ज्या विना अनुदानित शाळा आहेत, त्यांची यादी तयार केली जात नाही. ही यादी 31 मार्च पर्यंत तयार करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी परवा सांगितले होते. तेव्हा सांगितल्यानुसार ती यादी तयार करणे आवश्यक आहे.

महोदय, इयत्ता 5 च्या तुकडीला अनुदान दिले जाते. परंतु इयत्ता 6 वी ते 10 पर्यंतच्या तुकडयांना अनुदान दिले जात नाही. पूर्वी नॅचरल ग्रोथप्रमाणे शाळांच्या तुकडयांना अनुदान दिले जात होते. परंतु आता ती पध्दत बंद केली गेली आहे. त्यामुळे पूर्वीच्याच पध्दतीने अनुदान

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे...

देण्याच्या दृष्टीकोनातून विचार होणे आवश्यक आहे. इयत्ता 11 आणि 12 वी पैकी केवळ इयत्ता 11 वी च्या तुकडीला अनुदान दिले जाते, परंतु इयत्ता 12 वी च्या तुकडीला मात्र अनुदान दिले जात नाही. इयत्ता 11 वीला आलेले अनुदान इयत्ता 12 वी चे शिक्षक वाटून घेतात. त्यामुळे या तुकडयांच्या अनुदानासंदर्भात ठोस उत्तर देणे आवश्यक आहे.

महोदय, बाब क्र.54 आणि 55 च्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, पहिली ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न पुरविण्याची योजना अस्तित्वात आहे. महाराष्ट्रातील 100 टक्के शाळांमध्ये अन्न शिजविले जाते असे केवळ कागदपत्रावरच दिसून येते. परंतु प्रत्यक्षात मात्र राज्यातील केवळ 40 ते 50 टक्के शाळांमध्ये अन्न शिजविले जाते. विदर्भातील विद्यार्थ्यांना केळी व अंडी देण्याचे जाहीर केले होते. परंतु विदर्भातील विद्यार्थ्यांनी केळी व अंडी मिळाली नाहीत इतकेच काय तर त्यांनी ती पाहिलेलीही नाहीत. मी याबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या होत्या, परंतु शिक्षण विभागाकडून त्या तक्रारींची साधी दखलही घेतली गेली नाही. केळी व अंडी देण्याची योजना आज बंद आहे. पूर्वी विद्यार्थ्यांना तांदूळ देण्याची जी पध्दत होती ती योग्य होती. परंतु सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार तांदूळ देण्याची पध्दत बंद करण्यात आली. त्यामुळे शासनाने सुप्रीम कोर्टासमोर सांगितले पाहिजे की, विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न देणे योग्य नाही. विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न देण्याची जी योजना आहे त्या योजनेंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यामागे केंद्र सरकार मार्फत 1 रुपया आणि राज्य सरकार मार्फत 50 पैसे असा एकूण 1.50 रुपया दिला जातो. शासनाकडून हा निधी जिल्हयाला दिला जातो, परंतु जिल्हयाकडून मात्र हे अनुदान चार-चार महिने शाळांना दिले जात नाही. त्यामुळे अन्न शिजविण्यासंदर्भात शाळांसमोर फार मोठी अडचण निर्माण होते. मुख्याध्यापक सांगतात की, या योजनेचे पैसे प्राप्त झाले नसल्यामुळे आम्ही अन्न कसे शिजवायवे ? महोदय, माझे मत असे आहे की, या योजनेसाठी जे अनुदान दिले जाते त्याचा प्रॉपर उपयोग झाला पाहिजे. मी तर असे म्हणेन की, विद्यार्थ्यांना अन्न पुरविण्याच्या योजनेचा निधी शाळांना ॲडव्हांसमध्ये दिला पाहिजे. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून 2000 कोटी आणि राज्य सरकारकडून 250 कोटी दिले जातात. केंद्र सरकारकडून निधी प्राप्त होऊनही तुम्ही शाळांना निधी उपलब्ध करुन देत नाही. त्यामुळे हा निधी शाळांना उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने योग्य पावले उचलावीत असे मला वाटते.

..3..



SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 17:45

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे....

महोदय, सर्व शिक्षा अभियान हा आज चर्चेचा विषय आहे. परंतु सर्वसाधारण अनुभव असा आहे की, सर्व शिक्षा अभियान हे शिक्षण क्षेत्रात आज कुरण झाले आहे. पैसे खाण्याचा एकमेव धंदा म्हणजे सर्व शिक्षा अभियान आहे. कारण ज्यांना प्रशिक्षणाची काहीएक गरज नाही त्याना सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाते आणि ज्यांना खरोखर प्रशिक्षणाची गरज आहे त्यांना मात्र या प्रशिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. मला शासनाला विचारावयाचे आहे की, खरोखरच या प्रशिक्षणाची गरज आहे काय ? त्यामुळे या अभियानांतर्गत किती व्यक्तींना प्रशिक्षण दिले पाहिजे हे पाहणे आवश्यक आहे. कारण या अभियानांतर्गत इतक्या शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे की, शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकच उपलब्ध नसतात. कारण सर्वच शिक्षण प्रशिक्षणासाठी गेलेले असतात. केवळ मुख्याध्यापक हेच मात्र शाळेमध्ये उपस्थित असतात. त्यांना करमत नाही म्हणून शाळेतील एखाद्या शिक्षकाला ते सोबतीला ठेवतात.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MHM/ SBT यापूर्वी श्री. बोर्डे .. 17.50

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे ....

म्हणून हे प्रशिक्षण थांबविले पाहिजे. सभापती महोदय, प्रशिक्षणार्थींना देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. या संदर्भात मी मागील वेळी देखील सभागृहात प्रश्न मांडला होता. तसेच माननीय मंत्रीमहोदयांना निवेदनही दिले होते. परंतु माननीय मंत्रीमहोदय यावर काहीएक बोलत नाहीत, उत्तर देत नाही. या विषयासंदर्भात नेमके काय चालले आहे या संदर्भातही काही बोलत नाहीत. सभापती महोदय, पर्टिक्युलरली भंडारा, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्यासंदर्भात मी अनेक वेळा निवेदने दिली आहेत. परंतु यावर उत्तर काही मिळालेले नाही. सभापती महोदय, अद्यापपर्यंत मानधन दिलेले नाही. सभापती महोदय, सादील खर्च म्हणून पर हेड 20 रुपये द्यावे लागतात. मला आपल्याला सांगितले पाहिजे की, दोन रुपयेची वही आणि एका रुपयाचा पेन देतात आणि 17 रुपये गायब करतात. तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, मानधन म्हणून पर हेड 20 रुपये जे देण्यात येतात, ते आपण का देत नाही ? हा दलालीचा धंदा करायला तुम्हाला कोणी सांगितले ? सभापती महोदय, हेच वह्या आणि पेन घेऊन त्यांना वाटतात. हा अतिशय गैरप्रकार आहे. तरी, या संदर्भातही आपण विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आता मी पृष्ठ क्रमांक 53 वरील नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 67 संदर्भात बोलतो. सभापती महोदय, आमची जी अनेक वर्षांपासूनची मागणी आहे, त्याचा कोणताही उल्लेख या ठिकाणी केलेला नाही. म्हणून मी आता पुन्हा त्याचा उल्लेख करतो. महाराष्ट्रातील सर्व कर्मचाऱ्यांना एल.टी.सी. आणि वैद्यकीय प्रतिपूर्तीची योजना लागू आहे. परंतु केवळ नगरपरिषदेच्या शिक्षकांना आणि कर्मचाऱ्यांनाच ही योजना लागू नाही. सभापती महोदय, या संदर्भात मी सदनात 10 वेळा प्रश्न उपस्थित केला. तरी, या संदर्भात देखील आपण कोणताही प्रकाश टाकलेला नाही. सभापती महोदय, दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे नगरपरिषदेच्या प्राथमिक शिक्षकांना वेळेवर निवृतीवेतन मिळत नाही. देण्यात येणाऱ्या डी.ए. ग्रँटचा दुसरीकडे खर्च करण्यात येतो. तरी, डी.ए. ग्रँट ज्या कामासाठी देण्यात येते, त्याच कामांसाठी वापरली गेली पाहिजे, असे आपण त्यांना स्पष्ट निदेश द्यावेत. देण्यात येणारी डी.ए. ग्रँट नाल्याच्या आणि

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे ....

रोडच्या कामांवर खर्च करण्यात येते. सभापती महोदय, शिक्षकांचा पगार रोखून ठेवला जात आहे, हे योग्य नाही. तरी, याबाबतीत देखील आपण निश्चितपणे विचार केला पाहिजे. आता मी बाब क्रमांक 102, 109 व 111 या संदर्भात बोलू इच्छितो. वर्धा जिल्ह्यामध्ये मोठे, मध्यम व लहान प्रकल्प 11 ठिकाणी कार्यरत आहेत. परंतु त्यांची सिंचन क्षमता कमी आहे. त्यातून फक्त 30 ते 40 टक्के जमीन ओलिताखाली येते. सभापती महोदय, ही अतिशय कमी खर्चाची बाब आहे. अनियमितता व अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे त्या ठिकाणी पूर्ण सिंचन होत नाही. यासंबंधी करावयाची तरतूद या ठिकाणी केलेली नाही. तरी, पुढील सत्रामध्ये, हंगामामध्ये शेतकऱ्यांना निश्चितपणे फायदा होईल अशापध्दतीने आपण कार्यवाही करावी.

माझा शेवटचा मुद्दा बाब क्रमांक 168 - आदिवासी विभाग या संदर्भातील आहे. सभापती महोदय, नवीन तुकड्या निर्माण केलेल्या आहेत, त्यावर शिक्षकांच्या नियुक्त्या देखील केल्या आहेत परंतु त्यांना रेगयुलर वेतन मिळत नाही. तसेच तुकड्यांना अनुदानही मिळत नाही. तरी, या संदर्भात देखील व्यवथा करण्यात यावी, एवढे बोलून मी येथेच थांबतो.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, वन विभागाच्या पान क्रमांक 24 वरील बाब क्रमांक 32 या संदर्भात मी बोलणार आहे. सभापती महोदय, सातारा येथील वन विभागाचे उपवनरक्षक हे माननीय उच्च न्यायालयाचे आदेश सुध्दा पाळत नाहीत. आज साताऱ्याला त्यांनी सॉ मिलचे परवाने बेकायदेशीरपणे दिले आहेत. 80 सॉ मिल्सधारकांचा जप्त केलेला माल या उपवनरक्षकाने पुन्हा त्या सॉ मिलवाल्यांना दिला आहे. सभापती महोदय, या ठिकाणी 50 सॉ मिल्स सुरु करण्याचे बेकायदेशीररित्या परवाने दिलेले आहेत. उपवनसंरक्षक हे सर्व कार्यालय स्वत:च चालवितात. त्या ठिकाणी ॲड. संभाजी सकपाळ यांनी स्वतंत्रपणे या संदर्भात शासनाकडे अनेक तक्रारी केल्या आहेत. त्या तक्रारीवरुन फक्त मोघम चौकशी झाली. सभापती महोदय, बंद गाड्यांवर लाखो रुपयांचे डिझेल खर्ची पडल्याचे दिसून येत आहेत. सभापती महोदय, शासकीय अधिकाऱ्याकडून याची चौकशी देखील झाली. परंतु त्या संदर्भातील चौकशी सी.आय.डी. मार्फत झाली पाहिजे अशी मी या पूरक मागण्यांच्या निमित्ताने शासनाकडे मागणी करतो.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

तरी सुध्दा आमच्या भागात असलेली खारफुटी ही संपूर्णपणे उभी राहिलेली आहे यामध्ये दुमत नाही. शासनाच्या नगरविकास खात्याकडून या ठिकाणी खारबंदीसाठी तरतूद होत नाही त्यामुळे खारबंदी तशीच राहते. सन्माननीय राज्यमंत्री महोदय श्री. रवीशेठ पाटील यांच्या गावात जी खार बंदी करावयाची आहे त्यासाठी सुध्दा तरतूद होत नाही. मी अनेक वेळा त्यांच्या गावी गेलेलो आहे. माझ्या मताशी ते सुध्दा सहमत होतील. आमच्या सर्व परिसरामध्ये मॅंग्रोव्ह उभे राहिलेले आहेत, मॅंग्रोव्ह तोडण्याची परवानगी देण्यात येत नाही. आमच्या 7/12 च्या उताऱ्यावर भात शेती असतांना तेथे मॅंग्रोव्ह उभे राहिलेले आहेत. हे मॅंग्रोव्ह ची वाढ दोन वर्षात खूप होते, गेल्या 5 ते 10 वर्षापासून हे असेच चाललेले आहे. खार बंदीस्ती बरोबर न केल्यामुळे हजारो एकर जमिनीवर मॅंग्रोव्ह उभे राहिल्यामुळे त्या जमिनी खराब झालेल्या आहेत. मॅंग्रोव्ह तोडण्यासाठी फॉरेस्टचे अधिकारी बंदी करतात. सभापती महोदय, आमच्या 7/12 च्या उताऱ्यावर भातशेतीची नोंद असतांना त्या जमिनीवरील मॅंग्रोव्ह तोडण्यास परवानगी द्यावयास पाहिजे. योग्य अशी खार बंदीस्ती न केल्यामुळे मॅंग्रोव्हचे बी शेतीमध्ये येऊन त्यांची झपाटयाने वाढ होते. यासंदर्भात हायकोर्टाने जरी निर्णय दिलेला असला तरी शासनाच्या वतीने कोर्टामध्ये सांगितले पाहिजे की, ही परिस्थिती वेगळी आहे हे मॅंग्रोव्ह शेतीचे नुकसान करीत आहेत. म्हणून आमच्या भागातील शेती वाचविण्याची प्रक्रिया शासनाने करावी अशी माझी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय बाब क्रमांक 56 पृष्ठ क्रामंक 46- शालेय शिक्षण विभाग, यावर मी आता बोलणार आहे. शालेय शिक्षण विभागावर जी तरतूद केलेली आहे ती बरोबर नाही. या ठिकाणी कायम विनाअनुदान तत्वावर शाळा चालविल्या जात आहेत, शासनाकडे पैसा नाही, विनाअनुदान तत्वावर शाळा या राज्यामध्ये चालविल्या जात आहेत, कारण अर्थमंत्री महोदयांकडे पैसा नाही. ज्या शाळांना अनुदान मिळत आहे अशा शाळांकडे अतिरिक्त शिक्षक आहेत, शिक्षण खात्यामार्फत रायगड जिल्हयामध्ये "सुधागड एज्युकशेन सोसायटी" च्या शाळेमध्ये 141 अतिरिक्त शिक्षक आहेत. कोटयावधी रुपये या संस्था चालकांकडून वसूलीबाबत शासनाने नोटीस दिलेली आहे. ज्या शाळांना अनुदान मिळत आहे त्यांच्या संचालकांकडून धुमघडाक्यात शिक्षक नेमण्याची कार्यवाही सुरु आहे. या संस्थेकडे 142 अतिरिक्त शिक्षक आहेत, त्यांना बसून पगार देण्यात येत आहे.

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

रायगड जिल्हयामध्ये अतिरिक्त शिक्षक असतांना नवीन शाळांना शिक्षक भरण्याची मान्यता देण्यात येत आहे. म्हणून जो पर्यंत अतिरिक्त शिक्षकांना दुसऱ्या शाळांवर सामावून घेण्यात येत नाही तोपर्यंत नवीन शिक्षक भरतीस शासनाने परवानगी देऊ नये. संस्थांना पैसा देऊन नवीन शिक्षक भरतीचे काम मोठया प्रमाणात चालू आहे. रायगड जिल्हयातील अतिरिक्त शिक्षक भरल्याशिवाय नवीन शिक्षकांची भरती 100 टक्के थांबविली पाहिजे त्या दृष्टीकोनातून शासनाने विचार करावा. ही बाब गेल्या 10 वर्षापासून सुरु आहे, म्हणून मंत्री महोदयांनी याकडे लक्ष द्यावे.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MHM/ MAP/ SBT/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 18:00

श्री.जयंत प्र.पाटील ....

हे सर्व काम खालच्या पातळीवर झालेले आहे. म्हणून सुधाकर एज्युकेशन संस्थेमध्ये असलेल्या अतिरिक्त शिक्षकांना ताबडतोबीने दुस-या सस्थांमध्ये, शाळांमध्ये समाविष्ट करुन घ्यावे. या गोष्टीला माननीय मंत्रिमहोदय श्री.रविशेट पाटील पाठिंबा देतील असे मला वाटते. कारण सुधाकर एज्युकेशन सस्था त्यांच्या मतदारसंघामध्ये आहे.

बाब क्र.64, पान क्रमांक 52, नगरविकास विभागाबाबत मी सांगू इच्छितो की, कोकणामध्ये मुख्यालयाच्या ठिकाणी रत्नागिरी व अलिबाग या दोन नगरपालिका आहेत. गेल्या शासनाने जिल्हयाच्या मुख्यालयामध्ये असलेल्या नगरपालिकांसाठी जास्त निधी देण्याचा निर्णय घेतला होता. यानुसार रत्नागिरी नगरपालिकेला पूर्ण निधी मिळाला. परंतु अलिबाग नगरपालिकेला 3.40 कोटी रुपयांचा निधी देणे आवश्यक होते. परंतु शासनाकडून हा निधी देण्यात आला नाही. प्रश्न असा निर्माण होतो की, तरतूद केलेली असताना सुध्दा पैसे नाहीत, नगरपालिकेने कामे केली, प्रत्यक्षात त्या कामांचे पैसे देणे बाकी आहेत. त्या दृष्टीने अलिबाग नगरपालिकेला अजून 1.51 कोटी रुपयांचा निधी दिल्यास बरे होईल.

बाब क्र.67, पान क्रमांक 53, नगरविकास विभागाबाबत मी सांगू इच्छितो की, माथेरान नगरपरिषदेने पर्यटकांकडून प्रवाशी कर वसूल करण्यासाठी श्री.अगरवाल नावाच्या व्यक्तीला रु.1,01,20,000/- एवढया रकमेचा ठेका दिला होता. या संदर्भात ठेकेदाराने नगर परिषदेकडे आतापर्यंत फक्त रु.42,08,000/- एवढी रक्कम जमा केली आहे. एकदा नगर परिषदेने ठेका दिल्यानंतर ठेकेदाराने नगर परिषदेकडे पूर्ण रक्कम भरणे अत्यावश्यक आहे. या संदर्भात ठेकेदाराला उर्वरित रक्कम माफ करण्यासाठी नगर परिषदेने ठराव केला आहे. ही बाब बेकायदेशीर आहे. याबाबत शासनाने ताबडतोब कारवाई केली पाहिजे.

बाब क्र.68, पान क्रमांक 53, नगरविकास विभागाबाबत मी सांगू इच्छितो की, नगरपालिकांना वैशिष्टपूर्ण कामांसाठी विशेष अनुदाने या कार्यक्रमाअंतर्गत अलिबाग नगर परिषदेने गॅस चलित शवदाहिनी बांधण्यासाठी अंदाजे 25 लाख रुपयांच्या खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता, उप संचालकांनी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी नगरविकास विभागाकडे सादर केलेला आहे. अलिबाग नगर परिषदेचा हा प्रस्ताव अद्याप शासनाकडे प्रलंबित आहे. या प्रस्तावाला शासनाने मान्यता द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MHM/ MAP/ SBT/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 18:00

श्री.जयंत प्र.पाटील ....

बाब क्र.207, पान क्रमांक 187 पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाबाबत मी सांगू इच्छितो की, अलिबाग तालुक्यातील मान तर्फे झिराड, मुळे आणि खंडाळा या ग्रामपंचायतीमध्ये अधुनमधून पाणी टंचाई निर्माण होते. या ग्रामपंचायत हद्दीच्या बाजूस रामधरणेश्वर म्हणून एक घळ आहे. त्यामध्ये पाईपलाईन टाकली तर आजुबाजूच्या 25 गावांना पाणीपुरवठा होऊ शकेल व परिणामी तेथे असलेली पाणी टंचाई दूर होईल. अलिबाग तालुक्यातील मान तर्फे झिराड, मुळे आणि खंडाळा या ग्रामपंचायतीमध्येशेवटच्या तीन महिन्यांमध्ये पाणी मिळत नाही, ते मिळण्याची सोय होऊ शकेल. याबाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

या ठिकाणी आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी सभापती महोदयांचे आभार मानतो व माझे दोन शब्द संपवतो.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन् 2005-06 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेऊन माझे विचार मांडण्यासाठी मी आपल्या अनुमतीने उभा आहे. या ठिकाणी बाब क्रमांक 1, पृष्ठ 5 वर मी पहिल्या प्रथम बोलू इच्छितो. यामध्ये आपण मंजूर विनियोजनाहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त नियतवाटप करण्यासाठी रूपये 1,26,67,000 ची मागणी केली आहे. त्यासाठी आपण जी अनेक कारणे दिली आहेत त्यात आपण म्हटले आहे की, '... मुख्यत्वेकरून, शासकीय निवासगृहांचे परिरक्षण व दुरूस्ती व सुसज्जीकरण करणे, करमणूक खर्च, कार्यालयीन खर्च वगैरे वगैरे ...' तर यातील शासकीय निवासगृहांचे दुरूस्ती वगैरे मी समजू शकतो पण त्या ठिकाणी करमणूक खर्च कशासाठी आणि कसला आहे हे समजू शकत नाही. तरी त्याबाबत खुलासा केला तर बरे होईल.

त्यानंतर बाब क्र.2 ही निवडणुकीच्या खर्च करण्यासाठी मागितलेली बाब आहे. त्यापैकी सांगली लोकसभा मतदार संघातील निवडणूक ही तेथील लोकप्रतिनिधीच्या निधनामुळे म्हणजे नैसर्गिक कारणामुळे घ्यावी लागलेली आहे त्यामुळे तो खर्च आपणास करावा लागला आहे हे समजू शकतो. पण बाकी पाच निवडणुका ज्या झाल्या त्या कृत्रिम कारणामुळे आपल्याला घ्याव्या लागल्या आहेत म्हणजेच एक प्रकारे लोकशाहीला काळीमा लावणाऱ्या या निवडणुका आहेत. एक वर्षापूर्वीच या निवडणुका झाल्या होत्या आणि त्यात निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीला आपला पक्ष सोडावयाचा असेल तर तो त्याचा अधिकार जरूर आहे पण त्याबाबतीत त्याने निवडणुकीपूर्वी निर्णय घेतला पाहिजे की, आपल्याला नेमके कोठे जायचे आहे, कोठल्या पक्षात रहावयाचे आहे. निवडून आल्यानंतर कोठल्या प्रलोभनातून जर कोणाला पक्ष सोडावयाचा असेल तर त्याने राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढवावी अशी तरतूद आहे. पण अशा कारणामुळे निवडणूक होणार असेल तर त्यामध्ये जनतेचा पैसा खर्च होतो आपण लक्षात घेतले पाहिजे. जनतेच्या पैशातून हा खर्च करावा लागतो त्यामुळे अशा प्रकारे राजीनामा देऊन निवडणूक लढविण्यास त्याला प्रतिबंध केला पाहिजे. म्हणजे राजीनामा जरूर त्याने द्यावा पण तो मंजूर झाल्यानंतर पुन्हा त्याला निवडणूक लढवावयाची असेल तर त्यासाठी त्याला 6 वर्षे प्रतिबंध करावा. अन्यथा ज्या पक्षामध्ये तो प्रवेश करणार असेल आणि त्या पक्षातर्फे तो निवडणूक लढवित असेल तर त्या पक्षाकडून त्या निवडणुकीचा सर्व खर्च वसूल करावा अशी माझी या निमित्ताने सूचना आहे. कमीत कमी यामुळे क्रॉसिंग ऑफ द फ्लोअर

.... 3सी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ....

हा जो प्रकार सध्या देशामध्ये चालला आहे त्यामुळे लोकशाहीला काळीमा लागतो आहे त्यावर काही प्रमाणात बंधन येऊ शकेल. कोणतीही व्यक्ती असेल आणि ती असे करू पहात असेल तर, at the moment any body decides to cross the floor of the House, they should be punished. यादृष्टीकोनातून या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. म्हणून माझी या निमित्ताने सामान्य प्रशासन विभागाला विनंती आहे की, आपण हा खर्च जनतेच्या पैशातून करतो आहोत. आणि पाच वर्षातून एकदा निवडणुकांसाठी खर्च करण्यास आपण परवानगी दिलेली आहे असे असताना अशा प्रकारे पुन्हा पुन्हा निवडणुका होऊ लागल्या तर त्यातून जनतेचा पैसा वाया जाणार आहे. कोठे सभागृह कोसळले म्हणजे अविश्वासाचा ठराव येऊन शासन कोसळले आणि दुसरा राजकीय पक्ष सत्ता स्थापन करू शकत नसेल, ज्याप्रमाणे लोकसभा क्रमांक 11वी आणि 12वी कोसळली होती आणि अडीच वर्षातच पुन्हा निवडणुका घ्याव्या लागल्या. तशी परिस्थिती निर्माण झाली तर समजू शकतो पण रितसर निवडणुका होऊन निवडून आल्यानंतर राजीनामा देऊन, दुसऱ्या पक्षात जाऊन पुन्हा निवडणूक लढवावयाची असेल तर त्यासाठी 6 वर्षाचे बंधन घालणे जरूरी आहे असे मला वाटते तरी माझ्या या सूचनेचा विचार आपण करावा.

( यानंतर श्री. सरफरे ... 3डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3D 1

DGS/ KGS/ MAP/ 18:10

श्री. मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, बाब क्रमांक 160,पृष्ठ क्रमांक 1235 मध्ये वाल्मिकी आंबेडकर योजनेवर केलेल्या खर्चासाठी निधी कमी पडला म्हणून तरतूद केली आहे. या योजनेवर केंद्र सरकारने 47 कोटी 30 लाख 96 हजार रुपये खर्च केले असून तेवढीच रक्कम महाराष्ट्र शासनाने खर्च करावयाची आहे. या संदर्भात मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, मुंबईच्या बांद्रयाच्या पश्चिमेला नर्गिस दत्त नावाची वसाहत आहे. डिसेंबरच्या नागपूरच्या अधिवेशनाच्या वेळी ही वसाहत जळाली. त्यानंतर त्या वसाहतीमधील लोकांना दुसरीकडे घरे बांधून न देता वाल्मिकी आंबेडकर योजनेंतर्गत त्याठिकाणी घरे बांधून दिली. ही घरे बांधून दिल्यानंतर तिच्या वाटपामध्ये काळाबाजार करण्यात आला. जे मूळ लाभार्थी होते त्यांना घरे न देता ती दुसऱ्यांना विकण्यात आली आणि मूळ लाभार्थ्यांना तेथून हाकलून लावण्यात आले. अशापध्दतीने पैसे कमाविण्याचा धंदा झाला आहे. याची चौकशी करुन शासनाने त्या ठिकाणी रहाणाऱ्या मूळ रहिवाशांना घरे उपलब्ध करुन द्यावीत. त्याठिकाणी मूळ लाभार्थी किती होते, किती नवीन लोकांना घरे मिळाली, किती लोकांसाठी ही घरे बांधण्यात आली याची चौकशी करावी. अशाप्रकारे मुंबई शहरामध्ये व उपनगरामध्ये जे चालले आहे, त्याकडे आपण जर लक्ष दिले तर खर्च झालेला पैसा सत्कारणी लागल्यासारखे होईल. सद्या ही योजना बंद झाली असली तरी या योजनेवर पूर्वी झालेल्या खर्चाच्या संदर्भात मला सांगावयाचे होते एवढे बोलून मी माझे भाषण सपंवितो.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनाजी साठे (नामनियुक्त) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये माझे विचार मांडण्याकरीता मी या ठिकाणी उभा आहे. बाब क्रमांक 83 व पृष्ठ क्रमांक 69 अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. या निमित्ताने मला सुचवावयाचे आहे की, माझ्या माढा तालुक्यामध्ये माढा-पडसाळे,जानगाव-अंजनगाव उमाठे व आडेगाव ते टाकळी या तीनही रस्त्यांकडे गेल्या 40 वर्षापासून शासनाचे दुर्लक्ष झाले असल्यामुळे आज त्या रस्त्यांचे अस्तित्व शिल्लक नाही अशी अवस्था आहे. त्याकरीता शासनाने यापुढील काळात या रस्त्यांकरीता तरतूद करुन या गावच्या परिसरातील लोकांची होत असलेली गैरसोय दूर करण्याचे काम करावे अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने पाटबंधारे विभागासंबंधी अत्यंत गंभीर अशा बाबी मी आपल्या निदर्शनास आणणार आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी अनुशेषासंबधी या ठिकाणी विचार मांडले त्यांची मी पुनरुक्ती करणार नाही. परंतु माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे मराठवाडा क्षेत्रासाठी किती पैसे यावयाचे राहिले आहेत ते आपणास सांगतो आपण त्याची नोंद घ्यावी. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार आणि त्यानंतर शासनाने सुधारीत केलेल्या वर्षनिहाय अनुदानामध्ये सन 2002-03 मध्ये 689.15 कोटी, 2003-04 मध्ये 1114.15 कोटी, 2004-05 मध्ये 1037.76 कोटी, 2005-06 मध्ये 418.65 कोटी, अशापध्दतीने एकूण 3249 कोटी रुपये मराठवाडा विभागासाठी मिळायला हवे होते. त्यापैकी प्राप्त अनुदान 2002-03 मध्ये 215.76 कोटी, 2003-04 मध्ये 218.91 कोटी, 2004-05 मध्ये 471.84 कोटी, 2005-06 मध्ये 794.44 कोटी असे एकूण 1700 कोटी रुपये मिळाले. 1500 कोटी रुपये गेल्या चार वर्षामध्ये देणे बाकी आहे याची आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये आपण कबूली द्यावी.

यावर्षी किती अनुदान द्यायचे ठरले होते? त्यामध्ये आपण अंशदान दिले आहे. परंतु ए.आय.बी.पी. चे 200 कोटींपैकी फक्त 64.70 कोटी आम्हाला मिळाले. 135.29 कोटी आम्हाला मिळावयाचे राहिले आहेत. नाबार्डचे 30.36 कोटी मिळणार होते त्यापैकी 18.21 कोटी मिळाले आहेत. 12.14 कोटी मिळावयाचे राहिले आहेत. आणि मराठवाडयामध्ये मंत्रिमंडळाची बैठक घेण्याचा आम्ही आग्रह धरतो त्यामध्ये 414 कोटी रुपये अनुदान मिळणार होते.

(श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरु.....

त्यातील फक्त 225 कोटी रुपये एवढेच अनुदान मिळाले. 189 कोटी रुपये बाकी यावयाचे राहिलेले आहेत. एकूण लहान-मोठी रक्कम मिळून 340 कोटी रुपये मार्चपर्यन्त मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी देण्याचे आपण विसरुन गेलेला आहात. मला असे वाटते की, पुरवणी अंदाजपत्रकामध्ये 340 कोटी रुपयाची तरतूद आपण केली असेल. 340 कोटी मिळाल्यानंतर आम्हाला मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पाची जोरात कामे करता येतील. 109 क्रमांजाच्या बाबीमध्ये 100 जोटीची तरतूद जेलेली आहे. शासनाने फक्त 100 जोटीची तरतूद जेली आहे.मज आम्ही 240 जोटी रुपये विसरुन जायचे जाय ? ते पैसे देज्याची तरतूद आपल्याजडे आहे जाय ? मार्च पूर्वी रक्जम द्यावयाची असेल तर या पुरवजी माजज्यांमध्ये त्याचा समावेश जरायला पाहिजे होता. आपज मराठवाड्यावर जशासाठी अन्याय जरता ? माज्चे 1500 जोटी रुपये द्यायचे राहिलेले आहेत. माजील काही वर्षात पैसे देतांना आमच्या विभागावर अन्याय झाला, ठीज आहे. परंतु निदान यावर्षी तरी रुपये 240 जोटीची तरतूद जराल, अशी अपेजा होती. म्हजून सिंचन विभाजाचा जो अतिरेज चाललेला आहे,तो जोठेतरी थांबला पाहिजे,अशी माझी मागणी आहे. मराठवाडा विभाजातील ही 340 जोटी रुपये ताबडतोब देजार जाय ? अजूनही ती रक्जम रिलिज करण्यात आली नाही ती आपण जरजार आहात जाय ? याचा उत्तरामध्ये जुलासा जरावा. त्यापेजाही अडचजीची, चिंतेची बाब अशी आहे की, जृष्जा-जोरे महामंडळ निर्माज जेल्यानंतर 20 हजार जोटीपेजा जास्त रक्कम अदा करण्याचे प्रशासजीय अधिजार त्यांना दिले पज आम्ही जमलो, थोडेसे पळायला लाजलो, तोपर्यंत जोदावरी जलसिंचन महामंडळाचे आजि विदर्भ जलसिंचन महामंडळाचे अधिजार आपण फक्त 5 जोटीवर सीमित ठेवले. मराठवाड्यातील लोजाची जाजृती थोडेशी दिसावयास लाजली, चार प्रोजेक्ट होज्याच्यादृष्टीने मार्ज जाढायला लाजले. सभापती महोदय, मराठवाड्याची भौजोलिज परिस्थिती वेजळी आहे. ड्रीप आजि तुषार जमांड एरिया डेव्हलपमेंटचे जाम होत नाही तो पर्यंत ज-या अर्थाने सिंचन वाढजार नाही त्यामुळे त्यांना प्रशासजीय मान्यतेचे अधिजार भौजोलिज परिस्थिती पाहून जोदावरी जोरे सिंचन महामंडळाला परत द्यायला पाहिजेत. राज्यपालांचे निर्देश होते जी,समजज अधिजार सजळयांना द्या. राज्यपालांच्या निर्देशानुसार सजळयांना समान अधिजार दिले. आता जृष्जा जोरे महामंडळाला पैसे मिळत नाहीत असे म्हटले जी पश्चिम महाराष्ट्र आजि मुंबईच्या पोटात दुजायला लाजले जी मराठवाडा आजि विदर्भातील लोजांचे पाय जसे जापता येतील, हे पाहिले. म्हजून तुम्ही उडत आहात जाय मज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरु.....

तुमचे पंज जापू□टाजू. मज उजवा पंज, डावा पंज, उजवा पाय, डावा पाय जापू□लहा□जोंबडी जरु□सोडू□दिले. आता जोठे उडतोस ?तिज्डे उड. स□मा□□य श्री.जडजरी साहेब म्हजाले,हे जूप "दादा" आहेत. मला "दादा" आहे जी " बच्चा" आहेत, हे जळे□सै झाले 5 जोटीमध्ये छोटा बच्चा भी भाज □की सजेजा, अशी परिस्थती झालेली आहे. देशमुज साहेब तुमची तर जीव जरावेसी वाटते.

डॉ.सु□□ल देशमुज : 5 लाजाची मर्यादा आहे.

श्री.श्रीजांत जोशी : मज मंत्री पद सांभाळज्यापेजा जोजते तरी इतर उद्योजधंदे पहा, अशी सांजज्याची वेळ आलेली आहे. 5 लाजाचे प्रशासजीय अधिजार विदर्भ सिंच□विकास □हामंडळाला आहे, म्हजजे ही तर चेष्टा आहे. म्हजू□मला असे वाटते जी, मराठवाडा आजि विदर्भावर अ□याय जरज्यासारजे हे आहे. ृष्जा जोरे सिंच□महामंडळाला जेवढयापर्य□चे प्रशासजीय अधिजार वापरले, तेवढयाच जोटीचे अधिजार द्या. सजळ्याच माजास भाजाच्याबाबतीत दुजाभाज जेला जातो विशेषत: मराठवाडा आजि विदर्भावर जो अ□याय होतो...

श्री.धोंडीराम राठोड : जा□देशामध्येही लज द्यायला सांजा.

श्री. श्रीजांत जोशी : जा□देश सिंच□महामंडळाची आपज माजजी जरा. जा□देश आजि जोजज सिंच□महामंडळ वेजळे माजजार □ही तोपर्य□ त्यांच्यावरील अ□याय दूर होजार □ही. मला दो□महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत. सिंच□विभाजाअंतर्जत जार्यजारी अभियंता, उप अभियंता, अधिजज अभियंता या सजळयांची मी यादी घेतलली आहे. जार्यजारी अभियंत्याच्या सात जाजा रिक्त आहेत उप विभाजीय अधिजारी यांच्या 249 जाजा रिक्त आहेत. एजूज सजळया मिळू□जवळपास 90 आहेत. माझे म्हजजे असे आहे जी, या 90 उप विभाजीय अभियंत्यांच्या जाजा रिक्त आहेत. बऱ्याच ठिजाजी चार्ज देऊ□जडबड होते. एजा बाजूला बेरोजजारांचा प्रश□जंभीर आहे आजि दुसऱ्या बाजूला ज्यु□□र इंजि□□रला लाजल्यापासू□प्रमोश□मिळालेले □ही. त्यामुळे ज्यु□□र इंजि□□र यांच्या आयुष्यामध्ये जधीच प्रमोश□मिळाले □ही . ते तर इंजि□□र म्हजू□जेली 35 वर्षे एजाच ठिजाजी जाम जरतात. ते चातजासारजे वाट पहात आहेत, त्यां□प्रमोट जा जरत □हीत. त्या पुढे जाऊ□माझे म्हजजे आहे जी, ॲडमि□स्ट्रेश□मध्ये आपण चांगले रिफॉर्म आणले पाहिजेत. एजादी ॲडीशनल एक्झीक्युटिव्ह इंजि□□रची पोस्ट जेली पाहिजे, ॲडीश□ल सुपरिटेंडींज इंजि□□रची पोंस्ट तयार जेली पाहिजे. ॲडीश□ल चीफ इंजि□□रची पोस्ट जेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरु....

पाहिजे. त्यां□ व्हीजिल□स, क्वॉलिटी ंट्रोल डिझाइ□ची ज ामे दिली पाहिजे. ज ोठेतरी प्रवाह सिंच□ जेत्रात आजज्याची आवश्यज ता आहे. डेड झाल्यासारजे सिंच□ जाते ज रु□ टाज लेले आहे. विशिष्ट दो□-ती□ सर्ज ल आजि दो□-ती□ अधिज ारी हे जोरात पळता□ दिसतात. ज ारज त्यांचे दुज ा□ जोरात चालू असते. बाजी संपूर्ज 90 टक्जे मार्सेस आपज डेड जेलेले आहेत. या जात्याज डे आपज मंत्री म्हजू□ लज द्यावे. दुसरा लेंडी आंतर राज्य प्रज ल्प मॅचिंज ग्रॅ□ट 17 ज ोटी रुपये दिले □हीत तर आपल्याला इंटरेस्ट द्यावा लाजजार आहे. महाराष्ट्राचे सरज ार सतत पुरोजामी म्हजत असते. पज येथे आंध्र प्रदेश□ पूर्ज आपले ज ॉ□ट्रीब्युट दिले. आंध प्रदेशच्या पैशावर आपज ज ाम ज रतो आहे. पज मराठवाडयातील □ांदेड सारज्या भाजातील त्याला मॅचिंज ग्रॅ□ट देज्यासाठी आपल्याज डे 17 ज ोटी रुपये □हीत. व्याज आपज भरजार. याच्यापुढे महाराष्ट्राची एज ादृष्टी□ इंटरस्टेटमध्ये बद□ामी ज रज्याचे ज ाम हे ज ोठे तरी आपल्याज डू□ व्हायला लाजलेले आहे.

या□ंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी.....

लेंडी आंतरराज्य प्रकल्पाला 17 कोटी रुपयांची मॅचिंग ग्रँट दिली नाही. आंध्र प्रदेशने दिलेल्या पैशातून आपण काम करीत आहोत. मराठवाड्यातील नांदेड, लातूर सारख्या मागास भागासाठी मॅचिंग ग्रँट देण्याकरिता आपल्याकडे 17 कोटी रुपये नाहीत. त्याचे व्याज आपण भरणार आहोत. यामुळे आंतरराज्यांमध्ये महाराष्ट्राची बदनामी करण्याचे काम आपल्याकडून व्हावयास लागले आहे. या 31 मार्चच्या पूर्वी 17 कोटी रुपयांची तरतूद लेंडी प्रकल्पासाठी द्यावी अशी मी आग्रहाची मागणी करतो. सिंचन खात्यातील बाकीच्या काही मागण्या असतील त्याबाबतही माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, दोन तीन छोट्या छोटया बाबी मी सांगणार आहे. बाब क्रमांक 3 मध्ये मंत्रालयातील संगणकीकरण करण्यासाठी 14 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही आनंदाची बाब आहे. यासाठी मला सरकारचे अभिनंदन करावयाचे आहे. परंतु मला यासंदर्भात एक मुलभूत प्रश्न विचारावयाचा आहे. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी आणि डिव्हीजनल्स हेड्स या सर्वांचा ऑनलाईन कारभार सुरु होणार आहे की नाही ? आज एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक या ठिकाणी सर्व गोष्टी ऑनलाईन झालेल्या आहेत. ट्रान्सफर ऑफ पेपर्स तसेच प्रशासकीय मान्यतेचे काम ऑनलाईन कम्युनिकेशनने होणार आहे काय ? ट्रेझरीज ऑनलाईन झालेल्या आहेत पण तालुक्याच्या ट्रेझरीज ऑनलाईन झालेल्या नाहीत. मंत्रालयातील संगणकीकरण करीत असताना जनतेला दोन दिवसात निर्णय मिळेल अशी व्यवस्था होणार आहे काय ? त्याला पासवर्डची पध्दत द्यावी लागेल. चांगले सॉफ्टवेअर वापरावे लागेल. मंत्रालयापासून तालुका पातळीपर्यंतचे कामकाज ऑनलाईन करण्याची आवश्यकता आहे. कोणते सेक्टर करावयाचे, काय करावयाचे हा नंतरचा भाग आहे. अजूनही प्रशासनामध्ये एखादी गोष्ट सांगितली की, ती माननीय मंत्रिमहोदयांपर्यंत पोहोचण्यास किमान दीड महिने लागतात ही वस्तुस्थिती आहे. मंत्रालयात दिलेल्या आमदारांच्या पत्रांना ई-मेलने उत्तरे पाठविता आली तर हे 14 कोटी रुपये कारणी लागल्यासारखे होईल. त्याची अनुभूती आम्हाला येऊ द्या. आम्ही दिलेल्या पत्रांची उत्तरे ई-मेलने देण्याची व्यवस्था केली तर 14 कोटी रुपयांचा उपयोग झाला आणि कोठे तरी सरकार काम करीत आहे असे होईल. समथिंग

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. श्रीकांत जोशी ...

इज ऑपरेशनल असे आम्हाला सांगता येईल. नाही तर मंत्रालयातील कर्मचारी संगणकावर गेम खेळत बसलेले असतात आणि आमदाराला काही फायदा होत नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 5 मध्ये पुतळ्याच्या संदर्भातील विषय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अरबी समुद्रात उभारण्याचे ठरले होते. त्याचे पुढे काय झाले ? छत्रपती शिवाजी महाराजांना कोणी विसरणार नाही अशी अपेक्षा करतो. बाब क्रमांक 38 च्या संदर्भात मला कृषी खात्याला एक प्रश्न विचारावयाचा आहे. यामध्ये 200 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. त्यापैकी मराठवाड्यासाठी दिलेले अनुदान किती आहे ? मराठवाड्यासाठी असलेले अनुदान अत्यंत कमी आहे. गुजरात सरकारने एक चांगला पायंडा पाडलेला आहे. तशी पध्दत आपण वापरावी. त्यामुळे पर कॅपिटा इन्कम वाढेल. क्वालिटी सीड वापरावयास पाहिजे ते आपण केले नाही. बाब क्रमांक 41 मध्ये सेंद्रिय शेती करण्यास चालना देण्यासाठी अर्थसहाय्य देणे याकरिता 30 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. 30 लाख रुपयांमध्ये सेंद्रिय शेती कशी काय होईल ? हे समजावून सांगावे. तुषार व ठिबक सिंचन संच उभारण्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. शेवटी एकच मुद्दा मांडतो. बाब क्रमांक 84 मध्ये एकात्मिकृत रस्ते विकास कार्यक्रमाच्या संदर्भात तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये सार्वजनिक बांधकामाच्या दृष्टीने आयआरडीपी प्रोजेक्ट्सकरिता 30 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय श्री. भुजबळ साहेब उपस्थित आहेत. आता सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख हे सभागृहात उपस्थित नाहीत. औरंगाबादमध्ये काही बदल झालेला आहे. खूप भांडल्यानंतर 23 कोटी रुपये आयआरडीपीकडून एमएसआरडीसीला देण्यात आले. वैधानिक विकास मंडळाचे 12 कोटी रुपये मिळाले नाहीत म्हणून काम ठप्प आहे. त्याचप्रमाणे टोल मात्र सर्व बाजूने चालू आहे. औरंगाबाद आयआयडीपीमध्ये मदत करुन किती दिवसात ती कामे पूर्ण होतील ? सन 2001 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेली कामे 2006 पर्यंत ठप्प आहेत. ती कामे पूर्ण करावी अशी विनंती करतो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 18:25

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2005-06च्या पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृ.क्र 33, बाब क्रमांक 41च्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्याने संपूर्ण राज्यात फळबाग लागवडीसाठी शंभर टक्के अनुदान देण्याचे जाहीर केले. त्यानुसार रामटेक तालुक्यातील काही शेतक-यांनी संत्रा तसेच मोसंबीची झाडे लावली. परंतु असे निदर्शनास आले आहे की, त्या तालुक्यात जुलै पासून आतापर्यन्त शेतक-यांना एकही पैसा मिळालेला नाही. संत्र्यांची जी झाडे लावलेली आहेत त्यांना पाणी दिले नाही तर ती झाडे सुकून जातील. त्या शेतक-यांना तातडीने अनुदान द्यावे अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो. शेततळ्यांच्या बाबतीत शासनाने निर्णय घेतला. परंतु शेततळ्यांचा पत्ता नाही. याबाबतीतन माननीय मंत्री महोदयांनी तळमळीने लक्ष द्यावे.

पृ.क्र.34 वरील बाब क्रमांक 44 अंतर्गत कृषी विद्यापीठांना सहायक अनुदान व जैवतंत्रज्ञान इत्यादी बळकटीकरणासाठी 5 कोटीची अतिरिक्त तरतुदीची मागणी केलेली आहे. परंतु सहायक प्राध्यापकांना बढती देताना मागासवर्गीय अधिका-यांवर अन्याय केला जात आहे. सेवाज्येष्ठता सूचीमध्ये 31 क्रमांकावर असलेले श्री. तांबे यांना डावलून 33 क्रमांकावर असलेल्या अधिका-याला पदोन्नती देण्यात आलेली आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. माननय मंत्री महोदयांनी याप्रकरणी लक्ष घालून मागासवर्गीय अधिका-याला न्याय द्यावा.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृ.क्र. 77 वरील बाब क्रमांक 99 अंतर्गत शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे यासाठी रु. 3,33,00,000/- ची मागणी केलेली आहे. याबाबतीतही मागासवर्गीय कर्मचा-यांचे शोषण होत आहे. गडचिरोली जिल्हयातील कार्यकारी अभियंता श्री.डी.एच.हुलेकर यांना दिनांक 14.11.1995 पासून पदोन्नती देण्यात आली. पदोन्नतीच्या बाबतीत श्री. हुलेकर यांच्यावर अन्याय झालेला आहे. या अन्यायाच्या बाबतीत मी संबंधितांना पत्र लिहिले होते. परंतु त्या पत्राला अजून साधे उत्तर देखील पाठविलेले नाही ही दुर्दैवाची बाब आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या पृ.क्र.44 वरील बाब क्रमांक 52 च्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, 1ली ते 7वी पर्यन्तच्या प्राथमिक शाळांना मान्यता दिल्यानंतर अनुदान मात्र 4थी पर्यन्तच्या वर्गाना दिले जाते. कल्याण येथील समता प्राथमिक शाळेच्या संदर्भात मी शासनाला पत्र दिलेले

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश निकोसे पुढे सुरु...)

आहे. त्या शाळेतील 5वी ते 7वीच्या वर्गांना शंभर टक्के अनुदान द्यावे अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, नागपूर शिक्षण मंडळामध्ये रोजंदारीवर कर्मचा-यांची नियुक्ती केलेली होती. या कर्मचा-यांच्या संदर्भात 2003मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. अमरीशभाई पटेल यांनी आदेश दिले होते. शिक्षण मंत्र्यांच्या आदेशानुसार नागपूरमध्ये 24.11.2003रोजी सभा झाली. त्या सभेला मी हजर होतो. त्यानंतर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये दिनांक 14.12.2003 रोजी झालेल्या सभेस माननीय राज्यमंत्री, शिक्षण विभाग यांनी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष तसेच शिक्षण विभागाचे सचिव, श्री. पाठक, कर्मचारी संघटना, शिक्षण मंडळाचे सदस्य श्री. निकम, शिक्षण मंडळाच्या वकील श्रीमती झाडे, आणि आमदार म्हणून मी देखील उपस्थित होतो. माननीय राज्यमंत्री श्री. राजेंद्र शिंगणे यांनी कर्मचा-यांची व शिक्षण मंडळातील वकिलांची बाजू ऐकून, हायकोर्ट व कर्मचारी संघटना यांच्यात झालेल्या समझोत्याप्रमाणे व सिनिऑरिटी लिस्ट प्रमाणे नोकरीत समाविष्ट करुन त्यांना कामावर रुजू करण्यात यावे, असा निर्णय घेतला. नागपूर युनिव्हर्सिटी पॅटर्न प्रमाणे ते कर्मचारी 3 हजार रु.वर काम करायला तयार आहेत. त्याबाबतीत देखील अजून निर्णय घेतलेला नाही. ते लोक उपोषणाला बसण्याच्या मन:स्थितीत आहेत. एकूण 240 लोकांपैकी काही लोक मृत्यू पावले, काही महिलांची लग्ने झाल्यामुळे त्या महिलांनीही काम सोडलेले आहे. आता फक्त 40-45 रोजंदारीवरील लोक राहिलेले आहेत. त्यांच्याबाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांना न्याय द्यावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. शिगम 18:30

श्री. रमेश निकोसे ...

सभापती महोदया, पान क्र.182,पृष्ठ क्रमांक 203 महिला आणि बालकल्याण विभागाशी संबंधित ही पूरक मागणी आहे. या मागणीवर बोलताना मला अत्यंत दु:ख होत आहे. सप्टेंबरमध्ये शासनाने या विभागामार्फत नागपूर,सोलापूर,कल्याण,गोंदिया,भंडारा आणि चंद्रपूर या जिल्हयामध्ये प्रकल्प सुरु केले. परंतु आजच्या तारखेपर्यंत एक पैसाही अनुदान म्हणून दिलेला नाही. अंगणवाडी मधील शिक्षकांचे पगार झालेले नाहीत. अंगणवाडी मधील महिला 5-10 लाखांचा माल उधार घेऊ शकत नाही. महिला मंडळे अडचणीत आली आहेत. त्यांनी एक दिवसाचा बंद केला. बाजारातून माल विकत घेऊन अंगणवाडीतील मुलांना आहार पुरविणे या महिलांना कठीण झालेले आहे. म्हणून या अंगणवाडयांना तातडीने अनुदान देण्याबाबत बजेटमध्ये तरतूद करावी अशी मी विनंती करतो आणि पूरक मागण्यांना पाठिंबा देऊन माझे दोन शब्द संपवितो.

----

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, बाब क्र.165,पृष्ठ क्रमांक 147 यामध्ये मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त अनुदान लेखाशीर्षाखाली याखाली पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. वैद्यकीय संस्थांची आणि महाविद्यालयांची नांवे यामध्ये आहेत. या संस्थांसाठी निधी देण्यात आलेला आहे. यामध्ये जे.जे.,सेंट जॉर्ज,जी.टी.अशी अनेक रुग्णालये आहेत. आजच मा.सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी नियम 93 अन्वये सूचना मांडली होती. पण ते उपस्थित नसल्यामुळे ती चर्चेला येऊ शकली नाही. त्यांनी अतिशय महत्वाची सूचना मांडली होती. जे.जे.हॉस्पीटलमधील अनेक यंत्रे नादुरुस्त आहेत. प्रत्येक पूरक मागणी सादर करते वेळी जे.जे.हॉस्पीटलचे नांव त्यामध्ये असतेच. गेली सहा वर्षे मी पाहतो आहे की, या विभागाच्या पूरक मागण्या सादर होत असताना जे.जे.हॉस्पीटलचा उल्लेख असतोच. असे असताना सुध्दा या हॉस्पीटलमधील यंत्रे नादुरुस्त का असतात ? मागणीमध्ये म्हटले आहेकी 8/10 दिवस ही यंत्रे बंद होती. त्यानंतर सुरु करण्यात आली. मागणीमध्ये म्हटले आहे की सीटी स्कॅनसारखे महत्वपूर्ण यंत्र नवीन प्रस्थापित करण्यासाठी बीओटी आणि बीओ सारखे पर्याय शासनाच्या विचाराधीन आहेत. सभापती महोदया, बाब क्र. 170,पृष्ठ क्र.152 या पूरक मागणीमध्ये अंगणवाडीमधून द्रवरुप प्रथिने राज्यातील कुपोषण कमी करण्यासाठी अंगणवाडीतील मुलांना पुरविणे. द्रवरुप प्रथिने पुरविणेसंबंधातील ही बाब आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. कानडे..... 18:35

डॉ. दीपक सावंत .......

सभापती महोदया, माझ्या मनात एक शंका आहे की, ही प्रथिने म्हणजे एक्झॅक्टली या मुलांना आपण काय पुरविणार आहोत ? त्याचे स्वरुप काय असेल ? आपण त्यांना ड्रॉपच्या स्वरुपात हा पुरवठा करणार आहोत की कसे? या कुपोषित बालकांच्या आहारामध्ये नक्की काय देणार आहोत ? माझ्याकडे शासनानेच दिलेले मानव विकास अहवाल हे पुस्तक आहे त्यामध्ये अत्यंत महत्वाच्या गोष्टी दिलेल्या आहेत. आपण नव संजीवनी योजनेअंतर्गत जे अनुदान दिले जाते त्याची वाट कशी लावण्यात येते याचे मूर्तिमंत उदाहरण देऊन मी माझे भाषण संपविणार आहे. यामध्ये पाडा स्वयंसेवक अनुदान पोटी प्राप्त अनुदान 38221 रुपये तर खर्च फक्त 6108, भरारी पथक योजनेसाठी 41808 एवढे अनुदान प्राप्त झाले होते पण 5251 रुपये एवढाच खर्च करण्यात आला आहे. बालकांचे कुपोषणाचे प्रमाण आपल्या राज्यात सर्वात जास्त असतांना या कुपोषणावर मात करण्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून तसेच बजेटच्या माध्यमातून आपण करीत असतो तरी देखील प्राप्त झालेले अनुदान खर्च करण्यामध्ये एवढा अनुत्साह का दाखविला जातो. त्यानंतर मातृत्व अनुदान योजनेअंतर्गत 88661 रुपये एवढे अनुदान प्राप्त झाले असतांना खर्च मात्र 33060 रुपये एवढाच करण्यात आला. कुपोषित बालकांच्या श्रेणी 3 व श्रेणी 4 च्या बालकांवर औषधोपचार करण्यासाठी प्राप्त अनुदान 98145 रुपये एवढे मिळाले असतांना खर्च मात्र 6147 रुपये एवढाच खर्च करण्यात आला, हा तर कहरच आहे. जो पैसा औषधोपचारासाठी दिला जातो तो खर्च करीत नाही आणि दुसरीकडे मात्र त्यांना प्रथिनांचे वाटप करण्यासाठी सभागृहासमोर मागणी सादर केली जाते. शेवटचे म्हणजे दाईसंबंधीचा आहे. दाईच्या बैठकीसाठी 2866 रुपये एवढे अनुदान दिले होते परंतु 1059 रुपये एवकाच खर्च करण्यात आला आहे. ही तफावत नव संजीवनी योजनेमध्ये आहे. एकीकडे आपण योजनांना राजमाता जिजामाता पालनपोषण मोहिम अशा प्रकारची नांवे देतो व योजना काढतो परंतु यासाठी दिलेला पैसा खर्च केला जात नाही यासंबंधीचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा, अशी मी विनंती करतो. या योजनेअंतर्गत गेल्या वर्षी मी रस्ते जोडणीची अनेक गांवे शिल्लक असल्याची माहिती दिली होती ती कामे पूर्ण झाली की नाहीत यासंबंधीचाही खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा, अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------------------

..........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदया, पृ.क्र.5, बाब क्र. 2 यावरुन विस्तृत चर्चा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी केल्यामुळे मी त्यासंबंधी बोलत नाही. पण 11 ठिकाणी विधानसभेच्या पोटनिवडणूकांसाठी झालेला खर्च हा अनाठायी आहे, असे मला सुचवावयाचे आहे. अर्थात यासंदर्भात आपल्या हातात काहीही नाही हे मला माहिती आहे परंतु आपण कमीत कमी केंद्राकडे सूचना तरी करु शकतो की, अशा तऱ्हेच्या मध्यावधी निवडणूका घेऊ नये.

यानंतर पृ.क्र.7, बाब क्र. 6 क्रांतिसिंह नाना पाटील हे शब्द ऐकल्यानंतर पत्री सरकारची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. खूप उशिरा का होईना त्यांच्या जन्मगांवी स्मारक बांधण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी या मागणीच्या रुपाने शासनाने 2,44,068 रुपयांची मागणी केली आहे. या निर्णयाबद्दल मी शासनाचे अभिनंदन कराते.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर..

सभापती महोदय, यानंतर मी पान क्र.44 वरील शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्र.52 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. मंजूर अनुदानाहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आलेली आहे. पण येथे वेतनेतर अनुदानाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. या बाबीमुळे माध्यमिक शाळांना आश्वासन मिळाले आहे. हा निधी मार्च पर्यंत शासनाने उपलब्ध करून दिला पाहिजे. प्राथमिक शाळांबाबत मात्र येथे कोणतेही आश्वासन देण्यात आलेले नाही. सदर निधी हा माध्यमिक शाळांना मार्च पर्यंत मिळेल याबाबत मला शंका आहे.

यानंतर मी बाब क्र.56-सर्व शिक्षा अभियानांतर्गत वस्ती शाळेतील शिक्षकांना वाढीव मानधन देणे याकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. ज्या वस्तीशाळेतील शिक्षकांची 3 वर्षांची अखंड सेवा पूर्ण झाली आहे त्यांना एप्रिल 2004 पासून रुपये 1000/- इतक्या मानधनाहून रुपये 1500/- मानधन वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. असे जरी असले तरी या शिक्षकांच्या अनेक मागण्या आहेत. तीन वर्ष त्यांनी अखंड सेवा केल्यानंतर त्यांना डी.एड.मध्ये प्रवेश मिळावा अशी त्यांची मागणी आहे. कमीतकमी ती मागणी तरी शासनाने पूर्ण करावी. त्यामुळे त्यांना कोठे तरी कायमस्वरुपी नोकरी मिळू शकेल.

सभापती महोदय, बाब क्र.62 ही अशासकीय प्राथमिक शाळांचा विकास व विस्तार यासाठी तरतूद करण्यासंबंधीची आहे. अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी वर्गाच्या वेतनाकरिता रुपये 3,27,000/- इतक्या खर्चाची आवश्यकता आहे. आज आपण कायम विनाअनुदानित शाळांना परवानगी कशासाठी देत आहात ? 14 वर्ष सक्तीचे मोफत शिक्षण देणे हा घटनेने दिलेला अधिकार आहे. पण शासन त्याची पायमल्ली करीत आहे. कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळांना परवानगी दिल्यानंतर त्या शाळा भरमसाठ फी आकारतात. आज शिक्षक अतिरिक्त झाले आहेत. असे असताना आपण कायम विनाअनुदान तत्त्वावरील शाळांना मान्यता दिलेली आहे. ते चुकीचे आहे. आठव्या तुकडीला मान्यता दिल्यानंतर नववीच्या तुकडीला मान्यता दिली जात नाही. नैसर्गिक वाढीनुसार आपण मान्यता दिली पाहिजे. माझ्याकडे विवेकानंद शिक्षण मंडळाचे पत्र आहे. या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

संस्थेच्या शाळेला इयत्ता आठवीच्या तुकडीला सन 2003 मध्ये मान्यता देण्यात आली. पुढच्या वर्षी इयत्ता नववी व त्याच्या पुढच्या वर्षी इयत्ता दहावीच्या तुकडीला मान्यता द्यायला पाहिजे होती, ती देण्यात आली नाही. असे शासन का करीत आहे, तेच कळत नाही. याचा देखील या निमित्ताने खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा.

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास मंत्र्याचे बाब क्र.68 - महिला क्रांती वस्त्रप्रावरणे प्रशिक्षण याकडे लक्ष वेधणार आहे. महिलांना रोजगार पुरविण्यासाठी, महिलांच्या उन्नतीसाठी रुपये 20.00 लाख खर्च हा शासन व इचलकरंजी नगरपरिषद समप्रमाणत करणार आहे म्हणून रुपये 50.00 लाखाची तरतूद चालू वित्तीय वर्षा दरम्यान करण्यात आली आहे. या महिलांना प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी शासनाने काही योजना आखली आहे काय? असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे. या महिला प्रशिक्षण घेऊन घरात बसत असतील तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही.

बाब क्रमांक 71 ही दलित वस्त्यांमध्ये सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने आहे. यात आपण नागरी क्षेत्राचा समावेश करणार आहात काय ? जो जी.आर.निघेल त्यात 'मुंबई शहर वगळता' असा शब्दप्रयोग असणार नाही याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा. तसेच, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी द्रवरूप प्रथिनेसंबंधीचा उल्लेख केला आहे. तेव्हा कुपोषणे कमी होण्याच्यासाठी शासनाने काही तरी उपाययोजना करावी अशी या निमित्ताने सूचना करते. धन्यवाद.

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, गेल्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना एक मागणी केली होती. बारामती येथील महिला निवासी वसतीगृह हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. या वसतीगृहला भेट दिल्यानंतर ती जागा अत्यंत वाईट अवस्थेत असल्याचे माझ्या लक्षात आले. प्रत्येक खोलीमध्ये पाणी गळत होते. तेव्हा बारामती शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची वापरात नसलेली एखादी इमारत मिळावी अशी विनंती पत्राद्वारे करण्यात आली होती.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आम्ही जेव्हा अजून माहिती घेतली तेव्हा बारामतीमध्ये जुन्या कोर्टाचे काम नव्या इमारतीमध्ये सुरु झाल्यामुळे जुनी इमारत तशीच पडून आहे असे निदर्शनास आले. त्यामुळे जुन्या इमारतीची जागा महिला निवासी गृहाला मिळावी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने बारामतीच्या कोर्टाला पत्र पाठविले. परंतु त्या पत्रामध्ये नजरचुकीने, जुन्या कोर्टाच्या इमारतीऐवजी नवीन इमारतीची जागा महिला निवासी गृहाला मिळावी असा उल्लेख केला गेला. त्यामुळे बारामतीच्या कोर्टाकडून आणि संबंधित विभागाकडून पत्र आले की, आपण नवीन कोर्टाची इमारत महिला निवासी गृहासाठी कशी मागितली ? वास्तविक पाहता आमचे म्हणणे जुन्या इमारतीच्या संदर्भात होते. जुनी इमारत महिला निवासी गृहाला देण्यामध्ये काहीच अडचण येणार नाही. कारण ती इमारत न वापरता तशीच पडून आहे. बारामतीच्या न्यायाधीशांना शासनाच्या नजरचुकीमुळे जो मन:स्ताप झाला, त्याबाबत शासनाने ही बाब नजरचुकीने झाली आहे असे कळवून त्यांना दिलासा द्यावा अशी मी विनंती करीत आहे.

महोदया, बारामतीमध्ये महिला वसतीगृहाला जागा नसल्यामुळे ते वसतीगृह शिरुर येथे नेण्यासंदर्भात हालचाली सुरु आहेत. कारण त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची जागा उपलब्ध नाही असे सांगितले जाते. माझी अशी विनंती आहे की, बारामती मध्ये ज्या जागेवर वसतीगृह आहे ते त्याच जागेवर ठेवावे, त्याला अन्यत्र कोठेही हलवू नये. कारण त्या वसतीगृहात राहणाऱ्या महिला आसपास नोकऱ्या करीत आहेत, शिक्षण घेत आहेत.

तसेच मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद कार्यालयामध्ये पूर्वी जेवढया महिला कर्मचारी कार्यरत होत्या, त्या महिला कर्मचाऱ्यांची संख्या आता मोठया प्रमाणात वाढलेली आहे. त्या कार्यालयाच्या बहुतेक इमारती तुटपुंज्या स्वरुपात असून, एखाद्याच ठिकाणी महिलांकरिता स्वच्छता गृह दिसून येते. म्हणून माझी मागणी आहे की, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद कार्यालयामध्ये महिलांसाठी किमान एका तरी स्वच्छता गृहाची व्यवस्था करण्यात यावी. परंतु त्याबाबत पुरवणी मागण्यांमध्ये कसलाही उल्लेख नाही. त्यामुळे या संदर्भात विभागाने दखल घ्यावी अशी मी विनंती करते.

..2..

SJB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 18:45

डॉ.नीलम गोऱ्हे....

महोदया, आमदार निधीच्या बाबत नियमाप्रमाणे तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. विधानपरिषदेमध्ये जे सदस्य शिक्षक किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेले आहेत, त्यांना त्यांच्या मतदारसंघात पैसे देण्याचे बंधन आहे. अनेक सदस्य विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निवडून आलेले आहेत, तसेच राज्यपालांच्या माध्यमातून सुध्दा आलेले आहेत. परंतु आम्हाला शासनाचे उप सचिव श्री.निं.बा.रायलापूरकर यांचे पत्र आलेले आहे. महोदय, विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांना आमदार फंड देण्याबाबत अनेक वेळा प्रोसीजर झाली आहे. तत्कालीन विधानपरिषद सभापती, प्रा.ना.स.फरांदे यांनी विधानपरिषदेच्या आमदारांना कोणत्याही मतदारसंघात निधी वापरता यावा या दृष्टीने सुटसुटीतपणे उपाययोजना करता येईल असे सांगितले होते. त्यावेळी फार मोठे रणकंदन सभागृहात झाले होते. सर्वपक्षीय आमदारांनी सूचना करुन, विनंती करुन, माननीय सभापतींनी निदेश देऊनही आमदार निधीच्या संदर्भात कोणीही पाऊले उचलतो आणि वेगवेगळी प्रोसिजर मांडतो अशी स्थिती आहे. माझी या सदनाच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आमदार निधी खर्च करण्याच्याबाबत विधान परिषदेचे माननीय सभापती, माननीय उप सभापती आणि सन्माननीय सदस्य यांचे मत विचारात घेतले पाहिजे. नाही तर यापूर्वी पीठासीन अधिकाऱ्यांनी दिलेले जे निदेश आहेत त्यांना हरताळ फासण्याचे काम होईल. माननीय वित्त मंत्री म्हणतात की, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या सोयीनुसार एक जिल्हा "नोडेल" म्हणून ठरवावा आणि त्याबाबत नियोजन विभागाला कळवावे. महोदया, जर आम्ही नोडेल म्हणून नांदेड वा अन्य कोणत्या जिल्हयाचे नाव दिले आणि प्रोसिजर नुसार गेलो तर त्यामध्ये वेळ जाईल. जर एका जिल्हयात विकासासाठी पैसा आला आणि नंतर दुसऱ्या जिल्ह्याने ते पैसे पळविले तर अडचण होईल. उदा.आमदार निधीचे 80 लाख रुपये पुणे जिल्हयामध्ये आले आणि नंतर ते 15 जिह्यांत गेले तर प्रोसिजर कशी होईल याबाबत माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण वा खुलासा आपल्या उत्तराच्या भाषणात करावा,

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

नाहीतर यामध्ये सर्वांचाच कालापव्यय होणार आहे. तरी, या संदर्भात आपण स्पष्टीकरण दिले पाहिजे, असे मला खास करुन सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, तिसरा मुद्दा विधी व न्याय विभागासंदर्भात आहे. आस्थापनेवरील खर्च वाढविला आहे, ही चांगली गोष्ट आहे. मराठीतून न्यायदान व्हावे या दृष्टीकोनातून आपण कोणती तरतूद केली आहे ? मी हा विषय विशेष उल्लेखाद्वारे देखील मांडला होता. मी यावर अनेक वेळाला प्रश्न देखील विचारले आहेत. बऱ्याचशा ठिकाणी असलेले टंकलेखक हे मराठी भाषा न येणारे आहेत. लवकर लिहून घेऊ शकणारे दृत्गती टंकलेखकही शासनाकडे आहेत. ते टंकलेखक इंग्रजी भाषिक असल्यामुळे त्यांना मराठी यंत्रे वापरता येत नाहीत. त्यांना संगणकाचे ज्ञान नाही. असे केल्याने जुने टायपिस्ट बेकार होतील म्हणून टप्याटप्प्याने टायपिस्टच्या जागा भरल्या जात नाहीत, अशी आपली उत्तरे आम्ही बऱ्याच वेळा ऐकलेली आहेत. तरी, मराठी भाषेमध्ये न्यायदानासाठी शासनाने गती दिली पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 115 धर्मादाय आयुक्तांच्या संदर्भात आहे. धर्मादाय आयुक्तांच्या संदर्भात आपण कोणती व्यवस्था केलेली आहे ? धर्मादाय आयुक्तांकडे वेगवेगळ्या प्रकारचे कारभार आहेत. सभापती महोदय, सर्व धर्माच्या तीर्थक्षेत्रांकडे बऱ्यापैकी निधी असतो. तरी, त्या निधीच्या व्यवस्थापनासाठी धर्मादाय आयुक्तांकडे काही यंत्रणा आहे का ? कारण एका छोट्या कार्यालयाला हजारो संस्थांचा कारभार पहावा लागतो. ते एक पोस्ट ऑफिस झाल्यासारखे दिसत आहे. सभापती महोदय, ते जमेल त्याप्रमाणे हिशोब सबमीट करतात आणि फार मोठ्या तक्रारी आल्यातर त्यांची सुनावणी होते. धर्मादाय संस्थांना किमान काही माहिती देणे, पैशांच्या व्यवस्थापनासाठी काही मार्गदर्शन करणे अशाप्रकारचे कोणतेही काम धर्मादाय आयुक्तांकडून होत नाही. मुंबईमध्ये महालक्ष्मीचे मंदीर आहे. सर्व आमदार व मंत्री महत्वाची घटना घडल्यानंतर महालक्ष्मीच्या दर्शनासाठी जात असतात. सभापती महोदय, तेथील पुजारी आणि विश्वस्तांनी असे सांगितले की, त्यांना भाविकांच्या चप्पल ठेवण्यासाठी पायऱ्यांजवळ छोटा स्टॉल पाहिजे. परंतु धर्मादाय संस्था, महानगरपालिका यामुळे ती गोष्टसुध्दा मिळत नाही. त्यामध्ये त्यांना अनेक अडचणी येतात. तीथक्षेत्र, पर्यटन आणि धर्मादाय आयुक्त यांच्यामध्ये आपण कशाप्रकारे समन्वय साधू शकू हे पाहिले पाहिजे. माझ्या मते काही अधिकाऱ्यांवर खास जबाबदा-या टाकण्यात





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

आल्या तर यामध्ये समन्वय होऊ शकेल असे मला वाटते. त्याचप्रमाणे सभापती महोदय, वन विभागाच्या संदर्भात माझा एक मुद्दा आहे. पुण्याच्या दैनिक केसरीने त्यांच्या दैनिकामध्ये दिनांक 4, 5 व 6 मार्चला एक लेखमाला सातत्याने चालविली आहे. त्या संदर्भातील माहिती मी आपल्याला देते. मला या संदर्भात एक लक्षवेधी देखील लावावयाची आहे.

सभापती महोदय, महत्वाचा मुद्दा असा आहे की, तुम्ही बाब क्रमांक 32 मध्ये असे म्हटले आहे की, आमचे वन संरक्षक आणि यांसाठी निधीची तरतूद केलेली आहे. आपल्या ह्या वनसंरक्षकांनी वन संरक्षणाच्या नावाखाली हजारो शेतकऱ्यांना, आपली जमीन का घेऊ नये ? अशा नोटीसा दिल्या आहेत. नोटीसा दिल्यानंतर त्याचे उत्तर देण्यासाठी शेतकऱ्यांना वेळ द्यायला पाहिजे होता. नोटीसा दिल्या गेल्या नाहीत असे शेकडो शेतकऱ्यांचे मत आहे. सभापती महोदय, या लोकांमध्ये खातेफोड झालेली नसताना देखील, तुमची जमीन अमुक एका मर्यादेपेक्षा जास्त आहे की कमी आहे, असे विचारुन याबाबत त्यांचे म्हणणे न ऐकता वन विभागाने त्यांना या नोटीसेस दिलेल्या आहेत. माझ्या माहितीप्रमाणे, या संदर्भात पुण्याच्या वनपालांच्याकडून देखील चौकशी चाललेली आहे. या संदर्भात महसूल विभागाने देखील वन विभागाला विचारणा केलेली आहे. तरी या संदर्भात आपण पुण्याच्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करावी व दिलेल्या नोटीसांचा पुर्नविचार करुन, त्याची चौकशी करुन योग्य तो मार्ग काढावा, असे मला आपल्याला सुचवावेसे वाटते.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MHM/ MAP/ SBT/ KGS/ प्रथम श्री. कांबळे.. 18:55
डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, गेल्या वर्षभरामध्ये मी जवळ जवळ 100 नगरपालिका व काही महानगरपालिकांमध्ये आयुक्त, महापौर, स्थायी समितीचे सभापती यांची भेट घेऊन विचारले की, दलित वस्ती सुधारणेसाठी जो निधी आलेला आहे, त्या निधीतून दलित वस्ती सुधारणा झालेल्या आहेत काय ? हा निधी कोठे जातो आहे, त्याचे निकष काय आहेत हे समजून येत नाही. माझ्या माहिती प्रमाणे कोणत्याही शहरामध्ये दलित वस्ती सुधारणेसाठी निधी दिला गेलेला नाही म्हणून हा निधी कोठे देण्यात आला यासंदर्भातील लेखी उत्तर पटलावर ठेवण्यात यावे. हा निधी कोठे खर्च होतो याचा कधीही शोध लागत नाही. आता महाराष्ट्रामध्ये नगरपालिका व महानगरपालिकांची परिस्थिती अशी आहे की, आपण त्यांना जेवणाचे आवतन देता परंतु त्यांना जेवणच वाढीत नाही असा हा प्रकार आहे. या संस्थांना दलित वस्ती सुधारणेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत नाही, म्हणून दलित वस्त्यांतील सुधारणांसाठी पैसा देण्यात यावा.

आता मी बाब क्रमांक 65 वर बोलणार आहे. महाराष्ट्र नागरी मूलभूत सुविधा निधी उभारलेला आहे, अतिशय चांगली गोष्ट आपण केलेली आहे. हा निधी उपलब्ध करुन तो मोठया शहरांना लागू करणे अपेक्षित आहे. यासंदर्भात अंध, अपंगासाठी रस्त्यांच्या कडेला बार लावणे आवश्यक आहे. याबाबत शहरामध्ये सुविधा असावयास पाहिजे. परंतु यासंदर्भात कोणतीही अंमलबजावणी होत नाही. किमान स्वच्छतागृहांची सुविधा अनेक ठिकाणी करावयास पाहिजे, यासाठी पुरेसा पैसा दिला पाहिजे. महाराष्ट्र नागरी मूलभूत सुविधा निधी उभारला आहे, परंतु तो कोणत्या कारणांसाठी वापरला यासंदर्भातील तपशीलवार निवेदन द्यावयास पाहिजे. अशी माझी सूचना आहे. इतर देशातील मोठया शहरामध्ये पैसा देऊन कपडे धुऊन मिळतात, ते ड्राय करुन मिळतात अशा प्रकारच्या सुविधा मोठया शहरामध्ये अनेक ठिकाणी असतात, तशा प्रकारच्या सोई-सुविधा मूलभूत नागरी सेवेअंतर्गत आपल्याकडे करणे आवश्यक आहे. माझ्या माहिती प्रमाणे पिंपरी-चिंचवड येथील एका कार्यक्रमासाठी माननीय श्री. शरद पवार आले होते, त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, नागरीकरण खूप मोठया वेगाने होत आहे. मूलभूत सेवा-सुविधा जनतेपर्यंत पोहचल्या पाहिजेत, म्हणून याबाबत धोरण ठरवितांना व निधी खर्च करतांना सर्व राजकीय पक्षांचे प्रमुख व तज्ज्ञांची मते तसेच जनतेच्या गरजा विचारात घेऊन कार्यवाही होणे आवश्यक आहे. असे केले नाही तर हा निधी आला कोठे व गेला कोठे याचा शोघ घेण्याची आवश्यकता निर्माण होईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

-------

(2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्रमांक 6 पृष्ठ क्रमांक 7 सामान्य प्रशासन विभाग, राजर्षी शाहू महाराज व क्रांतिसिंह नाना पाटील यांचे स्मारक बांधण्यासाठी तरतूद केलेली आहे. उशीरा का होईना क्रांतिसिह नाना पाटील यांचे स्मारक उभे राहील याबाबत मी शासनाचे अभिनंदन करते. या स्मारकारसाठी जेवढया रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे त्यातून लगेच या स्मारकाच्या कामाला सुरुवात व्हावी याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे. मी परवा बा.सी.मर्ढेकर यांच्या स्मारकाविषयी विशेष उल्लेखाच्या निमित्ताने प्रश्न उपस्थित केला होता त्यासाठी सुध्दा मागील वर्षी 20 लाख रुपयांची तरतूद केली होती परंतु प्रत्यक्षात ती खर्च करण्यात आलेली नाही. यावर्षीच्या पुरवणी मागण्यामध्ये तरतूद दिसत नाही. यासंदर्भात परवाच सभापती महोदयांनी निर्देश दिले होते की, पुढील पुण्यतिथीला हा विषय उपस्थित करण्याचा प्रसंग येऊ नये या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी. यासंदर्भात मी मंत्री महोदयंना पत्र दिले होते त्याबातचा खुलासा सुध्दा उत्तरात करण्यात यावा.

आता मी बाब क्रमांक 11 पृष्ठ क्रमांक 8 वर बोलणार आहे. नव्याने निर्माण केलेल्या हिंगोली व गोंदिया या जिल्हयामध्ये माहिती कार्यालय स्थापन करण्यासंदर्भात 8 नवीन पदे निर्माण केलेली आहेत, यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. नवीन जिल्हयासाठी ही आवश्यकता आहे, परंतु जुन्या जिल्हयामध्ये विशेषत: आम्ही अमरावती व रायगड या ठिकाणची परिस्थिती पाहिली आहे तेथे प्रशासनातील बरीच पदे रिक्त आहेत. अमरावती जिल्हयातील 6 तालुक्यामध्ये बीडीओच्या जागा रिक्त आहेत. तर या ठिकाणी प्रशासकीय कारभार कसा चालेल म्हणून याकडे सुध्दा शासनाने लक्ष द्यावे.

यानंतर बाब क्रमांक 68 पृष्ठ क्रमांक 53 - महिला क्रांती वस्त्रप्रावरणे प्रशिक्षण यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे, या गोष्टीचा चांगला लाभ होणार आहे.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ SBT/ KGS/ MAP/ MHM/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 19:00

श्रीमती कांता नलावडे ...

सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी सांगितल्याप्रमाणे महिलांना प्रशिक्षण दिल्यानंतर जे उत्पादन तयार केले जाईल, त्याला बाजारपेठ मिळण्याची आवश्यकता आहे, अन्यथा ख-या अर्थाने महिला सक्षम होऊ शकणार नाहीत. याबाबत शासनाने लक्ष देण्याची आावश्यकता आहे.

बाब क्रमांक 69, पान क्र. 53, नगरविकास विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, वाई हे एक ऐतिहासिक शहर आहे. या शहराला सांस्कृतिक वारसा आहे. वाई शहराच्या जवळच पाचगणी तसेच महाबळेश्वरसारखी पर्यटन स्थळे आहेत, या ठिकाणी अनेक पर्यटक येत असतात. मधल्या वेळेत पर्यटकांचे मनोरंजन होण्यासाठी वाई शहरात चित्रपटगृह बांधण्यासाठी तरतूद करण्यात आली याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते.

बाब क्रमांक 71, पान क्र. 54, नगरविकास विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, नागरी स्थानिक संस्थांना दलित वस्तींमध्ये सुविधा पुरविण्यासाठी निधी देण्यात येणार आहे. परंतु हा निधी दिल्यानंतर दलित वस्त्यांमध्ये सुधारणा होणार आहेत काय, त्यांना सुविधा पुरवल्या जाणार आहेत काय, हा महत्वाचा प्रश्न आहे. या ठिकाणी मुंबई उपनगराचे माननीय पालकमंत्री बसलेले आहेत. मुंबईत दलित वस्तींमध्ये सुविधा देण्यासाठी काही रक्कम देण्यात आली होती, मी चेंबूरला राहते, त्या ठिकाणी असलेल्या दलित वस्तीमध्ये मी जात असते. त्या ठिकाणी फक्त कोबा टाकलेला दिसतो, पाण्याची व्यवस्था किंवा गटारीचे कामे झालेली दिसत नाहीत. याबाबत शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 42, पान क्र. 34, कृषिविकास विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, आर्थिकदृष्टया कमकूवत असलेल्या शेतक-यांना अर्थसहाय्य देण्याबाबत विशेष पॅकेज आहे, ही चांगली गोष्ट आहे. परंतु यासाठी कोणते निकष लावण्यात आलेले आहेत हे महत्वाचे आहे. ज्यावेळी आम्ही ग्रामीण भागामध्ये फिरतो त्यावेळी आम्हाला अनेक जिल्यांमध्ये चूकीचा सर्व्हे झाल्याचे दिसून आले. ब-याच ठिकाणी झालेल्या सर्व्हेमध्ये दारिद्रय रेषेखालील लोकांचा समावेश होणे गरजेचे असताना सुध्दा, जे लोक दारिद्रय रेषेखाली येत नाहीत, अशा लोकांचा दारिद्रय रेषेखालील यादीमध्ये समावेश झालेला आहे. याबाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ SBT/ KGS/ MAP/ MHM/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 19:00

श्रीमती कांता नलावडे ...

बाब क्रमांक 46, पान क्र. 35, पशुसंवर्धन विकास विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, पशू रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. परंतु या संदर्भात जी माणसे काम करीत असतात त्यांच्या आरोग्यावर काही परिणाम होत असतो. याबाबत सुध्दा शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 134, पान क्र. 112, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, पंचायती राज सस्थांना बक्षिसांचे वितरण करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. चांगले काम करण्याची प्रेरणा देण्यासाठी ही अतिशय चांगली बाब आहे. परंतु अनेक ठिकाणी कागदी घोडे नाचवले जातात, छोटया मोठया गोष्टींमध्ये भ्रष्टाचार होत असतो. यामुळे गोरगरीब जनता भरडली जाते ही वस्तुस्थिती आहे. अशा ठिकाणी कार्यरत असलेले प्रशासकीय अधिकारी किंवा प्रतिनिधींवर कडक कारवाई होण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 135, पान क्र. 112, ग्रामविकास विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, प्रत्येक गावाचा विकास होण्याच्या दृष्टीने यशवंत ग्रामसमृध्दी योजना ही अतिशय चांगली योजना आहे. पंरतु काही गावांमध्ये लोकवर्गणी जमा होत नाही. लोकवर्गणीशिवाय ही योजना पूर्ण होऊ शकत नाही. 10 टक्के लोकवर्गणी जमा होणे आवश्यक असते. याबाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 55, पान क्र. 46, शालेय शिक्षण विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, या ठिकाणी दुपारच्या आहारासाठी जास्त तरतूद करण्यात आली आहे. याचा काही ठिकाणी चांगला परिणाम दिसून येतो, काही ठिकाणी भ्रष्टाचार होतो. खिचडीमध्ये फक्त हळद टाकून पिवळा रंग आला म्हणजे खिचडी होत नाही. प्रत्यक्षात त्या ठिकाणी डाळ नसते, फक्त हळद असते. याबाबत शासनाने विचार केला पाहिजे.

बाब क्रमांक 56, पान क्र. 46, शालेय शिक्षण विभागाच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत वस्ती शाळेतील शिक्षकांना वाढीव मानधन देण्यासाठी तरतूद केलेली आहे. तेथे असलेल्या शिक्षकांना आवश्यक त्या सोयी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नलावडे ...

सभापती महोदया, त्यानंतर पृष्ठ क्र.47 वरील बाब क्रमांक 57 - सातारा सैनिक शाळा यासाठी सहाय्यक अनुदान आपण दिलेले आहे. खरोखरी ही एक चांगली, उत्कृष्ट अशी सैनिकी शिक्षण देणारी शाळा आहे तिला आपण सहाय्यक अनुदान दिले आहे त्याबद्दल अभिनंदन.

त्यानंतर पृष्ठ 152 वरील बाब क्र.170 - अंगणवाडीतील मुलांना द्रवरूप प्रथिने पुरविण्यासाठी ही पूरक मागणी केलेली आहे. या बाबतीत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारल्याप्रमाणेच मी देखील विचारू इच्छिते की, द्रवरूप प्रथिने म्हणजे नेमकी कोणत्या प्रकारची प्रथिने आहेत आणि ती कोणत्या कंपनीची आहेत याचे स्पष्टीकरण आपण केले तर बरे होईल.

त्यानंतर पृष्ठ क्रमांक 24 वरील बाब क्र.30 - यामध्ये मांढरादेवी यात्रेतील चेंगराचेंगरीमध्ये झ ालेल्या नुकसानी मध्ये बाधित व्यक्तींना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत केली आहे म्हणून सांगितले आहे. परंतु तेथील तहसिलदारांनी सांगितले आहे की, हा निधी आम्हाला मिळालेला नाही. तसेच तेथील दुकानदारांच्या ज्या जागा होत्या त्याही भुईभाड्याच्या जागा होत्या. त्यांना त्या अपघातामध्ये जे नुकसान आले आहे त्याबद्दल तेथील ट्रस्टने प्रत्येक दुकानदाराला 5 हजार रूपये दिले आहेत तेवढेच पैसे मिळाले आहेत. बाकी जे त्यांचे डिपॉझिटचे पैसे आहेत ते परत त्यांना मिळाले आहेत तेवढेच. बाकी कोणत्याही प्रकारची मदत त्यांना मिळालेली नाही. तसेच जे बाहेरगावचे दुकानदार आहेत त्यांनाही कोणत्याही प्रकारची रक्कम मिळालेली नाही. दुसरे असे की, ज्यांच्या कुटुंबातील व्यक्ती मृत झालेल्या आहेत त्यांनाही पूर्णपणे मदत मिळालेली नाही. ज्यांची विमा पॉलिसी होती त्यांना त्यातून रक्कम मिळाली आहे त्या व्यतिरिक्त कोठलीही मदत मिळालेली नाही तसेच शेतकरी कुटुंबांना देखील आर्थिक सहाय्य कोठल्याही प्रकारे मिळाले नाही असे आम्हाला तेथे सांगण्यात आलेले आहे. या शिवाय डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तेथे दोन टाक्या आपल्या निधीतून दिल्या आहेत बाकी कोणतीही सुविधा तेथे दिली गेलेली नाही. सभापती महोदया, त्या अपघाताची चौकशी करण्यासाठी कोचर आयोग नेमला आहे. पण अजून त्याचा अहवाल आलेला नाही. खरे म्हणजे इतके दिवस त्यासाठी लागण्याची गरज नाही. तेथील एक गुरव नावाचा जो साक्षीदार आहे त्याने तर अगोदर शासनाच्या विरूद्ध ॲफिडेविट दिले होते पण पोलिसांच्या

..... 3ओ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दबावामुळे त्याने ते मागे घेतले आहे. म्हणजे अशा प्रकारे दबाव जर तेथे असेल तर या कोचर आयोगाच्या चौकशीमध्ये तरी काय होणार आहे याबद्दल शंकाच आहे.

सभापती महोदया, त्यानंतर महिला व बाल कल्याण विभागाची बाब क्रमांक 200, पृष्ठ क्रमांक 181 या विषयी मला बोलावयाचे आहे. ...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, महिला व बाल कल्याण विभागाच्या पूरक मागण्या आज चर्चेसाठी नाहीत., त्या उद्या चर्चेसाठी आहेत. ...

श्रीमती कांता नलावडे : ठीक आहे. मी उद्या त्यावर चर्चा करीन. तरी आता आपण मला दिलेल्या वेळे बद्दल धन्यवाद.

तालिका सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अवचट हे बोलतील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, 2005-06 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेताना प्रथमत: सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 6, पृष्ठ 5 यावर मी बोलू इच्छितो. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मारकाचे बांधकाम करण्यासाठीच्या खर्चासाठीही ही बाब आहे. यासाठी मी धन्यवाद देत असतानाच एक व्यथा मला यथे मांडावयाची आहे. भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांचे स्मारक करण्यासाठी त्यांच्या गागोदे या गावी 1992 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुधाकरराव नाईक यांनी भूमीपूजन केले होते. त्याचवेळी मुख्यमंत्र्यांच्या सचिवांच्या दालनामध्ये या स्मारकाची रूपरेखा ठरविण्यात आली. त्याप्रमाणे नकाशे-आराखडे देखील तयार झाले. पण त्यानंतर त्याबाबतीत काहीही झाले नाही आणि आज जवळ जवळ 12 वर्षे झाले तीन वेळा त्या स्मारकाचे भूमिपूजन झाले. पण खेदाने सांगावेसे वाटते की, आजपर्यंत त्या स्मारकाची एक वीट देखील तेथे लागलेली नाही. अशा प्रकारे शासनास तेथे स्मारक करण्याची इच्छा नसेल तर निदान भूमिपूजन तरी करू नये. गेल्या 12 वर्षांमध्ये तीन वेळा मुख्यमंत्र्यांनी तेथे भूमिपूजन केले असेल आणि तरीही स्मारक होत नसेल तर त्याबद्दल काय म्हणावे ? तेव्हा जेथे अर्थसंकल्पापूर्वी भूमीपूजन झालेले आहे तेथे वर्षभरामध्ये स्मारकाचे उद्‌घाटन व्हावे अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो.

त्यानंतर नगरविकास विभागाची बाब क्रमांक 66, पृष्ठ क्र.53 रस्स्त्यांची सुधारणा करण्यासाठी सहाय्यक अनुदान म्हणून 37 कोटी 71 लाख 76 हजाराची मागणी केलेली आहे. या ठिकाणी याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांना धन्यवाद देईन. हवाळी अधिवेशनामध्ये संभाजी नगर महापालिकेचा अनुशेष राहिला होता तो दिला होता. परंतु अनुशेष दिला होता तो सगळाच्या सगळा महापालिकेला न मिळता परस्पर एमएसआरडीसीला वर्ग केलेला आहे. त्यांच्या महापौरांचे पत्र माझ्याकडे आहे. त्यांची 34 कोटी 64 लाखाची थकबाकी आहे. ...

( यानंतर श्री.सरफरे .... 3पी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट...

आणि 2001 ते 2005 पर्यंत दरवर्षी 5 कोटी रुपये देण्याचे मान्य केले होते. परंतु या 25 कोटी रुपये अनुदानापैकी फक्त 3 कोटी रुपये 5 वर्षाच्या काळात संभाजीनगर महानगरपालिकेला रस्त्यांसाठी दिले. म्हणून माझी विनंती आहे की, आपण ज्याप्रमाणे हिवाळी अधिवेशनामध्ये संभाजीनगर महानगरपालिकेला न्याय दिला त्याप्रमाणे या पूरक मागण्याच्या निमित्ताने संभाजीनगर महानगरपालिकेला न्याय द्यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदया, गृहनिर्माण विभागाच्या बाब क्र 160 व पृष्ठ क्र. 135 मध्ये "वाल्मिकी आंबेडकर आवास योजना (विशेष घटक योजना) याकरीता 47 कोटी 30लाख 96 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद भारत सरकारने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार 50:50 या हिश्यांच्या आधारे योजना राबविण्याकरीता करण्यात आली आहे. सद्या ही योजना बंद झ ाली असली तरी केद्र सरकारचे प्रत्येक वेळी अनुदान येते त्यामध्ये शासनाने सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र सरकारचा 50 टक्के हिस्सा म्हाडाच्या माध्यमातून दिला जाणार आहे. तसे असेल तर वाल्मिकी आंबेडकर योजनेकरीता राज्य सरकारच्या वतीने म्हाडाने निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तो पुरेसा निधी न दिल्यामुळे वाल्मिकी आंबेडकर योजना गेल्या दोन वर्षाच्या काळात खरोखर यशस्वी झाली काय याबाबत मंत्रिमहोदयांनी स्पष्टीकरण करावे.

सभापती महोदया, नियोजन विभागाच्या पृष्ठ क्र. 131 वरील बाब क्र. 159 मध्ये विधीमंडळ सदस्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमासाठी 12 कोटी 36 लाख 39 हजार रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या सहा महिन्याच्या काळात मुंबई शहरामध्ये लोकसभेपासून महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीमुळे प्रत्येक वेळी आचारसंहिता आडवी आली. मुंबईतील आमदारांनी मंत्रालयापासून प्रत्येक शासकीय कार्यालयांमध्ये कामे करण्यासाठी पत्रे दिली. परंतु जोपर्यंत आचारसंहिता संपुष्टात येत नाही तोपर्यंत त्यांच्या पत्रांना उत्तर देता येत नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे आमदारांसाठी असलेल्या स्थानिक विकास कार्यक्रमासाठी असलेला निधी 31 मार्च अखेर आपण लॅप्स करु नये अशी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात बोलतांना खिचडीसंबंधी विषय निघाला त्यावेळी माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ हे हसले, त्यांना मी दोष देत नाही. राज्यकर्त्यांना आईच्या भूमिकेतून जावे लागते. आई जशी आपल्या मुलाचे संगोपन डोळयात तेल घालून करते, तसे आपल्याला करावे लागते. आपण हसू नका. आपण आपल्या घरातील मुलांना देत आहोत असे समजा. आपण ज्यावेळी हा खर्च सार्वजनिक जीवनामध्ये जनतेच्या हितासाठी करतो. त्यावेळी जनतेच्या ताटामध्ये, खिशामध्ये त्यांच्या पोटामध्ये काही जाते की नाही हे आपण बघितले पाहिजे. तुम्ही हसण्यावारी घेऊ नका. तुमचे मन संवेदनशील, ब्लॉटींग पेपरसारखे असले पाहिजे. या सभागृहामध्ये जनतेच्या प्रतिनिधींनी मांडलेले प्रश्न आपण लिहून घेतले पाहिजेत.

सभापती महोदया, मी याठिकाणी नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 65 संबंधी माझे विचार मांडणार आहे. या मागणीमध्ये म्हटले आहे की, "नागरी क्षेत्रात मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी साधनसामुग्री उपलब्ध नाही हे त्याचे केवळ एकमेव कारण नाही तर, स्थानिक संस्था प्रशासनाकडे, त्यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ, तज्ञ व्यक्ती, भांडवली बाजारातून आणि वित्तीय संस्थांकडून पैसा उभा करण्याची क्षमता उपलब्ध नाही". म्हणून आम्ही मुंबई महानगर विकास प्राधिकरणाला 25 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले होते. यावेळी त्यांना अतिरिक्त 26 कोटी रुपये दिले पाहिजेत यासाठी ही मागणी केली आहे. मुंबई महानगर विकास प्राधिकरण चांगले काम करीत आहे.मुंबई महानगर विकास प्राधिकरण ही तुम्ही निर्माण केलेली स्वायत्त संस्था आहे. ग्रामपंचायतींनी आपला कारभार स्वतंत्रपणे करावा याकरीता कै. राजीव गांधी यांनी 74 व्या घटना दुरुस्तीन्वये ग्रामपंचायतींना स्वायत्तता दिली. परंतु आपण या ठिकाणी मुंबई महानगरपालिकेचे अधिकार काढून घेतले. त्यांचेकडून रस्ता रुंदीकरणाचे काम चांगल्या प्रकारे `चालले आहे. परंतु त्याचबरोबर पश्चिम उपनगरामध्ये छोटे छोटे बायपास रस्ते होत आहेत त्याठिकाणी झोपडया उभ्या रहात आहेत. आणि म्हणून मुंबईच्या जनतेला कोटयवधी रुपयांचा निधी उपलबध करुन देतांना त्यामधून लोकांना नागरी सुख सुविधा नीट मिळाल्या पाहिजेत. आज मुंबई शहरामध्ये येणाऱ्या लोंढयांना प्रतिबंध करण्यासाठी आपण कायदा करा. घटनेने त्यांना अधिकार दिले ठीक आहे. परंतु घटनेच्या चौकटीमध्ये राहून जर ते अधिकार माणसाच्या मूळावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

येत असतील, आणि एका घटकाला दिलेले अधिकार दुसऱ्या घटकाचे नागरी जीवन उध्वस्त करणार असतील तर त्याचा विचार केला पाहिजे की नाही?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु...

हा जो ज□व्हे□स डीड करण्याच्याबाबतीत 1963 साली जायदा झालेला आहे. कन्व्हेन्स डीड करताना बिल्डर त्या ठिजाजी त्रास देतात. यामुळे तेथील लोकांना पाणी मिळण्यामध्ये अडचण येते. कन्व्हेन्स झालेले नाही, प्रॉपर्टी टॅक्स भरला नाही म्हणून पाणी मिळू शकत नाही. या संबंधीचा मागच्या अधिवेश□मध्ये जायदा आजला. विधा□परिषदेमध्ये तो मंजुसाठी आल्या□तर बोलणे लवजर संपवा, लवजर बोलजे संपवा असे सांगून घाईघाईने विधेयक मंजूर केले. ज□ीच्या जिव्हाळ्याचे प्रश□ आहेत. आज जृह□र्माज संस्थांचे ज□व्हे□स □ झाल्यामुळे अ□ेज अडचजीं□ लोकांना तोंड द्यावे लागत आहे. माझी आग्रहाची वि□ंती आहे जी, ज□व्हे□स जरजे आवश्यज आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब क्रमांज 133 बाबत मी बोलणार आहे. या बाबीचा उल्लेज माझे मित्र, स□मा□ीय सदस्य श्री.विलास अवचट या□ 'वाल्मिजी आवास योज□'संबंधाने केला. स□मा□ीय सदस्य श्री.विलास अवचट सांजतात जी, जृह□र्माजाचा प्रश□ उपस्थित झाला जी, त्याजडे लाईटली पाहिले जाते, तो प्रश□ वाऱ्यावर सोडला जातो. त्यामुळे आमच्यात एज प्रजारची उदासि□ता येते जी, आपज या विभाजाचे प्रश□ मांडावेत जी □ाही ? मुबई महा□जरपालिजे□ जेल्या वर्षीची 72 जोटी रुपये मॅचिंज ग्रॅ□ट दिली पाहिजे. हे म्हाडा जायद्याप्रमाणे तुमच्यावर बंध□ आहे. परंतु 72 जोटी रुपयापैजी तुम्ही फक्त 25 जोटी रुपये दिलेले आहेत. सेसच्या बिल्डिजमध्ये रहाजारा भाडेजरु हा हायजोर्टामध्ये जाऊ□ त्यानी जनहित याचिका केली तर तुम्ही अडचजीमध्ये याल. कायद्याप्रमाणे मुंबई महा□जरपालिजा ही म्हाडाचा एज पैसा देजील ठेवू शजत □ाही. त्याचबरोबर मुंबई महा□जरपालिजा जोजत्या □ियमाच्या आधारे पैसे घेतात ? सभापती महोदया, इतर ठिजाजी जृह□र्माज जात्याच्या वसाहती आहेत. त्या ठिजाजचे पाण्याचे बील द्या, मज आम्ही उपकरापोटी जोळा जेलेले आहेत तुम्हाला देऊ. पज तुम्ही हे जायद्या□ जरु शजत □ाही. उपजरापोटी 1 रुपाया जोळा होता त्यातील 90 पैसे भाडेजरुचे असतात आजि 10 पैसे लॅ□डलॉर्डचे असतात. शास□ाचा एजही पैसा यामध्ये □ाही. माझे म्हणणे असे आहे की, महा□जरपालिजा हे पैसे ठेवू शजत □ाही.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडू□ माझे बोलजे संपविजार आहे. जारज विस्तृत चर्चा ही अर्थसंजल्पावर होईल, त्यावेळेला हा मुद्दा आम्ही मांडू. बाब क्रमांज 114 आणि 115 विधी व □्याय विभाज, या बाबीवर अनेकवेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. परंतु ती चर्चा लाईटली घेतलेली आहे. ही बाब धर्मादाय आयुक्तांच्या संबंधात आहे. मुंबईमध्ये विविध रुज्जलये आहेत. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु.....

विषयाच्या संबंधात आम्ही बोलून ंटाळजार □ही. प्रश□ मांडू□ तो धसास लावजार आहोत. जसलोज रुजालय, भाटिया रुजालय, ब्रीच ॅ□ी रुज्जालय, लिलावती रुज्जालय, जै□ रुग्णालय, रहेजा ंरुग्णालय, बांद्रा, हरजिस□दास रुग्णालय, हिंदुजा रुग्णालय, □□वटी रुग्णालय यांच्याबाबतीत अनेक वेळा चर्चा झाली. त्याबाबतीत आपज ायदा ेला, मिट्या ेल्या. दो□ महि□यापूर्वी धर्मादाय आयुक्तां□ पहाजी ेली असता, या सज्ळयां□ सांजितलेले आहे ी, आम्ही तुमचे काही ऐकणार नाही, तुमची बंधने पाळजार □ही. राज्य तुमचे आहे ी त्यांचे आहे ? ते तुमचे ाहीही ऐे त □हीत. म्हजू□ मला असे वाटते ी, यांच्या विरोधात अतिशय ठोर ारवाई रजे आवश्य आहे. या रुज्जालयांपैी अ□ रुज्जालयांना काही गोष्टींची बंधने घातलेली आहेत. 10 ते 15 टक्के गरीब लोकांसाठी ओपीडी केली पाहिजे. त्या संबंधात 10-20 लोांची मिटी ेली. राज्य हे मिटी रज्यामध्येच जाजार, लोांचे प्रश□ सोडविज्यामध्ये जाजार □ही. मिटी रज्याचे काय ारज आहे ? त्यासाठी मंत्री □मिलेले आहेत, सेक्रेटरी आहेत, अ□ प्रारचे अधिारी आहेत. मी ती□ जोष्टी लजात आजू□ दिलेल्या आहेत. ए म्हजजे ज्ञूह□र्माज जात्यामधील ोजतीही ॅ□ शास□ स्वत:डे ठेवू श त □ही. मध्यंतरी मा□□य मुज्यमत्र्यां□ जाहीर ेलेले आहे ी, पुढच्या पाच वर्षात आम्ही 10 हजार घरे बांधजार आहोत. त्यासाठी प्रत्ये वर्षी 300 ोटी रुपये जर्च रजार आहोत. या 300 ोटी रुपयापैी 200 ोटी आमचेच आहेत, मज तुम्ही ाय देजार आहात ? ते पैसे तुम्ही ठेवले आजि हेड बदलू□ ते दुसरीडे वळते ेले तर ते बोयदेशीर ठरेल. तसे मुंबई महा□रपालिेला सांजावे. माझी □रविास राज्यमंत्र्यां□ वि□ी आहे ी, कनव्हेन्सबाबत ठोरपजे पावले उचलली पाहिजेत. बिल्डर 2.5 एफएसआय घेतात, त्यातील ाही एफ.एस.आय. युटीलाईज रतात.

यान्नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

बाकीचा एफएसआय ते ठेवतात आणि कन्व्हेयंस करीत नाही. लोकांकडे अधिकार देत नाहीत. त्यामुळे लोकांना पाणी मिळत नाही. लोकांना 187 टक्के कर द्यावा लागतो. कन्व्हेयंस न झाल्यामुळे, एन.ओ.सी. न घेतल्यामुळे लोकांना 187 टक्के कर द्यावा लागतो. मुंबईमध्ये सर्वसामान्य माणसे राहतात. एक तर मुंबईसाठी बजेटमध्ये एक पैशाचीही तरतूद केलेली नाही. त्याबाबत अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी बोलू. आपण लवकरात लवकर बिल आणावे. रुग्णालयांसंबंधी सुध्दा अतिशय गंभीरपणे कारवाई करावी. शेवटी राज्यकर्ता हा अतिशय महत्वाचा आहे. तो प्रबळ झाला पाहिजे. तो शक्तीमान आहे असा संदेश जनतेपर्यन्त आणि संबंधित लोकांपर्यंत गेला पाहिजे. या ठिकाणी नुसते ठराव पास करुन आणि भाषणे करुन काही होणार नाही. या ठिकाणी जे ठराव पास होतील ते भान ठेऊन पास करु आणि भान भेऊन ते मंजूर होतील. पण त्याची अंमलबजावणी बेभान होऊन केली पाहिजे. तुम्ही मात्र बेभान होऊन लोकांना आश्वासने देता आणि अंमलबजावणी करताना मात्र हे करु की नको असे भान ठेऊन अंमलबजावणी करता. सभापती महोदय, मी दोनतीन गोष्टी या ठिकाणी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. त्याबाबत शासनाने विचार करावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 2 च्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार बोलले. त्यासंदर्भात मी एकच वाक्य सांगणार आहे. हे आमच्या माथी का मारता ? कोणाची तरी महत्वाकांक्षा, कोणाचा तरी मोह, कोणाची तरी माया यासाठी निवडणुका होतात आणि त्यातून सर्वसामान्य जनतेवर भूर्दन्ड बसतो. यासाठी 2 कोटी 77 लाख 50 हजार रुपयांचा निधी द्यावा लागला. यादृष्टीने ड्रास्टीक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. जे कोणी राजीनामा देतील त्यांना राजीनामा देऊ द्यावा परंतु त्यानंतर त्यांना निवडणूक लढविता येणार नाही हा पहिला क्लॉज असला पाहिजे. ज्या पक्षातून ते निवडून आले होते त्या पक्षाच्या प्रमुखाला त्या ठिकाणी नॉमिनेट करण्याचा अधिकार दिला तर त्या पक्षाची संख्या तीच राहील आणि फाटाफुटीचे प्रकार थांबतील. सरकारने याबाबतीत भविष्यामध्ये पावले उचलली पाहिजेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 65 च्या संदर्भात बरेच सन्माननीय सदस्य बोलले. आपण यामध्ये नागरी मूलभूत सुविधांच्या संदर्भात 26 कोटी 30 लाख रुपयांची तरतूद केली आहे. नागरीकरण किती झपाट्याने होत आहे याची माहिती महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये आलेली आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, महाराष्ट्रामध्ये 1991 ते 2001 या कालावधीत राज्याबाहेरुन आलेल्या स्थलांतरितांची संख्या 32.80 लाख इतकी जास्त होती. त्यातील एक वैशिष्ट्य असे की 1991 ते 2000 या कालावधीत बृहन्मुंबईमध्ये राज्याबाहेरुन आलेल्या स्थलांतरितांची संख्या 11.10 लाख होती आणि तिचे प्रमाण बृहन्मुंबईच्या निव्वळ भर पडलेल्या लोकसंख्यमध्ये 54.8 टक्के होते. ही अतिशय भयावह परिस्थिती आहे. याचा अर्थ असा की, जर 22 लाख लोक आले असतील तर 11 लाख लोक बाहेरचे आले. एवढे लोक या ठिकाणी आले याचा अर्थ आपण त्यांना सुविधा देत आहात. या नागरीकरणाचा विचार केला तर छोटी छोटी शहरे सुध्दा प्रचड प्रमाणावर विकसित व्हावयास लागली आहेत. त्या ठिकाणी सुध्दा बाहेरचे लोक स्थलांतरित होऊन आलेले आहेत. म्हणून छोट्या शहरांच्या बाबतीत सुध्दा शासनाने विचार करावा आणि त्या ठिकाणी सुध्दा नागरी सुविधा द्याव्यात. त्या ठिकाणी मलनि:स्सारण, पाणीपुरवठा, , गटारे याची व्यवस्था झाली नाही तर त्या ठिकाणी पुन्हा नवीन रोगराई पसरेल. त्या ठिकाणी कशा प्रकारे निधी देणार आहात याचे डिटेल्स द्यावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेकरिता 27 कोटी 99 लाख रुपयांची पुरवणी मागणी केली आहे. आताच सोलापूरमध्ये रोजगार हमी योजनेमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचे प्रकरण आपल्याला माहीत आहे. त्या ठिकाणी कोण पैसे खातो ? कंत्राटदार कसे पैसे खातात ? चुकीचे मस्टर कसे लावले जातात ? हे सगळे आपल्याला माहीत आहे. या रोजगार हमी योजनेमध्ये भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. रोजगार हमी योजनेमध्ये सगळ्यात जास्त कामे रस्त्यांची असतात. रस्त्यांची कामे करणारा विशिष्ट वर्ग आहे. विशिष्ट समाज ते काम करीत असतो. ज्यांच्यासाठी ही रोजगार हमी योजना राबवितो त्यांना त्याचा लाभ काहीच मिळत नाही असा माझा दावा आहे. परवा सुध्दा ठाणे जिल्ह्यातील मोखाडा, शहापूर, जव्हार येथील रस्त्याचे प्रकरण आले.

श्री. हसन मुश्रीफ : आज रोजगार हमी योजनेच्या मागण्या चर्चेसाठी नाहीत.

( सभापतीस्थानी मा. उपसभापती )

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : आजच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये वित्त व नियोजन विभाग आहे. त्यामध्ये रोजगार हमी योजनेच्या संदभार्तील बाब आहे. बाब क्रमांक 84 मध्ये एकात्मिक रस्त्यांच्या संदर्भात मागणी केलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी 2001 साली 161 कोटी 80 लाख रुपये संभाजीनगरला रस्त्यांसाठी वितरित केले. संभाजीनगरमधील अमूकअमूक रस्ते होतील अशी घोषणा त्यांनी केली. सभापती महोदय, मला सांगायला अत्यंत खेद होतो की, 2001 ते 2006 सालापर्यन्त फक्त 22 कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम खात्याला दिले गेंले. यासंदर्भात आम्ही एमएसएसआरडीसीच्या अधिका-यांना बोलावले, नगरविकास विभागाच्या सचिवांना देखील बोलावले. त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी 2001मध्ये केलेल्या 161 कोटी 80 लाख रु.च्या घोषणे बाबत विचारणा केली. नगरविकास खात्याने आमची चूक झाली,या वर्षी आम्ही 25 कोटी रु. वितरित करणार आहोत, असे सांगितले. या ठिकाणी देखील आपला बॅकलॉग आहे. या 161 कोटी 80 लाख रु.चे आपण काय करणार आहात ते आम्हाला सांगावे. देवगड तालुकयामधील पोखरगाव ते खराडा हा अनेक वस्त्यांना जोडणारा रस्ता नाबार्ड अंतर्गत मंजूर झालेला आहे. या रस्त्यासाठी दरवर्षी तुटपुंजी तरतूद केली जात असल्यामुळे हा रस्ता होत नाही. माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, त्यांनी व्यक्तिश: यामध्ये लक्ष घालून हा रस्ता करावा. तसेच औरंगाबादच्या बाबतीतदेखील माननीय मंत्री महोदयांनी जाणीवपूर्वक लक्ष घालून तेथील औरंगजेबी कारभार पहावा.

बाब क्रमांक 102अंतर्गत धरणाच्या संदर्भात तरतूद केलेली आहे. परंतु कोकणासाठी एका नया पैशाची सुध्दा तरतूद केलेली नाही.कोकणाच्या तोंडाला पाने पुसलेली आहेत. कोकणातील महमदवाडी धरणासाठी एका पैशाचीही तरतूद नाही. कित्येक वर्षे ते धरण पडून आहे. तेव्हा कोकणासाठी आपण काय तरतूद केलेली आहे ते मंत्री महोदयांनी आम्हाला सांगावे.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 135 अंतर्गत 101 ते 250 हेक्टर सिंचन क्षमतेच्या पाटबंधारे योजनांचे सर्वेक्षण यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी याठिकणी मागणी करीत आहे की, कोकणातील कणकवली तालुक्यातील कुंभवडे या गावातून मल्हारी नदी वाहते. ते गाव सह्याद्रीच्या कुशित वसलेले आहे.पावसाळ्यामध्ये त्याठिकाणी 8-8 धबधबे कोसळत असतात परंतु मे महिन्यामध्ये त्या गावाला पिण्यासाठी पाणी नसते. बाब क्रमांक 141 मध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत ....)

स्टेटपूल योजनेंतर्गत लहान पाटबंधारे योजनांसाठी मागणी केलेली आहे. ही योजना आपण त्याठिकाणी राबवावी. कोल्हापूर बंधा-यासाठी  बाब क्रमांक 140 मध्ये मागणी केलेली आहे. मी मागील वेळेस नामनियुक्त असल्यामुळे मला कोठेही आमदार निधीतील पैसा खर्च करण्यासाठी देता येत होता. त्यामुळे कोकणातील माझ्याच गावातील छोट्या धरणासाठी मी 10 लाख रु. दिले. कोकणातील कोल्हापूर बंधारे अतिशय छोटे आहेत. अन्य ठिकाणचे कोल्हापूर बंधारे पाहिले तर डोळे विस्फारले जातात. 155 लाख हेक्टर सिंचन क्षमता असलेले बंधारे अन्य भागात आहेत. या कोल्हापूर बंधा-यांच्याबाबतीतील निकष बदलण्याची आवश्यकता आहे हे मी माननीय मंत्री महोदयांना नेहमीच सांगत असतो. मागे मी कुंभवडे प्रोजेक्ट बाबत विचारणा केली होती. त्यावेळी 250 हेक्टर सलग जमीन नाही म्हणून देता येणार नाही असे मला सांगण्यात आले. कोकणातील जमीन ही डोंगर-उताराची असते. वरुन खाली पाय-या, पाय-याप्रमाणे जमिनीला उतार असतो. जमिनी सलग नाहीत. एक तुकडा अरविंद सावंत यांचा, तर दुसरा तुकडा विलास अवचट यांचा तर तिसरा तुकडा मधुकर चव्हाण यांचा असतो. त्यामुळे अशा जमिनीवर सिंचनाचा लाभ घेणे कठीण होऊन जाते. जमीन डोंगर उताराची असल्यामुळे खाली पायथ्याशी पाणी साठले तर निदान पिण्यासाठी पाणी मिळू शकेल. एप्रिल, मे महिन्यामध्ये जी दुरावस्था असते ती संपेल. म्हणून मी माझ या आमदार निधीतून त्याठिकाणी बंधारा बांधला. तो बंधारा थोडा नादुरस्त झाल्यानंतर तो दुरुस्त करण्यासाठी मी पत्र दिले. ते पत्र दिल्यानंतर मला पहिल्यांदा "आम्ही एस्टिमेट करतो" असे सांगण्यात आले. त्यानंतर मला आलेले उत्तर असे आहे, "शासन निकषाप्रमाणे बंधा-याचे व्यवस्थापन व देखभालीसाठी स्थानिक शेतकरी व लाभार्थी यांनी सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करणे क्रमप्राप्त असून संस्थेची नोंदणी होताच अनुदानाच्या उपलब्धतेनुसार उपरोक्त बंधा-याचे काम हाती घेण्याबाबतची कारवाई जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल."

नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 19:30

श्री. अरविंद सावंत ..

मी गेली वर्ष-दीड वर्ष या विषयावर पत्र लिहित आहे. या पत्रांवर शेवटचे उत्तर 10 डिसेंबर 2005 रोजी मला मिळाले. 2-3 लाख रुपयांच्या किरकोळ दुरुस्तीचे काम आहे पण शासन निधी उपलब्ध करुन देत नाही. बंधारा स्थानिक विकास निधीतून घेतला आहे. जमिनीप्रमाणे कोकणातील घरांची रचना सुध्दा वेगळी आहे. एका वाडीमध्ये 10-20 घरे असतात. दोन वाडयांमधील अंतर 4-5 कि.मी.चे असते आणि गावाची व्याप्ती साधारणपणे 25 कि.मी.असते. कोकणातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता हे निकष बदलणे आवश्यक आहे तरच कोकणातील जनतेला न्याय मिळेल. सभापती महोदय, बाब क्र.158मध्ये प्राथम्यक्रमानुसार पाटबंधारे प्रकल्पांसाठी एकरकमी केंद्रीय अर्थसहाय्य असे नमूद करण्यात आले. याबाबत प्राथम्यक्रम कोणता आणि कोणत्या प्रकल्पांना निधी देणार याबाबतचा खुलासा शासनाने करावा. धन्यवाद.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलताना ज्या मुद्यांना आतापर्यंत स्पर्श करण्यात आला नाही आणि जे मुद्दे रिपीट होणार नाही त्या मुद्यांच्या संदर्भातच मी बोलणार आहे. सभापती महोदय, बाब क्र.52,पान क्र.44 शिक्षण विभागाशी संबंधित पूरक मागणी आहे. शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याजापोटी 5 कोटी 99 लाख 5 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एवढी मोठी रक्कम पुरवणी मागणीद्वारे आणावी लागते याचे कारण मला समजत नाही. कोणत्या प्रकारे हिशोब केला असेल ते शासनाने स्पष्ट करावे. निश्चितपणाने हे पैसे द्यावे लागणार आहेत. सभापती महोदय, माध्यमिक शाळांप्रमाणेच प्राथमिक शाळांमधून सुध्दा वेतनपथक तयार झालेले आहे. वेतनपथक तयार होऊनही अनेक जिल्हयांमध्ये या पथकासाठी अधिकारी नाहीत, स्टाफ नाही आणि जागाही उपलब्ध नाही अशी परिस्थिती आहे. यासंदर्भात शासनाने काळजी घेणे आवश्यक आहे. सभापती महोदय, प्रत्येक विभागामध्ये संगणकीकरणासाठी पुरवणी मागणीद्वारे तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीतील रकमेचे सुध्दा संगणकीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. लाखो रुपये सस्पेंसमध्ये पडलेले आहेत. रकमेचे शेडयूल मिळत नाही. यामध्ये अपहार केला आहे असे मी म्हणणार नाही. परंतु ही रक्कम कोणत्या खात्यामध्ये टाकावयाची हा प्रश्न समोर उभा राहिला आहे. म्हणून भविष्य निर्वाह निधी खात्याचे सुध्दा संगणकीकरण होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, बाब क्र.54,पान क्र.46 मध्ये मध्यान्हभोजनासाठी 67 लाखापेक्षा जास्त रकमेची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार मध्यान्हभोजन म्हणून खिचडी देण्यात येते. ही एक अत्यंत चांगली योजना आहे. एवढी मोठी रक्कम केंद्र शासन या योजनेसाठी उपलब्ध करुन देत आहे. ही योजना चांगली असली तरी त्यामध्ये होणारा जो भ्रष्टाचार आहे तो भयानक आहे. असे म्हणतात की, आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे ही संस्कृती आणि दुसऱ्याच्या ताटातील हिसकावून घेणे ही विकृती. अशा प्रकारची विकृती या योजनेमध्ये निर्माण झालेली आहे. या योजनेमध्ये फार मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार आहे. खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांपर्यंत खिचडी दिली जात नाही. म्हणून ही योजना काटेकोरपणाने कशी राबविता येईल यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे अनुदानित शाळातील वर्गामध्ये ही योजना राबविली जाते त्या वर्गातील विद्यार्थ्यांना खिचडी मिळते. परंतु त्याच शाळेमध्ये जे विनाअनुदानित वर्ग आहेत त्यातील मुलांना खिचडी मिळत नाही. याबाबतीत शिक्षणमंत्र्यांना मी

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

भेटलो होतो. शिक्षण राज्यमंत्री श्री. मुश्रीफ साहेब याठिकाणी बसले आहेत. यासंदर्भात देखील विचार व्हावा अशी मी यानिमित्ताने शासनाला विनंती करतो. सभापती महोदय, बाब क्र.56 पान क्र.46 वस्ती शाळांच्या बाबतीत ही पुरवणी मागणी आहे. वस्ती शाळेतील शिक्षकांना एप्रिल 2004 पासून 500 रुपयांची वाढ झालेली आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये यासंदर्भात मी प्रश्न उपस्थित केला व शासनाने तातडीने निर्णय घेतला.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

आणि अशा प्रकारे दुर्मिळ भागात काम करणाऱ्या वसती शाळांच्या शिक्षकांना 500 रुपयाची वाढ पुर्वलक्षी प्रभावाने दिली त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. खरोखरच 5.35 कोटीची एवढी मोठी रक्कम जी या ठिकाणी तरतूद करण्यात आली ती या शाळांतील गरीब शिक्षकांना पोहचावी म्हणून याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. कारण मध्येच ही रक्कम गायब होण्याची देखील भिती असते. तसेच माझी अशीही विनंती आहे की, या गरीब वस्ती शाळांतील शिक्षकांना ही रक्कम वाढवून देण्यात आली ती त्यांनाच मिळावी म्हणून धनादेशाद्वारे अथवा त्यांच्या बँकेच्या खात्यावर दिल्यास बरे होईल.

महोदय, यानंतर पृ.क्र.47, बाब क्र. 57 च्या संदर्भात मला असे सुचवावयाचे आहे की, सातारा सैनिकी स्कूलसाठी सन 2003-04 आणि 2004-05 या दोन वर्षासाठी 1.27 कोटीची पुरवणी मागणी या ठिकाणी देण्यात आली आहे. शासनाने जरुर सैनिकी शाळांना मदत करावी याबद्दल दूमत नाही पण अशा प्रकारच्या सैनिकी शाळा शासनाने सुरु केल्या आहेत आणि ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांना मात्र वेळेवर मदत मिळत नाही. या निमित्ताने मी ठाणे जिल्हयाचे उदाहरण देऊ इच्छितो की, भारती सैनिकी शाळा या ठाणे जिल्हयातील शाळेच्या शिक्षकांना गेल्या पाच महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. अनेक वेळा आम्ही विनंती केली, शिक्षणाधिकारी व संचालक शिक्षण विभाग यांनी देखील शिफारस केली, त्यासंदर्भात बराच पत्रव्यवहारही झालेला आहे परंतु अद्यापही हे अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे या शाळेच्या शिक्षकांना वेतन मिळण्याच्या दृष्टीने मंत्री महोदयांनी आदेश द्यावेत. खरे तर या पुरवणी मागणीच्या माध्यमातून या शिक्षकांच्या पाच महिन्याच्या वेतनाचा प्रश्न सहज सोडविता आला असता पण तसे केले नाही, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्याचबरोबर जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक शिक्षकांच्या सुधारित वेतनश्रेणीबाबतचा जी.आर. 11 नोव्हेंबर, 2005 रोजी शासनाने काढलेला आहे. या शिक्षकांना 7225 ही सुधारित वेतनश्रेणी शासनाने मानय केली आहे. शालेय शिक्षण विभागाला सन 2000 मध्येच ही वेतनश्रेणी मिळाली परंतु जिल्हा परिषदेच्या या शिक्षकांना देण्यासाठी 2005 साल उजाडले. हा जी.आर. काढलेला असला तरी त्यासंदर्भात अद्याप कोणतीही आर्थिक तरतूद

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ..........

करण्यात आलेली नाही. या जी.आर. मध्ये असे म्हटले आहे की, यासंबंधीची तरतूद शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने करावी. ही तरतूद या पुरवणी मागणीच्या माध्यमातून सुध्दा करता आली असती पण जाणीवपूर्वक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शिक्षकांसाठी हे करण्यात आले नसल्याचे दिसून येते, त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा. तसेच मुल्यांकनानुसार अनेक शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात प्रश्न आहे. अनुदान देण्यात येणाऱ्या तुकडयांचा प्रश्न आहे. पण या ठिकाणी 31 मार्चपर्यंत हे अनुदान देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे आश्वासन दिले आहे.

महोदय, आदिवासी विभागासंबंधी शेवटचा मुद्दा मी सांगू इच्छितो की, पृ.क्र.149 वर पुरवणी मागणी दिलेली आहे, आदिवासी विकास मंत्री देखील या ठिकाणी बसलेले आहेत. मागील अधिवेशनात आदिवासी विभागातील उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांबाबत मी प्रश्न उपस्थित केला होता. जिल्हा परिषदेच्या शिक्षकांसाठी ज्याप्रमाणे 11 नोव्हेंबर 2005 रोजी जी.आर. काढून प्रश्न निकाली काढला त्याच धर्तीवर आदिवासी विभागातील शिक्षकांचा प्रश्न अजुनही प्रलंबित आहे. त्यासंदर्भात काल सभागृहात तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने चर्चा देखील झाली की, या शाळांमध्ये उच्च माध्यमिक शिक्षक मिळत नाहीत, मिळाले तरी ते सोडून जातात. अशा परिस्थितीत या शिक्षकांना जी वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे ती मिळात नाही म्हणून ते सोडून जातात. मागील हिवाळी अधिवेशनात जे मान्य करण्यात आले त्याचाही उल्लेख येथे करण्यात आला त्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिशन बाजोरिया (अकोला-वाशिम-बुलडाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पृ.क्र.52, बाब क्र.64-65-66 यामध्ये भरपूर तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षी अकोला महानगरपालिकेच्या हद्दीत भीषण पाणी टंचाई निर्माण झाली होती आणि त्यावेळी अकोला शहरातील नागरिकांना महिन्यातून फक्त दोनच दिवस पाणी मिळत होते. अशा परिस्थितीत अकोला महानगरपालिकेमध्ये फक्त एकच महान नांवाचे धरण आहे. मागील वर्षी माननीय मुख्यमंत्रयांनी अमरावती येथे एक बैठक घेतली होती आणि त्या बैठकीमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था असावी म्हणून अकोला येथील काष्टी नांवाचा जो तलाव आहे त्यासाठी एक कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिले होते.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया...

सभापती महोदय, येथे नगरविकास विभागाचे मंत्री बसले आहेत, मागे त्यांनी एक कोटीची घोषणा केली होती ती पूर्ण करावी. तसेच, श्री.भुजबळ साहेब देखील येथे उपस्थित आहेत. अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतून म्हणजेच आकोल शहराच्या मध्यभागातून मुंबई कोलकत्ता नॅशनल हायवे क्रमांक 6 जातो. येथील वाहतूक वळविण्यासाठी बायपास रस्त्याची मागणी गेली अनेक वर्षे स्थानिक जनता करीत आहे. पण शासन त्याकडे लक्ष देत नाही. यासाठी PILदेखील उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आले होते. तेव्हा कोर्टाने बायपास रस्ता तयार करावा असा निदेश दिला. या कामासाठी जमीन देखील संपादित करण्यात आली आहे. तेव्हा या कामाचे नियोजन करून काम सुरू करावे अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सन 2005-2006 च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एकूण रक्कम रुपये 292 कोटी 56 लाखाच्या 20 पुरवणी मागण्या सभगृहापुढे मांडण्यात आलेल्या आहेत.

केंद्रीय मार्ग निधीकडून रस्त्याचे बांधकाम करण्यासाठीच्या निधीमध्ये वाढ करण्यात आल्यामुळे राखीव निधी ठेव लेख्याकडून हस्तांतरण अंतर्गत रुपये 166 कोटी 75 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. अमरावती शहरामध्ये एकात्मिकृत रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत रस्त्याच्या बांधकामाचा वेग कायम ठेवण्यासाठी रुपये 35.00 कोटीची मागणी करण्यात आली आहे. मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी रुपये 49.07 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. हुडको कडून घेतलेल्या कर्जावरील व्याज द्यावयाचे असल्याने मंजूर अनुदानाहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी रुपये 13.59 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. अशा अनेक मागण्या सभागृहापुढे मांडण्यात आल्या आहेत.

या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, अरविंद सावंत, पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे यांच्यासह अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.पाटील यांना माडा तालुक्यातील तरतुदीसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रमाने तरतूद करण्याचा माझा निश्चितपणाने प्रयत्न राहील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी बारामती येथील महिला वसतीगृहासंबंधी भाष्य केले आहे. त्यासंबंधी मी निश्चित माहिती घेतो. कोर्टाच्या अखत्यारितील असलेल्या इमारतीसंबंधी विधि व न्याय विभागाने निर्णय घेणे आवश्यक आहे. तरी देखील माझ्यातर्फे पाठपुरावा करण्यात येईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी जे.जे.रुग्णालय येथील ड्रनेज लाईन चोक होत असल्याबद्दलची तक्रार केली आहे. सदर ड्रेनेज लाईन बदलण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे,हे या निमित्ताने सांगू इच्छितो. तसेच, सेंट जॉर्ज रूग्णालयातील छतातून गळती होत असल्याने त्याचे देखील दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद येथील आय.आर.डी.पी.अंतर्गत असलेल्या रस्त्याच्या कामासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी व अरविंद सावंत यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याकडे देखील लक्ष घालून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल्.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 19:45

श्री.छगन भुजबळ....

तसेच अकोला बायपास रस्त्याचे काम लवकरात लवकर हाती घेणार आहोत. खरे म्हणजे या कामाच्या संदर्भात लिटीगेशन निर्माण झाले होते. केंद्र सरकारपर्यंत हे प्रकरण गेले होते. कारण जो बाहय रस्ता काढावयाचा होता, त्यामध्ये बी.ओ.टी. तत्वाच्या संदर्भात अडचण निर्माण झ ााली होती. परंतु मी सदनाला सांगू इच्छितो की, लवकरात लवकर हा बायपास पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

त्यामुळे मी सदनाला विनंती करु इच्छितो की, सन 2005-2006 या वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक 80 ते 99 मंजूर कराव्यात.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 19:45

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण, पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्योद्योग, औकाफ, विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, शालेय शिक्षण, पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्योद्योग, औकाफ, विधी व न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, रमेश निकोसे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती कांता नलावडे यांनी भाग घेतल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो.

विधी व न्याय विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मुंबईतील रुग्णालयांमध्ये मग ते ब्रीच कँडी हॉस्पीटल असेल, जे.जे.हॉस्पीटल असेल, बॉम्बे हॉस्पीटल असेल त्यांना शासनाने जमिनी किंवा सोयी दिल्या असल्यामुळे त्यांनी 10 टक्के गरीब रुग्णांवर मोफत उपचार करावा. मात्र असे होताना दिसून येत नाही असे त्यांनी सांगितले. या रुग्णांवर तशा प्रकारे उपचार करण्यात यावा यासाठी आम्ही चर्चा सुरु केली आहे. वास्तविक पाहता यासंदर्भात जनहित याचिका दाखल झाल्यामुळे ही बाब न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. परंतु तरीही मी सदनाला सांगू इच्छितो की, जे दारिद्र्रेषेखालील आहेत त्या रुग्णांना रुग्णालयांस सेवा देण्यास आम्ही भाग पाडू. त्या रुग्णालयांनी सांगितले की, जर हार्टच्या संदर्भातील रुग्ण असेल तर त्याच्यावर उपचार करण्यासाठी येणारा भलामोठा खर्च आम्हाला करता येणार नाही. त्यांनी ॲफिडेव्हिट सादर केलेले असल्यामुळे याबाबतचा निर्णय प्रलंबित आहे. आतापर्यंत असे किती ॲफिडेव्हिट झाले याबाबतची माहिती देण्यास मी तयार आहे.

सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी शिक्षण क्षेत्राबाबत या ठिकाणी अनेक प्रश्न मांडले. शालेय पोषण आहार योजनेबाबत अनेक सन्माननीय सदस्यांची तक्रार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खिचडी मिळत नाही. शाळेमध्ये खिचडी शिजविली जात नाही. त्यामुळेच शालेय पोषण आहार योजनेचे काम महिला बचत गटाकडे देण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत दर्जेदार आहार मिळावा म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत. महोदय, या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना बिस्कीटे पुरविणार आहोत. तसेच जे विद्यार्थी अंडी खातात त्यांना अंडी सुध्दा पुरविणार आहोत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

आज बर्ड फ्ल्यू या रोगामुळे सर्वत्र भितीचे वातावरण पसरलेले आहे. परंतु कोंबडया खाण्यामध्ये कसल्याही प्रकारची भिती नाही म्हणून आम्ही आज सभागृहात कोंबडी खाल्ली.

**उपसभापती** : मला वाटते आपण सभागृहात कोंबडी खाल्ली असे म्हटल्यापेक्षा विधान भवनात कोंबडी खाल्ली असे म्हणावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण सांगितल्यानुसार मी वाक्यामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. आम्ही आज विधान भवनात कोंबडी खाल्ली. या पुरवणी मागण्यांना उत्तर देताना माझा सांगण्याचा उद्देश असा होता की, या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दर्जेदार मिळावा, योजनेत भ्रष्टाचार होऊ नये म्हणून शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे.

शिक्षण विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, विना अनुदानित माध्यमिक शाळांची यादी तयार केली जात नाही, तुकडयांना मान्यता मिळत नाही अशा प्रकारचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. या अनुषंगाने सांगू इच्छितो की, 31 मार्च पर्यंत या याद्या करण्याबाबत आमचा प्रयत्न राहील. मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते की, राज्यातील 8 लाख विद्यार्थ्यांना आज लिहीता-वाचता येत नाही. परंतु याबाबत मात्र कोणी एक शब्दही बोलत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी कायम विना अनुदानित शाळांच्या संदर्भात शासनाला नवीन धोरण आखण्याची आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

सभापती महोदय, यामुळे अनेक प्रश्न तयार होतात, शाळांचा दर्जा खालावत आहे, काही लोक जास्त फी घेत आहेत. तसेच विद्यार्थी कमी झाल्यामुळे दुसऱ्या शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षकांची संख्या वाढत आहे, परिणामी त्यांच्या समायोजनेचा प्रश्न निर्माण होत आहे. तरी, या संदर्भातील विषय माननीय मंत्रीमंडळापुढे ठेवून आम्हाला धोरण आखावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सुधाकर एज्युकेशन सोसायटीच्या चौकशीबाबत मागणी केली आहे. तरी, मी त्यांना असे सांगू इच्छितो की, आम्ही त्यांची मागणी गेल्या अधिवेशनातच मान्य केली होती. तरी, विधी व न्याय विभाग, शिक्षण विभाग, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग तसेच क्रिडा व युवक कल्याण विभाग या सर्व खात्यांच्या मागण्या मंजूर कराव्यात, अशी मी सदनाला विनंती करतो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग व नगरविकास विभाग या खात्यांच्या मागण्यांसंदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, विलास अवचट, मधुकर सरपोतदार तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि या संदर्भात काही महत्वाच्या सूचना देखील केल्या, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी मुंबईमध्ये अरबी समुद्रात होत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासंबंधी माहिती मागितलेली आहे. तरी, या संदर्भात मी सदनाला असे सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासंदर्भात माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. त्या समितीची बैठक दिनांक 28.10.2005 रोजी झाली. माननीय मुख्यमंत्री यांनी स्वत: गेटवे ऑफ इंडिया येथे जाऊन वेगवेगळ्या 4-5 साईट्स देखील पाहिल्या आहेत. परंतु त्या ठिकाणी असलेल्या सर्व साईट्स भारतीय नौदलाच्या अखत्यारित येत असल्यामुळे त्या संदर्भात त्यांचा अभिप्राय घेऊन या बाबतीतील साईट निश्चित करण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी बा.सी.मर्ढेकर यांच्या मु.पो. मर्ढे, तालुका व जिल्हा सातारा या गावी त्यांचे स्मारक करण्याविषयी वारंवार मागणी केली आहे. तरी, मी सन्माननीय सदस्यांना असे सांगू इच्छितो की, या संदर्भात सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा यांनी 48 लाख 76 हजार रुपयांच्या खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन शासनाच्या मान्यतेसाठी पाठविलेले आहे. त्या संदर्भात बांधकाम विभागाकडून छाननी होऊन कोणत्याही परिस्थितीत महिन्याभराच्या आत या गोष्टीला मान्यता दिली जाईल आणि येणाऱ्या बजेट अधिवेशनामध्ये कोणत्याही परिस्थितीत काहीतरी निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आम्ही निश्चितप्रकारे तजवीज करु. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी विनोबा भावेंच्या स्मारकाविषयी मुद्दा उपस्थित केला की, त्या ठिकाणी भुमिपूजन झाले, परंतु उद्घाटन केव्हा होणार ? तरी, मी या संदर्भात त्यांना एवढीच माहिती देऊ इच्छितो की, या स्मारकासाठी एकूण 74 लाख 70 हजार इतक्या खर्चाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे आणि 10 लाख 50 हजार इतका खर्चही झालेला आहे. पुढील खर्च जिल्हाधिकारी मागतील त्याप्रमाणे शासन निश्चितपणे उपलब्ध करुन देईल. सभापती महोदय, भूदान चळवळीचे प्रणेते कै. विनोबा भावे यांचे स्मारक निश्चितपणे शासन पूर्ण करील एवढा विश्वास मी सभागृहाला

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

या निमित्ताने देऊ इच्छितो. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभागासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी प्रामुख्याने स्वॅनसाठी 17 कोटी 92 लाख रुपयांची मागणी केली आहे व त्या संदर्भात काही प्रश्नही उपस्थित केले आहेत. तरी, या संदर्भात मी सभागृहाला अशी माहिती देऊ इच्छितो की, व्ही सेटच्या यंत्रेणेद्वारे डिव्हीजन कमिशनर आणि कलेक्टरची कार्यालये आज मंत्रालयाशी जोडली गेली आहेत. परंतु स्वॅनच्या माध्यमातून आता जे स्टेट वाईड एरिया नेटवर्क आहेत, त्यांना केंद्र शासनामार्फत निधी उपलब्ध होत आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ प्रथम श्री. कांबळे.. 19:55

श्री. राजेश टोपे...

माझी सर्व माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण आपले इ-मेल नंबर दिले तर त्या इ-मेलवर आपणास पत्रांची उत्तरे आम्हाला पाठविता येतील. त्यासंदर्भातील सर्व व्यवस्था करण्यात आलेली आहे. नगर विकास विभागाच्या संदर्भात अनेक मान्यवर सदस्यांनी आपले विचार येथे मांडलेले आहेत. यामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, श्री. जयंत प्र. पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. विलास अवचट, श्री. मधुकर चव्हाण या सर्व सदस्यांनी पुरवणी मागण्यांच्या संदर्भात चर्चेमध्ये भाग घेतलेला आहे. माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी एमएमआरडीए च्या माध्यमातून जोगेश्वरी ते गोरेगाव रस्त्यांच्या कामाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे, त्यामध्ये त्यांनी असे सांगितले की, रस्त्यांवर अनेक खड्डे पडलेले आहेत, त्या रस्त्यांची परिस्थिती सुधारावी म्हणून एमएमआरडीएमार्फत एमयुआयपी तर्फे या योजना चालू आहेत. अनेक रस्त्यांची कामे निश्चितपणे पूर्ण करण्यात येणार आहेत.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, जोगेश्वरी ते गोरेगांव या रस्त्यांवर अनेक खड्डे पडलेले असून, रस्त्यांवर अर्धवट बांधकाम करुन सळया मोकळ्या पडलेल्या आहेत, त्या रस्त्यांवर अनेक छोटे मोठे अपघात होत आहेत.

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याबाबत शासनाने नोंद घेतलेली आहे, त्यादृष्टीकोनतून कार्यवाही करण्यात येत आहे.

**उपसभापती** : एमएमआरडीएची कामे खूप धिम्या गतीने सुरु आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो मंत्री महोदयांनी गांभीर्याने घ्यावा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, याबाबत विशेष लक्ष घालण्यात येईल. पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी आपआपल्या विभागामध्ये निधी मिळावा अशी मागणी केलेली आहे. यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपल्या रायगड जिल्हयासाठी निधी मिळाला पाहिजे, तसेच सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातून कामे होण्याबाबत निधीची उपलब्धता करुन दिली पाहिजे असा मुद्दा मांडला आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी औरंगाबाद विभागासाठी निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे अशा प्रकारची मागणी केलेली आहे. एकंदरीत सर्व सदस्यांची

.....2....

**( सभापती स्थानी माननीय तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी )**

श्री. राजेश टोपे....

मागणी ही निधीच्या बाबतीतील आहे. यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, नगर विकास विभागाच्या माध्यमातून अलिकडेच जी पाहणी करण्यात आलेली आहे त्यामध्ये महाराष्ट्रात मोठया प्रमाणात नागरीकरण वाढत चालले आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण 43 टक्के नागरीकरण झालेले आहे. सर्वात जास्त नागरीकरण झालेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. 74 वी घटना दुरुस्ती केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था हया आर्थिक दृष्टया सक्षम व बळकट व्हाव्यात हा त्यामागील मुख्य उद्देश होता. त्या दृष्टीकोनातून माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्तमंत्री यासंदर्भात निश्चितपणाने कार्यवाही करीत आहेत. खालच्या सभागृहामध्ये ऑक्ट्राय बंद व्हावा अशी मागणी करण्यात आलेली आहे, त्यादृष्टीकोतनातून माननीय वित्तमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे की निश्चितपणे ऑक्ट्राय बंद करण्याचा मानस शासनाचा आहे. पण ऑक्ट्रायला दुसरा पर्याय उपलब्ध होत नाही तोपर्यंत ऑक्ट्राय बंद करता येणार नाही. मी मुंबई परिसरातील सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ऑक्ट्राय पासून शासनास वर्षाला 5500 कोटी रुपये उत्पन्न मिळते, त्यातील 2400 कोटी रुपये हे एकटया मुंबई शहरातून मिळते एवढया मोठया रकमेला पर्याय शोधल्याशिवाय तो बंद करणे व्यवहार्य होणार नाही. नाही तर आपणास प्लॅन साईज कमी करावी लागेल. यासंदर्भात वित्तमंत्री नवीन पर्यायाचा शोध घेत आहेत त्यामध्ये आपणाला लोकल व्हॅट चालू करता येईल काय व त्यातून आपणाला निधी उपलब्ध होईल काय याबाबत विचार विनिमय करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MAP/ SBT/ MHM/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ... 20:00

श्री.राजेश टोपे ...

महानगरपालिकांची परिस्थिती सुधारण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने जवाहरलाल नेहरु नागरी नवीकरण मिशन नावाची योजना आखली आहे. या योजनेमुळे पुढील काही वर्षांमध्ये महानगरपालिकांची परिस्थिती सुधारण्यासाठी निधी उपलब्ध होऊ शकेल. या संदर्भात नगरविकास खात्याच्या माध्यमातून महत्वाचे विधेयक आणले जाणार आहे. महानगरपालिकांची "अ", "ब", "क " व "ड" अशी वर्गवारी करीत आहोत. विशेष अनुदानाच्या माध्यमातून "क" व "ड" या वर्गवारीमध्ये येणा-या महानगरपालिकांना आर्थिक सहाय्य मिळणे शक्य होणार आहे. तसेच "अ", "ब" व "क " या महानगरपालिकांचे अधिनियम व तरतुदी वेगवेगळया आहेत, त्या समान होण्याची आवश्यकता आहे. केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाचे हेच म्हणणे आहे. याबाबत शासन विचार करीत आहे. सभापती महोदय, मी गेल्या वर्षी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी महानगरपालिकांचे कॅडरायझेन करु असे सांगितले होते. या संदर्भात आज मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. यामुळे महसूली विभागात महानगरपालिका / नगरपालिका कर्मचा-यांच्या बदल्या करणे शक्य होणार आहे. जेणेकरुन कर्मचा-यांची कार्यक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने निश्चितपणे मदत होऊ शकेल. निधी उभा करता यावा म्हणून सेवा देणा-या स्थानिक स्वराज्य संस्था, किंवा महानगरपालिका या सारख्या ठिकाणी ई-गव्हर्नन्स सिस्टीम सुरु करण्यासाठी संगणकीकरण, एक खिडकी योजना यांची अंमलबजावणी करता येण्यासाठी बाराव्या वित्त आयोगाने तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक महानगरपालिका / नगरपालिकेमध्ये एक खिडकी योजना लागू झाली पाहिजे, सगळीकडे संगणकीकरण करण्यात येऊन ऑफिसचे काम पेपरलेस झाले पाहिजे, जेणेकरुन प्रॉपर्टी टॅक्स, जन्म-मृत्यू या सारख्या गोष्टी बटण दाबल्यानंतर ताबडतोब समजल्या पाहिजेत अशी शासनाची अपेक्षा आहे. यासाठी संगणीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सुंदर व स्वच्छ शहरामध्ये राहिले पाहिजे असे प्रत्येकाला वाटते. या दृष्टीकोनातून अर्बन एनव्हायर्नमेंट विशेष महत्वाचे आहे. या संदर्भात बाराव्या वित्त आयोगाने काही मार्गदर्शक तत्वे मंजूर केली आहेत. यामध्ये घनकचरा व पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीकोनातून 50 टक्के निधी खर्च करता येईल अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आहे. नगरपालिकांच्या दृष्टीने अर्बन पॉवर्टी एलिव्हेशन विशेष महत्वाचे आहे. त्यानुसार बीपीएलचा सर्व्हे व्हावा अशी शासनाची अपेक्षा आहे. या संदर्भात आजच आदेश दिलेले आहेत.याबाबत येत्या 2-4 महिन्यांच्या कालावधीत नगरविकास विभागाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ...

माध्यमातून दारिद्रय निर्मूलन करण्याच्या दृष्टीने बीपीएल सर्व्हे करण्याचे महत्वाचे काम केले जाणार आहे....

श्री.मधुकर चव्हाण : कन्व्हेएन्सच्या बाबतीत आपण काय करणार आहात ?

श्री.राजेंद्र टोपे : याबाबतची देखील नोंद घेण्यात येईल. या ठिकाणी मला दुसरे काही सांगण्याची आवश्यकता नाही. शासन अनेक प्रकारची धोरणे आणू पाहत आहेत, मी या ठिकाणी सर्व माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. सभापती महोदय, नगरविकास विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी सदनाला विनंती करतो.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्र सरकारकडून येणारा निधी विधानसभेच्या आमदारांना वाटप होणार आहे आणि मग विधान परिषदेच्या आमदारांच्या बाबतीत शासनाची भूमिका काय आहे याचा खुलासा आज आपण करणार असल्याचे आपण कबूल केले होते पण राज्यमंत्र्यांनी त्याबाबत काहीही सांगितले नाही. त्यांच्याकडून याबाबत उत्तर यावे म्हणून मुद्दाम आम्ही हा विषय मांडला होता.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, दलित वस्त्यांच्या बाबतीत या पुरवणी मागण्यांमध्येही मोठ्या प्रमाणात निधी आपण उपलब्ध करून घेतलेला आहे. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती गोऱ्हे यांनी सातत्याने येथे मुद्दा मांडला हाता की, दलित वस्त्यांसाठी निधी दिला जात नाही आणि त्यामुळे दलित वस्त्यांमध्ये ज्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजे असतात त्या दिल्या जाऊ शकत नाहीत. माझे या दृष्टीकोनातून एवढेच सांगणे आहे की, दलित वस्त्यांसाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्र सरकारकडून येणारा निधी विधानसभेच्या सगळ्या आमदारांना दलित वस्तीमध्ये वापरण्यासाठी प्रत्येक मतदारसंघामध्ये 50 लाख रूपये प्रमाणे दिला जाणार आहे. तर मग विधान परिषदेच्या आमदारांना तो का दिला जात नाही याबद्दल चर्चासुद्धा येथे आम्ही उपस्थित केली पण त्यावर उत्तर आलेले नाही.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्यावर निश्चितपणे विचार करून त्या संदर्भात सूचना देण्यात येतील इतकेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

****

..... 4ए 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी व जलसंधारण मंत्री) : सभापती महोदय, कृषी व जलसंधारण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी आपले विचार येथे मांडले आहेत त्यामध्ये त्यांनी द्राक्ष बागायतदारांच्या बाबतीत निर्माण झालेल्या अडचणीबाबत मार्गदर्शन करण्याची आवश्यकता या बाबतीत त्यांनी जी सूचना केली आहे त्याबाबत निश्चितपणे नोंद घेतली जाईल तसेच नॅशनल हॉर्टीकल्चर मिशन आहे त्यांच्याकडूनही मार्गदर्शनाबाबतच्या ज्या सुविधा निर्माण झालेल्या आहेत त्याचा उपयोग करून अशा प्रकारचे मेळावे घेतले जातील हे मी आपल्याला प्रथमत: सांगू इच्छितो.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जलसंधारण विभागाच्या बाबतीत बोलताना एका प्रकल्पाचे सर्वेक्षण करावे अशी सूचना केली आहे. त्याचे सर्वेक्षण केले जाईल इतकेच सांगतो. या व्यतिरिक्त त्यांनी कोकण विभागामध्ये जलसंधारणाचे जे छोटे छोटे प्रकल्प आहेत, छोटे छोटे कोल्हापूर टाईप बंधारे होण्याच्या दृष्टीने कोकणसाठी निकष बदलण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे. पण त्यासाठी कोकणामध्ये पाणी उपलब्ध असले तरी आवश्यक ती 250 हेक्टर जमीन उपलब्ध नसते आणि इतरही अडचणीची परिस्थिती असते उदा. पाण्याचा साठा असेल वा उताराचा भाग असेल या सगळ्या बाबींचा अवश्य विचार केला जाईल तसेच तेथे सहकारी पाणी वाटप संस्था स्थापन करण्याविषयीही जो निकष आहे त्यामुळे तेथे अशी संस्था स्थापन होऊ शकत नाही अशा प्रकारचे त्यांनी विचार मांडले आणि म्हणून कोकण विभागासाठी हे सर्वच निकष वेगळे असले पाहिजेत असे त्यांनी सांगितले. तर मी त्यांना सांगू इच्छितो की, भविष्यामध्ये या गोष्टींचा स्वतंत्रपणे अभ्यास करून, सध्या कोकणामध्ये जलसंधारण प्रकल्प घेण्यामध्ये ज्या अडचणी आहेत त्यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने कोकणातील सदस्यांना घेऊन एक बैठक घेऊन याबाबत निर्णय केला जाईल असे मी या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी कृषी संबंधात काही विचार मांडले आहेत. शेतकरी अडचणीमध्ये येण्यास कारणीभूत अशा ज्या गोष्टी आहेत त्यामध्ये बियाणांचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यांची उत्पादकता कमी आहे त्याचे मुख्य कारण निविष्टा हेही आहे म्हणजे ते अप्रमाणित वा गुणवत्ता कमी असणारे निविष्टा मिळणे हे त्यातील महत्त्वाचे कारण आहे. म्हणूनच त्याबाबतीत आपण काळजी घेतली पाहिजे. असे अत्यंत अभ्यासपूर्वक असे त्यांची मुद्दे होते. बीटी

..... 4ए 3 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. थोरात ....

कॉटनच्या बाबतीतील त्यांचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. हे बियाणे भारतात आले परंतु त्यापूर्वी 1996-97 पासून त्यावर अनेक प्रक्रिया घडलेल्या आहेत की जेणेकरून हे आपल्याकडे आणावे की आणू नये हा प्रश्न आहे. केंद्र सरकारचा वन आणि पर्यावरण विभाग जो आहे, जैविक बियाणे आणत असताना त्याचा कंट्रोल त्यावर असतो. त्यावर निरनिराळ्या प्रकारच्या चार समित्या आहेत. त्या याबाबत पूर्णपणे अभ्यास करतात आणि त्यानंतर सांगितले जाते की, हे बियाणे आपल्या देशात प्रसृत करण्यास हरकत नाही. ही सगळी प्रक्रिया 5-7 वर्षे चालल्या नंतर हे बीटी बियाणे प्रसृत करण्याच्या संदर्भातील निर्णय केंद्र सरकारने घेतला. त्यानंतर ते महाराष्ट्रात आले आणि महाराष्ट्राचाही त्यावर कंट्रोल असला पाहिजे म्हणून आपल्याही समित्या त्यावर नेमल्या आहेत. हा विषय पर्यावरण विभागाशी देखील निगडित आहे. या बाबतीत काटेकोर काळजी घेतली जावी अशी अपेक्षा केंद्र सरकारातील पर्यावरण विभागाची देखील राहिली आहे. कारण हे जैविक बियाणे पर्यावरणावर परिणाम करू शकणारे ठरू शकते असेही त्यांचे काही निकष आहेत. ..

( यानंतर श्री. सरफरे ... 4बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

त्यामुळे महाराष्ट्रामध्ये ज्यावेळी बीटी बियाणे आले त्यावेळी त्याचा अनधिकृतपणे वापर होऊ नये. कारण पर्यावरणाशी निगडीत विषय असल्यामुळे आपण त्यासंबंधी काळजी घेतली नाही तर वेगळया प्रकारचे जैविक बियाणे येऊन त्याचे वेगवेगळे परिणाम पिकांवर होऊ शकतात हे शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. त्यामुळे अनधिकृत बीटी बियाणे कुणीही वापरु नये आणि जर कुणी वापरीत असेल तर त्यांच्यावर आपण कारवाई करतो. या ठिकाणी आपण कंपनीची दलाली कशासाठी करता असे म्हटले असले तरी यामध्ये कोणत्याही दलालीचा विषय नाही. पर्यावरण विभाग आणि केंद्र सरकारच्या निकषाप्रमाणे काळजी घेऊन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे एवढेच यानिमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, या वर्ष कपाशीवर लाल्या रोग आला त्यासंबंधी उल्लेख करण्यात आला. त्याला रोग म्हणता येणार नाही, ती एकप्रकारची डेफिशिअन्सी आहे. बीटी कॉटन घेतल्यानंतर त्याला बोंड अळी येत नाही. आणि बोंड अळी आली नसली तरी यावर्षी पाऊस अधिक झाल्यामुळे शेतामध्ये टाकलेले खत पाण्यामध्ये वाहून गेले. त्यामुळे त्या झाडांना व पानांना अन्नद्रव्य मिळाले नाही. ते न मिळाल्यामुळे त्या पानांचा रंग लाला झाला. त्याला लाल्या रोग म्हणतात. त्या वर कोणतीही उपाययोजना होत नाही. त्यासाठी कृषी विभागाला पिकामध्ये खत टाकण्यासाठी सूचना केली होती. त्यामुळे बीटी जातीच्या कापसाच्या उत्पादकतेमध्ये घट झाल्याचे दिसते. म्हणून शासनाने निर्णय घेऊन हेक्टरी 2 हजार रुपये मदत करण्याचा निर्णय घेतला.

आजच्या चर्चेमध्ये बियाण्यांच्या कायद्याच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला. यापूर्वी सुध्दा बियाण्यांच्या बाबतीत बोलतांना बोगस बियाण्यांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारचा स्वतंत्र कायदा असला पाहिजे अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त केली गेली. त्याबाबत संपूर्ण माहिती घेतल्यानंतर असे लक्षात आले की, सन 2000 मध्ये अशाप्रकारचा स्वतंत्रपणे बोगस बियाण्यांना आळा घालण्याचा कायदा करण्याचा प्रयत्न करण्यात आला व त्याचा मसूदा तयार करुन तो केंद्र सरकारकडे पाठविला. त्यानंतर केंद्र सरकारने दि.13.5.2003 रोजी असे उत्तर दिले की, अशाप्रकारचा स्वतंत्र कायदा राज्य सरकार करु शकत नाही. हा कायदा केंद्र सरकारने करावयास पाहिजे. केंद्र सरकारने यासंबंधी कायदा करीत असतांना त्यामध्ये आयुक्त कृषी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असली पाहिजे अशाप्रकारची शिफारस आपण केली. त्याचप्रमाणे बियाण्यांच्या उत्पादनाचे व्यापारी तत्वावर रजिस्ट्रेशन हे फक्त नोटीफाईडला देत होतो. ते बियाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

सर्टिफाईड करावे लागेल. व असे हे ट्रुथफूल बियाणे रजिस्ट्रेशन करण्याबाबत तरतूद करण्यासाठी सूचना केली आहे. एवढेच नव्हेतर त्यामध्ये फौजदारी स्वरुपाची शिक्षा कमी आहे ती वाढविण्यासाठी सूचना केली आहे. त्याचप्रमाणे ज्या शेतकऱ्याकडे बियाणे बोगस आल्यामुळे त्यांचे जे नुकसान होणार आहे त्याला नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशाप्रकारची मागणी त्या कायद्यामध्ये करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे किटकनाशकाच्या कायद्यामध्ये बदल करण्याचे काम सुरु आहे. किटकनाशकांची जी निरनिराळी संजिविके व जैविके आहेत त्यांना आळा घालण्यासाठी कायद्यामध्ये बदल सुचविला असून त्यामध्ये दंडात्मक शिक्षेची तरतूद कली आहे. त्याचप्रमाणे आज ज्या बोगस किटकनाशकांच्या केसेस आहेत त्यांच्या शिक्षेच्या बाबतीत विलंब होण्याचे जे कारण आहे त्या संदर्भात मी या ठिकाणी खुलासा केला आहे. आपण एकदा किटकनाशकाचे तीन सँपल घेतल्यानंतर ते फरीदाबादला पाठवावे लागतात. ते सँपल फेल, अप्रमाणित ठरले नाही तर ती केस दाखल करता येत नाही. त्यासाठी आम्ही केंद्र सरकारला सूचना केली आहे की ही पध्दत योग्य नाही. आज सुध्दा 62 सँपल पाठविण्यात आले त्यापैकी फक्त 5 सँपल अप्रमाणित ठरले बाकीचे सँपल अजून पेंडींग आहेत. या कायद्यामध्ये खतांसाठी केसेस दाखल करण्यासाठी 15 वर्षे मुदत ठेवली आहे आणि किटकनाशकांसाठी 7 वर्षाची मुदत ठेवली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (पुढे सुरु....

या पध्दतीने बदल होतात, त्यामुळे विलंब होतो. केस टिकू शकत नाही. तेव्हा यामध्ये बदल केला पाहिजे, म्हणून केंद्र सरकारकडे बदल सुचवत आहोत. यामध्ये जो वेळ लागतो आहे, तो कमी कसा करता येईल, असाही आमचा प्रयत्न आहे.

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदय, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, आपल्याकडून उत्तराची अपेक्षा आहे. कृपा करुन लक्षात घ्यावे की, शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करत आहोत. कोठेतरी बियाणे, फवारणी याच्यामध्ये दोष आहेत त्यामुळे त्यांचे कर्ज वाढते आहे, पिकांची नासाडी होत आहे, शेतकरी उद्ध्वस्त होत आहेत. याबाबत दंडात्मक कारवाई करण्याबाबत सांगितलेले आहे म्हणजे नेमके काय करणार आहात ? खरे तर याबाबतीत जास्तीत जास्त कडक कारवाई केली पाहिजे, इम्पीचमेंटची कारवाई केली पाहिजे. मंत्री महोदय, आपल्या माहितीकरिता सांगतो की, आपण माहितीचा अधिकाराचा कायदा केला. त्यानंतर. त्यानंतर केंद्राचा माहितीचा अधिकार कायदा झाल्यानंतर आपला माहितीचा अधिकार कायदा रद्द झाला. तशाप्रकारे केंद्राकडे आपण परवानगी मागा आणि राज्याचा ताबडतोबीने कायदा करा. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, या आत्महत्येची नोंद माननीय पंतप्रधानांनी घेतलेली आहे, माननीय राष्ट्रपतींनी घेतलेली आहे. या सगळ्यांनी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची नोंद घेतल्यानंतर राज्याचा अंतर्गत कायदा करायला कोणतीच आडकाठी येणार नाही. तसा कायदा आपण करणार असाल, तर म्हणता येईल की, शासन गांभीर्याने याकडे पहात आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्य महाराष्ट्रामध्ये कायदा व्हावा, अशी अपेक्षा आहे. केंद्र सरकारला कळविलले आहे. केंद्र सरकार राज्यामध्ये कायदा करण्यास परवानगी देत नाही. परंतु त्याबाबतीत पुन्हा एकदा प्रयत्न करायला हरकत नाही. आम्हाला कायदा बनविण्यासाठी स्वतंत्रपणे परवानगी द्यावी, अशी मागणी करता येईल. तसा आपला आग्रह हा पुन्हा एकदा कळवू. कोर्ट केसेस दाखल करण्याबाबत वेगळे शेड्युल तयार करु शकतो. खात्याचा ड्राईव्ह घेतला. कोर्ट केसेस दाखल करत असताना 12 कारखान्यांचे लायसन निलंबित केलेले आहे. एवढेच नाही तर बियाण्याच्या संबंधात आठ कारखान्यांवर निलंबनाची कारवाई केलेली आहे. पेस्टीसाईडच्या तपासणी बाबत फरिदाबादची अडचण आहे. दुसऱ्या राज्यातील निविष्टा येतात त्यावर कंट्रोल कसा करायचा यादृष्टीने हा आमचा प्रयत्न आहे. पुन्हा एकदा निविष्टांची गुणवत्ता कशी राहील, यादृष्टीने प्रयत्नशील राहू. माझी विनंती आहे की, सभागृहाने जलसंधारण आणि कृषी विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात. --

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.रणजित कांबळे (राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग) : सभापती महोदय,पाणी पुरवठा विभागाच्या मागणी क्रमांक 2056,1206,207 मांडलेल्या आहेत. त्यामध्ये कर्मचारी व अधिकाऱ्यांचे पगार व भत्त्याच्या संबंधातील आहेत. माझी विनंती आहे की, या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय...

श्री.नितीन गडकरी : निवेदन केले जाणार होते त्याचे काय झाले ?

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : मला जी माहिती आहे, त्याप्रमाणे वित्त मंत्री महोदय हे दिल्लीला गेलेले आहेत. ते आज रात्री येणार आहेत. त्या विषयावर वित्त मंत्री निवेदन करणार आहेत.

श्री.नितीन गडकरी : खालच्या सभागृहामध्ये निवेदन केलेले आहे, ते बदलून येथे नव्याने निवेदन करणार आहेत काय ? त्यामध्ये काही खुलासा न झाल्यामुळे गैरसमज होऊन हजारो लोक मोर्चाच्या पध्दतीने जमा झाले होते. त्यांच्यापर्यन्त चुकीचा संदेश गेला असावा. त्यामुळे हे सभागृह संपेपर्यन्त निवेदन करु, असे सांगण्यात आले होते म्हणून मी आग्रह धरला.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा,लाभक्षेत्र विकास, वित्त व नियोजन व संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, पाटबंधारे विभागाच्या एकंदर 9 मागण्या आहेत. त्यांची किंमत 827 कोटी रुपये आहे. या मागण्या सभागृहासमोर ठेवलेल्या आहेत. या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मूलभूत प्रश्न उपस्थित केला की, या ज्या पुरवणी मागण्या आहेत त्याचे वाटप करीत असताना माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे वाटप केले आहे की नाही ? माननीय राज्यपालांची परवानगी घेतली की नाही ? मी सांगू इच्छितो की, सन 2005-06 मध्ये माननीय राज्यपालांनी पाटबंधारे खात्याचा एकंदर नियतव्यय 4685 कोटी रुपयांचा ठेवण्यास सांगितले होते. परंतु एकंदर महाराष्ट्र राज्याचे बजेट पाहता आपण 1941 कोटी रुपयांच्या मागण्या मागच्या अर्थसंकल्पात ठेवल्या आणि त्या 1941 कोटी रुपयांचे वाटप माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशानुसार करण्यात आले आहे. गेल्या तीन अधिवेशनांमधील ज्या पुरवणी मागण्या होत्या त्यांची एकूण किंमत 1321 कोटी रुपये होती. म्हणजे एकंदर 3262 कोटी रुपयांचा नियतव्यय पाटबंधारे खात्याकडे उपलब्ध होता. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला तो अत्यंत महत्वाचा आहे. आज महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र जवळजवळ 308 लाख हेक्टर आहे आणि त्यापैकी 212 लाख हेक्टर क्षेत्र लागवडीयोग्य आहे. जून 2004 पर्यंत जे पूर्ण झालेले प्रकल्प आहेत त्या प्रकल्पांमुळे 39 लाख हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण झाली. म्हणजे राज्याची सरासरी पाहिली तर 212 लाख हेक्टर भागिले 39 लाख हेक्टर असा हिशेब केला तर राज्याच्या सिंचनाची सरासरी 18.46 इतकी येते. मुंबईचे जिल्हे सोडले तर बाकीच्या 33 जिल्ह्यांमध्ये 12 जिल्हयाची सरासरी 18.46 च्या वर आहे. त्यामध्ये नाशिक विभागातील जळगाव, मराठवाडा विभागातील नांदेड आणि परभणी, नागपूर विभागामध्ये नागपूर, भंडारा आणि गोंदिया, पुणे विभागातील सर्व सहा जिल्हे म्हणजे पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर हे जिल्हे आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी जे दोन मुद्दे उपस्थित केले होते त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. जे 1041 कोटी रुपये उपलब्ध झाले ते आपण माननीय राज्यपालांना कळविले काय आणि त्यांच्या संमतीने वाटले काय ? त्यांची संमती घेतली नसेल आणि माननीय राज्यपालांना आपण सांगितले नसेल तर त्यामुळे निर्देशाचा भंग केलेला आहे हे खरे आहे काय ?

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाचे स्पेसिफिक उत्तर असे आहे की, 1041 कोटी रुपये हे पाटबंधारे विभागाच्या मूळ अर्थसंकल्पाचा एक भाग आहे काय हे समजून घेण्यासाठी आणि त्याचा समावेश मूळ अर्थसंकल्पात करावा की नाही ? माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे त्याचे वाटप करावयास पाहिजे काय ? ही बाब या सभागृहाने ॲडव्होकेट जनरलकडे पाठविलेली आहे. सभापती महोदय, मी स्पेसिफिक उत्तर देत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. डॉ. सुनील देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, आपण मंत्री आहात. आपण हुशार आहात. आपण कोणतेही काम विचार करुन करता. आपण अविचाराने काम करीत नाही. आपल्याला जे 263 कोटी रुपये मिळाले, जे तुम्ही रिॲप्रोप्रिएशन केले, ते आपण त्या रिजनमधून त्याच रिजनमध्ये केले की, बाहेर केले आहे ? याबाबतीत नियम आहे. दुसरी बाब अशी की, पुन्हा 741 कोटी किंवा त्यापेक्षा जास्त कोटी रुपये ॲड केले आणि सगळे मिळून 1041 कोटी रुपये होतात. आपण आधी सांगितले की, 1901 कोटी रुपये आहेत. आपण सांगितले की, माननीय राज्यपाल महोदय, तुम्ही 4 हजार कोटी रुपये ठेवा असे म्हणता पण आमच्याकडे पैसे नाहीत. 1901 कोटी रुपये आपण माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे वाटले.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 20:25

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

मग हे जे नवीन पैसे तुम्ही आणलेले आहेत., जे पैसे तुम्हाला मिळालेले आहेत, जे पैसे तुम्ही वाटलेले आहेत त्याला तुम्ही माननीय राज्यपालांची परवानगी घेतली असेल तर "होय" म्हणून सांगावे. परवानगी घेतली नसेल तर "नाही" म्हणून सांगावे. ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेण्याच्या बाबतीतील मुद्दा वेगळा आहे. तुम्ही राज्यमंत्री आहात. तुम्ही शपथ घेतलेली आहे. प्रत्येक वेळी पैसे देताना तुम्ही ॲडव्होकेट जनरल यांना विचारता काय ? मग त्यावेळी तुम्ही कसा काय निर्णय घेता ? तुम्ही घेतलेला निर्णय चुकला असेल तर "चूक झाली" असे सांगा किंवा निर्णय बरोबर असेल तर तो "बरोबर आहे" असे सांगा. दूध का दूध पानी का पानी करुन टाका.

डॉ. सुनील देशमुख : माननीय सदस्यांनी माझी तारीफ केली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. माननीय सदस्यांनी कायदेशीर मुद्दा उपस्थित केल्यामुळे त्यासंदर्भात ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेणे आवश्यक आहे...

श्री. नितीन गडकरी : मी माननीय वित्त राज्यमंत्री महोदयांना एक मार्काचा सोपा प्रश्न विचारतो. आपण 1041 कोटी रु.पैकी 263 कोटी रुपयाचे जे रिॲप्रोप्रिएशन केले ते त्याच रिजनमध्ये केले की दुस-या रिजनमध्ये केले ? त्यासाठी आपण माननीय राज्यपालांची परवानगी घेतलेली आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे हे आहे की नाही, हे विचारण्यासाठी हा प्रश्न ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे रेफर केलेला आहे. त्यांचे उत्तर येऊ द्यावे.

श्री. नितीन गडकरी : याबाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले तर त्यांची बाजू बळकट होईल. ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन आल्यानंतर त्याबाबतीत काय करायचे ते आपण नंतर बघू. तुम्ही निधीचे ॲलॉकेशन करण्याच्या अगोदर माननीय राज्यपालांना विचारले होते काय ? जे काही सत्य असेल ते उघड व्हावे एवढीच माझी मागणी आहे.

डॉ. सुनील देशमुख : ते मी तपासून सांगतो..

श्री. नितीन गडकरी : माननीय राज्यमंत्री महोदय काय तपासून सांगणार आहेत, हे मला समजत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : माननीय राज्यपालांना त्या संदर्भात पत्र गेले आहे की नाही, हे तपासावे लागेल. शेवटी कोणत्याही मंत्र्यांला त्याच्या विभागाच्या संदर्भातील सगळा पत्रव्यवहार माहीत असावा, असे अपेक्षित नाही. त्यामुळे माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत मी माहिती घेऊन सांगतो.

श्री. नितीन गडकरी : या सभागृहामध्ये अतिशय महत्वाच्या विषयावर मी जवळपास 25-30 मिनिटे घटनेतील तरतुदी सांगून चर्चा केली. माननीय राज्यमंत्री हे एम.बी.बी.एस. डॉक्टर आहेत. आम्ही महाविद्यालयीन जीवनात एकत्र शिक्षण घेतले. ते माझे मित्र तसेच डॉ.श्रीकांत जिचकार यांचे शिष्य आहेत. ते कधी खोटे बोलत नाहीत. मंत्रीपद गेले तरी, ते खोट बोलणार नाहीत. त्यांचा तसा स्वभाव आहे. तेव्हा माननीय राज्यपालांची परवानगी घेतली की नाही या प्रश्नाचे "होय" की "नाही" असे उत्तर त्यांनी द्यावे.

डॉ. सुनील देशमुख : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरीसाहेबांना मी सांगू इच्छितो की, 1941 कोटीसाठी माननीय राज्यपालांची परवानगी घेतलेली होती. 1321 कोटीसाठी माननीय राज्यपालांची परवानगी घेतलेली नव्हती. 2001साली माननीय राज्यपालांनी पहिल्यांदा डायरेक्शन्स दिल्या. धक्कादायक बाब अशी की, या 5 वर्षात सिंचन क्षमता 64.55 इतकी झाली. उर्वरित महाराष्ट्रामध्ये 12.59 पेक्षा ती अधिक भरुन निघाली. 1.4.2005 रोजी उर्वरित महाराष्ट्राची सिंचन क्षमता मायनस 3.86 इतकी आहे. गेल्या 53 वर्षत 29 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. त्यासाठी 39 हजार कोटी खर्च करण्यात आले. त्यातील 42 टक्के निधी फक्त 6 जिल्ह्यासाठी खर्च झाला.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ...

सभापती महोदय, जवळजवळ 12 हजार 146 कोटी रुपये हे फक्त सहा जिल्हयात खर्च झाले आहेत आणि राज्यपाल महोदयांच्या डायरेक्शन आल्यानंतर सुध्दा 2003-04 या वर्षात राज्यात 50 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली त्यातील एकटया पुणे विभागात 26000 हेक्टर सिंचन क्षमता आणि बाकी विभागात 2 ते 14 हजार एवढी सिंचन क्षमता निर्माण झाली. पाणी उपलब्ध आहे किंवा नाही याचा संबंध नाही. सभापती महोदय, कोकण विभागात 45.54 टक्के जलसंपत्ती आहे त्यावर 5 टक्के खर्च झाला. कृष्णाखोरेमध्ये 21.56 टक्के जलसंपत्ती आहे त्याच्यावर 42 टक्के खर्च झाला. राज्य शासनाचा मंत्री म्हणून यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी पावले टाकलेली आहेत.यापूर्वी हे जरी घडले असले तरी भविष्यात असे घडू नये असा आमचा प्रयत्न आहे. विदर्भातील मंत्री म्हणून जरी विचार केला तरी माझ्या अमरावती जिल्हयामध्ये 1 लाख 60 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याची जबाबदारी आलेली आहे. मागे काय घडले आहे यापेक्षा याच्यापुढे असे घडू नये यासाठी मी जास्त प्रयत्नशील राहणार आहे. 2005-06 या वर्षामध्ये जे कमी पैसे मिळाले आहेत ते 2006-07 या वर्षात कसे भरुन निघतील आणि येणाऱ्या आर्थिक वर्षात जास्तीत जास्त जो अनुशेष आहे तो कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. राज्य शासनाचे धोरण याच पध्दतीचे राहणार असल्यामुळे येणाऱ्या काळात नक्कीच अनुशेष भरुन निघेल याबद्दल माझ्या मनात खात्री आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पैसे नका देऊ पण अन्याय कसा झालेला आहे हे विदारक सत्य माननीय मंत्रीमहोदयांनी रेकॉर्डवर आणले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. राज्यपालांची परवानगी घेतली नाही असे आपण सांगितले. हा निर्णय कॅबिनेट मंत्र्यांनी घेतला किंवा सरकारने घेतला हे मला माहीत नाही पण तुम्ही हे मान्य केले. तिसरा मुद्दा म्हणजे एका रिजनमधून दुसऱ्या रिजनमध्ये पैसे ट्रान्सफर करता येत नाहीत. 263 कोटी रुपयांमध्ये तुमच्या अमरावती जिल्हयाचे सुध्दा पैसे असतील. अमरावती जिल्हयाचे पैसे अकोला जिल्हयाला किंवा त्या रिजनमधील अन्य जिल्हयाला वळविता येतील. परंतु अमरावतीचे पैसे औरंगाबादला वळविता येणार नाहीत किंवा औरंगाबाद जिल्हयाचे पैसे कोल्हापूरला वळविता येणार नाहीत. 263 कोटी रुपयांचे वाटप रिजन टू रिजन केले आहे किंवा अन्य रिजनमध्ये पैसे वळविले आहेत याचे उत्तर द्यावे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, शासन ॲडव्होकेट जनरलचा सल्ला घेणार आहे. त्यांच्यासाठी काही उत्तरे ठेवावी लागतील. मीच सगळी उत्तरे दिली तर अडचण होईल. मराठवाडयाच्या बाबतीत श्री. श्रीकांत जोशी यांनी मुद्दा उपस्थित केला. विदर्भावर जसा अन्याय झाला तसा मराठवाडयावरही झालेला आहे. जवळजवळ 1500 कोटी रु 5 वर्षात मिळालेले नाहीत. जे न्याय्य पैसे होते ते मिळाले नाहीत हे खरे आहे. मराठवाडयाच्या बाबतीतील हा अन्याय येणाऱ्या काळामध्ये दूर क रण्याचा प्रयत्न करु. लेंडी प्रकल्पाबद्दल पैशाची व्यवस्था केलेली आहे. इंटरस्टेट प्रकल्प असल्यामुळे त्यासाठी पैशाची तरतूद केलेली आहे. पाटबंधारे खात्याच्या 827 कोटी रुपयांच्या पूरक मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो. वित्त आणि नियोजन विभागाच्या 2 मागण्यांबाबत याठिकाणी चर्चा करण्यात आली. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधान परिषद सदस्यांना नियोजन विभागाकडून आलेल्या सूचनांनुसार आमदारांकरिता असलेला स्थानिक विकास निधी वितरीत केला जातो असे सांगितले. नोडल डिस्ट्रीक्ट एकच केल्यामुळे अडचण होते.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. कानडे..... 20:35

डॉ. सुनील देशमुख .......

महोदय, ज्या विधानपरिषद सदस्यांना मतदार संघ आहे त्या मतदारसंधाशी संबंधित जिल्हयांना निधी वितरित केला जातो. पण ज्यांना मतदारसंघ नाही जसे आपण सांगितले की, आमदारांनी निवडून दिलेले वगैरे. त्यांना त्यांच्या सूचनेप्रमाणे राज्यात वेगवेगळया जिल्हयात निधी देता येतो. अशा निधीतून त्यांनी 5 लाखाचे पत्र एखादया जिल्हयाला देण्याचे सुचविले तर त्यासाठी प्रत्येक वेळेस नियोजन विभागामार्फत त्या त्या जिल्हाधिका-यांकडे हे पत्र पाठवावे लागते. जिल्हाधिकारी त्या संबंधित कामाची तपासणी करुन पुन्हा नियोजन विभागाकडे ते पत्र पाठवितात. त्यानंतर निधी वितरित केला जातो. पण या नवीन पध्दतीमुळे एखादा नोडल जिल्हयाची निवड करुन त्या जिल्हयासाठी 80 लाख रुपये द्यावेत अशी सूचना केल्यानंतर त्या जिल्हाधिका-यांकडे हे पैसे आपण ठेवणार आहोत. त्यामुळे आपल्याला फक्त त्याच जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवावयाचा आहे व त्यामुळे त्यांना प्रत्येक वेळेस नियोजन विभागाकडे जाण्याची गरज राहणार नाही. कारण जो जिल्हा या आमदारांनी निवडलेला असतो त्यामध्ये ती 80 लाखाची रक्कम वर्ग करण्यात येईल म्हणून प्रत्येक वेळेस नियोजन विभागाची परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. त्या त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी संबंधित कामाची तपासणी करुन पाठविणार व यासंबंधीच्या पॉवर्स त्यांना डेलिगेट करण्यात येतील. राज्यसभेच्या खासदारांचा निधी देखील अशाच प्रकारे वाटप करण्यात येतो. म्हणून सन्माननीय सदस्यांना याचा फायदाच होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी आमदार निधी लॅप्स होऊ नये असा मुद्दा येथे उपस्थित केला आहे. त्याबाबत मी असे सांगेन की आमदारांचा निधी त्या त्या वर्षीच खर्च होणे अपेक्षित आहे. जो निधी शिल्लक राहतो तो त्या वर्षाअखेर समर्पित होतो. म्हणून आपण जे 80 लाख रुपये देतो त्याच्या दीड पट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह पॉवर्स संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देतो. मागील वर्षी निवडणुका असल्यामुळे परिस्थिती वेगळी होती. त्यामुळे साडेतीन महिन्यात हा पैसा खर्च होऊ शकला नाही म्हणून खास बाब म्हणून आपण मान्यता दिली आहे. पण दरवर्षी हे करायला लागलो तर ती एक प्रकारे बजेटरी इररेग्युलॅरिटी होऊ शकेल. यावर्षी सुध्दा आपण तशी परवानगी देणार आहोत, एवढेच या निमित्ताने सांगून नियोजन विभागाच्या 7 मागण्या आणि वित्त विभागाच्या 8 मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के (गृहनिर्माण मंत्री) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या मागण्यांबाबत सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आपले विचार मांडत असतांना महानगरपालिकेबाबत मुद्दा मांडला. त्याचे स्पष्टीकरण करीत असतांना मी असे सांगेन की, मुंबई महानगरपालिकेकडे थकित असलेली 38.20 कोटी इतकी रक्कम शासनाने तात्काळ भरण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे आंबोडकर आवास योजनेच्या कामाच्या संदर्भात जी विचारणा केली आहे त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, 55084 घराचे काम सुरु केले व त्यातील 46500 घरे बांधून पूर्ण झाली व उर्वरित घरे सन 2007 पर्यंत पूर्ण करण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांनी स्व. नर्गिस दत्तनगर येथील वसाहतीतील 222 घरासाठी लाभार्थ्यांची पात्रता जिल्हाधिकाऱ्यांनी ठरविलेली आहे व त्या पध्दतीने ती योजना राबविण्यात आलेली आहे. एवढे बोलून गृहनिर्माण विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

------------------

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, वन विभागाच्या पुरवणी मागण्यांवर दोनच सन्माननीय सदस्य बोलले असल्यामुळे सभागृहाने वन विभागासाठी कमी प्रॉयॉरिटी दिली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंतय प्र.पाटील यांनी विभागीय चौकशीची मागणी केली आहे. चौकशी अहवाल आल्यानंतर जरूर कारवाई करण्यात येईल. तसेच खारफुटीचे संरक्षण करण्यासंबंधी मागणी करण्यात आली आहे. शासकीय व खाजगी जमिनीवरील खारफुटी आता राखीव वन म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दै.केसरीमधील बातमीचा उल्लेख येथे केला आहे. खाजगी वन संज्ञेचा कायदा हा 1975 चा आहे. पुणे जिल्हयातील जमीन घोषित केल्यानंतर 7/12 वर आली नव्हती हे लक्षात आल्यानंतर ती जमीन 7/12 वर घेण्यात आलेली आहे. त्यानंतर जी काही वनेतर कामे झाली आहेत त्यासंबंधी नोटीस बजावल्या आहेत. 12.5 हेक्टर जमिनीच्यावर या कायद्यामध्ये आलेले आहेत. यात वेगळे काही करण्यापेक्षा कायद्याप्रमाणे कारवाई करीत आहोत. आता चूक सुधारण्याचे काम चालू आहे. तसेच, पेंच प्रकल्पाचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी पुढाकार घेऊन काम सुरू करण्यात आले आहे. तेव्हा मी सन्माननीय सभागृहाला विनंती करतो की, वन, पर्यटन व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात.

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेतला आहे, त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो व आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी सभागृहाला विनंती करतो.

**तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी)** : सन 2005-2006 च्या पुरवणी मागण्यांवरील पहिल्या दिवसाची चर्चा आता संपलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरूवार, दिनांक 23 मार्च 2006 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 8 वाजून 43 मिनिटांनी गुरूवार, दिनांक 23 मार्च 2006 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही